म. ग्रं. सं. ठाणें
विषय भारत
सं. क्र. ५८८

# टालिन

अर्थात्

# सोव्हिएट रशिया

चैतन्य प्रकाशन

RLFBK-0006159

लेखक—अमरेन्द्र ]

[ मूल्य दोन रुपये

০০৩৪

ग्रं. क्र. ५

# स्टालिन

अर्थात्

# सोव्हिएट रशिया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६७५८

लेखक—अमरेन्द्र

RLLBK-0006159

जुलै १९४१ ] [ पृष्ठसंख्या २०८

मूल्य दोन रुपये

प्रकाशक-सीताराम मोरेश्वर खरे
२५२/४ ब, सदाशिव पेठ, पुणें २.

चैतन्य प्रकाशन

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

ब्लॉक-के. कृ. खाडीलकर, पुणें.
चित्र-नॅशनल आर्ट सर्व्हिस, मुंबई.

मुद्रक-बाळकृष्ण भाऊ जोशी
ज्ञानविलास प्रेस, पुणें.

माझ्या





आई-वडिलांना

ॐ

सन्मान्य वाचक,

प्रथमत:च सांगून टाकतों कीं, मी कोणी 'बडा विद्वान' नाहीं. त्या समजुतीनें हा ग्रंथ हातीं घेऊंच नका मी एक असा माणूस आहें कीं, विश्वातील अणुरेणूची उपयुक्तता, बरेवाईटपणा, जगत्कल्याणक्षण हिंदु संस्कृतीच्या विशुद्ध स्थिरतेच्या दृष्टिकोणातून पाहाण्याचा ज्याचा स्वभावच बनून गेला आहे. परमोच्च लोकशाहीचा टेंभा मिरविणाऱ्या अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रुझवेल्ट यांचे 'इतिहासप्रसिद्ध' भाषण किंवा मंत्री श्री. कॉर्डेल हल यांची युद्धोत्तर जगाची पांच कलमी योजना असो, किंवा कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिश पंतप्रधान श्री चर्चिल अथवा परराष्ट्रमंत्री श्री. ईडन यांचें जगत्कल्याणाच्या 'पवित्र, परोपकारी, उदात्त' ध्येयाचें दर्शन घडविणारें क्रांतिकारी वक्तव्य असो, नाझी जर्मनीच्या हिटलरनें उद्घोषिलेली युरोपची 'नवी घडी' असो किंवा पिवळ्या जपानच्या श्री. मॉत्सुओकांनीं वर्तविलेलें आशियाच्या 'नव्या युगा'चें भविष्य असो, त्या साऱ्या साऱ्या गोष्टींतून माझ्या भारताचें म्हणजे पर्यायानें हिंदु संस्कृतीचें कल्याण कांहीं साधणार आहे का हे मी पाहात असतों. मी माझ्या पहिल्या पुस्तकांतच सांगितले आहे कीं, साहित्यसेवा हें कांहीं माझें साध्य नव्हे, हा चरित्र-ग्रंथहि त्यासाठीं लिहिलेला नाहीं साहित्याच्या नभ:प्रांगणात (की कायसें !) हा माझ्या साहित्याचा तारा चिरंतन चमकत राहावा अशी वेडी अपेक्षा मी मुळीच करीत नाहीं. या लहानशा दीपाच्या प्रकाशांत माझ्या देशबांधवांना जर कांहीं कल्याणाचा मार्ग दिसला तर त्यातच मला समाधान आहे.

× × × ×

हें पुस्तक वस्तुतः लिहून संपलें १९४० च्या मार्च २६ ला परंतु त्यानंतर अनंत भानगडी होऊन तें आज बाहेर पडत आहे. आणि हें प्रकाशांत आलें याचें श्रेय प्रकाशक श्री खरे यांनाच बहुतेक आहे.

स्कॅनिंग

पुस्तक प्रथम लिहून संपलें त्यानतर तें अथपासून इतिपर्यंत वाचून आणि बहुमोल सूचना करून माझ्या एका सन्मित्रानें ( नाव सांगण्यास मनाई आहे) मला उपकृत करून ठेविलें आहे. प्रस्तावना लिहिण्याचे परिश्रम घेतले ते 'केसरी' चे संपादक विद्वन्मान्य श्री. तात्यासाहेब करंदीकर यानीं. त्याचे औपचारिक आभार मला मानता येत नाहींत; कारण त्याच्याविषयीं माझ्या अंत करणात जो प्रेमादराचा नितांत भाव साठविलेला आहे तो मला तसें करू देत नाहीं. उल्लेखिलेल्या ग्रंथलेखकाचा नि नियतकालिका-च्या संपादकाचा मी मनःपूर्वक आभारी आहें

—आणि तसें पाहिलें तर माझ्यासारख्या एक विशिष्ट विचारसरणी-च्या माणसाच्या हातून हा ग्रंथ लिहून बाहेर पडावा हा योगायोगच आहे एक! अर्थात् हा ग्रंथ अपूर्ण आहे याची मला स्पष्ट जाणीव आहेच.

ग्रंथ छापला जात असतानाच रूसो—जर्मन युद्ध सुरू झालें. अर्थात् त्याचा विचार यांत करणें क्रमप्राप्तच होतें. त्यासाठीं परिशिष्ट जोडावें लागलें. भाषेच्या शुद्धाशुद्धतेची जी सरमिसळ या लिखाणात दिसेल ती काहीं मुद्दाम केलेली तर काही वेळेच्या अभावामुळें राहून गेलेली आहे. नमस्ते

—अमरेन्द्र

# स्टालिनच्या शब्दचित्राची पार्श्वभूमि

महायुद्धामुळें आज जगांत जीं कित्येक प्रसिद्ध पुरुषाचीं नांवें सर्वतो-मुखी झाली आहेत, त्यात रशियाचा **सर्वाधिकारी स्टालिन** याचें नांव अग्रभागीं आहे. अशा सर्वाधिकारसंपन्न व जगविख्यात पुरुषाच्या चरित्राचा अल्पतरी परिचय आपणास असावा अशी जिज्ञासा असणें अगदीं स्वाभाविक आहे. ही स्वाभाविक जिज्ञासा तृप्त करण्यासारखें स्टालिनचें एखादें शब्दचित्र याच वेळी जनतेच्या हातीं देण्यात औचित्य असून **श्रीयुत अ. ल. गाडगीळ** यानीं ही पर्वणी साधली यात त्याचें प्रसगावधान व्यक्त होते. ज्या स्टालिनने आजपर्यंतच्या आपल्या अनाकलनीय आयुष्यक्रमानें आणि विशेषतः दोन वर्षापूर्वीच्या जर्मन सर्वाधिकाऱ्याशीं केलेल्या मित्रत्वाच्या करारानें जगाला चकित करून सोडलें, त्या स्टालिनच्या कर्तृत्वाचा व यशाचा बीजमंत्र कोणता तो जाणण्याची उत्कंठा बहुतेकास असणार. ही उत्कंठा तृप्त करण्याचे साधन म्हणून नव्हे, तर अशा साधनाचें दिग्दर्शन करण्याला हें पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे. स्टालिनचें चरित्र हें एक अनाकलनीय गूढ आहे. त्यातून हिंदुस्थानात तरी स्टालिनच्या चरित्राचे सर्व कप्पे उघडून दाखविण्याचें काम अशक्यच होय. तथापि मोठ्याच्या चरित्राकडे ज्यानें त्यानें आपल्या दृष्टीने पाहावें आणि आपला मर्यादित हेतु परिपूर्ण करून घ्यावा या न्यायानें श्रीयुत अ ल. गाडगीळ यानीं आपल्या संघटकेच्छूच्या दृष्टीने स्टालिनच्या चरित्राचा अभ्यास केला आणि तो या पुस्तकरूपानें समानशील वाचकापुढें माडला हें यथोचितच झालें.

स्टालिनच्या चरित्राचें संपूर्ण आकलन होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत स्वतः स्टालिननें आत्मचरित्र तर लिहून ठेवलें नाहींच, पण आत्मचरित्राला आधारभूत होतील अशा मुलाखतीहि त्याने फारशा दिल्या नाहीत. त्याचे बाळपणापासूनचे जीवश्च कंठश्च स्नेही कोणी आहेत व त्याच्या लिखाणावरून अथवा पत्रव्यवहारावरून त्याच्या चरित्रावर

६९५



प्रकाश पडेल म्हणावे तर तिकडूनहि निराशाच, पण याच्याहिपेक्षां खरी अडचण ही की, ज्या लोकाशीं त्याचा घनिष्ट सबध आला अशा लोकाची त्याच्याविषयींचीं मतें पाहू गेल्यास एकाचा एकाशी मेळ बसण्याची मारामार! कोणाला स्टालिन हा सद्गुणाचा पुतळा वाटतो तर कोणाला तो निर्दयतेची मूर्ति भासतो. कोणी त्याच्या आजपर्यंतच्या यशस्वी कारकीर्दीवरून त्याच्या कर्तृत्वाची प्रशसा करतो तर कोणी त्याला मिळालेलें सुयश हें केवळ योगायोगाचें फळ असें मानतो.

अशा परस्परविरोधी मतातूनहि साधारनिराधार विधानाची पारख करून घेता येते. पण स्टालिनच्या गतेतिहासासबधानें असाहि एक सशय प्रगट करण्यांत येतो की, स्टालिन हा सर्वाधिकारी झाल्यानतर त्याच्या कर्तृत्वाला व मोठेपणाला बाध येईल अशा ज्या काही घटना पूर्वकाळी घडल्या असतील त्यांचा पूर्वीचा इतिहासहि दडपून टाकून तो पुनश्च सोइस्कर अशा स्वरूपात लिहून ठेवण्यात आला! कृत्रिमतेची मजल येथपर्यंत जाऊन पोचली असेल तर खरे मूळचें नैसर्गिक स्वरूप शोधून काढणें दुष्करच मानले पाहिजे. तथापि प्रस्तुत चरित्रकार श्रीयुत अ ल. गाडगीळ याचा हा छोटासा प्रयत्न पाहिला असता त्यावरून त्यानी या सर्व प्रकारच्या अडचणींतून मार्ग काढून व कृत्रिम बहिरगाची पुटें बाजूला सारून अतरगाचा बराचसा ठाव घेतला आहे आणि ऑलिव्हर क्रॉमवेलची सुप्रसिद्ध उक्ति Paint me as I am स्वतः स्टालिनला आणि त्याच्या भक्तगणाना अमान्य असली तरी त्या उक्तीच्या अनुरोधानें स्टालिन जसा खरोखरीच असणें सभाव्य आहे तसेंच त्याचें शब्दचित्र काढून दाखविलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं, आणि या अवघड शर्यतीत एवढें प्रशसापत्र मिळविणें म्हणजे कांही लहान सहान कामगिरी नव्हे अर्थातच स्टालिनचे इतपत हुबेहूब शब्दचित्र रेखाटल्याबद्दल चरित्रकाराचें साश्चर्य कौतुकच केलें पाहिजे.

स्टालिनच्या पूर्वेतिहासात इतरानीं फेरबदल केल्यामुळें असो अथवा स्वतः स्टालिनच्या मतातच अनेक वेळा परिवर्तन झाल्यामुळें असो,

स्टालिनचें चरित्र जरी कोड्यासारखें वाटत असलें तरी त्या चरित्राकडे पाहणाऱ्याची दृष्टि जर निश्चित व अविचल असेल तर त्याला त्याच्या मनाचा ठाव लागल्याशिवाय राहणार नाहीं मत्स्ययंत्रातला मासा जरी सारखा फिरत असला तरी मत्स्यवेध करणाऱ्याची दृष्टि जर स्थिर असली तर त्याला नेमका वेध करता येतो, किंवा मूल जरी चंचल असलें तरी फोटो घेणारा जर कुशल असेल तर त्याला त्या मुलाचा फोटो पुसट न होऊं देता घेता येतो त्याप्रमाणेंच चरित्रकार जर कुशल असेल आणि त्याची चरित्र-विषयाकडे पाहण्याची दृष्टि जर ठाम असेल तर त्यालाहि आपल्या चरित्राचा विषय बरोबर रंगवितां येतो. प्रस्तुत चरित्र-कार श्री. अ. ल. गाडगीळ यांनीं आपली भूमिका निश्चल ठेवली असल्यामुळें त्यानाहि स्टालिनचें चित्र मुळाबरहुकूम रेखाटता आलें.

श्री अ. ल. गाडगीळ यांची भूमिका निःसंदिग्ध राष्ट्रीय संघटनेची आहे आणि त्या भूमिकेवरून पाहतांना त्याना स्टालिनच्या राष्ट्रीय संघटनेच्या अद्भुत करामतीची यथार्थ कल्पना आली आहे स्टालिननें जें रशियात महत्कार्य केलें तें राष्ट्रीय संघटनेचें होय राज्यक्रान्तीचा पहिला भर ओसरल्यानंतर अंतस्थ कारस्थानें आणि परकीयांचा विरोध यांच्यामुळें रशियाच्या कारभाराची जी घडी विस्कळीत झाली होती ती स्टालिननें झाडून झटकून चापून चोपून टाकटीक बसाविली. हें करीत असतांना त्यानें 'रशिया म्हणजेच मी आणि मी म्हणजेच रशिया' असें समीकरण मनाशीं पक्कें दृढ केलें होतें. फ्रान्सचा साम्राज्य-वादी राजा चौदावा लुई हाहि 'मी म्हणजेच फ्रेंच राष्ट्र' असें म्हणे. पण त्याच्यात व स्टालिनमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडण्याचें कारण हेंच कीं, चौदावा लुई हा स्वतःच्या बडेजावाकरिता फ्रान्स देशाचा बळी देण्याला कचरणारा नव्हता, आणि स्टालिन हा रशियन राष्ट्रासाठीं स्वतःचा होम करण्याला तयार आहे व त्याचें प्रत्यंतर आजपर्यंत अनेक वेळा आलें आहे. सारांश, स्टालिनला रशियन राष्ट्रापरतें दुसरें ध्येय नाहीं व दैवतहि नाहीं. याकरिताच त्यानें आपल्या वैयक्तिक प्रपंचाकडे दुर्लक्ष करूनच रशियन राष्ट्राचा प्रपंच नेटका केला हें साधण्यासाठीं

त्यानें स्वार्थावर तर पाणी सोडलेंच, पण विश्वबंधुत्वासारख्या अतिराष्ट्रीय कल्पनाच्याहि तो नादीं लागला नाहीं.

स्टालिन हा कोणत्या गुणाच्या जोरावर एवढें महत्पद पावला हा एक विचारार्ह प्रश्न आहे. स्टालिनला फारसें उच्च शिक्षण मिळालें नव्हतें आणि त्याच्या अंगीं तशी उपजत--प्रतिभाहि नव्हती. लेनिन हा खरा ध्येयवादी व प्रतिभाशाली नेता होता. त्याबरोबरच त्याच्या अंगीं अलौकिक धाडस व व्यवहारचातुर्यहि होतें. याच गुणाच्या जोरावर तो एका नव्या पंथाचा प्रस्थापक आणि प्रत्यक्ष क्रांति घडवून आणून नव्या राज्ययंत्राचा सूत्रधारहि बनला ट्रॉट्स्कीच्या अंगीं ध्येयवादित्व, शौर्य व प्रतिभाशालित्व होतें. तथापि त्याच्या अंगीं संघटनाचातुर्य नसल्यानें तो सूत्रधार होऊं शकला नाहीं. त्याचा क्रांतिवादहि राष्ट्रीय स्वरूपाचा नसून आंतरराष्ट्रीयस्वरूपाचा असल्यानें रशियन जनतेला त्याच्या ध्येयाविषयीं प्रेम वाटू शकलें नाहीं. स्टालिनच्या अंगीं उच्च ध्येयवाद नसला तरी राष्ट्रीयत्व पक्कें भिनलें होतें शौर्य, धैर्य, धाडस व संघटनाचातुर्य हे गुण त्याच्या अंगीं भरपूर होते. याशिवाय लेनिन व ट्रॉट्स्की यांच्यापेक्षाहि मनाचा कणखरपणा व खंबीरपणा स्टालिनच्या अंगीं अधिक आहे असे हे तिघे पुढारी एकविचारानें कार्य करीत होते, तोंपर्यंत ते इतरांना कर्दनकाळासारखे भासत असून अजिंक्य होते या तिघांत लेनिन हा ध्येयवादी, धाडसी व संघटक असल्यानें तोच क्रान्तीचा अध्वर्यु झाला व दुसरे दोघे त्याचे साहाय्यक झाले. लेनिन गेल्यानंतर जेव्हां ट्रॉट्स्की व स्टालिन या दोघांत शर्यत सुरू झाली तेव्हां ट्रॉट्स्कीचा आंतरराष्ट्रीय क्रांतिवादच त्याला बाधक झाला आणि संघटनाचातुर्याच्या अभावीं तो मागें पडला स्टालिनच्या अंगीं प्रतिभाशालित्व नसल्यानें तो स्वतः कोठलीहि क्रांति घडवून आणण्याला समर्थ झाला नसता. पण लेनिननें घडवून आणलेली क्रांति पुढें चालविण्याला स्टालिनच्या अंगचे संघटनाकौशल्य, माणसाची अचूक परीक्षा, मनाचा कणखरपणा इत्यादि गुण उपयोगी पडले. यावरून दिसून येईल कीं, लेनिन हा जसा स्वतः क्रांति घडवून आणू शकला, तशी क्रांति स्वतः घडवून आणण्याची

धमक स्टालिनच्या अंगीं नसली तरी प्रस्थापित क्रान्तीचें नेतृत्व स्वीकारून तिला व्यवस्थित स्वरूप देण्याचें कौशल्य व त्या नव्या सांप्रदायाशीं समरस होण्याइतकी त्यागवृत्ति स्टालिनच्या अंगीं असल्यानें तो लेनिनच्या राजवटीचा योग्य वारस होऊं शकला. मात्र लेनिन हा मुळापासून नसता आणि ट्रॉट्स्की व स्टालिन यांच्यातच चुरस लागती तर ट्रॉट्स्की हा क्रांतिकारक ठरला असता, पण त्याच्या क्रान्तींत स्टालिनला स्थान मिळालें नसतें व तो मागें पडला असता. पण लेनिन पुढारी होता म्हणून स्टालिन त्याच्यामागून त्याचा वारस होऊं शकला.

पण लेनिनचा सांप्रदाय तरी स्टालिनने जशाचा तसाच पुढे चालविला का हाहि एक प्रश्नच आहे. कोणताहि सांप्रदाय घेतला तरी त्याच्या प्रस्थापनेच्या वेळीं ज्या अंगप्रत्यंगावर जितका भर दिला जातो तितकाच तो पुढें कायम राहतो असें नाहीं. किंबहुना तसें करणें श्रेयस्कर न होता परिस्थितीप्रमाणें अंगप्रत्यंगाची अदलाबदलहि होणें आवश्यक ठरतें. तथापि आमूलाग्र फेरबदल करून देखील आपण मूळचाच सांप्रदाय चालवितों असा टेंभा मिरविणें हें अनुचित होय. या दृष्टीनें मार्क्सवाद, बोल्शेव्हिझम, कम्युनिझम, लेनिनवाद, स्टालिनवाद या पांच तत्रांत साम्य किती व विरोध किती, मूळारंभी मार्क्सनें जीं तत्वें प्रतिपादन केलीं त्यांतलीं किती तत्त्वें केव्हां कोणीं कशीं सोडलीं आणि त्यांत कोणीं, केव्हा किती भर घातली आणि अशा या बदललेल्या विद्यमान स्टालिनवादाचा तोंडवळा मार्क्सवादाशीं कितपत जुळतो याची चर्चा करणें मनोरंजक व उपयुक्तहि होईल. प्रस्तुतच्या स्टालिनचरित्रात चरित्रकारानें हा मुद्दा मांडून त्याचें दिग्दर्शन करण्याइतकें विवेचन केलें आहे व तें मोठें उद्बोधक आहे. तें वाचल्यावर स्वाभाविकपणेंच असें वाटतें कीं, मार्क्सवाद व त्याचा गोतवळा असाच स्वतंत्र विषय घेऊन त्यावर साधार व भरपूर भवतिनभवति होणें जरूर आहे. प्रस्तुतचें पुस्तक हे केवळ स्टालिनचें चरित्र असल्यानें त्यात हा विषय अनुषंगानें जेवढा आला तेवढ्याचें मार्मिक विवेचन यांत आले असून तें लेनिनभक्ताच्या मनाला धक्का देण्यासारखें आहे.

ओघानें आलेंच म्हणून आणखी एका मुद्द्याचें येथेंच विवेचन करू. मार्क्सचे अनुयायी समतावादी असल्यानें ते अगदी काटकसरीनें राहतात व त्याची राहणी अगदीं सामान्य माणसाच्या राहणीइतकीच साधी असते असें सांगण्यात येतें पण हें विधान सरसकट सगळ्याना लागू पडत नसून काहीं झालें तरी ज्याचा त्याचा स्वभावच अखेरीस प्रभावी ठरतो स्टालिन हा अठरा कोटि रशियन लोकांवर सर्वाधिकार चालवीत असून देखील त्याचा पगार अवघा ५० डॉलर्स आहे असें म्हणतात. पण स्टालिनचे राहण्याचे अनेक राजवाडे मॉस्कोच्या उपनगरांत व काळ्या समुद्राच्या तीरावर आहेत आणि ते सर्व अद्यावत् सुखसोयींनीं संपन्न आहेत. त्याच्या बागा व मळे असून त्यांत शेकडों मजूर राबत असतात हा सर्व खर्च कसा चालतो याचें कित्येकास कोडें पडेल. पण संस्थानातल्या जमाखर्चाची ज्याना माहिती आहे त्याना याचें मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. स्टालिनचे राजवाडे, मळे, बागा याच्यावरील हा सगळा खर्च रशियाच्या सरकारी बजेटांत रस्तेदुरुस्ती, आरोग्य खातें, ग्रामसुधारणा इत्यादि खात्याच्या खर्चांत समाविष्ट केला जातो. संस्थानिकानी आपला खाजगी खर्च मर्यादित करावा असें सांगताना जेव्हा रशियाचा दाखला देण्यात येतो, तेव्हा तो दाखला देणाऱ्यांनीं रशियाच्या बजेटातली ही गोमहि लक्षात ठेवावी

मार्क्सवादातील '**समते**' **चा** अर्थ 'प्रत्येकाला त्याच्या त्याच्या गरजेइतकेंच वेतन देणें' असा केला जातो. या दृष्टीनें रशियांत '**समता**' प्रस्थापित झाली आहे काय, असा प्रश्न विचारला असता स्वत. **स्टालिनच** सांगतो कीं, ही समजूतच चुकीची आहे '**प्रत्येकाकडून त्याच्या लायकीप्रमाणेंच काम घेणें आणि प्रत्येकाला त्यानें केलेल्या कामाच्या मानानें मोबदला देणें**' असाच कम्यूनिझमचा प्रथमावस्थेंतला दंडक आहे. 'ज्याला त्याला त्याच्या गरजेइतकेंच वेतन देणें' ही समतेची कल्पना ध्येय म्हणून कम्यूनिस्टांपुढे आहे; पण ती कल्पना व्यवहारात येण्यापूर्वी प्रत्येक मनुष्य आपआपल्या लायकीप्रमाणे आपण होऊन काम करण्याइतका आणि आपल्या गरजेइतकाच मोबदला उचलण्या-

इतका प्रामाणिक झाला पाहिजे. इतकी सात्त्विक वृत्ति अद्यापि समाजात आली नाहीं, म्हणून तसा दडकहि अमलात नाहीं. तें एक आमचें दूरचें ध्येय आहे !

*स्टालिनचें हें उत्तर वकिली थाटाचें आहे.* याचा निष्कर्ष एवढाच कीं, आजमितीला खुद्द रशियातहि इतकी सचोटी नाहीं म्हणून समताहि नाहीं, आणि इतकी सचोटी कृतयुगाशिवाय मनुष्याच्या अंगीं येणारहि नाहीं, म्हणून हें समतेचें ध्येय कृतयुग आल्यावाचून अमलात येऊ शकणार नाहीं ! हें जर खरें तर मग या कलियुगात त्या ध्येयाच्या नावावर कलह निर्माण करण्याचें प्रयोजन तरी काय ?

रशियात कम्यूनिझमची प्रस्थापना झाली यावरून ही पद्धति जनतेला हितावह असून ती कोणत्याहि देशात रूढ करता येईल अशी जी समजूत आहे ती चुकीची आहे रशियात देखील ती सुखासुखी अमलांत आली नाहीं, जुलूमजबरदस्तीनेंच ती अमलात आली. आणि ज्या देशातले लोक रशियनाप्रमाणेंच आळशी, अल्पसंतुष्ट, दैववादी आणि जुलमापुढें निमूटपणें मान वाकविणारे असतील तेथेंच ती अमलात येऊ शकेल समंजस व स्वातंत्र्यप्रिय जनतेंत त्याची डाळ शिजू शकणार नाहीं. आणि रशियात देखील वरील दडपण कायम आहे तोपर्यंतच तिची बजावणी. तें दडपण कमी झालें कीं पुनश्च 'येरे माझ्या मागल्या' आहेच. रशियातले लोक कम्यूनिझमचे चाहाते झाले आहेत याचा अर्थ दृष्टान्तानें व्यक्त करावयाचा असल्यास गोव्यातले बाटलेले हिंदु लोक जितपत मनानें ख्रिस्ती झाले आहेत तितपतच रशियन लोक कम्युनिस्ट झाले आहेत. दोघाच्याहि वरचें दडपण दूर करा म्हणजे खरा प्रकार दिसून येतो. शिवाय रशियात चालू असलेला बोल्शेव्हिझम आणि जर्मनीतला नाझीझम या दोहोंत अंतर तरी किती आहे, हें ज्याला पहावयाचें असेल त्यानें या पुस्तकातलीं १५३, १५४, १५५ ही पृष्ठें पाहावीं.

चरित्रकारानें ही जी तुलना केली आहे, तीवरून असा प्रश्न साहजिकच मनात उद्भवतो कीं, एवढी क्रान्ति, इतका रक्तपात, एवढा गाजा-

वाजा करून जें नवे समाजतंत्र चालू केलें, तें तसेंच चालू का राहिलें नाहीं ? त्यात इतका बदल कसा झाला ? याचें उत्तर हेंच की, मानवी प्रकृतीच्या विरोधक अशी कोणतीहि समाजपद्धति जुलूमजबरदस्तीविना टिकू शकत नाहीं आणि कोणत्याहि समाजावर कोणीहि कायमचें दडपण घालू शकत नाहीं. झारच्या वेळची गुलामगिरी ही जितकी निसर्गविरुद्ध होती तितकाच कम्यूनिझमहि निसर्गविरुद्ध असल्यानें जोपर्यंत त्याला जबरदस्त राजसत्तेचा पाठिंबा आहे तोंपर्यंतच तो टिकणार. तो पाठिंबा कमजोर झाला की कम्यूनिझमहि घसरगुडीला लागणार व तसाच तो रशियात घसर-गुडीला लागला आहे. आस्तिकवाद प्रकृतिसिद्ध का नास्तिकवाद प्रकृति-सिद्ध या वादाचा निकालहि कायद्याचें बंधन दूर करा म्हणजे आपोआप कळून येतो. नास्तिकवाद रशियात मुद्दाम शिकविला जातो व कायद्याच्या जोरावर टिकविला जातो. आस्तिकवाद शिकवावा लागत नाहीं व त्या-साठीं कायद्याची जबरदस्तीहि करावी लागत नाहीं. रशियन लोक चोवीस वर्षांच्या नास्तिक वादाच्या शिकवणुकीनंतरहि मनांतून आस्तिकच राहिले यावरूनच काय तें समजावें.

राष्ट्रीयवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद यासंबंधातहि असाच अनुभव आला आहे. ‘ जगातल्या सगळ्या कामगारबंधूनो, एकजूट करा,’ असा कितीहि कंठशोष केला, तरी राष्ट्राराष्ट्रांत युद्ध जुंपले की, ज्या त्या राष्ट्रांतला मजूर वर्ग आपल्या सरकारलाच पाठिंबा देण्यास निसर्गत प्रवृत्त होतो. त्यामुळें मजूरवर्गाच्या संपाच्या शस्त्रानें महायुद्धें बंद पाडू ही कल्पना फोल ठरली आहे महायुद्धासाठीं जर्मनींतल्या नाझी सरकारला तेथल्या मजूर वर्गाचा जितका पाठिंबा आहे तितकाच रशियांतल्या बोल्शेव्हिक सरकारासहि तेथल्या मजूर वर्गाचा पाठिंबा आहे तेव्हा जगातला सगळा मजूर वर्ग एक कसा होणार ?

अशा अनेक नैसर्गिक अडचणींमुळें रशियातला बोल्शेव्हिझम घसर-णीला लागला असून झारशाहीतले राज्यतंत्र व स्टालिनशाहींतलें राज्यतंत्र यात नाममात्र फरक राहिला आहे. झारशाहींतला अनैसर्गिक जुलूम

मात्र दूर झाला, पण कोणत्याहि स्वरूपाच्या क्रान्तीनें तो दूर झालाच असता कारण अनैसर्गिक गोष्टी जगात चिरकाल टिकूं शकत नाहीत.

अनैसर्गिक पद्धति निसर्गाच्या विरोधानेंच बदलत असेल हें मान्य केलें तरी मनुष्याचे विचार बदलून क्रांतिकारक पुढारी क्रान्तिविरोधक कसा होतो असा एक प्रश्न पुढें येतो. याला उत्तर असें कीं, क्रान्तिकारकाला समाजात जेवढे म्हणून दोष दिसतात, तेवढे दोष दूर करण्यासाठीं म्हणून तो क्रांति घडवून आणतो. पण एकदा क्रांति घडवून आणल्यावर जी नवी घडी बसविण्यात येईल, तिच्याविषयीं त्या क्रांतिकारकासच अपत्य-प्रेम वाटू लागतें; आणि मग जर दुसरा कोणी क्रान्तिकारक ती घडी बदलून नवी घडी घाला असें म्हणू लागेल तर जुन्या क्रान्तिकारकाच्या दृष्टीनें तो नवा क्रान्तिकारक बडखोर ठरतो व त्या बडाचा मोड करण्या-कडे जुना क्रान्तिकारक आपली सर्व सत्ता उपयोगात आणू लागतो. अर्थातच जुन्या क्रान्तिकारकाच्या मनातला सुधारणेचा उमाळा ओसरून जाऊन नव्या क्रान्तिकारकाच्या दृष्टीनें जुना क्रान्तिकारक अधिकारलोलुप व सनातनी वृत्तीचा ठरतो

आजमितीला रशियात स्टालिनच्या राजवटीत जी परिस्थिति निर्माण झाली आहे तिची उपपत्ति मागण्याकरिताच वरील विवेचन केलें आहे. जेवढी सुधारणा आपल्याला मान्य वाटेल तेवढीच टिकावी आणि ती सीमा सोडून नवीन कांही करण्याचा कोणी प्रयत्न केला, कीं तो हाणून पाडावा अशी स्वतः स्टालिनचीच मन:प्रवृत्ति झाली आहे; आणि या प्रवृत्तीमुळेंच रशियांतले भयंकर हत्याकांड घडून आलें. पूर्वींची झारशाही ज्या विचारसरणीवर अधिष्ठित होती त्या रेषेपलीकडील भूमि त्या वेळी बडाची सीमा ठरत असे. आज स्टालिनशाही ज्या विचारसरणीवर अधिष्ठित आहे त्या रेषेच्या पलीकडील सीमा आता बडाची सीमा ठरत आहे रेखांश कोठून मोजावयाचा ते गाव बदललें तरी प्रकार एकच. अर्थातच ज्यानीं जुन्या झारशाहींतल्या हत्याकांडाचा निषेध केला त्यांनीं स्टालिनशाहींतल्या हत्याकांडाचाहि कडकडून निषेध

केला पाहिजे. तो निषेध केला जात नाहीं हें कितपत न्याय्य आहे हें या पुस्तकाच्या वाचनावरून ठरेल.

हें चारित्र लिहिले गेलें त्या वेळी रूसो—जर्मन युद्ध सुरू झालें नव्हतें. हें युद्ध सुरू झाल्यानें हिटलरशाही अधिक टिकाऊ का स्टालिनशाही अधिक टिकाऊ असा नवाच प्रश्न उपस्थित झाला आहे या प्रश्नाचें उत्तर आजच देणें अशक्यप्राय आहे या झगड्याचा शेवट ज्या प्रकारानें होईल त्यावरून या पुस्तकातील विचारसरणीला निराळी कलाटणी द्यावी लागेल कीं काय अशीहि शंका मनात डोकावते. तसें झाल्यास या चरित्रग्रथाला आणखी पुरवणी जोडून नवीन परिस्थितीची सोपपत्तिक चर्चा करावी लागेल. तशी वेळ येईपर्यंत वाचकानी या पुस्तकातली विचारसरणी वाचून पचनीं पाडून ठेवावी. ‘ नवी विटी नवें राज्य ’ या न्यायाला अनुसरून युरोप खडातल्या कोठल्याहि देशात नवी राजवट सुरू झाल्यास तदनुरोधानें नवें चरित्र लिहिण्याची प्रस्तुतच्या लेखकाच्या मनाची तयारी आहे असें गृहीत धरूनच मी ही प्रस्तावना संपावितों.

गायकवाड—वाडा<br>आषाढ शु. ८।१८६३ } ज. स करंदीकर

# अन्तरंग


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | जागतिक कोडें | १ |
| २ | लुटारू धर्मोपदेशक | १२ |
| ३ | क्रांतिकारकातील पोलादी पुरुष | ३० |
| ४ | लेनिनचा संधिसाधू पट्टशिष्य | ३४ |
| ५ | थोडा पूर्वेतिहास | ४५ |
| ६ | बडखोर सेनापति | ६९ |
| ७ | स्टालिन विरुद्ध ट्रॉट्स्की | ९३ |
| ८ | पंचवार्षिक योजनाचें अरिष्ट | १०७ |
| ९ | क्रान्तीनें गिळलेले क्रान्तिवीर | १२४ |
| १० | अपूर्व राज्ययंत्र | १४४ |
| ११ | अपवित्र सगनमत ! | १५७ |
| १२ | रशिया—चढाऊ राष्ट्र | १७२ |
| १३ | स्टालिन म्हणजे रशिया | १९३ |
| १४ | हा ' स्वर्ग ' तुम्हाला हवा ? | २०३ |
| | परिशिष्ट ( छापता छापता ) | २०८ |

चार छायाचित्रें

( १ ) जोसेफ स्टालिन, ( २ ) १९३४ मधील स्टालिन व सहकारी, ( ३ ) रूसो—जर्मन मैत्रीची घोषणा, ( ४ ) क्रेमलिन राजवाडा.


' सह्याद्रि, झंकार, विविधवृत्त, चित्रा, धनुर्धारी, पूर्णिमा, मौज ' वगैरे मराठी आणि 'The World Review, The Spectator, The Nineteenth Century and After ' इत्यादि इंग्रजी नियतकालिकातील लिखाणाचा आधार पुस्तकाला घेतलेला आहे.

जोसेफ स्टालिन



व्यक्तिदर्शन

# जागतिक कोडें !

तें एक जागतिक कोडें आहे !

त्याच्या मित्रांना अगर शत्रूना, उपासकाना वा विरोधकाना, दूरच्याना किंवा जवळच्याना तें अद्यापि सुटलेलें दिसत नाही.

आणि आज खरोखरच भाई जोसेफ व्हिसॅरिव्हओनोव्हिच स्टालिन याचें जीवन म्हणजे एक अतर्क्य कोडें होऊन बसले आहे खरें !

फिनलंडवरील अन्याय्य आक्रमण, पोलंडची निर्दय लचकेतोड, नाझी सर्वाधिकाऱ्यांशी असमर्थनीय संगनमत, १९३७ सालातील सहकाऱ्यांचे भीषण हत्याकांड आणि इतर अनेक काळ्याकुट्ट्या कृत्यांच्या पार्श्वभूमीवर या जॉर्जियन हुकूमशहाचा वैचित्र्यपूर्ण जीवनपट रंगविलेला दिसत आहे. ही स्टालिनच्या कर्तृत्वाची विध्वंसक काळी बाजू! किंचित्काल साऱ्या जगाला दिपवून टाकणारी अशी दुसरी विधायक बाजूहि आहे, ती म्हणजे रशियाची पंचवार्षिक योजना, जगातील सर्वश्रेष्ठ रशियन लाल सेना आणि रशियाचें औद्योगीकरण यापैकीं कोणतीहि एकच बाजू पाहाणाराला स्टालिन कोडें वाटणार नाही विध्वंसक बाजू पाहाणारा धिक्कारून म्हणेल—' स्टालिन क्रूर हुकूमशहा आहे ! विधायक बाजू दृष्टींत आणणारा गौरवून सांगेल—' भाई स्टालिन जगाचा उद्धारक आहे ! '—नि यामुळेंच मी म्हणतो कीं, तें एक जागतिक कोडें आहे !

१९४ साल संपेपर्यंत असें मला वाटे. जगहि त्याच घोटाळ्यात होतें परंतु ४१ वें खिस्ताब्द उजाडलें, नि हळूहळू त्या अतर्क्य कोड्याचा उलगडा होऊं लागला. माझ्या दृष्टीनें तें कोडें आता सुटलेलें आहे. कसें तेंच सांगणार आहें यापुढें

* * *

# लुटारू धर्मोपदेशक ?

कॉकेशस पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून शेळ्यामेंढ्यांचे कळप घेऊन फिरणारा नि आपण उत्तम दरवडेखोर कसें बनावें याचा अभ्यास करणारा जोसेफ व्हिसॅरिओनोव्हिच स्टालिन आज जगातील एका प्रथमश्रेणीच्या बलाढ्य राष्ट्राचा सर्वाधिकारी म्हणून जगापुढें उभा आहे.

मनुष्य महत्पदाला चढला म्हणजे त्याच्या बालपणातील वा पूर्वायुष्यातील लहानमोठ्या आठवणींना उजळा देऊन त्यांचा संबंध—कांहीं वेळां ओढून ताणून सुद्धां—त्याच्या मोठेपणाशीं जोडावयाचा प्रयत्न अनेकदा केला जातो

स्टालिनच्या लहानपणीं घडलेली अशीच एक गोष्ट त्याच्या जीवनावर चिरपरिणाम घडविणारी ठरली असें एका लेखकाचें म्हणणें आहे. गोष्टी अनेकदा योगायोगानें जमून येतात तशातलीच हीहि एक असें वाटलें तर म्हणावें, परंतु ही घटना मात्र अति मनोरंजक दिसते, एवढें खरें; कारण दरवडेखोरींतून धर्मशिक्षणाकडे वळविला गेलेला नि अखेर टिफ्लिसच्या धर्ममठातील आचार्यांनाहि गुंगारा देऊन क्रांतिकारकांत

घेऊन निसळणारा स्टालिन याचें आयुष्य म्हणजे चमत्कारिक योगायोगाची एक मालिकाच आहे.

## अंजिराची विलक्षण करामत

टिफ्लिसमध्यें घडलेल्या एका घटनेचा वृत्तांतहि असाच विलक्षण आहे. एके दिवशीं जोसेफ बाजारात कांही फळें खरेदी करण्यासाठीं गेला असता एका फळवाल्यानें त्याच्याकडे दृष्टिक्षेप करून मंद स्मित केलें व एका कागदाच्या तुकड्यात त्याला पाहिजे होते ते अंजीर बांधून दिले. तें कागदाचें चिटोरें म्हणजे एक क्रांतिकारकाचें पत्रक होतें. जोसेफचें लक्ष सहजच त्या कागदाकडे गेलें व तो तें पसरून वाचू लागला.

"दररोज पिळल्या जाणाऱ्या शेतकरी–कामकऱ्यानो !" त्या पत्रकाचा प्रारंभ होता हा. –"तुम्ही किती दिवस हा अमानुष जुल्म सहन करीत स्वस्थ बसणार ? एकीची गर्जना करा की जुलमी राजसत्तेचा नाश झालाच म्हणून समजा !"

प्रथमदर्शनीं या धर्मोपदेशकाचें डोकें संतापानें भडकल्यासारखें झाले. 'एक मोठा राजा, आदरणीय विभूति असें समजून ज्या झारची चित्रें आम्ही धर्ममठातून नि देवळातून आदरानें ठेवितों, त्या झारविरुद्ध बंड करा म्हणून सांगणारा कोण हा पाजी इसम ? याचेंच डोकें प्रथम मारावयास पाहिजे.'–अशा तऱ्हेचे विचार एकदम त्याच्या मनात उभे राहिले यात आश्चर्य नव्हतें पण तो तसाच मठांत परत आला, येथें मात्र त्याला आश्चर्याचा धक्का बसला असावा वास्तविक तो एक अबोलका, एकलकोंडा प्राणी म्हणून समजला जाई. परंतु त्याच्या त्या अबोलपणानेंच त्याच्याविषयीं संशय घेण्यास जागा निर्माण झाली. तो मठात आला तो पोलीस अधिकाऱ्याकडून खुद्द त्याच्याच खोलीची झडती घेण्याचें काम सुरू होतें. त्या प्रकाराचा अर्थच त्याला कळेना अखेर त्याला समजून आलें कीं, क्रांतिकारक 'जाती' च्या संशयावरून झारचे हे आज्ञाधारक शिपाई आपल्या खोलीची तपासणी करीत आहेत. पण त्या वेळीं जोसेफला त्यांनीं अटक वगैरे केली नाहीं

पुढे थोडक्याच दिवसात त्या मठांतील दोन विद्यार्थ्यांना त्याच्याजवळ क्रांतिकारक पत्रकें सापडल्यामुळे पोलिसांनी पकडून नेलें. या घटनेचा परिणाम जोसेफच्या मनावर अति खोलपर्यंत व टिकाऊ स्वरूपाचा झाला, नि त्या घटकेपासून तो नव्या चळवळीच्या अभ्यास जोरानें करू लागला पाठशाळेची शिस्त न भगू देता तो दिवसा धर्मविषयक ग्रथांचें अध्ययन व अध्यापन करी आणि रात्रीं क्रांतिवादी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात निमग्न होऊन जात असे

याच काळात तो लेनीनचें वाङ्मयहि वाचू लागला १८८५ मध्यें लेनिनच्या भावाला तिसऱ्या अलेक्झांडरचा खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून फाशी देणार, हें वृत्त वाचून तर स्टालिनचें पित्त या जुलमाविरुद्ध सतापानें खवळून गेले कॉकेशस पर्वताच्या कुशीत त्यानें ज्या निग्रही कडवेपणाचें व जहाल वृत्तीचे बाळकडू घेतलें होते तें उसळी घेऊन उठलें काळा डगला घालून धर्मोपदेशकाचें वैठें जीवन घालविण्यास त्याच्या जागृत झालेल्या लढाऊ मनोवृत्तींनी पूर्णतया नकार दिला आणि वयाच्या १८ व्या वर्षीच हा तरुण बंडखोर 'ना दाम ना काम अशा अलख निरजन' स्थितीत क्रांतिकारकाच्या गटात शिरला टिफ्लिस नगरात ज्या एका विश्रांतिगृहात हे तरुण क्रांतिकारक जमत असत, ते विश्रांतिस्थान प्रवाश्यांना आजहि दाखविलें जातें म्हणतात.

## कॉकेशसची अमोल देणगी

कॉकेशस पर्वताच्या गगनचुंबी बर्फाच्छादित रांगा युरोप व आर्यांचे प्राचीन निवासस्थान यांच्या बरोबर मध्यभागी उभ्या आहेत. या पर्वतातील जॉर्जिया सस्थानानें जोसेफ स्टालिन ही देणगी रशियाला समर्पण केली या सस्थानातील टिफ्लिस प्रातात गोरी या लहानशा शहरीं जोसेफचा जन्म १८७९ सालीं २१ डिसेंबरला झाला टिफ्लिसपासून बाटूमला जाणाऱ्या लोहमार्गावरचें तें एक स्टेशन आहे कॉकेशस पर्वताच्या दक्षिणेकडील भागात तें वसलेल आहे

जॉर्जिया सस्थानातून जोसेफ स्टालीनच्या पूर्वी नाव घेण्यासारखी एकहि

व्यक्ति निर्माण झालेली नाही. अलेक्झांडर, चंगीझखान व तैमूरलंग यांच्या राक्षसी स्वाऱ्यांचा, कत्तलींचा नि सुलतानी सत्तेचा सुमारें दोन हजार वर्षांचा काळाकुट्ट इतिहास मात्र जॉर्जियाच्या भूतकालात घडलेला आहे. या भूतकालाचा पडदा दूर सारला तर काय दिसेल, म्हणून प्रश्न केल्यास एकाच उदाहरणावरूनहि त्याचें उत्तर अनुमानिता येईल. तमारा नावाच्या जॉर्जियन राणीबद्दल एक दंतकथा आहे की, आपल्या प्रियकराची कत्तल करण्याचा खेळ तिला फार आवडत असे ही कल्पनादुष्ट दंतकथा ऐकूनच त्या इतिहासाच्या अंतरंगात प्रवेश करण्याची इच्छा कोणाला होईल असें वाटत नाही.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीच रशियानें जॉर्जिया आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून टाकला क्रिमियन युद्धाच्या वेळी कॉकेशसमधील टोळ्यांनी शामील या पराक्रमी पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली शहांशहाविरुद्ध बंड उभारलें; परंतु लवकरच त्या बंडाचा मोड करण्यात आला लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे शामील हा जॉर्जियन वंशातला नव्हता.

जॉर्जियन लोक सबंध जगात देखणेपणाबद्दल प्रख्यात आहेत. असें काहींचें म्हणणें आहे. परंतु त्यांच्यातील पुरुष प्रमाणाबाहेर उंच असून स्त्रिया मात्र खुज्या व रुंद छाती असलेल्या आहेत. या स्त्रियांना पाश्चिमात्य सौंदर्याच्या कल्पनेप्रमाणे कोणी सुंदर समजत नाही. वर उल्लेखिलेले शामीलचें बंड मोडल्यानंतर रशियानें जॉर्जियामध्यें उत्तम प्रकारच्या पलटणी उभारण्यास सुरवात केली त्या काळींहि जॉर्जियन लोकांत स्थानिक देशाभिमानाचा स्फुलिंग जिवंत होता, परंतु तरीहि ते झारशीं एकनिष्ठ राहिले. पोलंड, फिनलंड व बाल्टिक संस्थानें येथें क्रांतिकारकांनीं जसें अधूनमधून डोकें वर काढून रशियन सत्ता उधळून देण्याचा प्रयत्न केला, तसे प्रकार मात्र जॉर्जियामध्यें बहुधा घडले नाहीत. त्याची राजधानी टिफ्लिस याची प्रसिद्धि कशाबद्दल असेल तर ती जगातील सर्वोत्कृष्ट पाकसिद्धीविषयीं ' कथेटिन्सी मद्य व ' शॅश्लिक ' यांचेंच नांव जॉर्जियाऐवजीं उच्चारलें जातें.

अशा या जॉर्जिया संस्थानातील जॉर्जियन जातीचा एक पुरुष आज बाल्टिक समुद्रापासून पासिफिक महासागरापर्यंत सुमारें १८ कोटी प्रजेवर अनिर्बंध सत्ता गाजवीत आहे. याचें पाळण्यातलें नाव जोसेफ जुगाश्विल्ही. लहानपणीं त्याचे सवंगडी त्याला 'सोसो' या टोपणनांवानें हाका मारीत. त्यानंतर त्यानें अनेक नावें घेतलीं. कोबा, निझेराड्झे, चिझीकॉफ, इव्हॅनोव्हिक इतकी नामावळी ज्ञात आहे. असे सांगतात कीं, लेनिननें आपल्या ह्या प्रतिस्पर्ध्याला उत्तरायुष्यांत स्टालिन हे नाव दिलें. स्टालिन याचा अर्थ पोलादी पुरुष! आणि हें नाव खरेंच सार्थ आहे त्याला!!

स्टालीनच्या पित्याचें नाव प्रसिद्ध नाही. तो डिडिलिओ खेड्यातील एका शेतकऱ्याच्या कुळात जन्माला आला. गोरी येथे प्रथम स्वतंत्रपणे जोडे शिवण्याचा धंदा तो करीत असे, नंतर टिफ्लिस येथील ॲडेल-कनॉफ बूट कारखान्यांत तो काम करू लागला.

स्टालिनचा विरोधक ट्रॉट्स्की यानें त्याच्या वडिलासंबंधी उद्गार काढले आहेत— "स्टालिनचा बाप विसारिअन हा अति क्रूर मनुष्य होता. स्टालिनला व त्याच्या आईला विसारिअनच्या हातचा खरपूस प्रसाद अनेकदा चाखायला मिळाला होता." स्टालिनची आई पूर्णतः निरक्षर अशी एक ऑसेंटाइन शेतकरीण होती. तिची बोलीहि रशियन नव्हती. तिला जोसेफखेरीज आणखी काही मुलगे झाले, परंतु लहानपणीच त्यांनीं परलोकचा रस्ता सुधारला. जोसेफ हाच नवसासायासानें जगलेला एकुलता एक मुलगा. जोसेफ वयात येण्यापूर्वीच त्याचे वडील वारल्यामुळें आईच्याच शिकवणीत तो वाढला, असे म्हणावयास चिंता नाहीं, आणि शारीरिक दृष्ट्याहि तो बापापेक्षा आईच्याच वळणावर अधिक गेला आहे. स्टालिनच्या आईसंबंधी ट्रॉट्स्की म्हणतो कीं 'स्टालिनची आई ही घरात राबणारी एक गुलामच होती, याचा स्टालिनच्या कोवळ्या मनावर विलक्षण खोल परिणाम झाला.'

तथापि स्टालिन अस्सल जॉर्जियन नाही. ठेंगू, लठ्ठ व पिळदार बांधा, एखाद्या तत्त्वज्ञासारखी खोल विचारमग्न दृष्टि, दाट नि बाकदार भिवया

अशा वर्णनाची ही व्यक्ति आहे. अंतरंगात काय विचार चालू आहेत, कसली खळबळ माजली आहे नि कोणतें राजकारण शिजतें आहे याचा थांग त्याच्या 'दगडी' चेहेऱ्यावरून कधींच लागावयाचा नाहीं. तो स्वतःला पोलादी माणूस म्हणवून घेत आला आहे नि एका अर्थी शरीर नि मन या दोन्ही बाबतींत तें विशेषण सार्थ ठरतें हेंहि खरें.

स्टालिनची आई ज्या ऑसेंटाईन जमातीतील ती ऑसेंटाईन जमात जॉर्जियन जमातीपेक्षाहि अधिक रानटी व अत्याचारी वृत्तीची आहे. निरक्षर, जंगली नि अद्यापिहि इतिहासकालीन पाषाणयुगातील भासणारी एक डोंगराळ मुलुखातील टोळी असेंच तिचें वर्णन करावें लागेल फिन्स व मेग्यार लोकांशीं रोटीबेटीचे संबंध येऊनहि ही जमात अद्यापि युरोपीय सुधारणाच्या समीपहि जाऊं शकलेली नाहीं.

जोसेफचा जन्म झाला त्या काळीं अॅलेक्झांडर दि लिबरेटर (विमोचक) हा राज्य करीत होता गुलामांना स्वतंत्रता मिळाली नव्हती, तरी कॉकेशस प्रांत गुलामगिरींत नसल्यामुळें त्याचा काहींच प्रत्यक्ष परिणाम त्या ठिकाणीं होण्यासारखा नव्हता. टोळीवाल्यांची बंडाळी मोडून बरेच दिवस लोटले होते व रूसीकरण ( Russfication ) जोरानें सुरू होतें. रशियानें खिवा, बुखारा, समरकंद हे भाग आपल्या राज्यांत सामील करून नैर्ऋत्य आशियांत दूरवर हातपाय पसरले होते बाल्कन्समधील तुर्की राज-सत्तेला जोराचा धक्का मिळाला, सर्बिया, बल्गेरिया आणि रुमानिया हे चिमकुले देश पुनः इतिहासजमा झाले त्या काळींच झारच्या घराण्यातील एक बलाढ्य राजा अॅलेक्झांडर दि लिबरेटर याचा सेंट पीटर्सबर्गमधील कॅथेराइन कालव्याच्या धक्क्यावर सोफिया पेरेव्हस्कायानें खून केला होता रशियाला द्यावयाच्या नव्या लोकशाही राज्यघटनेचा एक मसुदा त्या वेळीं तयार झाला होता व त्यावर दुसऱ्या अॅलेक्झांडरची सही व्हावयाची होती असें म्हणतात. तिसऱ्या अॅलेक्झांडरनें आपल्या बापाच्या या खुनाचा सूड जनतेवर पुरेपूर उगवून घेतला.

जोसेफचा तारुण्यकाळ बहुतेक तिसऱ्या अॅलेक्झांडरची जुलमी कारकीर्द

पाहाण्यात गेला असल्यामुळें त्या राजवटीतील दडपशाहीचा खोल ठसा त्याच्या भावनाप्रधान अंतःकरणावर उमटून राहिला असल्यास नवल नाहीं.

## उनाड पोरांचें संघटनकौशल्य

गोरी येथील एका धर्मोपदेशकानें जोसेफला पहिले धडे दिले. त्या शाळेतील शिक्षण विनामूल्य होते, तथापि हा दरिद्री बापाचा मुलगा त्यात फारसा रमला असें दिसत नाहीं. कारण गावातील अति व्रात्य, हूड व दांडग्या मुलांच्या टोळीचा नायक म्हणूनच तो ओळखला जात असे. आईबाप अशिक्षित नि दरिद्री होते तरी आपल्या मुलानें नाव मिळवावें अशी मात्र त्याची तीव्र इच्छा होती. वस्तुतः त्या प्रांतात मुलाचें शिक्षण र ट फ पर्यंत गेलें म्हणजे खूप मिळविली, अशीच सर्वसामान्य समजूत असे, परंतु विसारिअन जुगाश्विल्ली यानें आपल्या एकुलत्या एका चिरंजीवाना सुशिक्षित बनवून धर्मोपदेशक बनवावयाचें ठरविलें.

जोसेफची बुद्धि अगदींच मंद होती असें नव्हे, तो मन लावून शिकता तर त्याला तेंहि जमू शकलें असतें. पण नजर पुस्तकावर असली तरी त्याचे मन डोंगरपठारावर पळणाऱ्या घोड्याचा पाठलाग करण्यात, भरधाव घोडा फेकण्यांत नि ब्रें ऽ ऽ करून इतस्ततः भटकणाऱ्या मेंढ्या राखण्यातच गढलेलें असे. रिकामा वेळ सापडताच करण्याचा त्याचा आवडता व्यवसाय म्हणजे हाच.

मठात जाऊन धर्मतत्त्वाची मारे घोकपट्टी करणाऱ्या ह्या होतकरू धर्मोपदेशकाचे विचार काय चालले असतील ? चोरी कशी करावी, दरवडे कौशल्यानें कसे घालावे ? उत्तम चोर होण्यासाठीं काय काय करावें लागतें; इत्यादि उदात्त प्रकारचे ! बाकी, त्याचा दोष सर्वस्वी जोसेफकडे नव्हता, कारण उत्तम दरवडेखोर म्हणवून घेणें हें कॉकेशस पर्वतातील लोकाना एक पराक्रमाचें, भूषणास्पद लक्षण वाटते. घोड्याची चोरी करणारे शर्विलक श्रेष्ठ प्रतीचे समजले जातात. जास्त वर्णन न करिता एवढेंच सांगितलें तर पुरे होण्यासारखें आहे की, सांप्रत हिंदुस्थानच्या वायव्य

सरसीमेवर वावरणाऱ्या इरसाल टोळीचाच तो एक नमुना !

गोरीच्या धर्मोपदेशकाजवळ तीन वर्षें शिक्षण घेतल्यानंतर जोसेफला त्याच्या आईबरोबर टिफ्लिस येथें एका धर्ममठात शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्यात आलें टिफ्लिस हें जॉर्जियाच्या राजधानीचें ठिकाण असून गोरीच्या मानानें तेथील वातावरण अत्यंत निराळें होतें याच शहरात जोसेफ कम्युनिस्ट क्रांतिकारक बनला त्याच्या मूळच्या रानटी स्वभावांत येथील शहरी, वैभवशाली नि उत्साहमय वातावरणानें विलक्षण स्थित्यंतर घडवून आणलें.

टिफ्लिसच्या मठातील त्याचे बहुतेक शाळूसोबती वरच्या वर्गातले होते, त्यांमुळें जोसेफ न्यूनगंडानें पछाडला जाऊन त्याच्या अंत:करणात चोरट्या द्वेषानं कायमचं ठाण मांडलें, असें त्याच्या विरोधकाचें म्हणणें आहे. जोसेफनें ठरीव शिक्षणक्रमाप्रमाणें आपला अभ्यास सुरू केला. त्याच्या अंगावर धर्मोपदेशकाचा काळा डगला चढला. अत्यंत अभ्यासू व कर्मठ धर्मोपदेशक म्हणून त्यानें नाव मिळवून आपल्या आईबापांना व गुरूला प्रसन्न केलें, असें कांहीं चरित्रकर्त्यांचें म्हणणें आहे परंतु तें खरें दिसत नाहीं कारण लवकरच मठाधिकाऱ्यानें जोसेफच्या कपाळावर ' धर्मोपदेशक होण्यास नालायक असा शिक्का मारून त्याची संस्थेतून हाकलपट्टी केली

या पाठशाळेतील एकंदर व्यवहार भिकारडा नि शिस्त करडी होती. त्यामुळें स्वतंत्र मनोवृत्तीच्या नि दऱ्याखोऱ्यातून इतस्ततः वागडण्याची सवय झालेल्या जोसेफला ती पाठशाळा मानवली नसल्यास नवल नाहीं. त्याला तेथें कारागृहात डांबल्यासारखे वाटू लागलं. सिनॉर मुसोलिनीच्या शिक्षणक्रमातहि असा प्रसंग येऊन गेल्याचें त्याच्याबद्दल माहिती असणाऱ्यांना ठाऊक असेलच.

या धर्ममठातून जोसेफ बाहेर पडला, तो कां नि कसा, याबाबत दोन-तीन परस्परविरोधी गोष्टी सांगितल्या जातात. स्टालिनशत्रु लिऑं ट्रॉट्स्की म्हणतो कीं, ' मार्क्स व डार्विन यांच्या ग्रंथांच्या अभ्यासामुळें धर्मशिक्षणाकडचें त्याचें लक्ष पार उडालें; आणि तो कम्युनिस्ट क्रांतिकारक बनला शिवाय तो त्या धर्ममठातील दरिद्री वातावरणाला व वैय-

त्विक दारिद्र्यालाहि कावला होता ' स्टीफन ग्रॅहॅमच्या मतें त्यास धर्म-शिक्षणाला नालायक ठरवून मठाधिकाऱ्यानें त्याची हाकलपट्टी केली. याखेरीज दुसरा एक लेखक लिहितो कीं ' स्टालिन या ठिकाणीं चार वर्षे होता, आणि हा लवकरच नामांकित जॉर्जियन पाद्री बनणार असें त्याच्या शिक्षकास वाटूं लागलें या काळीं स्टालिन अत्यंत अभ्यासू व कर्मठ बनला होता नि त्यामुळें त्याच्या आईबापासहि धन्यता वाटूं लागली होती. '

कार्ल मार्क्सचे ग्रंथ, तर्कशास्त्र व भौतिकवाद यांचा अभ्यास जोसेफनें या मठातच केला होता व स्टीफन ग्रॅहॅमच्या मतें पुढें आपल्याला क्रांतिकारक बनावयाचें आहे असें त्यानें येथें पूर्वीच ठरविलें होतें धर्ममठांतून बाहेर पडल्यानंतर कांहीं महिन्यांतच सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या टिफ्लिस शाखेला तो येऊन मिळाला. वयाच्या २१ व्या वर्षीच गुप्त कटवाल्या क्रांतिकारकांना आवश्यक असलेले धैर्यशौर्यादि गुण त्याच्या ठिकाणी निश्चितपणें वसत होते सोशल डेमॉक्रॅटिक पक्ष कायदेशीररीत्या अस्तित्वांत राहूंच शकत नव्हता यासाठीं त्याची संघटना गुप्त होती आणि यामुळें साहजिकच या पक्षाचे सभासद पोलिसांच्या गुप्त टेहेळणीखालींच वावरत होते

या वेळेपर्यंत प्रतिगामी तिसरा अ‍ॅलेक्झांडर मरून जाऊन त्याच्या जागीं दुसरा निकोलस हा दुबळा झार आला होता निकोलस झारवर त्याच्या राणीचें म्हणजे झारीनाचें व तिच्या प्रभावळीचें अतिशय वजन होतें. या प्रभावळीला व राणीलाहि आपल्या मुठींत ठेवणारा एक खलपुरुष होता, त्याचें नांव रासपुटीन. त्यामुळें त्या वेळीं रासपुटीन हा एक महाकारस्थानी मनुष्य संबंध रशियाच्या राज्ययंत्राचा पडद्यामागील सूत्रचालक बनला होता त्याच्या बुवाबाजीला इतिहासांत तोड फक्त मराठेशाहींतील कनजीचीच देतां येईल. नोकरशाहीच्या दडपशाहीनें जुलुमाचें शिखर गाठलें होतें नि त्यामुळें पोलिसांची धावपळ व लष्कराच्या हालचाली यांना ऊत आला होता. सारा देश ढवळून निघाला होता नि या काळांत रशियांतील सर्व राष्ट्रीय

अल्पसंख्याक जमातींत क्रांतिकारक प्रवृत्तीची निर्मिति झाली होती अर्थात् एकपरीनें हें त्याचें पाऊल प्रगतिपथावरच होतें असें म्हणावयास चिंता नाहीं. टिफ्लिस, बाकू व बाटुम येथें पक्षाची संघटना जोमानें फोफावत जाऊन तेथील गिरणीकामगार आणि रेल्वे नि तेलाच्या धंद्यातील कामगार यांच्यात अति जोरानें परिणामकारक प्रचार सुरू होता.

टिफ्लिसच्या बाजारात ओझे उचलण्याचें काम स्टालिननें पत्करलें. तत्त्वज्ञानाचा नि धर्मशास्त्राचा अभ्यास करणारा हा तरुण आता हमाली करू लागला. तो ज्या ठिकाणीं काम करीत असे ती बाजारपेठ अगदीं कोंदट नि गलिच्छ होती सूर्याचे किरण त्या वस्तीला क्वचितच दर्शन देत, नि कधीं दिलेच तर बुरख्याआड तोंड झाकलेल्या स्त्रीप्रमाणें त्यामुळे 'काळोखी बाजार' म्हणून या मोहल्याला नाव पडलें होतें. सुमारें २० हजार कामगार आपलें कष्टमय जीवन या ठिकाणी हमाली व इतर कामें करून, कंठीत होते जोसेफसहि त्याच वैभवात नांदत होता ! पण त्याची पुढारी वृत्ति त्याला स्वस्थ बसू देईना 'The Pioneer of Pioneers' म्हणून पुढे ज्याचें विद्वानांनीं वर्णन केलें त्या संघटनकुशल स्टालिनच्या संघटनकौशल्याची चमक येथेच प्रथम दिसली ! त्यानें आपल्याभोंवती एक लहानसें मंडळ निर्माण केलें हळूहळू त्याचें मोठ्या प्रमाणावरील संघटनेंत रूपांतर होऊं लागलें. त्याच्या दुःखांना वाचा फुटू लागली दलितांची विव्हळ अंतःकरणें बोलू लागली.

—आणि एके दिवशीं त्या कामगारांनीं संप पुकारला. नवीनच प्रकार होता हा झारच्या राजवटींत अर्थातच इतरत्र जें घडतें तेंच याहि ठिकाणीं घडून आलें. रशियन पोलीस नि कोसॅक स्वार यांनी संपवाल्यावर निर्दय हल्ले चढविले. कित्येक कामगार त्यांच्या हल्यारांना बळी पडले. मृत्यु पावलेल्यांचा नि जखमी झालेल्यांचा आकडा नक्की सांगता आला नाहीं, तरी तो बराच मोठा असावा. त्या पहिल्या संपानें जोसेफला कामगारांचा नेता बनविलें. त्याच्या ठिकाणीं संघटनाचातुर्य नि धडाडी होतीच त्यामुळें तो पुढें येऊं लागला; नि आज सोव्हिएट यूनियनचा सर्वाधिकारी म्हणून तो

जगाकडून ओळखला जात आहे

टिफ्लिसच्या पहिल्या संपाचे पुढारीपण त्याने यशस्वी केले पण त्यामुळे तो रशियन पोलिसाच्या रोषास पात्र ठरला. कदाचित् तो सन्मान वाटला असेल जोसेफला रशियन आज्ञाधारक शिपायाचा ससेमिरा सुरू झाला पण त्यांना फार दिवस त्रास न पडू देता जोसेफने तेथून गुंगारा मारला व स्वारी बाटूमला येऊन थडकली.

---

# क्रांतिकारकांतील पोलादी पुरुष

क्रांतिकारकांचें जीवन म्हणजे सतीचें वाण ! मृत्युला आव्हानूनच त्या रणकुंडात उडी घ्यावी लागते यशस्वी होऊन मातृभूमीचे पाश फेडू शकला तर थोर पुरुष ठरेल, जग ओव्या गाईल त्याच्या. दुर्दैवानें यशाला पारखा झाला तर त्याबरोबरच अब्रूला नि जिवालाहि मुकेल, जगाकडून धिक्कारिला जाईल. त्यातहि गुप्तपणाने कार्य घडविणे म्हणजे तर तारेवरचा नाच क्रांतिकारकांच्या टिफ्लिस शाखेत नाव दाखल करताच हा अनुभव जोसेफला आला. पण त्यातून उद्‌भवणाऱ्या हालअपेष्टांना नि यातनांना तोंड देण्याची सिद्धताहि त्यानें केली त्याचे मन वज्रासारखें कठोर आहे, परमेश्वरानें त्याला शरीरहि पोलादी दिलेले आहे त्या दोन्ही देणग्याचा त्यानें भरपूर उपयोग करून घेतला आजहि त्याला तेच गुण उपयोगी पडत असतील.

जोसेफ बाटूमला आला नि पुनश्च त्यानें आपलें कार्य पुढे चालू केलें. या गावीं तो अधिक दायित्वाने क्रांतिकारकाचें काम शिरावर घेऊन वागत होता. त्या काळीं लेनिन लंडनमध्ये असे. ‘ इस्क्रा ’ ( ठिणगी )

नावाचें वृत्तपत्र तो तेथें प्रकाशित करी त्या पत्राला रशियात बंदी होती. तथापि त्याच्या हजारों प्रति पोलिसांचा नि पहारेकऱ्यांचा डोळा चुकवून रशियात आणल्या जात. झारचें गुप्तहेरखातें आपल्या कामात कितीहि निष्णात असले तरी त्याला तो इस्का-वाङ्मयाचा रशियन भूमीत घुस-णारा प्रवाह थांबविता आला नाहीं अतिशय जहाल विचारसरणी या पत्रांतून प्रसृत केली जाई झारच्या जुलुमी सिंहासनाखाली दारूचें कोठार रचण्याचें कार्य ह्या पत्रानें चालविलें होतें असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. पण असें हें जहाल वाङ्मय रशियात यावयाचें कसें ? रशियन बंदरात या आक्षिप्त पत्रकांचे नि वृत्तपत्रांचे गठ्ठे कायदेशीरपणें उतरवून घेण्याची सोयच नव्हती. गुप्तहेरांची दृष्टीहि अशा ठिकाणीं विशेष कडक असे. म्हणून तत्कालिन क्रांतिकारकांनीं एक युक्ति योजिली ज्या कापडातून पाणी आत शिरणार नाहीं अशा प्रकारच्या कापडात हे गठ्ठे गुंडाळले जात बोटीवरून गुप्तपणें ते गठ्ठे समुद्रात सोडले जात ते पाण्याखालीं बुडून जाऊ नयेत अशीहि व्यवस्था केलेली असे मग क्रांतिकारकांचे हस्तक मच्छीमारीच्या पाघरुणाखालीं ते गठ्ठे लपवून बंदरावर आणीत.

पण अखेर याहि प्रकाराचा सुगावा पोलिसांना लागला. त्यातच जोसे-फहि सापडला. दीड वर्षेपर्यंत कच्च्या बंदींत काढल्यावर त्याला सैबेरि-याची हवा खाण्यासाठीं तीन वर्षांच्या मुदतीनें पाठवून देण्यात आलें. हाच जोसेफचा पहिला सरकारी पाहुणचार. पण तो भोगावयास स्टालिन मुळींच राजी नव्हता झारच्या कडक बंदोबस्तातूनहि निसटून जाण्यात स्टालिननेंच उच्चांक संपादिला असावा अटक नि सुटका याचा जणू पाठशिवणीचा खेळ त्याच्या तारुण्याच्या पहिल्या कांहीं वर्षांत चालला होता आता कसा पळून जातो ' म्हणून अगदीं चेवानें रशियन पोलि-सांनीं स्टालिनला पकडावें नि त्यानें कारागृहातून वा सैबेरियातून दिलेल्या शिक्षेचे अर्धेअधिक दिवसहि लोटले नाहींत तोंच पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून फरारी व्हावें, अशी प्रथाच पडून गेली होती.

१९०२ सालापासून जोसेफला एकूण सहा वेळा कारागृहाची हवा

खात्री लागली आहे. या काळातील त्याचें जीवन म्हणजे कुत्रे पाठीशीं लागलेल्या लाडग्याची अवस्था ! त्यानें स्वत:च या उपमेनें त्याच्या तत्कालिन आयुष्याचें वर्णन अनेक ठिकाणीं केलें आहे.

जिवाची धावपळ अहोरात्र चालू होती. वयाच्या १७ व्या वर्षापासूनच क्रांतिकारकाच्या गटांत येऊन मिळाल्यानतर त्याचें जीवन अस्थिर नि अरेचसे अज्ञातवासातच गेले, इतर हुकूमशहाप्रमाणें यालाहि या कारावासाचा बहुविध अनुभव त्याच्या कारभारात उत्तम मार्गदर्शक ठरला. १९०४ ते १९१३ पर्यंत त्याला एकूण पाच वेळा पकडण्यात आलें नि तितक्या वेळा तो पोलिसाच्या हातावर तुरी देऊन निसटला. सुरुवातीच्या धामधुमींत तो सापडता तर फासावरच लटकला असता, परंतु पुढें पुढें झारची क्रांतिकारकाशीं वागणूक जरा सौम्य झाली होती. कारण झारला क्रांतिकारकाची तितकीशी भीति वाटेनाशी झाली होती, नि म्हणूनच तो वाचला.

## मृत्यूच्या दरींतून प्रवास

१९०८ साली तो बंदिवासात असताना एस. वेरेटशॅक नावाचा एक तरुण तेथेंच शिक्षा भोगीत होता. त्याने ' कोबा ' ( स्टालिन ) च्या तत्कालिन वागणुकीचें जे वर्णन केलें आहे, त्यावरून कोबाची मूर्ति स्पष्टपणें आपल्या डोळ्यासमोर उभी राहील त्या कारागृहात तो इतर बंद्याना फार प्रिय झाला होता धड गुड्याहि नसलेली निळी बंडी, बारीक डोळे नि गजगतीची चाल हा त्याचा रुबाब इतराहून काहीं न्याराच दिसे. इतर गुन्हेगारात या राजकीय बंद्याना मिसळू देत नसत; परंतु कोबा युक्तीप्रयुक्तीने त्याची भेट घेई. तो म्हणे, “ मला तर बुवा असे लोकच अधिक आवडतात राजकारणात फार चांगला उपयोग करून घेता येतो अशा माणसाचा ! ” आणि या त्याच्या म्हणण्याचें प्रत्यतर त्यानें पुढें अनेक प्रसगी आणूनहि दिले. कोबाचे कित्येक जुने मित्र दरवडेखोर, लुटारू नि चोर होते. परंतु स्टालिनची योजकता मार्मिक असल्यानें त्यानें अनेक राजकीय दरवड्यात या सव-

गड्यांचा भरपूर उपयोग करून घेतला. तसेंच जोसेफ जेव्हा जेव्हां कारा-गृहातून निसटून पळून जाई, तेव्हा तेव्हा तो आपल्या बरोबरच्या इतर बद्यान्याहि सुटकेचा प्रयत्न करी परंतु त्याच्याइतकी निधडी छाती इतर फारशी कोणाची नसल्याने बहुधा त्याला एकट्यालाच आपली सुटका करून घ्यावी लागे कारागृहात कांहीं कमीजास्त घडले, दगाधोपा झाला अथवा शिस्तीचा भंग झाला की, प्रथम जोसेफकडे अधिकाऱ्याची सशयी नजर वळे विलक्षण चळवळ्या नि भयंकर माणूस म्हणून तो ओळखला जात असे त्या काळीं.

असाच एक प्रसंग एकदा घडला. स्टालिनचें नाव 'स्टालिन'च का तें त्यातून समजेल कोबावर कारागृहातीलच एका चोरीचा आरोप ठेवण्यात आला त्याच्या सहकाऱ्याचीं नावें त्याला विचारण्यात आलीं पण त्याचें उत्तर सुरवातीला नि अखेरीला एकच—'मला कांहीं माहीत नाही' इतर लहानमोठे अनेक उपाय पोलिसांनी करून पाहिले, पण छे', कोबा कांहीं बधण्याचें चिन्ह दिसेना. अखेर झारशाहींतील एका तत्कालिन भयंकर उपायाचा अवलंब कोबावर करण्याचे ठरलें त्याच्या दोन्ही हातात बेड्या घालून झिंगलेल्या सैनिकाच्या दोन रांगामधून त्याला चालत जाण्याची आज्ञा झाली. प्रत्येक शिपायासमोर तो येताच त्याच्या अंगाखांद्या-वर, पाठीपोटावर नि सर्वत्र चाबकाचे भयंकर फटके प्रत्येक शिपाई लगावी. त्याच्या पाठीतून नि इतर अवयवातून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. त्याने दात घट्ट मिटून धरले होते. धडपडत, ठेचाळत पण शांत मनानें तो त्या मृत्यूच्या दरीतून पलीकडे गेला. अखेर शेवटच्या फटक्याला मात्र तो बेशुद्ध पडला किती भीषण नि निर्दय शिक्षा ही! या यमदाढेतून वाचून कोणी पलीकडे गेला तरच नवल! कित्येकांना तर या शिक्षेच्या असह्य यातनामुळें मरणापूर्वी वेड लागे. पण कोबाची इच्छाशक्ति दुर्दम्य होती, सहनशीलता अमर्याद होती. तो त्या दोन्ही रांगामधून फटके खात खात पार झाला, आणि कसा, तर मनात मार्क्सच्या एका गहन तत्त्वाचें मनन करीत! माझ्या भारतीय बांधवांना ही शिक्षेची अमानुष पद्धति

अपरिचित नाही. ' पवित्र ' इस्लामच्या रक्षणार्थ सिद्ध झालेल्या निजाम-साहेबानी हिंदु धर्मवीरांचा छळ याच—अगदीं याच पद्धतीनें केला आहे. पण इतिहासाची पुनरावृत्ति अर्धवट होत नसते !.. जुलुमी राजसत्तेचा नाश केव्हां तरी ठेवलेलाच असतो. झारशाहीच्या या जुलुमातून वाचून आज स्टालिन सोव्हिएट रशियाचा सर्वाधिकारी बनला आहे ! जुलुमी झार-शाही कालाच्या कराल जबड्यात गडप होऊन गेली आहे ! !

## ' आतां कसा पळून जातो ' !

मार्च १९०२ मध्यें जोसेफला बाटुम येथें पकडण्यात आलें. १९०३ अखेर कारागृहात डांबल्यानंतर पूर्व सैबेरियातील नोव्हाया उडा या खेडे-गावीं तीन वर्षांसाठीं त्याला सीमापार करण्यात आलें. नियोजित खेडेगावी त्याची पाठवणी झाल्यानंतर फक्त एकच महिना लोटला, नि १९०४ च्या जानेवारींत नोव्हाया उडाहून पोबारा करून आलेली कोबाची स्वारी टिफ्लिस नगरात आपल्या सहकाऱ्यांबरोबर कॉफीपान करताना दिसूं लागली ! तेथें ट्रान्स—कॉकेशियन ऐक्य समितीचा सभासद म्हणून तो काम करूं लागला १९०४ ते १९०५ हा काळ त्यानें मेन्शेव्हिकांविरुद्ध कडक मोहीम चालविण्यात खर्च केला. मेन्शेव्हिक, सोशल रेव्होल्युशनरी, अराजक आणि जॉर्जियनराष्ट्रवादी यांच्याविरुद्ध सभांतून नि वृत्तपत्रांतून फार जोरदार रीतीनें त्यानें पद्धत-शीर प्रचार केला. १९०३ सालीं कारावासात असतानाच पक्षाच्या दुसऱ्या कॉंग्रेसमध्यें बोल्शेव्हिक—मेन्शेव्हिकांत माजलेले तीव्र मतभेद त्याच्या कानावर आले होते सीमापारींतून निसटून तो परत आला त्या प्रसंगीं हे मतभेद विकोपाला गेले होते तेव्हा स्टालिनने बोल्शेव्हिक पक्षाचें बेकायदा ठरविलें गेलेलें ' प्रोलेटेरियन स्ट्रगल ' ( कामगारांचा झगडा ) हे मुखपत्र १९०५त आपल्या हातीं घेतलें तिसऱ्या बोल्शेव्हिक कॉंग्रेसच्या संघटनकार्याचें बरेंच श्रेय स्टालिनला द्यावें लागेल १९०५च्या अखेरीला टॅमरफोर्म ( फिनलंड ) येथें भरावयाच्या अखिल रशियन बोल्शेव्हिक परिषदेसाठीं ट्रान्स—कॉकेशियन बोल्शेव्हिकांचा प्रतिनिधि

म्हणून तो उपस्थित झाला होता.*

१९०६ सालात १९०५ च्या क्रांतीचे अवशेषहि नष्टप्राय झाले. नव्या ' ड्यूमा सभेची निवडणूक नि पक्षाची स्टॉकहोम काँग्रेस यांच्या धामधुमीचा काळ तो होता. बोल्शेव्हिकांनी या वेळी ड्यूमा सभेवर बहिष्कार पुकारून मेन्शेव्हिकाशी झगडा आरंभिला होता ट्रान्स-कॉकेशियामधील कामगारविरोधी प्रवृत्तीविरुद्ध लढण्याचा स्टालिननें चग बांधला. टिफ्लिसमध्यें बोल्शेव्हिकाचें 'ड्रो' (काळ) नावाचें एक पत्र सनदशीर म्हणून चालविलें जात होतें त्या पत्राचें नेतृत्व या काळीं स्टालिनकडे आलें.

१९०६ मधील स्टॉकहोम काँग्रेसला तो गेला होता, पण बोल्शेव्हिक पक्षाच्या टिफ्लिस शाखेचा प्रतिनिधि म्हणून 'इव्हनोव्हिच' या नव्या नावानें त्यानें आपली ओळख तेथें दिली. पक्षाच्या लंडन काँग्रेसमध्येंहि टिफ्लिसचा प्रतिनिधि म्हणून तो उपस्थित राहिला, आणि तिकडून परत येताच लंडन काँग्रेसच्या धोरणानुसार कार्य करण्यासाठीं टिफ्लिसला रामराम ठोकून तो बाकूला आला तो लंडनला गेला होता तो परिषदेपेक्षा लेनिनच्याच भेटी-साठीं असें म्हणणें अधिक योग्य दिसेल. कारण या वेळीं त्याने लेनिनशीं बरेंच खलबत केलें नि आपलें पुढील धोरण आखलें असें दिसतें. या ठिकाणीं ' बाकू वर्कर ' या बेकायदा बोल्शेव्हिक पत्राची व्यवस्था तो पाहू लागला. बाकूच्या कामकरी विभागातून मेन्शेव्हिकाना हाकलून लावून तेथें बोल्शेव्हिकाना त्यानें संपूर्ण विजय मिळवून दिला. तेव्हांपासून बाकू प्रांत बोल्शेव्हिझमचा बालेकिल्ला समजला जातो.

१९०८ मध्यें कोबा पुनश्च पकडला गेला नि आठ महिन्याच्या कारागृहवासानंतर व्होलोगाड ( सैबेरिया ) परगण्यांतील सॉल्विच्गेगोड्स्क या स्थानीं तीन वर्षेपर्यंत स्थानबद्धतेची शिक्षा त्याला देण्यात आली पण झारच्या कुशल गुप्तहेराना नि पोलिसाना चकवून कोबा गुप्तपण बाकूला निघून आला ! पुढें १९१० पर्यंत तो पोलिसांच्या हातीं लागला नाहीं.

---

* या संस्मरणीय परिषदेचा वृत्तांत पुढील प्रकरणात दिला आहे.

त्या अवधीत त्याची अनेक नामांतरें नि वेषांतरे झाली तथापि १९१० मध्ये त्याला पकडून काही महिने डांबून ठेवण्यात आलें; नि सॉल्व्हिचे-गोड्स्कला त्याची पुनश्च रवानगी झाली. १९११ पर्यंत तो निर्वासित स्थितीत खितपत होता. परंतु त्याच वर्षी सरकारच्या हातावर तुरी देऊन मध्यवर्ति समितीच्या सूचनेनुरूप त्यानें पेट्रोग्राडमध्यें येऊन आपले बस्तान मांडले परंतु पेट्रोग्राडमध्येंहि तो फार दिवस काम करू शकला नाही थोडक्याच अवधींत झारच्या पोलिसांना त्याला पुनः पकडून मोठ्या बंदोबस्तानें व्होलोगाड प्रांतातच त्याची पाठवणी केली.

वेष नि चेहरे पालटण्यात तो वाकबगार होता त्याचें वेषांतर इतकें बेमालूम साधे की, त्याच्या सहकाऱ्याचीहि कित्येकदा फसवणूक होई त्यामुळे त्या वेळी पोलिसांच्या नोंदवहीत डेव्हिन आणि कोबा या दोन भयंकर दहशतवादी क्रांतिकारकांची नांवे निरनिराळ्या वर्णनासह टिपलेली होती परंतु वस्तुत. त्या दोन्ही व्यक्ति एकच, आणि तो म्हणजे जोसेफ ! एका दरवड्यांत डेव्हिड या नावानें त्यानें भाग घेतला होता असेंहि म्हणतात. निजेराद्रज अगर मि जेकॉव्ह हीहि त्याची दोन रूपे होती. या दोन्ही नावाचा फरारी बंदी एकच आहे असें पोलिसांना कळताच त्याचा संताप झाला. चिडून त्याच्यावर सूड उगविण्यासाठीं सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा त्याला देण्यांत आली. परंतु सहा काय नि दहा काय स्टालिनला सर्व शिक्षांची मुदत एकच होती — ती म्हणजे फरारी होईपर्यंतची !

## दैवानें हात दिला

१९११ सालातच पुन्हा त्यानें आपली सुटका करून घेतली नि पेट्रोग्राडमधील क्रांतिकार्याच्या उठावणीसाठीं तो तेथें जाऊन गुप्तपणें काम करू लागला अर्थात् यापैकी सर्वच बेकायदा स्वरूपाचें होतें; त्याचें नांव, त्याचें कार्य नि त्याचे तेथील वास्तव्य सुद्धां !

१९१२ मध्ये पक्षाची सुप्रसिद्ध परिषद भरली होती. त्या परिषदेत लेनिनच्या अत्याग्रहावरून नि काही सभासदांच्या मर्जीविरुद्ध स्टालिनला पक्षाच्या मध्यवर्ति समितीवर नेमण्यात आले होते. त्या काळी स्टालिनकडे

" इज्वीस्टा " या पत्राचें संपादन होतें. लेना–खपाच्या दिवसात या पत्रानें बरेंच महत्त्वाचे कार्य केलेलें आहे. याखेरीज रशियाच्या महत्त्वाच्या प्रदेशातून दौरे काढून त्यानें स्वपक्षप्रचार केला वार्षिक मे–दिनाच्या सिद्धतेसाठीं खूप परिश्रम घेतले आणि " प्रवदा " वृत्तपत्राच्या स्थापनेंतहि बऱ्याच श्रमाचा वाटा उचलला.

प्राग परिषदेनें स्टालिनला रशियाबाहेर राहून चळवळ चालविण्याला परवानगी दिली. परंतु स्टालिनला या सवलतीचा कांहींच उपयोग नव्हता.जर्मन, फ्रेंच, इंग्लिश वगैरे कोणत्याच युरोपीय भाषेशीं त्याचा परिचय नसल्यानें त्याला रशियातच काम करावें लागलें; तथापि रशियातील गुप्त हेरखात्याच्या नि पोलिसाच्या जाळ्यांत न फसता कौशल्यानें कसे काम करावयाचें हे त्याला आता चांगलें अवगत झालें असल्यानें रशियाच्या सीमेंतच राहून स्टालिनने उत्तम कामगिरी बजाविली.

परंतु १९१२ च्या एप्रिलमध्यें फिरून त्याच्या कपाळीं नारीमचा वनवास आला. नारीममध्यें ४ वर्षें शिक्षा भोगण्यासाठीं त्याला सीमापार करण्यात आलें. पण ' येरे माझ्या मागल्या ' या म्हणीप्रमाणें तो त्याच वर्षाच्या उन्हाळ्यात तेथून जो फरारी झाला तो पेटोग्राडला येऊन थडकला. तेथून क्रॅकौला जाऊन तो लेनिनला भेटला नि वर्षअखेरीस क्रॅकौ येथे भरलेल्या बोल्शेव्हिक परिषदेंत त्याने भाग घेतला क्रांतीसाठीं केलेल्या स्टालिनच्या धाडसाने, अविश्रांत परिश्रमानें लेनिनवर छाप पाडली. या वेळीं लेनिननें स्टालिनवर फार महत्त्वाची राजकीय कामगिरी सोंपविली. ड्यूमाच्या[1] निवडणुकी लढविण्याचें तें कार्य होतें त्यात स्टालिन यशस्वी ठरून लेनिन-पंथीयानीं १६ जागा हस्तगत केल्या. अर्थातच त्यांचे पुढारीपण स्टालिनकडे आले. त्या काळापासूनच स्टालिनची शिस्त भयंकर कडक असे. सोशल डेमोक्रॅटिक पक्षातील बोल्शेव्हिक गट हा एक घटकावयव होता पक्षातील कोणाहि सभासदास भाषण करावयाचे झाल्यास त्याला ते प्रथम स्टालिनच्या नजरेखालीं

१ झारच्या कारकिर्दीतील रशियन लोकप्रतिनिधींची लोकसभा.

घालावे लागे. कॅकोहून स्टालिन पुनः पेट्रोग्राडला परतला नि तेथें 'प्रवदा' नि 'इवीस्टा' या दोन्ही पत्राचें काम पाहूं लागला. 'प्रवदा'-ची त्या काळीं चांगली भरभराट झाली होती. तें आता नियमितपणें निघूं लागलें. आतां स्थिरस्थावर होईल असें दिसूं लागलें. परंतु तें अनुमान चुकीचें ठरलें. १९०५ च्या अल्पायुषी क्रांतीचें पुनरुज्जीवन करण्याचें प्रयत्न सुरू होतांच स्टालिनला अचानक पकडण्यात आलें. या अटकेच्या कामी दोन गुप्त पोलिसांचा हात होता; त्यांपैकीं मॅलिनोव्हस्की हा एक असावा असें काहींचें म्हणणें आहे. स्टालिनची या पूर्वीची सर्व खरीखोटी नांवें सरकारच्या दप्तरात नोंदलीं गेली होतीं या वेळ-पर्यंत. त्यामुळें त्यापुढे एक महाभयंकर गुन्हेगार म्हणून झार सरकार त्याला ओळखूं लागलें. १९१३ च्या वसंत ऋतूंत काहीं काळ कारागृहात कंठल्यावर त्याची पुनश्च सैबेरियात पाठवणी झाली. या सीमापारींत त्याला जेथें राहावयाचें होतें तें नवें ठिकाण आर्टिक समुद्र-किनाऱ्यावर भयंकर थंडीमध्यें तुरूहन्स प्रांतात होतें. स्टालिनला तुरूहन्स-मधील क्युरेइका या खेड्यांत अत्यंत हालअपेष्टांत १९१३ ते १९१६ हीं चार वर्षं रखडावें लागलं. त्यानें येथूनहि पळून जाण्याचे अनेक अयशस्वी प्रयत्न केले होते. परंतु या ठिकाणाहून सुटका होणें हा निव्वळ दैवाचा भाग होता. तथापि स्टालिनला अखेर त्या दैवानें हात दिला खरा !

पहिल्या महायुद्धाचा वणवा पेटला नि त्याच्या ज्वालांनीं रशियालाहि ग्रासलें. त्यामुळें स्टालिन व सैबेरियातील इतर रशियन निर्वासित यांना आपल्या सुटकेची आशा वाटूं लागली. १९१७ च्या फेब्रुवारींत रशियन कामगारांनीं क्रांतीचें शिंग फुंकलें नि या दुसऱ्या प्रयत्नाला यश आलें. अर्थातच क्रांतिवाद्यांना सार्वत्रिक माफी मिळाली. अनेक निर्वासित देश-भक्त स्वगृहीं परत आले. १९१७ च्या मार्चमध्यें स्टालिन पेट्रोग्राड शहरीं 'प्रवदा' पत्राच्या संपादकीय कार्यालयात येऊन पोहोंचला. सैबेरियांतील चार वर्षं केवळ यमयातनेंत गेलेली होतीं. स्टालिनसारख्या पोलादी शरी-राच्या नि मनाच्या वीराचीहि हिंमत त्या चार वर्षांच्या काळानें थोडी-बहुत खचविली, त्यावरून इतर सामान्यांची कल्पनाच करावी लागेल.

पेट्रोग्राडमध्यें येताच स्टालिननें मध्यवर्ति समितीचा सभासद या नात्यानें पक्षाच्या संघटन कार्यांतील आपला वाटा उचलला

## एक भयंकर हेर

स्टालिनला जी दीर्घमुदतीची शेवटची शिक्षा भोगावी लागली ती पक्षात घुसलेल्या एका झारच्या हेरामुळें. त्याचें नांव मॅलिनोव्हस्की.

१९१२ च्या जानेवारांत प्राग येथें लेनिननें आपल्या पक्षातील मंडळींची एक परिषद भरविली या परिषदेंत कामगार चळवळीचें आपलें क्रांतिकारी धोरण सुस्पष्टपणे आपल्या अनुयायासमोर मांडून, लेनिनने मेन्शेव्हिकांशी[1] असलेला आपल्या पक्षाचा संबंध कायमचा तोडला ही परिषद अत्यंत बिकट व आणीबाणीच्या परिस्थितीत भरविण्यात आली होती सर्व कारभार चोरटा होता सर्व प्रतिनिधि गुप्तपणाने वेषांतर करून वा अन्य साधनें उपयोजून उपस्थित झालेले होते, या प्रतिनिधींतच दोन सरकारी हेरहि होते त्यांपैकीं पीटर्सबर्ग येथील धातुकामगार संघाचा प्रतिनिधि म्हणून रोमाँ मॅलिनोव्हस्की ह्या एका महाबिलंदर हेराने लेनिनचा पूर्ण विश्वास संपादिला ड्यूमाच्या चौथ्या निवडणुकींत बोल्शेव्हिक पक्षाचा प्रतिनिधि म्हणून त्याची निवड करण्यात आली व कट्टा बोल्शेव्हिक म्हणून त्याचें नाव सर्वत्र दुमदुमू लागले मॅलिनोव्हस्कीची हुशारी विलक्षण नि उत्साह दांडगा होता, त्यामुळें तो लेनिनवर सहज छाप टाकू शकला. मॅलिनोव्हस्कीच्या स्वभावातील दांभिकपणा व नम्रतेचा अतिरेक, यामुळें तो पुढें पुढें आपल्या सहकाऱ्यांना अप्रिय होऊं लागला हें खरें; परंतु त्याची कर्तबगारी फार मोठी असल्यानें त्याच्या विरुद्ध जाण्याचे वा त्याचा अपमान करण्याचें साहस सहसा कोणी करीना.

त्याच्या वर्तनाबद्दल संशय मात्र अनेकांना आला होता. विशेषतः बुखारीन व रोझमिरोविच हे तर त्या दृष्टीनें त्याच्या पाळतीवरच होते. रोझमिरोविचची अटक नि सुटका या भानगडींत मॅलिनोव्हस्कीच्या नावाचा जो उपयोग झाला त्यामुळें तर त्याच्या अंतरंगाची ओळख रोझमिरोविच व

१ क्रांतिकालातील नेमस्त पक्ष

बुखारीन या दोघांसहि पटून चुकली दुसऱ्याहि अनेक गोष्टी संशयास्पद अशा घडल्या. त्यामुळें अखेर मध्यवर्ति समितीनें त्याच्या चौकशीसाठी लेनिनच्या अध्यक्षत्वासाठी एक मंडळ नेमलें. मॅलिनोव्हस्कीविरुद्ध पुढें आणण्यात आलेला पुरावा ' भक्कम परंतु अपुरा ' असल्याचा अर्धवट निकाल या मंडळानें दिला, परंतु त्याचें कारण लेलिनचा अद्यापिहि मॅलिनोव्हस्कीवर विश्वास कायम होता हेंच असावें तथापि या प्रकरणाच्या वेळीच मॅलिनोव्हस्की गुप्तपणें मॉस्को सोडून निघून गेला. बऱ्याच महिन्यानंतर त्याच्या कारवायासंबंधी स्पष्ट प्रकाश पाडणारें कागदपत्र व इतर गोष्टी जेव्हा उजेडात आल्या, तेव्हा मात्र सर्वांची नि त्याबरोबरच लेनिनचीहि खात्री झाली कीं, मॅलिनोव्हस्की हा एक झारचा भयंकर गुप्त हेर होता.

मॅलिनोव्हस्की पक्षाचीं बरीच महत्त्वाचीं कामे करी 'प्रवदा' पत्र व ड्यूमा सभेंतील पक्षाचा गट याबाबत त्यानें केलेलें कार्य विशेष उल्लेखनीय आहे परंतु अखेर त्यानें स्वर्डलोव्ह व स्टालिन या दोघांचाहि विश्वासघात करून त्यांना पोलिसांच्या हातीं दिलें.

पुढें युद्धाच्या धामधुमींत मॅलिनोव्हस्की युद्धबंदी म्हणून कांहीं दिवस जर्मनीच्या कारावासात होता. १९१७ सालीं तो तेथून रशियाला परत आला. शेवटीं त्याला जुन्या सहकाऱ्यांच्याच आज्ञेवरून गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

## मी कोणीच नाहीं ?

१९१७ ची जगप्रसिद्ध क्रांति घडल्यानंतर मार्च महिन्याच्या अखेरीला स्टालिन पेट्रोग्राडला परत आला. पेट्रोग्राडमध्यें पाऊल ठेवल्यापासून तो पुरा गोंधळून गेला होता एवढी जगप्रसिद्ध क्रांति घडविली गेली नि स्टालिननें तर त्यात कसलाहि हातभार लावलेला नव्हता ! क्रांति घडली, जुनी राजवट उलथून पडली नि सामान्यत. होतें त्याचप्रमाणें, सार्वत्रिक क्षमेची घोषणा प्रकट करण्यात येऊन, अनेक लहानमोठे राजकीय बंदी स्थानबद्ध नि निर्वासित क्रांतिवादी, रशियाच्या भूमीवर पुनश्च स्वतंत्रपणें

वावरू लागले. सैबेरियातील अनेक निर्वासित क्रांतिवीर परत आले. त्यात-लाच एक स्टालिन त्याला विशेष महत्त्व देण्यासारखें त्यावेळी त्याच्या-पाशीं कांहीं नव्हतेंहि नि कोणी तें मान्यहि केलेलें नाहीं.

परंतु स्टालिनच्या मानी मनाला ही गोष्ट अति तीव्रपणानें बोचली. त्याची महत्त्वाकांक्षा दुर्दम्य होती नि तसाच आत्मविश्वासहि दृढ होता पण त्याला स्वतः पुढें होऊन कांहीं नवीन निर्माण करावें अशी इच्छा असली तरी तशी प्रतिभा त्याच्यापाशीं नव्हती लेनिन हा त्याचा देव, अतएव सर्वस्वी आधार असल्यानें त्याच्याच येण्याची वाट तो पहात बसला. एकदां लेनिननें रशियांत पाऊल टेवल्यानंतर मात्र स्टालिनच्या हालचाली जोमानें नि उत्साहानें सुरू झाल्या. कामनेफ व स्टालिन यांनीं लेनिनचें स्वागत केलें.

लेनिनच्या आगमनानें देशांत बराच उत्साह सञ्चारला. पण लेनिननें 'प्रवदा' पत्रांत पहिला अग्रलेख लिहून जनतेला संदेश दिला कीं, 'आपले हितशत्रु हुडकून काढून त्यांचा प्रथम नायनाट करा.' त्या चिथावणीबद्दल लेनिनवर खटला होण्याचा व त्यामुळें कारागृहांत अडकून पडण्याचा संभव दिसू लागताच लेनिन सावध झाला.

स्टालिन लेनिनची प्रत्येक कृति अगदीं लक्षपूर्वक पाहात होता. लेनिनचा स्वागतसमारंभ पार पडल्यानंतर लेनिन स्टालिनपाशीं म्हणाला, "लोकांनीं राज्यक्रांति घडविलेली आहे; आपण त्यांच्याच इच्छांना मान दिला पाहिजे. प्रथमतः जर्मनीशी सख्य जोडून आपल्या सर्व लहान-मोठ्या निर्वासित क्रांतिवाद्यांना स्वगृहीं परत आणलें पाहिजे" या वाक्यावरून कोणाहि सामान्य माणसाला लेनिनमध्यें जर्मनीच्या हस्तकाचें प्रतिबिंब दिसलें असतें, परंतु स्टालिन पक्कें जाणून होता कीं, लेनिन रशियाचा कधींच विश्वासघात करणार नाहीं.

यावेळीं लेनिननें स्टालिनला जें मार्गदर्शन केलें त्यातूनच स्टालिननें आपल्या पुढील सर्व आयुष्याच्या भव्य इमारतीचा नकाशा तयार केला, याच पायावर त्याचा प्रचंड राजकीय जीवनप्रासाद उभारलेला आहे.

ग्रंथ. क्र. ५८०



लेनिनची 'पूर्ण क्रान्ती' ची घोषणा केरेन्स्कीला[1] मानवणारी नव्हती. घटना समितीची कल्पनाहि केरेन्स्कीला आवडत नसे. तो बराचसा हुकूमशाही वृत्तीचा होता असेंच म्हणावें लागेल. झारशाहीचा तो भयकर शत्रु असला नि तिची पाळेमुळें पार खणून काढण्याची त्याची खटपट चालली असली, तरी नेमस्त पद्धतीची समाजवादी लोकसत्ता स्थापाची हेंच त्याचें ध्येय होते. अर्थातच लेनिनच्या जहाल विचारसरणीशी त्याचे पटलें नाहीं. एकटा स्टालिन लेनिनची कड घेऊन होता. परतु सुरवातीला तरी कामनेफ, झिनोव्हीफ, टॉम्स्की, झेरझिन्स्की हे सर्व लेनिनच्या धोरणाला विरोध करू लागले. तथापि तरुणानी नि बहुजनसमाजानें लेनिनची बाजू उचलून धरली. त्याना पाहिजे होतें तेच नेमके स्टालिननें दिलें. जुलैमध्यें लेनिन जेव्हा फिनलडमध्यें पळून गेला त्यावेळीं त्याला बोल्शेव्हिक उठावणीविषयी बरीच आशा वाटू लागली होती

केरेन्स्कीने केलेल्या चुकांमुळे केरेन्स्कीचें हगामी सरकार धोक्यात आलें. कॉर्निलॉफ[2] लष्करी अरेराव बनला होता, आणि स्टीफन ग्रॅहॅमच्या मताप्रमाणे, लेनिन त्या काळीं पुढें न येता तर थोडक्याच काळात सेनापति कॉर्निलॉफनें केरेन्स्की सरकार उधळून राष्ट्रीय लष्करी राज्ययत्र रशियात उभारलें असतें.

केरेन्स्की सरकारचीं शभर वर्षें भरत आलीं आहेत हें लेनिनला स्पष्ट दिसत होतें. प्रश्न एवढाच होता कीं त्याच्या प्रश्नात कॉर्निलॉफ या लष्करी अरेरावाच्या हाती रशियाचीं सूत्रें द्यावयाचीं कीं सोव्हिएटानीं राज्ययत्र हाती घ्यावयाचें. १९१७ च्या सप्टेंबरमध्ये लेनिननें पेट्रोग्राडमधील बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ति समितीला लिहिलें: "बोल्शेव्हिकाना आता राज्यसत्ता आपल्या हातीं घेणें शक्य असून त्यानीं ती घेतलीच पाहिजे." हा लेनिनचा सदेश व्यक्तिश: स्टालिनच्या नावावर पाठविलेला

---

१ अलेक्झाडर केरेन्स्की हा एक तरुण वकील झारच्या राज्यत्यागानतर आलेल्या दुसऱ्या हगामी सरकारचा नेता होता

२ हा एक नामवत सेनानी होता

होता. यावरून लेनिन त्या वेळीं स्टालिनला किती विश्वासातला समजत असेल हें कळून घेण्यासारखें आहे कॉर्निलॉफ पेट्रोग्राडवर चालून आला; परतु बोल्शेव्हिकानी पुढाकार घेऊन त्याचा पराभव केला.

लेनिन, स्टालिन व ट्रॉटस्की हे तिघेजणच त्या काळी एकत्र होऊन चळवळीचा पुढाकार घेत होते त्यातहि स्वतः लेनिन सूत्रधार होता त्याला दूरदृष्टीहि होती. त्यामुळें लेनिननें पुढील धोका पाहून फिनलंडमध्ये गुप्तपणें प्रयाण केलें. ट्रॉटस्की मात्र पकडला गेला. स्टालिनला पकडण्या-इतकें महत्त्व केरेन्स्कीच्या सरकारला वाटलें नाहीं. त्याचा पुरेपूर फायदा स्टालिननें घेतला या मिळालेल्या सधीचा उपयोग त्यानें केरेन्स्कीचे सैन्य बोल्शेव्हिकाना अनुकूल करून घेण्यात केला. बोल्शेव्हिकाच्या आड येणा-ऱ्याचा काटा काढण्याच्या कामी हेंच सैन्य त्याला उपयोगी पडलें

७ मे रोजी बोल्शेव्हिकाची अखिल रशियन कॉंग्रेस भरली होती या सभेत दोन तट पडले कॉमनेफ, रायकॉव्ह व नोगीन यानीं लेनिनला विरोध केला, स्टालिननें पाठिंबा दिला. सर्व सत्ता सोव्हिएटाच्या हातीं केंद्रित झाली पाहिजे असें लेनिनचें आग्रहपूर्वक म्हणणे होते. जमिनीवर शेतकऱ्याची मालकी राखणें, बँकाचें राष्ट्रीयकरण करणे, औद्योगिक सघावर ( ट्रस्ट ) सरकारचा ताबा ठेवणें, कामगारवर्गांचे हितसबध सुरक्षित राखणें वगैरे महत्त्वाचे मुद्दे लेनिनच्या ठरावात होते. अखेर हा लेनिनचा ठराव समत झाला. पूर्वीच्या रशियन साम्राज्याखालील सर्व परतत्र राष्ट्राना स्वयनिर्णयाच्या सपूर्ण अधिकार देण्याविषयींचा स्टालिनचा निबध या परिषदेनें मान्य केला या परतत्र घटकांना साम्राज्यापासून स्वतत्र होण्यास परवानगी देण्यात आली या स्टालिनच्या ठरावावर सभेत खूप खडाजगी झाली होती

या परिषदेनतर मे महिन्यांतच मध्यवर्ती समितीने एका राजकीय मडळाची स्थापना केली. स्टालिनला त्याचा सभासद नेमण्यात आले. नोव्हेंबरची उठावणी, लोकशाही परिषद, प्राथमिक लोकसभा इत्यादि लहानमोठ्या सर्व कार्यांत स्टालिननें लेनिनला मनःपूर्वक साहाय्य केलें. तो

त्याचा जिवलग स्नेही नि निकटचा सहकारी बनून गेला होता. लेनिन जुलैपासून ऑक्टोबरपर्यंत अज्ञातवासात असताना तर स्टालिनच्या हातीं चळवळीच्या मुखपत्राची जवळजवळ सर्व सूत्रें आलेलीं होतीं. 'कामगार नि सैनिक,' 'कामगाराचा मार्ग,' 'कामगार' इत्यादि वृत्तपत्रें स्टालिनच्या नेतृत्वाखालीं चालू लागली होती. त्या वेळीं पक्षाची सहावी कॉंग्रेस भरली. तिच्या यशस्वितेसाठीं जे. स्वर्डलोव्हचा मदतीनें स्टालिननें खूप परिश्रम केले होते चळवळीचा उठाव करण्यासाठीं राजकीय नेतृत्व स्वीकारणारी पाच जणाची Piaterka नावाची एक समिति अगर युद्धमंडळ मध्यवर्ति समितीने स्थापन केले होते. या मंडळावर नोव्हेंबर महिन्यात स्टालिनला सभासद निवडण्यात आलें. तसेंच उठावणीच्या संघटनात्मक नेतृत्वासाठीं सात सभासदाची 'Semierka' नावाची दुसरी एक समिति निर्माण करण्यात आली होती, तिच्यावरहि स्टालिन सदस्य म्हणून निवडून आला.

१९१७ सालापासून सोव्हिएटांचा मध्यवर्ति कार्यकारी समितीचा सभासद म्हणून स्टालिननें काम केलेले आहे. १९१७ ते १९२३ पर्यंत तो पीपल्स कमिसार फॉर नॅशनॅलिटीज या जागेवर होता.

१९१९ ते १९२२ मध्यें कामगार नि शेतकरी याच्या तपासणी-खात्याचा मंत्री होता १९२२ मध्ये पक्षाच्या मध्यवर्ति समितीचा एक चिटणीस म्हणून त्याची नेमणूक झाली १९२५ पासून ई. सी सी. आय्. च्या प्रेसीडियमचा एक सभासद हें त्याचें स्थान होतें. १९४१ मध्यें कॉम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस नि यू. एस्. एस्. आर्. चा पंतप्रधान ही त्याची जागा आहे.

## मी आणतों पैसे !

१९०६ साल क्रांतिकारकांना मोठें खडतर गेलें. क्रांतिकारकाची पाळेमुळें खणून काढण्याचा झारनें निश्चय केला होता. विटी, स्टॉलिपिन, कोकोव्हट्सेफ यासारखे राज्यकार्यधुरंधर मुत्सद्दी झारचे साहाय्यक होते. स्टॉलिपिनची दडपशाही इतिहासप्रसिद्ध आहे. सहस्रावधी क्रांतिवाद्यांची सैबेरियांत पाठवणी झाली, शेकडो क्रांतिवीर झारच्या कारागृहांत पिचून

मेले, अनेक क्रांतिकारक सैनिकांच्या गोळ्यांना बळी पडले. राज्यक्रान्तीच्या दिवसांत प्रबल, उन्मत्त नि चिडलेल्या राज्याधिकाऱ्यांकडून क्रांतिकारकांवर जे अनन्वित अत्याचार नि भीषण दडपशाही केली जाते त्याचेच इतिहासांतील हेंहि एक उदाहरण होतें अर्थातच क्रियेमागून प्रतिक्रिया ही व्हावयाचीच क्रांतिकारकांच्या गुप्त कटांना, अत्याचारी कारस्थानांना ऊत आला बॉम्ब अचानक फुटूं लागले, सरकारी अधिकाऱ्यांच्या खुनाचे प्रयत्न ऐकूं येऊं लागले, रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या उडूं लागल्या; नि सर्वत्र अशांतता नि अस्वस्थता माजून गेली. दहशतवाद्यांनी प्रसंगी सरकारी खजिनेहि लुटले.

त्या काळीं क्रांतिकारकांना मिळणारें देशांतील नैतिक पाठबळ कमी झालें होतें. अर्थातच आर्थिक मदतीची तीव्र वाण भासूं लागली नि पैसा तर अत्यावश्यक होता. त्यामुळें सरकारी खजिने नि धनिकांच्या तिजोऱ्या यांकडे क्रांतिवाद्यांचें लक्ष साहजिकच वळलें, आणि त्यांत त्यांचा दोषहि नव्हता कांहीं. गरीब जनतेपासून लुबाडून नि पिळून घेतलेलेंच बहुतेक द्रव्य होतें तें !

१९१२ सालीं एक नवीन मध्यवर्ति समिति निवडण्यांत आली-स्वर्डलोव्ह, ओर्झोनिकिड्झे, स्टालिन वगैरे सभासदांचा तींत समावेश करण्यांत आला होता. १९१२ च्या जुलै महिन्यांत गॅलीशियामधील क्रॅकौ या गांवीं लेनिन राहण्यास आला. १९११–१२ सालापासून रशियांतील कामगार चळवळीला पुनश्च जोर चढून तिनें तीव्र क्रांतिकारक रूप धारण करण्यास प्रारंभ केला होता. त्या वेळीं लेनिन पॅरीसमध्यें होता; परंतु रशियाकडेच त्याची दृष्टि सतत लागून राहिली असल्यामुळें किंचित् आशेचा किरण दिसूं लागताच तो रशियन सीमेच्या सन्निध येऊन राहिला. पॅरीसच्या खडतर आयुष्यक्रमाला विटलाहि होता तो.

पोलंडमधील गॅलीशिया हा भाग ऑस्ट्रियाच्या सत्तेखालीं परंतु रशियाला लागून होता. लेनिनचा निवास येथें असतानाच बुखारीन, सॅफारोव्ह व झिनोव्हिफ या तरुण मंडळींची जोड लेनिनला प्राप्त झाली. 'प्रवदा'

पत्रावर देखरेख करण्याचे कामहि स्टालिननें याच वेळीं स्वीकारलें. हें कार्य अत्यंत गुप्तपणानें तो चालवीत होता; आणि त्यांत त्यानें चांगलें यश संपादिलें.

१९१६ नंतर क्रांतिकारकांची द्रव्याभावीं भयंकर कुचंबणा होऊं लागली असाच एकदा लेनिन चिंताक्रान्त होऊन बसला होता स्टालिन एकदम पुढें झाला नि म्हणाला, " मी आणतों पैसे "

" कसे ? " लेनिननें अधीरपणें विचारलें.

" लुटून ! " स्टालिन उत्तरला.

त्यानंतर लेनिन व स्टालिन यांनी एक बेत ठरविला. स्टालिनच्या धाडसीपणाचें तें एक नमुनेदार उदाहरण आहे.

१३ जून १९१७ रोजीं टिफ्लिसच्या सरकारी बँकेकडे सेंटपीटर्सबर्गहून ३४१००० रुबल्सची रक्कम भरणा व्हावयाची होती ( नोव्हो ब्रेम्याच्या म्हणण्याप्रमाणें ) पांच हजारी ६४२ नोटांचें तें एक मोठें ओझें होतें. कुर्डुमॉफ हा कोषाधिकारी तो खजिना एका उघड्या घोड्याच्या गाडींत घालून टिफ्लिसकडे निघाला त्या गाडीच्या पाठीमागेंच दुसऱ्या एका वाहनांत चार हत्यारी पहारेकरी ठेवलेले होते त्या खजिन्याच्या संरक्षणासाठीं एक कोसॅक तुकडीहि बरोबर देण्यांत आली होती पण तें सारें लटांबर गव्हर्नरच्या बंगल्यापाशीं येतांच त्यांच्यावर अचानक एक मोठा बॉम्ब पडला. ही हल्ल्याची योजना स्टालिननें पूर्वीपासूनच आखून ठेविली होती. पहिला बॉम्ब टाकला तो स्टालिननें कीं इतर कोणी हे नक्की कळलेले नाहीं त्या भयंकर बॉम्बच्या पाठोपाठ दुसरेहि अनेक लहान बॉम्ब फेंकण्यांत आले आसपास दडून राहिलेल्या क्रांतिकारकांनीं एकदम रिव्हॉल्व्हर्समधून गोळ्या झाडण्यास सुरवात केली. भयंकर गडबड उडाली कोषाधिकारी गाडीबाहेर फेकला गेला. घोडे उधळले नि गाडी घेऊन सैरावैरा धावूं लागले, परंतु कटवाल्यांपैकीं कोणीतरी कौशल्यानें एक बॉम्ब नेमका त्या घोड्याखालीं टाकला. घोडे ठार झाले नि अर्थातच गाडी थांबली. हा अचूक बॉम्ब टाकणारा म्हणजे ' कामो पेटोसीअन ' किंवा स्टालिन यांनेंच

तावडतोब गाडीवर उडी मारली, पैशाची पेटी हस्तगत केली, नि डोंगराळ मुलुखात वेगानें धाव् शकणाऱ्या एका लहानशा गाडीत उडी ठोकून तो भरधाव निघाला. तरीहि त्याचा कोसॅक शिपायावरील गोळीबार चालूच होता. तसाच तो निसटला. कोसॅक स्वाराची संख्या कटवाल्याच्या ६--७ पटींनी अधिक होती, तथापि ते एकसुद्धा कटवाला पकडू शकले नाहीत [१] उलट त्याच्यापैकींच बरेच स्वार कामीं आले. स्टालिनची सबधच्या सबध तुकडी लूट घेऊन सुरक्षितपणे पसार झाली. कोसॅकांनी कटवाल्याचा पाठलागहि केला नाहीं लेनिनला हवे होते ते पैसे मिळाले. स्टालिननें त्यांतील एका पैलाहि स्पर्श केला नाहीं असें म्हणतात तथापि या रकमेपैकीं फक्त २५०००० रुबलसच बोल्शेव्हिकांना मिळाल्याचें एक लेखक म्हणतो. [२]

क्रांतिकारकांत शिरल्यापासून स्टालिनचें अचाट धाडस, साहसी वृत्ति नि ठरविलेली गोष्ट पार पाडण्यासाठी प्राणपणानेंहि झगडण्याची सिद्धता लेनिनच्या प्रत्ययाला आली होती हा कर्तबगार पुरुष लेनिनच्या आज्ञाधारक सेवकासारखा वागू लागल्यानें तर लेनिनला त्याच्याविषयीं साहजिकच जिव्हाळा वाटू लागला हा जिव्हाळा अखेरपर्यंत कायम टिकला नसला तरी लेनिनने स्टालिनच्या निर्दय कर्तृत्वाचा नि आज्ञाधारक वृत्तीचा ( निदान वरकरणीं तरी तसें दिसत होतें ) संपूर्ण उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें होतें हे दोघे परस्परविरोधी स्वभावाचे क्रांतिकारक एकत्र कसे नांदले हें मात्र आश्चर्य आहे !

---

१ युजेन लिऑ याच्या म्हणण्याप्रमाणे त्यात कटवाल्यापैकीं एक जण ठार नि ५० जखमी झाले.

2 M A Aldanof 'Sovremensiki' P. 112

# लेनिनचा संधिसाधू पट्टशिष्य

" सुविख्यात क्रांतिकारकाचे विचार जर लेनिनच्या लिखाणात मला आढळतात, तर तसले इतरत्र असणारे विचार स्वतन्त्रपणे वाचण्याची काय आवश्यकता आहे मला ? आणि स्वत: लेनिनच जर त्या विचारास महत्त्व देत नसेल तर लेनिनचा कट्टा शिष्य या नात्याने त्याजकडे लक्ष देण्याची मला मुळीं आवश्यकताच नाहीं. " स्टालिनचे स्वत:चे उद्गार आहेत हे. पण एवढ्यावरून स्टालिनच्या लेनिनभक्तीची कसोटी ठरविण्याच्या भरीस कोणी पडू नये अशी धोक्याची सूचना द्यावीशी वाटते

स्टालिनच्या मनावर आजपर्यंत सत्ता चालविण्यात कोणी यशस्वी ठरलें असेल तर ती एकच व्यक्ति, लेनिन ! पण स्टालिनच्या या लेनिनशिष्यत्वाच्या शुद्धतेविषयीं संशय आल्याखेरीज राहात नाही स्टालिनला सोव्हिएट रशियाचे सर्वाधिकार आपल्या हातीं घ्यावयाचे होते. तशी दुर्दम्य महत्त्वाकांक्षा त्याने आपल्या मनाशीं बाळगिली होती. लेनिन हा नव्या सोव्हिएट रशियाचा पहिला सूत्रधार होता. त्याच्याच तन्त्रानें सारा कारभार चाले. अर्थातच अशा सामर्थ्यसंपन्न व सर्वोच्च अधिकारपदावर अस-

लेल्या लेनिनवर छाप पाडणें किंबहुना त्याला आपलासा करून घेणें, प्रसगीं स्वत'च्या भावनाच्या नि मताच्या बळी देऊन वा तीं दूर सारून लेनिनच्या म्हणण्याला मान डोलविणें ह्या गोष्टी स्टालिननें केल्या असतील त्या केवळ लेनिनवरील अव्यभिचारी, निर्मळ नि निःस्वार्थी भक्तीनेंच असें म्हणता येईल काय? दूरदर्शीपणानें लेनिनच्या अंतरगात प्रवेश करून, त्याच्या वि-श्वासात राहून सर्व केंद्रीभूत सत्ता आपल्या हातीं घेण्याचा कावा स्टालिन-च्या मनात त्या वेळीं नसेल असें कोणी ठामपणाने म्हणू शकेल काय? लेनिन मृत्यूच्या दाढेत पूर्णपणे सापडला असताना त्याला स्टालिनच्या अरेरावीची स्पष्ट कल्पना येऊन तो पश्चात्ताप पावला स्टालिननें राज्य-कारभारात केलेल्या अन्याय्य व असमर्थनीय हस्तक्षेपाबद्दल त्याची निर्भत्सना करणारें एक पत्रहि लेनिननें त्या प्रसगीं त्याला पाठविलें होतें. त्यावर स्टालि-ननें दुःख प्रदर्शित करून क्षमायाचनाहि केली. परतु थोड्याच दिवसात लेनिन जेव्हा प्रत्यक्ष मरण पावला, तेव्हा तें क्षमापत्र स्टालिनने लेनिनची नि सहाय पत्नी क्रुप्सकाया हिच्यापासून हिसकावून घेऊन त्याचा नाश केला आणि असें काही घडलेच नव्हतें असा डांगोरा पिटला याचा स्पष्ट अर्थ असा की, आपल्या गरजेपुरताच स्टालिनला लेनिन पाहिजे होता; सर्व सत्ता आपल्या हातीं आल्यानतर लेनिनच्या मोठेपणाची त्याला मुळीच पर्वा नव्हती ही तऱ्हा इतिहासात अनेक हुकुमशहानीं, राजानीं व पुढा-ऱ्यानीं अवलबिलेली दिसेल कै. लोकमान्य टिळकाच्या थोर नावाचा उपयोग करून लक्षावधी रुपयाचा फड उकळणारे ' महात्मे ' जगातील प्रत्येक देशात पाहावयास मिळतील. आतां लोकमान्याचें नाव निघालें म्हणून सागतो. रशियातहि हिंदुस्थानप्रमाणेंच एक मनोरजक वाद या नाममाहा-त्म्यावरून माजला होता

हिंदुस्थानच्या चालू राजकारणातील तो न तुटणारा वाद म्हणजे लोक-मान्य टिळकाचें राजकारण पुढे कोण चालवीत आहे? कॉंग्रेस आणि हिंदु-महासभा या दोन महत्त्वाच्या व बलशाली पक्षांपैकी प्रत्येक पक्ष मोठ्या अहमहमिकेनें ' आम्हीच खरे लोकमान्याच्या राजकारणाचे वारसदार ' असें

म्हणून तें येनकेनप्रकारेण पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

तसाच कांहींसा प्रकार सोव्हिएट रशियाच्या राजकारणात लेनिनच्या मतप्रणालीबाबत स्टालिन नि ट्रॉट्स्की याच्या पथात माजला होता. फरक एवढाच की, लेनिनचा जड देह अस्तित्वात असताना म्हणजे तो मृत्यु-शय्येवर खिळला असतानाच या वादाला सुरवात झाली, नि हिंदुस्थानातला वाद टिळकाच्या निधनानंतर उद्भवला. त्यांत कावेबाज स्टालिननें कांही स्वकर्तबगारीवर तर कांही दैवाचा फासा अनुकूल पडला म्हणून ' मीच लेनिनचा खरा शिष्य ' असें सिद्ध करण्याचा प्रयत्न—निदान आभास तरी यशस्वी केला.

## पहिली संस्मरणीय भेट

लेनिन आणि स्टालिन हे दोघे कर्तबगार पुरुष प्रथम एकमेकाना भेटले तें ठिकाण टॉमरफोर्स.

१९०५ सालच्या क्रांतीच्या पहिल्या रणधुमाळींतच फिनलंडमधील टॉमरफोर्स येथें बोल्शेव्हिक पुढाऱ्याची एक गुप्त सभा भरली होती. या सभेसाठीं ठिकठिकाणाहून अनेक बोल्शेव्हिक कार्यकर्ते उपस्थित झाले होते. त्यात जोसेफ ( स्टालिन ) हाहि आला होता आणि याच वेळीं प्रथमत. स्टालिन—लेनिन याची भेट झाली. टॉमरफोर्सच्या बैठकींत कार्याच्या दृष्टीनें कोरड्या चर्चेपेक्षा अधिक कांही फलनिष्पत्ति झाली नाहीं, परंतु स्टालिन-सारखा एक हिरा मात्र लेनिनला मिळाला स्टालिननें लेनिन या व्यक्तीला प्रत्यक्ष असें यापूर्वी केव्हाच पाहिले नव्हतें असें दिसतें, परंतु लेनिनच्या वाङ्मयाशीं मात्र स्टालिन यापूर्वीहि चागलाच परिचित होता.

टॉमरफोर्सच्या बैठकीसबधीं स्टालिन आपल्या मित्रांपाशीं अभिप्राय व्यक्त करताना म्हणतो " टॉमरफोर्स येथील बोल्शेव्हिकाच्या सभेंत लेनिनला मी प्रथम पाहिलें. आमच्या पक्षातील गगनाला गवसणी घालणारा हा वैनतेय, हा थोर पुरुष ( बाह्यागानें ) मला अगदीं चार सामान्य माणसासारखा दिसला. लेनिनची विचारसरणी तर्कशुद्ध, स्पष्ट व निर्दोष होती. " या प्रसंगींसुद्धा लेनिनखेरीज कोणीहि व्यक्ति स्टालिनवर आपली छाप पाडू शकली नाहीं. एकंदरींत लेनिनच्या व्यक्तित्वाविषयीं व कर्तृत्वा-

संबंधीं स्टालिनच्या मनांत अनेक वर्षांपूर्वींपासून गाढ आदर वसत होता. असें वरील उद्‌गारावरून दिसतें. या उलट लेनिनहि स्टालिनच्या कर्तब-गारीवर या काळीं प्रसन्न झाला व त्याचा भविष्यकाल थोड्याबहुत अंशानें तो पाहू शकला असें म्हणता येईल.

तथापि त्यानंतरचा बहुतेक काळ धामधुमींत व अस्थिर परिस्थितींतच गेला; त्यामुळें स्टालिनचा लेनिनशीं फारसा जिव्हाळ्याचा संबंध १९१२ पर्यंत आलेला दिसत नाहीं १९१२ सालीं प्राग येथें बोल्शेव्हिक पक्षाची काँग्रेस भरली, तींत स्टालिन येऊन दाखल झाला. या परिषदेंतच स्टालिन प्रथमतः चमकला सभासदांचा स्टालिनविषयीं तितकासा अनुकूल ग्रह नसताहि लेनिनच्या मलावणीवरून स्टालिनला बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ति समितीवर घेण्यात आलें रशियाबाहेर राहूनहि स्टालिननें चळवळींचीं सूत्रें हालविलीं तरी चालतील, अशी परवानगी या बैठकींत स्टालिनला मिळाली असताहि त्यानें रशियातच काम करण्याचें पतकरलें रशियात जाऊन काम करण्यात पोलिसांच्या जुलुमाला तोंड द्यावें लागणार हें स्पष्ट दिसत होतें, तरीहि तो रशियात गेला, यावरून त्याचा निधडेपणा व्यक्त होत असला तरी, त्याला रशियनखेरीज कोणतीच अन्य भाषा येत नसल्यामुळें परदेशात जाऊन राहणें ही गोष्ट तितकीशी शक्य व इष्टहि नव्हती.

मध्यवर्ति समितीवर स्टालिनला घेण्यात लेनिनचा कांहींतरी विशिष्ट हेतु होता हें निश्चित, व त्याच धोरणानें त्या वेळीं लेनिननें त्याच्या शिरावर जोखमीचीं कामें टाकण्यास सुरवातहि केली होती.

एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, लेनिन जसे स्टालिनचे गुण जाणीत होता नि त्याचा उपयोग कसा नि कोठें करून घ्यावा हें त्याला कळत होतें, तसाच स्वतः स्टालिनहि लेनिनची थोर कर्तबगारी नि त्याच्या ठिकाणची तेजस्वी प्रतिभा उमजण्याइतका शहाणा होता. मग लेनिननें स्टालिनसारख्या एका "हडेलहप्पी शिपायाचा उपयोग 'साधन' किंवा 'हत्यार' म्हणून क्रांतिकार्यांत करून घेतला" तसाच स्टालिननें स्वतःच्या प्रामाणिक मताच्या प्रसारासाठीं लेनिनच्या नावाचा उपयोग साधन किंवा हत्यार म्हणून करून घेतला तर त्याला दोष कसा देता येईल!

# थोडा पूर्वेतिहास

१९०५ च्या पहिला क्रांतीचा प्रयत्न अयशस्वी ठरला. झार सरकार-कडून करण्यांत आलेली अमानुष दडपशाही व बोल्शेव्हिक पक्षाची अपुरी संघटना यामुळेच हें अपयश आलें असें जरी म्हणता येत नसलें, तरी १९१० सालपर्यंत कामगारांचे नि क्रांतिवाद्यांचे पुढारी पुनः डोकें वर काढू शकले नाहीत हें खरें. १९१० सालांतील महत्त्वाची घटना म्हणजे बोल्शेव्हिकांनीं सोशल डेमॉक्रॅटिक पक्षातील मेन्शेव्हिकांच्या क्रांतिविरोधी गटाशीं असलेला आपला संबंध पूर्णपणे तोडून टाकला, ही होय. १९१० सालीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं आपली संघटना बरीच सावरली नि कामगार वर्गाची चळवळ क्रांतिकारक धोरणानें चालविण्यास त्यांनीं प्रारंभ केला. त्याच काळांत युरोपांत आगामी महायुद्धाचे कृष्णमेघ दिसू लागले होते. ही संधि साधावयाचें लेनिनप्रभृतींनीं ठरविलें. महायुद्ध सुरू झाल्यानें भांडवलशाहीचा अति विस्तृत व्याप तिला सांभाळतां सांभाळतां नाकीं नऊ येतील नि अशा सुसंधीचा पूर्ण फायदा आपण करून घेतला पाहिजे हें लेनिननें ओळखलें. त्यासाठीं रशियांत क्रांतिकारी कामगारांचा एक

प्रचंड सघ निर्माण करण्यात आला. १९१३ नि १९१४ सालातील जगड्व्याळ राजकीय संपात बोल्शेव्हिक पक्षाचें बल चांगलेच कसाला लागले होतें नि त्यामुळेंहि लेनिन आदि पुढाऱ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला होता

## बोल्शेव्हिकांपुढील बिकट कार्य

१९१४ च्या ऑगस्ट महिन्यात पहिल्या महायुद्धाचा वणवा युरोपात पेटला. साम्राज्यशाही राष्ट्रांनी स्वतःची साम्राज्ये टिकविण्यासाठी नि असलेली पकड करून त्याचा विस्तार करण्यासाठी हा झगडा सुरु केला होता. या साम्राज्यवादी राष्ट्रांपैकीं सर्वांचें सामर्थ्य सारखें नसल्यानें जगाची अधिक वाटणी कोणीं बळकवावी हा प्रश्न साहजिकच उद्‌भवला या गटातील राष्ट्रांच्या दर्जांची असमानता नि आर्थिक परावलंबित्व हेंच या महायुद्धाचे मूळ कारण असे लेनिन म्हणू लागला लेनिनचें हें म्हणणें इतर समाजवाद्यांना पटलें नाहीं अर्थातच महायुद्धाविषयीं समाजवाद्यांचें धोरण काय असावे यावर रण माजून मतभेदाचे प्रसंग उद्‌भवले.

लेनिनला गॅलीशिया प्रांतांतील पोरोनिनो गावीं ऑस्ट्रियन सरकारनें काहीं दिवस कारावास घडविला, त्यानंतर काहीं दिवस क्रॅकौ येथें राहून तो स्वित्झर्लंडमध्ये गेल्यावर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात तेथें निर्वासित बोल्शेव्हिकांची एक सभा बोलविण्यात आली. त्या बैठकींत चालू महायुद्धाशीं संपूर्ण असहकार करून त्यांत रशियाचा पराजय होईल असे प्रयत्न करण्याचा निश्चयवजा ठराव बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ति समितीनें संमत केला[1] नि आपलें धोरण तदनुसार आखलें. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेला (The Second International) बोल्शेव्हिकांनीं आपल्या दृष्टीनें या बैठकांत मूठमाती दिली कारण तिचें धोरण युद्धसहकाराचे होते.

रशियाच्या झार सरकारनें महायुद्धात सामील होताच पहिली कोणती गोष्ट केली असेल तर ती म्हणजे लेनिनच्या युद्धविरोधी नि क्रांतिकारक अनुयायांची वासलात लावण्याचा यत्न करणें. तथापि वैध मार्गांनी बोल्शे-

---

१ हाच तो लिऑं ट्रॉट्स्कीचा सुप्रसिद्ध ' विध्वंसवाद. '

व्हिक क्रांतिवादी कल्पनांचा प्रसार ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिक पक्षीय सभासदांनी जोरदारपणे केला. परंतु ड्यूमा सभेंतील प्रतिनिधि या नात्यानें काम करण्याचीहि अनुकूलता त्यांना फार दिवस लाभली नाहीं. बोल्शेव्हिकांचे ड्यूमामधील सर्वहि प्रतिनिधि सरकारनें पकडले त्यांत कामनेव्ह हाहि एक होता. त्यांच्यावरील आरोपाची रीतसर चौकशी होऊन त्यांची सैबेरियांत पाठवणी झाली. बोल्शेव्हिक प्रतिनिधींच्या तत्कालीन तेजस्वीपणाची लेनिननेंहि प्रशंसा केली आहे.

इतरहि अनेक मार्गांनीं गुप्त वा उघडपणें चाललेल्या युद्धविरोधी चळवळी चिरडून टाकण्याचा सरकारनें चंग बांधला. छापे, झडत्या, धरपकडी नि लष्करी न्यायासनापुढील चौकशीनंतर शिक्षा हे सत्र जोरानें सुरू झालें. ' प्रवदा ' पत्र सरकारी आज्ञेवरून लगेच बंद करावें लागलें. बहुतेक सर्व बोल्शेव्हिक सीमापार झाले. खुद्द रशियांतच बोल्शेव्हिक मतप्रचाराचें कार्य नामशेष झाल्याचें दिसूं लागलें. मात्र परदेशांतील कार्य जोमानें वाढीला लागलें होतें लंडनमध्यें लिट्विनॉफ, स्टॉकहोममध्यें श्लियाप्निकोव्ह, स्विझियानियात कोलोन्टाई आणि न्यूयॉर्कमध्यें बुखारीन ही मंडळी आपल्या पक्षांतील विखुरलेले लोक एकत्र आणून क्रांतिकारी समाजवादाच्या चळवळीला पुनश्च तेज चढविण्याचे प्रयत्न करीत होती. आपल्या पक्षाची संघटना मजबूत करून चालू महायुद्धाचें वर्गकलहांत तीव्रतेनें रूपांतर व्हावें, क्रांतिकारी समाजसत्तेची स्थापना करतां यावी अशासाठींच लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक नेत्यांची अहोरात्र धडपड नि परिश्रम सुरू होते. मात्र ट्रॉट्स्की व मध्यवर्ती समितीचे कांहीं सभासद शांतताप्रस्थापनेची चळवळ करून राहिले होते. महायुद्धाच्या वेळीं आपसांतील यादवीला प्रारंभ होऊन तिचें क्रांतींत पर्यवसान होणें ही आकस्मिक उद्भवणारी गोष्ट नव्हे, तर युद्ध-प्रारंभापूर्वी या दोस्त राष्ट्रांतून जीं अनेक आर्थिक नि राजकीय स्थित्यंतरें घडून आलीं त्यांचा तो स्वाभाविक परिपोष आहे, असें पटवून देण्याचा लेनिननें प्रयत्न करून पाहिला, पण त्याला त्यांत यश मिळालें नाहीं

दुसऱ्या आनरराष्ट्रीय परिषदेंतील पुढाऱ्यांनी यावेळीं जें विश्वासघातकी वर्तन केले त्यामुळे लेनिनचें मन प्रक्षुब्ध झाले. जर्मनीतील पक्ष-पुढाऱ्यांनीं युद्धसहकार करून कैसरचे पाठबळ सपादन केलें मार्क्स नि एंजल्स यांनी 'जर्मन सोशल डेमॉक्रॅटिक पक्ष स्थापला होता, त्यामुळें जगातील कामगार या पक्षाकडे एक अधिकृत गट या नात्याने पाहात होते. याच पक्षानें आयत्या वेळीं तोंडघशी पाडल्यानें बोल्शेव्हिकांच्या युद्धविरोधी चळवळीला बराच जाणवण्याजोगा धक्का बसला.

" युद्धाला अपरिहार्यपणें कारणीभूत होणाऱ्या साम्राज्यशाहीला जग-विण्यापेक्षा मानवी समाजाला कायमच्या शांततेची व सुखाची प्राप्त करून देणाऱ्या कामगार क्रांतीची आराधना करणें अत्यत श्रेयस्कर आहे भाडवल-शाहीला जगविणारी शांतता आपल्याला नको आहे तर भांडवलशाही युद्धाच्या ऐवजी देशातील निरनिराळ्या वर्गांत आपसात युद्ध होणें आव-श्यक आहे " असे लेनिन म्हणू लागला

प्लेखोनाव्हने युद्धसहकाराची भाषा सुरू केली, तर रोझा लक्झेंबर्ग, राडेक, बुखारीन याना जागतिक क्रान्तीचे डोहाळे लागले. त्यामुळे एकी-कडे प्लेखोनाव्हसारख्या समाजवादी आचार्यांचा निषेध करीत असता, बुखारीनप्रभृति जगत्क्रांतिवादी कट्टर जहालांना 'आस्ते कदम'चा इशारा देण्याचे कार्य लेनिनला करावें लागत होते.

## चालून आलेली सुसंधी

पण महायुद्ध कांहीं या क्रांतिवादाच्या चर्चा-बैठकींसाठीं थांबलें नव्हतें ! तो वणवा चांगलाच भडकला. रशियाची रग बरीच जिरली एकामागून एक अपजयाचेच प्रसग झारच्या सैन्यावर आल्यानें आपल्या अजिंक्यत्वाचा रशियाचा पीळ दिला पडला १९१५ च्या उन्हाळयात तर रशियाची स्थिति इतर युद्धमान राष्ट्रांपेक्षा फारच केविलवाणी झाली. आणि त्यामुळें रशियातील बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना आपलें कार्य उरकण्याची एक सुसधीच चालून आली.

रशियन सैन्याला ठिकठिकाणीं खाव्या लागत असलेल्या पराजयाचे

कारण वस्तुत. रशियन सैनिकाच्या नालायकीत होतें, परंतु आपलें मनुष्यबळच कमी पडत आहे असा निष्कर्ष काढून रशियन सेनापतींनी लष्करभरतीची मोहीम सुरू केली १९१४ च्या महायुद्धाचे वेळीं हिंदुस्थानात रंगरूट भरतीसाठीं जे भलेबुरे प्रकार योजण्यात आले त्याचीच ती एक आवृत्ति होती. चाबकानें बडवीत हजारों रशियन शेतकरी नि इतर लोक रणांगणावर पाठविण्यात आले गुराना हाकलीत नेणाऱ्या कसाबाची वर्तणूक तरी त्यापेक्षा अधिक चांगली असेल. अर्थातच अशा असंतुष्ट सैनिकाचें सैन्य रशियाला कसें यश मिळवून देणार ? उलट बंडखोर प्रवृत्ति सैन्यातूनहि वाढीला लागली. लक्षावधि रशियन सैनिक रणक्षेत्रावर शत्रूच्या गोळ्याना बळी पडत होते, तशीच उपासमारहि विलक्षण होत होती. ना शस्त्र, ना वस्त्र अशा अवस्थेत लढणाऱ्या त्या सैनिकाचें ते युद्ध नसून आत्महत्याच होती, असें युजेनने म्हटलें आहे. आणि हें भयानक दृश्य महायुद्धाच्या प्रारंभापासून फक्त एका वर्षाच्या आत दिसू लागलें युद्धसामुग्रीचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांतील कामगार वर्गावरहि कामाचा असह्य ताण पडू लागला त्यामुळे असंतोषाचें वारें त्याच्यातहि फैलावलें कामगार वर्गावरील जुलूम नि जबरदस्ती वाढू लागल्यानें तेहि आपोआप संघटित होऊ लागले हजारों कामगार आपोआपच कामासाठी एकत्र येत असल्यानें त्याचें दळणवळण वाढलें. परस्पराचे विचार नि असंतुष्ट भावना परस्पराना कळून त्याना संघटित स्वरूप येऊ लागलें. हळूहळू या कामगार चळवळीतल्या स्फुलिंगातूनच राजकीय असंतोषाचा वणवा पेटला. कोणत्याहि कारणासाठी संप होवो त्याची परिणति राजकीय उठावणींत व्हावयाची असें जवळजवळ ठरूनच गेलें होतें त्या काळीं ' राजकीय संप हा रशियातील कामगार चळवळीचा प्रमुख कार्यक्रमच होऊन बसला होता ' असें एक लेखक म्हणतो. १९०५ सालीं रशियातील कामगाराची संख्या १५ लाख होती ती १९१७ मध्ये २० लाखावर गेली.

देशात युद्धामुळे पाचावर धारण बसली नि देशव्यापी असंतुष्टतेची लाट पुनश्च उसळी घेऊन उठली. उपासमारीमुळें चिडून अखेर १९१५

च्या उन्हाळ्यात राजकीय तपाना प्रारंभ झाला. १९१७ मध्यें फेब्रुवारींत लष्करातील शिपायांनी व कामगारांना सरकारविरोधी चळवळीचें स्वरूप इतकें तीव्रतेप्रत नेलें की, त्याला बंडाचें स्वरूप प्राप्त झालें. या स्थित्यंतरणीला कारणीभूत झालेली व क्रान्तीला यशस्विता प्राप्त करून देणारी संघटना कांहीशी प्रयत्नांनें व कांही निसर्गतःच निर्माण झाली होती 'सोव्हिएट' म्हणून ज्या संघटनेचें नांव आज जगभर उच्चारलें जातें तीच ही संघटना होय !

१९०३ सालापासून १९१७ पर्यंत बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक हे दोन पक्ष रशियाच्या पुनर्घटनेसाठा आपापल्या मार्गांनी झटत होते. जहाल नि नेमस्त असें सामान्यतः[१] या दोन पक्षांचें वर्णन करता येईल. क्रान्ति प्रत्यक्ष घडून येईपर्यंत नि बोल्शेव्हिकाचें आसन स्थिर होईपर्यंत मेन्शेव्हिक नि बोल्शेव्हिक यांचा झगडा अखंड चालू होता

युद्धाच्या प्रारंभानें कामगार वर्गाच्या क्रांतिकारक चळवळीच्या नाड्या कांही काल आवळल्या गेल्या हें खरें, पण या महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीशीं तोंड देण्याकरिता झार सरकारला देशांत जी भयंकर दडपशाही करावी लागली, तीमुळेच सबंध देश ढवळून निघून भावी क्रान्तीची पार्श्वभूमि सिद्ध करता आली असें म्हणतां येईल. म्हणजे एका तऱ्हेनें पहिलें महायुद्ध रशियांत क्रांति घडविण्यास उपकारकच ठरलें

१९१७ मार्च[१] (जुन्या रशियन दिग्दर्शकाप्रमाणें फेब्रुआरी) महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पीटर्सबर्गमधील सैनिकांनी नि कामगारांनी क्रान्तीचा पहिला उठाव केला २३ फेब्रुआरी हा रशियन क्रान्तीचा पहिला दिवस होय आंतरराष्ट्रीय महिला दिन या दिवशीं आला असल्यानें तो प्रचंड प्रमाणावर साजरा करण्याचें सोशल डेमॉक्रॅटिक पक्षानें ठरविलें होतें मात्र त्यांत भाषणें, सभा, मिरवणुकी नि पत्रकं काढणें याच प्रकारचे सौम्य नि निरुपद्रवी कार्यक्रम नियोजित होते संपाचा विचारहि कोणी केलेला नव्हता सिद्धता अशी कसलीच नसल्यानें लढाऊ बोल्शे-

१. या दोन दिनदर्शिकांत १३ दिवसांचा फरक आहे.

-व्हिक कामगार संघानें उलट संप वगैरे काहीं करू नये अशाच सूचना कामगाराना दिल्या होत्या. तथापि पीटर्सबर्गमध्यें एकाएकी संपाची ज्योत पेटली त्यात सर्वच पक्षाचे कामगार येऊन मिळाले. त्याच्या पाठीशीं त्याना चेतविणारे पुढारी अगर प्रवर्तक नव्हते. संप पुकारला गेला तो स्वयंस्फूर्तीनेंच

झाले! हा हा म्हणता वाऱ्यासारखा हा वणवा भडकत गेला. पण विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे या वेळीं झारचे एकनिष्ठ घोडेस्वार नि बरेंच लष्कर संपवाल्याना मिळालें. अनेक राजनिष्ठ पलटणीहि बंड करून उठल्या संप मोडण्यासाठीं अनेक अमानुष उपाय झारच्या पोलिसांनीं योजिलें लष्कराकडून यान्त्रिक बंदुका नि तोफांचाहि सर्रहा उपयोग करण्यात आला. पण संपवाले हटले अगर खचलेहि नाहींत. संपाचा जोर अखेरपर्यंत कायम होता; नव्हे लष्कराच्या साहाय्यामुळें संपवाल्याचा उत्साह अनेकपटींनीं वाढला १५०००० लष्कर नगररक्षणार्थ ठेविलेलें होतें तें अखेरीस सर्वच्या सर्व क्रांतिकारकाना येऊन मिळालें.

ता. २७ ला संपवाल्यानीं शहरातील कारागृहाचे दरवाजे उघडून सर्व राजकीय बंद्याची सुटका केली त्यात बोल्शेव्हिक तसेच मेन्शेव्हिक पुढारी-हि होते. कारागृहातून मुक्त होताच मेन्शेव्हिकानीं ड्यूमा सभेचा रस्ता सुधारला तर बोल्शेव्हिकांनीं शहराच्या निरनिराळ्या भागातील कामगारा-कडे नि सैनिकाकडे धाव घेतली.

क्रांतिकारकानीं बंडखोर सैनिकाच्या साहाय्यानें टॉरीड राजवाड्यासह सबंध पेट्रोग्राड राजधानी आपल्या ताब्यात घेतली. झारच्या राजवटीतील सर्व लहानमोठे सरकारी अधिकारी पकडण्यात आले. ता. २८ फेब्रुवारी-ला सकाळीं बोल्शेव्हिकाच्या मध्यवर्ति समितीनें रशियातील जनतेला उद्देशून केलेली सुप्रसिद्ध घोषणा प्रकट झाली.

## क्रांति कशी घडली ?

१९१७ फेब्रुवारीच्या क्रांतीनें झारची सत्ता उलथून टाकली. कामगार नि सैनिक याच्या प्रतिनिधींचें एक 'सोव्हिएट' ( पचायत मंडळ )

पेट्रोग्राडमध्ये स्थापन करण्यात आले. परंतु त्या सोव्हिएटमध्यें मेन्शेव्हिकांचेच बहुमत होतें त्यामुळें हे नवें सरकार बोल्शेव्हिकांच्या जहाल तत्त्वज्ञानापेक्षा अगदींच मिळमिळीत किंबहुना प्रसंगी त्या तत्त्वांच्या विरुद्धहि वागू लागलें. भांडवली गटाच्या सत्तेला नेस्तनाबूत करण्याऐवजीं भांडवली सरकारला मदत करण्याचेंच त्याचें स्वरूप राहिलें हे भांडवलदाराविषयीं सहानुभूति असणारें धोरण अर्थातच लेनिनप्रभृतींना मान्य नव्हतें परंतु ती सर्व मंडळी त्या वेळीं निर्वासित होती स्वतः लेनिन स्वित्झर्लंडमध्ये अडकून पडला होता

पुढे जेव्हा लेनिन रशियात परत आला, तेव्हा लेनिनवर जर्मन सरकारचा हेर असल्याचा आरोप करून, रशियात प्रस्थापित सरकारविरुद्ध कुरापत काढून यादवी माजविण्यासाठींच कैसरनें त्याला पाठविलें असल्याची कोल्हेकुई तत्कालीन हंगामी सरकारची पत्रे करूं लागलीं हें हंगामी सरकार म्हणजे मेन्शेव्हिक पक्षाचें केरेन्स्की मंत्रिमंडळ होय. परंतु बोल्शेव्हिकांनी आपली चळवळ तशीच जोमानें चालू ठेविली. सैनिकांचीं अंतःकरणें बोल्शेव्हिकांकडे वळवून घेण्यासाठी बोल्शेव्हिक पक्षानें बोल्शेव्हिक लष्करी समिति स्थापन केली

क्रान्तीनंतरचा पहिला मे-दिन रशियात सर्वत्र अत्यंत मोठ्या प्रमाणावर साजरा व्हावयाचा होता. त्यातच हंगामी सरकारचा एक वरिष्ठ व उत्तरदायी अधिकारी मिल्युकोव्ह यानें 'दोस्तांना विजय मिळेपर्यंत रशिया युद्धातून अंग काढून घेणार नाहीं, एकनिष्ठेनें लढेल' असें आश्वासन मित्रराष्ट्रांना दिलें असल्याची वार्ता त्याच दिवशीं प्रसृत झाली होती त्यामुळें पेट्रोग्राडमध्ये त्या दिवशीं दोन मिरवणुका निघाल्या परंतु दोहींचें स्वरूप भिन्न होतें कामगार व सामान्य सैनिक यांची एक, नि दुसरींत पांढरपेशा वर्ग, शिष्ट लोक व सरकारी अधिकारी होते. कामगार व सैनिक हंगामी सरकारचा निषेध करीत होते, बोल्शेव्हिकांच्या बीज वाक्याचा जयजयकार त्यांनी चालविला होता दुसऱ्या मिरवणुकींत जर्मन हेराचा निषेध नि दोस्त राष्ट्रें व हंगामी सरकार यांचा जयजयकार ऐकू

येत होता या दोन्ही मिरवणुकी कांहीं ठिकाणीं एकत्र आल्या. त्यात परस्परांनी परस्परांवर गोळ्याहि चालविल्या चकमकी झडल्या. कामगार व सैनिक मिल्युकोव्हप्रभृति सरकारी अधिकाऱ्याच्या त्यागपत्राची मागणी करीत होते. त्याचा परिणाम पुढें झालेला दिसला. मिल्युकोव्ह नि गुचकोव्ह या हंगामी सरकारच्या दोन मन्त्र्यांनी त्यागपत्रें दिलीं नि झेरेटेलीप्रभृति पाच सोशालिस्ट पुढारी मंत्रिमंडळात घेण्यात आले. परंतु त्यामुळें जुन्या परराष्ट्रीय धोरणात कांहींच फरक पडला नाहीं. कारण केरेन्स्की हाच नव्या सरकारचा पंतप्रधान अतएव सूत्रचालक राहिला होता व त्याचा ओढा दोस्तराष्ट्राकडे होता.

रशियात चालू असलेल्या सार्वत्रिक युद्धविरोधी चळवळीची पर्वा न करता केरेन्सीच्या हंगामी सरकारनें ता. १ जुलै रोजीं चढाईला प्रारंभ केला. त्यामुळें सैनिकांचा संताप अनावर झाला त्यांनी बंड केले, पण पेट्रो-ग्राडमध्यें तो प्रयत्न अयशस्वी ठरला या अयशस्वी सशस्त्र उठावणीचा फायदा केरेन्स्कीनें कौशल्याने करून घेतला नि बोल्शेव्हिकाविरुद्ध, देशाचे मत चेतवून दिलें.बोल्शेव्हिक पक्ष चिरडण्यासाठीं स्वतः केरेन्स्की सरकारनेहि खूप प्रयत्न केले नि ते कांहींसे यशस्वी झाल्याचेंहि किंचित् काल दिसले.

पण पुढें रशियात सुंदोपसुंदी माजली. केरेन्स्की हा पंतप्रधान आणि हंगामी सरकारचा सरसेनापति लष्करी अरेराव कॉर्निलॉफ याची रशिया-च्या सर्वाधिकार-पदासाठीं भांडणे लागलीं. त्यात पेट्रोग्राडवर चाल करून आलेल्या कॉर्निलॉफची वाट परस्पर बोल्शेव्हिकांनींच लावली. हंगामी सरकारने कसेंबसें नवीन संयुक्त सरकार निवडलें. त्या सरकारने बोल्शेव्हिकांवर संक्रान्त आणली बहुतेक पुढारी बंदीत पडले नि कांहीं रशियाबाहेर पळून गेले वा अज्ञातवासात राहू लागले तथापि कांहीं काळ लोटताच बोल्शेव्हिकांच्या हालचालींना पुनश्च चालना मिळून त्यांनी जनतेवर आपले वजन पाडण्यास सुरुवात केली.

रशियामधील स्थानिक सोव्हिएटांतून बोल्शेव्हिक प्रतिनिधि बहु-संख्येनें निवडून आले. खेड्यातील सोव्हिएटांमध्येंहि बोल्शेव्हिकांना

अधिकार मान्य केला जाऊं लागला. हंगामी नियुक्त सरकार निस्त्राण होऊं लागल्याचें स्पष्ट दिसून येत होतें या संधीचा फायदा घेऊन सशस्त्र उठावणीची सिद्धता बोल्शेव्हिकांनीं सुरू केली. मॉस्को सोव्हिएटमध्यें बोल्शेव्हिकांनीं लष्करी क्रांतिकारी समिति उघडपणें स्थापन केली होती. तिचें अध्यक्षपद ट्रॉट्स्कीला देण्यांत आलें. या समितीला सोव्हिएटाची अधिकृत मान्यता होती पेट्रोग्राड सोव्हिएटनेंहि ट्रॉट्स्कीला आपला अध्यक्ष निवडलें

लष्करी क्रांतिकारी समितीनेंहि देशांतील सर्व लष्करी नि आरमारी पलटणींशीं दळणवळण पाडलें. तसेंच शेतकरी-कामकरी यांच्या संघटनेचेंहि कार्य तिनें शिरावर घेतलें क्रांतीच्या सिद्धतेचीं चक्रें जोरानें फिरूं लागलीं. त्याचें सूत्रचालकत्व बोल्शेव्हिक मध्यवर्ति समितीकडे होतें स्टालिन, स्वर्डलोव्ह, सोकोलनिकोव्ह, झेरझिन्स्की व बुबनोव्ह वगैरे कर्तबगार नेत्यांनीं हें कार्य दक्षतापूर्वक नि शांतपणें चालविलें होतें.

अखेर ७ नोव्हेंबर ( रशियन दिनदर्शकाप्रकाणें २५ आक्टोबर ) रोजीं सकाळीं ठरल्याप्रमाणें हंगामी सरकारविरुद्ध सशस्त्र बंडाचें निशाण उभारलें गेलें. लाल लष्कराच्या साहाय्यानें त्याच दिवशीं बोल्शेव्हिकांनीं राजधानी ( पेट्रोग्राड ) सर केली 'कामगार व सैनिक' या बोल्शेव्हिक मुखपत्रांत त्याच सकाळीं लेनिनची घोषणा प्रसिद्ध झाली होती ती महत्त्वाची आहे.

" हंगामी सरकार उलथून टाकण्यात आलें आहे...ज्या ध्येयाकरिता रशियांतील जनता आजवर झगडत होती तें ध्येय आतां साध्य झालें आहे लोकसत्ताक राज्यपद्धति, शांततेची तावडतोब प्रस्थापना, जमिनदारांची जमिनीवरील मालकी नाहींशी करणें, उत्पादनाच्या साधनांवर कामगारांचा ताबा मिळविणें व सोव्हिएट सरकारची स्थापना करणें या गोष्टी त्वरित अमलांत आणण्याचें ठरविण्यात आलें आहे सैनिक, कामकरी नि शेतकरी यांची क्रांति चिरायु होवो ! "

केरेन्स्कीचा पराभव होऊन त्यानें रशियांतून पळ काढला. त्याच रात्रीं

११ वाजता सोव्हिएटाची दुसरी अखिल रशियन कॉंग्रेस भरली.त्या परिषदेत नव्या सरकारची घोषणा करण्यात आली. या परिषदेंतील ६५० प्रतिनिधींपैकीं ३९० बोल्शेव्हिक असल्यानें त्यांचेंच बहुमत होतें. सोशल रेव्होल्यूशनरी पक्षातील नेमस्त सभासद व मेन्शेव्हिक यांनीं निषेधार्थ सभात्याग केला, तरी त्या दोन्ही पक्षातील जहाल मतवाल्यांनी नव्या सोव्हिएट सरकारला पाठिंबाच दिला.दुसरे दिवशीं सकाळीं नव्या सरकारचें मंत्रिमंडळ बनविण्यात आलें. नव्या सरकारचा अध्यक्ष लेनिन व परराष्ट्रमंत्री टॉट्स्की अशी निवड झाली. ' सोव्हनॉरकोम ' म्हणजे सोव्हिएट नोरोड्निक् कोमसरोव्ह-हें त्या नव्या सरकारचें नाव. कौन्सिल ऑफ दि पीपल्स कमिसार्स (लोकप्रधानमंडळ) असे त्याला म्हणतात या सॉव्हनॉरकोममध्ये बोल्शेव्हिकांशिवाय इतर कोणासहि घेतलें गेलें नाहीं

नवें सरकार स्थापन झालें म्हणजे सारा कारभार काहीं एकदम सुतासारखा सरळ चालू लागतो असे थोडेंच आहे? नवी विटी नवें राज्य—नवे कारभारी नि त्यांची राज्यकारभार पद्धतिहि निराळीच त्यातूनहि भांडवलवाल्यांचें सिंहासन फोडून कामगारांचें राज्य स्थापण्यास निघालेल्या या बोल्शेव्हिकांविषयीं बाहेरच्या जगातील सत्ताधाऱ्यांना प्रेम नि आदर याऐवजीं द्वेष नि शत्रुत्वच अधिक वाटत होतें. ही क्रांति यशस्वी झाली याचें शल्य त्यांच्या मनात सारखें बोचत होतें. आणि त्या ब्रिटनप्रभृति तथाकथित लोकशाह्यांना हें शल्य उपटून टाकण्याचा प्रयत्न करण्यास लवकरच संधि मिळाली.

---

# बंडखोर सेनापति

## नव्या संकटांशीं दोन हात

१९१८ मध्ये जर्मनीचा स्वाहाकार करून पहिल्या महायुद्धाचें धडाडलेलें यज्ञकुंड तात्पुरतें शांत झालें पण त्यामुळे सोव्हियट राज्यपद्धति उलथून पाडण्याचे प्रयत्न करावयास दोस्तांना नि इतर राष्ट्रांना चांगलें फावलें. सोव्हिएट लोकसत्ता धुळीला मिळविण्यासाठी हाडवैऱ्यांनींहि आपसांत संगनमत केलें नि रशियावर चहू दिशांनी चढाई झाली.

१९३९ साली जर्मनी व रशिया या एकमेकांचे हाडवैरी म्हणून समजल्या जाणाऱ्या दोन राष्ट्रांनी परस्परांत सख्यत्व केलें; नि त्यांतील पुढचा अर्धा भाग—म्हणजे दोस्तांवर संयुक्त चढाई करण्याचा—लवकरच सुरू होण्याची चिन्हें कांहीं पत्रपंडितांना दिसत आहेत.

परिस्थिति बिकट होती. १९१७ च्या क्रांतीमुळें देशभर उसळलेल्या अशांततेनें अद्यापि शांत रूप धारण केलेलें नव्हतें. सर्वच कारभार अस्थिर नि अनिश्चित होता. नवे पदाधिकारी नि सोव्हिएट श्रेष्ठी राजकारणक्षेत्रांतील कुटिल नीतींशीं अपरिचित होते; त्यांतील बरेचसे तर अगदींच

अननुभवी अखेर लेनिननें रशियाच्या सरक्षणासाठीं लष्करी कारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या स्वतःच्या हातीं घेतली. 'लाल सैन्या'ची उभारणी याच वेळीं करण्यात आली. लेनिनच्या आज्ञेनुसार सक्तीची लष्करभरती सुरू झाली शेतकरी, कामकरी, तरुण कम्युनिस्ट नि कांहीं थोडे झारच्या राजवटींतील जुने लष्करी तज्ज्ञ यांचीच ही लाल सेना बनलेली होती, आणि ही उभारण्याचें सारे श्रेय बोल्शेव्हिकांनाच आहे.

या नव्या लाल लष्कराचें कार्य क्रांतिरक्षण हें होतें. लिऑ टॉट्स्की या कुशल, उत्साही नि प्रबल इच्छाशक्तीच्या योद्ध्याकडे या सेनेचे आधिपत्य देण्यात आलें, त्याच्या ठिकाणीं वक्तृत्वगुणहि असामान्यत्वानें वसत होते. रेव्होल्यूशनरी मिलिटरी कौन्सिल म्हणजे क्रांतिकारी लष्करी मंडळाचा तो सूत्रधार बनला क्रांति घडविण्यासाठीं नि ती टिकविण्यासाठीं टॉट्स्कीनें यादवींत व परचक्राच्या काळीं जी जिवापाड मेहेनत केली ती संस्मरणीय आहे. तो जगत्क्रांतिवादी होता किंवा त्याचा विरोधक स्टालिन हा त्याच्याहून अनेक पटींनीं पाताळयंत्री होता, यापैकीं एक अगर दोन्ही कारणामुळें तो अखेर मेक्सिकोसारख्या दूर देशांत क्रूरपणें मारला गेला. ही गोष्ट खरी असली तरी लाल सैन्याचा अधिपति म्हणून सोव्हिएट रशियाच्या रक्षणार्थ त्यानें बजावलेली बिनमोल कामगिरी कोणाहि बोल्शेव्हिकानें वा अन्य तत्पथीयानें विसरणें हें कृतघ्नपणाचें ठरेल.

१९१८ च्या डिसेंबरात सोव्हिएटांनीं लष्करउभारणीची काढलेली मोहीम तितकीशी यशस्वी ठरली नाहीं. १९१९ सालच्या आरंभाला ५० ते ६० हजार सैनिकांची फक्त पटावर नोंद होती, पण प्रत्यक्ष संख्या फारच थोडी दिसली. आजारबुणग्यांचा आकडा फुगू लागून सैन्यांतून पळून जाणारांचीहि संख्या वाढू लागली. सोव्हिएटांना अर्थातच मनुष्यबळाची वाण पडली. लेनिन या सर्व परिस्थितीकडे बारकाईनें पाहात होता, नि त्यामुळें त्याला क्रांतिकारी लष्करी मंडळाच्या कारभारात हातहि बराच वेळां घालावा लागला

१९१९ च्या सुरवातीला बोल्शेव्हिकांची आठवी कॉंग्रेस भरली. उपरि-

लिखित परिस्थितीबाबत या अधिवेशनात कडाक्याचे वादविवाद झाले ट्रॉट्स्की या प्रसंगी उपस्थित नव्हता, परंतु मध्यवर्ति समितीच्या वतीनें लेनिन स्टालिन व सोकोल्निकोव्ह यांनीच भाषणें केली. शिस्तबद्ध सैन्याची उभारणी रशियात त्वरित झाली पाहिजे, नाहीपेक्षा जिवापाड श्रमानें घडविलेली क्रांति अल्पायुषी ठरेल असें त्याचें म्हणणें होतें या अधिवेशनात स्टालिनच्या वक्तृत्वाला चांगलेच तेज चढलें आणि याच वेळेपासून लेनिननें स्टालिनची कर्तबगारी ओळखून त्याला आपल्या विश्वासांत घेतलें यापुढें स्टालिन लेनिनचा लष्करी सल्लागार बनला. या दोघांच्या सहकार्यानेंच सोव्हिएट रशियावरील त्या काळा आलेलें महा अरिष्ट दूर झालें "सोव्हिएट लोकसत्ता चहूं दिशानीं शत्रूनें घेरली असून अखिल रशियानें या प्रसंगी शत्रूला एकजुटीनें तोंड दिलें पाहिजे" अशी विनतीपत्रकें काढून लेनिननें, या युद्धात पराजय झाल्यास रशियाच्या कपाळी किती भयंकर दुर्दशा येईल याचें भडक चित्र रेखाटलें. याच तऱ्हेची चळवळ सबंध देशभर फैलावली आणि ती बरीच यशस्वी ठरली सैन्यातून पळून जाण्याची शेतकरी सैनिकांची प्रवृत्ति नष्ट होऊं लागली, आधीच पळून गेलेले सैनिक परत लष्कराला येऊन मिळाले. राष्ट्ररक्षणासाठीं अत्यावश्यक कामें करणारे तेवढेच कम्युनिस्ट वगळून बाकी बहुतेक सैन्यात दाखल झाले. बोल्शेव्हिकांना 'रानटी' म्हणून नावें ठेवणाऱ्या विरोधकांची खंदक खणण्यासाठीं नि रस्ते बनविण्यासाठीं आघाडीवर पाठवणी करण्यात आली अशा तऱ्हेनें सैन्याला थोडें स्थैर्य येऊं लागलें. लेनिनला तत्पूर्वी लष्करी शास्त्राचा गंधहि नव्हता. पण त्याच्या अमोघ इच्छाशक्तीनें नि दुर्दम्य उत्साहानें रशियावरील हे परचक्र लेनिननें आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानें परतवून लाविलें असें एकानें लिहिलें आहे.

सोव्हिएट लोकसत्तेच्या नुकत्याच जन्मलेल्या कोवळ्या बालकाच्या नरडीला नख लावण्याचा प्रयत्न भांडवलवाल्या नि साम्राज्यशाही देशानीं करून पाहिला, परंतु कम्युनिस्टांच्या सुदैवानें तो दुर्धर प्रसंग टळला. मॉस्कोला व पेट्रोग्राडला दोस्तांनी जवळजवळ वेढाच दिला होता. विपुल

क्र. न. ५८०



युद्धसाहित्य, आधुनिक पद्धतीचीं, अद्यावत् सुधारलेलीं उत्तम शस्त्रास्त्रें यांनीं दोस्तांचें सैन्य सुसज्ज होतें, दारूगोळा, विमानें, तोफा नि रणतन्त्रा यांपैकीं कशाचीच त्यांच्यापाशीं वाण नव्हती. तसेंच मित्रराष्ट्राचे सैन्याधिकारी कसलेले लष्करी तज्ज्ञ नि अनुभवी योद्धे होते. लाल सैन्याची परिस्थिति बरोबर याउलट होती. त्यांच्यापाशीं घोडदळ होतें तें अपुरें. काहीं विमानें होतीं तीं 'इसवी सनापूर्वीचीं' नि मोडकीतोडकी चिलखती गाड्या अभावानें तळपत होत्या. दोस्तांचे सैनिक उत्तम शिक्षण घेतलेले, सशक्त, खाण्यापिण्याची ददात नसलेले असे होते, तर लाल सैन्य म्हणजे शेतकरी—कामकऱ्यांच्या इकडून तिकडून पकडून आणलेल्या, क्वचित् जबरदस्तीनें भरती केलेल्या, अर्धपोटी, थकलेल्या नि लष्करी शिक्षणाशीं फारसा परिचय नसलेल्या लोकांचा एक बेशिस्त जमाव होता! तथापि जें कांहीं सैन्य शिल्लक होतें तें क्रांतिकारक वृत्तीचें होते हेंच थोडेसें लाल सैन्य मरणमारणाच्या ईर्षेनें नि अटीतटीनें श्वेत सेनेशीं झुजले नि अखेर विजयी झालें. घटना आश्चर्यजनक खरी पण अनपेक्षित नव्हे, कारण भाडोत्रीपणा नि आपुलकीचा कढ यांतील फरक आपल्यापरीनें परिणाम घडविल्याखेरीज केव्हांच राहात नसतो! हिंदुपदपातशाहीची स्थापना करणाऱ्या 'रानटी' मावळ्यांना ना अन्न ना वस्त्र अशा स्थितींत राजशाही थाटांत वावरणाऱ्या बादशाही मोंगली सेनेशीं झगडून विजय संपादिता आला यासारखीं उदाहरणें इतिहासांत नित्य घडत असतात. रशियन क्रांतीच्या इतिहासांतील हा प्रसंगहि तशापैकींच एक ठरला. श्वेत सैन्यांतील शिपायांचा अगचोरपणा, अधिकाऱ्यांतील आत्मविश्वासाचा अभाव नि भीरुता, सोव्हिएट राजवटीविरुद्ध शस्त्र चालविण्यास कित्येक सैनिकांची असलेली नाखुषी इत्यादि गोष्टीहि श्वेत सैन्याच्या नाशाला कारणीभूत झाल्या

तथापि सोव्हिएट रशियावर गुदरलेल्या या परचक्रांतून नि यादवीच्या अरिष्टांतून रशियांतील सोव्हिएट राज्यपद्धतीचें संरक्षण करण्याची बहुमोल कामगिरी करण्याचं श्रेय ज्या कांहीं पराक्रमी पुरुषांकडे जातें, त्यांत शूर

स्टालिनचा वाटा बराच आहे युद्ध अमक्याच ठिकाणी चाललें होते नि बाकीचा प्रदेश शांत होता असें नव्हे, किंबहुना अवघा रशियाच युद्धभूमि बनला होता अशा आणीबाणीच्या परिस्थितींत जेथें जेथें युद्ध निकरावर येई तेथें तेथें स्टालिनची पाठवणी केली जाई. स्टालिननें आजपर्यंत सेनापतित्व केव्हाच केलेलें नव्हतें, नव्हे तो शिपाईच होता. पण या काळात त्यानें बजाविलेल्या लष्करी कामगिरीचें खरोखरी कौतुक करण्यासारखें आहे त्यानें लढविलेल्या ३–४ प्रसिद्ध लढायांचा सविस्तर इतिहास वाचला असताना त्याच्या संघटनकौशल्याची, तडफेची नि सैनिकांना आपलेसें करून घेण्याच्या गुणाची पूर्ण कल्पना येऊ शकेल

## झारित्सिनची यशस्वी झुंज

यापैकीं त्याची पहिली कामगिरी म्हणजे सैबेरियामधील झारित्सिन ह्या शहराचें व तेथील गव्हाचें संरक्षण करणें ही होती.

झारित्सिन लढविण्याच्या कामगिरीवर स्टालिनची नेमणूक अकल्पित योगायोगानेंच झाली. दक्षिण रशियाला होणाऱ्या अन्न-पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणें हे काम झारित्सिन येथे करावयाचें होतें. त्यासाठीं १९१८ च्या जून महिन्यात लाल सैनिकांच्या दोन तुकड्या व दोन चिलखती मोटारी बरोबर घेऊन स्टालिन झारित्सिनकडे निघाला तो झारित्सिनमध्यें येऊन पाहातो तों तेथे तर मावळा गोंधळ माजलेला त्याला दिसला. सोव्हिएट पक्षांतील सभासदांपैकीं एकाचें तोंड पूर्वेला तर एकाचें पश्चिमेला, अशी स्थिति होती. याखेरीज ट्रेड यूनियन्स व 'पक्षा'च्या शाखा यांतहि विस्कळीतपणा उत्पन्न झाला होता लष्करी अधिकाऱ्यांच्या कारभारात तर कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति स्टालिनवर प्रत्यक्षपणें जें कार्य सोंपविलेलें होतें तें पार पाडण्यासाठीं त्याला पदोपदीं अडीअडचणींशीं झगडावें लागत होतें. आणि हे अडथळे निर्माण होण्याच्या बुडाशीं कोसॅक लोकांत वेगानें वाढत असलेल्या प्रति–क्रांतिकारी वृत्तींना जर्मनशासित युक्रेनमधील जर्मन सैन्याकडून मिळणारें उत्तेजन व प्रत्यक्ष साहाय्य हें कारण होतें.

मराठी ... ग्रं ... 
क्र. ६१५९



या प्रति-क्रांतिकारी कॉसॅक टुकड्यांनीं झारिस्टिनच्या आसपासची बरीच ठाणीं थोडक्याच काळांत हस्तगत केली आणि झारिस्टिनला वेढा दिला त्यामुळें मॉस्को नि लेनिनग्राड येथील अन्नाविणें तडफडणाऱ्या लोकांना अन्नपुरवठा करण्याचें तें बाजूलाच राहून खुद्द झारिस्टिनचाच भयंकर कोंडमारा झाला

जुलैच्या ७ दिनाङ्काला स्टालिननें लेनिनला कळविलें, " झारिस्टिनच्या दक्षिणेकडील रस्ता अद्यापि आमच्या हातीं आलेला नाहीं. आवश्यक त्या माऱ्याची हाकलपट्टी करीत आहे व त्यांना चांगली समज देत आहे. आमची स्वत:ची अगर दुसऱ्याहि कोणाची काळजी न बाळगता धान्य मिळवतोंच मिळवतों झारिस्टिनच्या आपल्या लष्करातील अधिकारी आळशी नि नालायक असल्यामुळेच शत्रूला फावलें. तेव्हां आमच्या हातांतून गेलेली आघाडी आम्ही परत मिळवावयाची तर ती यांना दूर सारूनच मिळवावी लागेल "

झारिस्टिनमध्यें लेफ्ट सोशल रेव्होल्यूशनरीज् बंड करून उठतील अशी भीति लेनिननें प्रकट केली होती. त्यावर स्टालिननें उत्तर पाठविलें, " माथेफिरूंचा समाचार घेण्यास आम्ही चुकणार नाहीं शत्रूशीं शत्रु या नात्यानेंच वागू "

१९१८च्या ११जुलैला स्टालिननें लेनिनला कळविलें कीं, " कालनिन ( उत्तर कॉकेशसचा सेनापति ) याच्या आघाडीवर अन्नपुरवठा अगर युद्धसाहित्य जाऊं शकत नाहीं आणि उत्तरभाग धान्य पिकविणाऱ्या प्रांतापासून तोडला गेला आहे. याला कारण येथील अधिकारी वर्गच आहे. परिस्थिति सुधारण्यासाठीं योग्य ते उपाय करीत आहे आवश्यक तर सैन्याधिकाऱ्याची येथून हाकलपट्टीहि करायला मी कमी करणार नाहीं, अर्थात त्यामुळें उत्पन्न होणारें सर्व दायित्व मी माझ्या शिरावर घेण्यास सिध्द आहेच "

परिस्थिति दिवसानुदिवस बिकट होत चालली होती, तथापि स्टालिननें जिवापाड मेहनत करून अगदीं थोड्या अवधींत ती आटोक्यात

आणली मॉस्कोला या स्टालिनच्या कर्तबगारीची माहिती समजताच त्याच्यावर पुढील कामगिरी सोपविण्यात आली—" सुव्यवस्था निर्माण करणें, पांगलेली पथके प्रत्यक्ष चालू सैन्यविभागात मिळवून टाकणें, योग्य त्या अधिकाऱ्याच्या नेमणुका करणें आणि सर्व बेशिस्त माणसाची हाकलपट्टी करणें " हा तो कामे प्रस्तुतची आज्ञा लेनिनच्या समतीनेच निघालेली होती

आता स्टालिनला पाहिजे होतें तेच मिळालें. आपणाला विश्वासू वाटतील व आपल्या शब्दाबाहेर यत्किंचितहि जाणार नाहीत अशा सहकाऱ्याची त्यानें निरनिराळ्या महत्त्वाच्या जागावर योजना केली क्रांतिकारक युद्धमडळाचा अध्यक्ष ट्रॉट्स्की याने झारित्सिनकडे जवळजवळ कानाडोळाच केला होता त्यामुळे स्टालिनने आपल्याला पाहिजे तशी सर्व योजना आखली

तेवढ्यात जर्मन सेनेकडून डॉन या गवताळ प्रदेशात पराभूत झालेल्या युक्रेनियन क्रांतिकारक सैन्यातील उरलेसुरले सैनिक, झारित्सिनमध्यें येऊन पोहोंचले होते. स्टालिननें एक नवीनच क्रांतिकारी लष्करी मडळ स्थापन करून तो स्वतः त्याचा नेता बनला व या मडळानें प्रत्यक्ष सैन्य उभारण्याचे काम सुरू केलें इतराना अशक्य वाटणारी अशी ती गोष्ट होती, परंतु स्टालिनने आपल्या धडाडीने, चिकाटीने व उत्साह नि इच्छाशक्ति याच्या जोरावर ते प्रत्यक्षात घडवून आणलें डिव्हिजन्स, ब्रिगेड्स, रेजिमेंट्स असे मोठमोठे सैन्यविभाग हा हा म्हणतां उभे राहिले रसदपुरवठा खातें व पिछाडीवरील अधिकारी वर्ग यातील प्रतिक्रांतिकारी व तत्सम असें सार बीज खणून काढण्याचें काम स्टालिनने झटपट उरकून टाकलें. प्रतिक्रांतिकारी बीज शोधून तें नष्ट करून टाकण्यासाठी स्टालिननें ' चेका या गुप्त हेर खात्याचा अत्यत कौशल्यानें या शहरात प्रथमतःच उपयोग करून घेतला

कर्नल नासोव्हिच यानें त्या काळचें वर्णन असं केलें आहे: "वातावरण भयकरच धोक्याचें होतें झारित्सिनमधील चेकाचें काम अहोरात्र वेगानें

ऱ्यात होतें. अत्यंत विश्वसनीय नि गुप्त अशा समजल्या गेलेल्या ठिकाणीं कट उघडकीला आले नाहींत असा एक दिवसहि जात नव्हता. शहरातील सर्व कारागृहे पूर्ण भरून गेली होतीं. आघाडीवर तर रणकंदनाची सीमा झाली होती!”

याच वेळीं कांहीं प्रति-क्रांतिवाद्यांनीं घटना समितीची (Constituent Assembly) घोषणा करून स्टालिन विरुद्ध डॉन कॉसॅकांना झारिस्टिन-वर हल्ला करण्यासाठीं मदत देण्याचा प्रयत्न सुरू केला. इंजीनिअर एलेक्झेयेव्ह हा या कामगिरीसाठीं मॉस्कोमधून आपले दोन मुलगे बरोबर घेऊन आला होता, परंतु पुढें हा सर्व कट उघडकीला आला. लगेच इंजीनिअर ॲलेक्झेयेव्ह, त्याचे दोन्ही मुलगे, इतर बरेच अधिकारी व कांहीं संशयित माणसें इतक्या जणांना चेकानें पकडलें नि चौकशी वगैरे कांहीं प्रकार न होतां त्यांना गोळ्या घालण्यांत आल्या

स्टालिनचा केंद्र–( नॉर्थ कॉकेशियन कमांड हेडक्वार्टर्स ) शुद्धिकरणाचा कार्यक्रम धडाक्यानें सुरू होता परंतु त्यामुळें ट्रॉट्स्की मात्र भयंकर संतापला त्यानें स्वतःच्या कल्पनेप्रमाणें निर्माण केलेलें लष्करी यंत्र स्टालिनच्या कारवायांमुळें कोलमडूं लागलें. त्याच्या विश्वासातील अधिकाऱ्यांची हाकलपट्टी होऊं लागली. तेव्हां ट्रॉट्स्कीनें स्टालिनला तार करून कळविलें कीं, जुन्या अधिकाऱ्यांची त्यांच्या पूर्वीच्या जागीं पुनः नेमणूक करून त्यांना स्वतःच्या मताप्रमाणें वागूं द्यावें. स्टालिननें त्या सूचनेच्या तारेला कचऱ्याची टोपली दाखविली!

झारिस्टिन शहराचें रूप थोडक्याच अवधींत पार पालटलें. नगरांतील गाणींबजावणीं नि नाचरंग बंद करण्यांत येऊन शहराला लाल लष्कराच्या छावणीचें स्वरूप आलें. पिछाडीला नवीन सैन्याची मदत येऊन पोहोंचतांच आघाडीवर लढणाऱ्या सोव्हिएट सैनिकांना उत्साह चढला. लाल सैन्यांतील लहानमोठे अधिकारी नि सैनिक या साऱ्यांनाच आपल्या पाठीशीं बळकट संघटना उभी असल्याचें वाटूं लागून धीर आला.

झारिस्टिन लढवितांना स्टालिननें नुसते कागदी घोडे नाचविले नाहींत,

तर तो स्वतः रणांगणावर जाऊन ३६५ मैल विस्ताराच्या आघाडीवर संचारू लागला त्याला यापूर्वी लष्करी शिक्षणाचा गधहि नव्हता. असे असताना अत्यंत बिकट परिस्थितीत लष्करी डावपेचाची अचूक योजना करून त्यानें दाखविलेलें कौशल्य खरोखरी वाखाणण्यासारखें आहे लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे स्टालिननें आतापर्यंत सैन्यात शिपाई म्हणून केव्हाहि नोकरी केलेली नाहीं !

या लढाईंत ख्यातनाम लाल सेनापति व्हॉरॉशिलॉव्ह स्टालिनबरोबरच होता, त्याने स्टालिनविषयी लिहिलेल्या " Stalin and the Red Army " या लेखात प्रस्तुत रणधुमाळीचे वर्णन केलें आहे १९१८ ऑगस्टची सुरवात होती ती कॅसनॉव्ह कोसॅकाचा झारिस्टिनवर चढाई करून लाल सैन्याला व्होल्गापर्यंत मार्ग रोखण्याचा एकत्रित प्रयत्न सुरू होता. सोव्हिएट लष्कराच्या अग्रभागी कम्युनिस्ट विभाग लढत होता डोनेट्झ खोऱ्यातील कामगारांचीच ही बहुतेक सेना बनलेली होती. उत्कृष्ट संघटित नि कसलेले कोसॅक योद्धे प्रतिपक्षात होते. तथापि लाल सैन्याने प्रतिपक्षाच्या भयंकर असह्य हल्ल्यानाहि तोंड दिले. मोठी आणीबाणीची परिस्थिति होती, परंतु स्टालिन नेहमीप्रमाणे शांत नि विचारात गढून गेलेला दिसे. माऱ्याच्या जागा नि लष्कराची केंद्र—छावणी ( Head quarters ) या दोन्ही ठिकाणची व्यवस्था दक्षतापूर्वक ठेवण्याचें त्याचें काम अहोरात्र चालू होतें अखेरच्या काही दिवसात तर त्याच्या डोळ्याला डोळा लागला नाही.

फिट्झहॉलॉराव्ह, मॅमोनटोव्ह व इतर काही अधिकारी यांकडे कॅसनॉव्ह पलटणींचें नेतृत्व होते. चातुर्याने योजिलेल्या बेताप्रमाणे त्याच्या हालचाली सुरु होत्या सोव्हिएट पलटणींची पुरी दमछाट झाली होती आणि शत्रूचा हल्ला तर अधिकाधिक तीव्रपणाने येत होता. लाल सैन्याची अतीव हानि झाली नालाच्या आकाराची व्यूहरचना कॅसनॉव्ह सैन्याच्या अधिकाऱ्यांनी केली होती नि ते सर्व बाजूंनी लाल लष्कराला दाबीत आत येत होते. व्होल्गाची बगलहि त्यांच्याच हाती होती. लाल लष्कराला बाहेर पड-

ण्याला मार्गच उरला नाही. पण स्टालिन मात्र डगमगला नव्हता. त्याच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नी सर्वत्र एकच गोष्ट दिसत होती—विजय ! कसेंहि करून शत्रूचा नि:पात करावयाचा हा त्याचा निर्धार होता. त्याच्या या यशाच्या दुर्दम्य आकांक्षेचा परिणाम त्याच्या सहकाऱ्यावरहि झाल्याखेरीज राहिला नाही

—आणि अखेर स्टालिनचें लाल लष्कर विजयी झालें. शत्रूला डॉन-च्या बाजूला पिटून परतविण्यात आलें.

स्टालिननें झारित्झिनबरोबरच त्या काळीं अत्यावश्यक असलेल्या गव्हाचेंहि रक्षण केलें. श्वेत सैन्याविरुद्ध झुजून त्यानें जो हा विजय संपादन केला, त्याचें 'रेड व्हर्डन' असें अतिशयोक्तिपूर्ण वर्णनहि केव्हा केव्हा केलें जातें. स्टालिनच्या या कर्तबगारीबद्दल आज त्या शहराचें स्टालिनग्राड असें नवें नामकरण करण्यात आलें आहे.

## शोधायला गेला नि विजय आणला

पर्म या गांवीं स्टालिनने केलेली कामगिरीहि अशीच कौशल्यपूर्ण आहे पूर्व आघाडीवर १९१८ च्या अखेरीअखेरीला भीषण परिस्थिति उत्पन्न होऊन तिसऱ्या 'आर्मी' ला ( सैन्यविभाग ) पर्म शत्रूच्या हातीं देणें भाग पडलें होतें या सैन्याला शत्रूनें अर्धवर्तुळ वेढा देऊन जेरीस आणलें नि नोव्हेंबरच्या शेवटीं त्यातील सैनिकांचा धीर खचला. मागून मदत येण्याची खात्री नाही, पिछाडी कोलमडत आलेली, अपुरा अन्न-पुरवठा, ३५ अंशाखालील उष्णतामान, रस्त्याचा अभाव, सुमारें २४२ मैलाहून अधिक विस्तृत असलेली अवघड आघाडी, दुर्बल नि असमर्थ अधिकारी वर्ग अशा निराश परिस्थितींतहि सहा महिनेपर्यंत सतत झुजून तिसरी आर्मी अद्यापि—कशीबशी कां होईना—तग धरून होती. परंतु अशा परिस्थितींत ती तरी किती टिकाव धरणार ?

यापुढे हळू हळू तिचा दम खचू लागला. सैनिक मेटाकुटीला आले, आणि त्यामुळे होती ती शिस्तहि बिघडून गेली. अर्थातच या सैन्याची वाताहात होऊन तें वीस दिवसात फक्त १८२ मैल मागे सरलें

माघार घेण्यातहि शिस्त मुळीच नसल्यानें १८ हजार सैनिक, दशकावारी तोफा, शेंकडो यांत्रिक बंदुका इत्यादि हानि झाली. शत्रूनें व्हिआट्काचा भयंकर नाश करून संबंध पूर्व आघाडी व्यापली. शत्रूच्या चढाईला द्रुत-गति प्राप्त झाली.

या प्रकारामुळें मध्यवर्ति समितीला या आघाडीकडे लक्ष पुरवावेंच लागलें. तिसरी आर्मी पुनश्च एकत्रित नि संघटित करण्याचें कार्य कौशल्याचें होतें. त्यासाठीं कोणाची योजना करावी असा प्रश्न उत्पन्न झाला. लगेंच स्वतः लेनिननें रेव्होल्यूशनरी मिलिटरी कौन्सिलच्या अध्यक्षाला तार केली कीं, 'स्मिल्गा हा अधिकारी या कामीं नालायक वाटत असल्यानें स्टालिनचें नाव मी सुचवितों.' त्यावर मध्यवर्ति समितीनें आपला निर्णय दिला—" मध्यवर्ति समितीच्या झेरझिन्स्की व स्टालिन ह्या दोन सभासदांचें एक (पक्षाचें) अधिकृत चौकशी मंडळ नेमण्यात येतें असून त्यानें पर्मचा पाडाव, उरल आघाडीवरील पराजय व त्यासंबंधीच्या सर्व प्रसंगांतील परिस्थिति यांचा अभ्यास करून कारणें शोधावीं. दुसऱ्या व तिसऱ्या आर्मींच्या सर्व प्रांतांतील पक्षाचें व सोव्हिएटांचें कार्य पुनश्च त्वरित चालू होण्यासाठीं या मंडळाला आवश्यक वाटतील त्या उपायांचा अवलंब त्यानें करावा, अशी सूचना मध्यवर्ति समिति देत आहे. "

स्टालिन आपल्या कामगिरीवर निघाला. नुसत्या " चौकशी "च्या कामासाठीं त्याची नेमणूक झाली होती, तरी आघाडीवर मदत धाडणें, गमावलेलीं ठाणीं परत घेणें वगैरे गोष्टीहि तो करूं लागला.

१९१९ च्या ५ जानेवारीला स्टालिननें लेनिनला कळविलें "तिसऱ्या आर्मीतील एकूण ३०००० सैनिकांपैकीं फक्त ११०० च, तेहि मेटाकुटीला आलेले नि दमून गेलेले, सैनिक शिल्लक उरले आहेत. सरसेनापतीकडून आलेले सैनिक विश्वासार्ह तर नाहींतच, पण उलट काहींजण आमच्याशीं शत्रुत्व करीत असून त्यांना चांगली जरब देणें अत्यावश्यक आहे. या उरल्या सुरल्या सैनिकांना वाचविणें व व्हिआट्कावर चालून येत असलेल्या शत्रूला रोखून धरणें यासाठीं तात्काळ अत्यंत विश्वासू अशा तीन

'रेजिमेंट्स' रशियामधून येथें पाठविल्या गेल्या पाहिजेत. नाहींतर व्हाएट्काची स्थिति पर्मप्रमाणेंच झाल्याखेरीज राहणार नाही."

युद्धाच्या महाभयंकर आपत्तींच्या कारणाचा' शोध लावण्याचें कामहि चालूच होतें पूर्व आघाडीवर लाल सैन्यावर जें अरिष्ट कोसळलें होतें, त्याची कारणपरंपरा स्टालिननें थोडक्यात पुढीलप्रमाणें दिली. शत्रूच्या हल्ल्याच्याच नेमक्या वेळीं लाल सैन्यात निर्माण झालेली दमछाट व कटाळा नि शीण, शिलकी सैन्याचा अभाव, अधिकारी वर्ग नि सैनिक या परस्परातील तुटलेले संबंध, सैन्याधिकाऱ्यांनी योजलेल्या बेतातील बेशिस्त नि बेबंदपणा, क्रांतिवादी लष्करी मंडळानें आघाडीवरील सैन्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीं उपयोजिलेल्या चीड उत्पन्न करणाऱ्या व दुष्ट पद्धति, केंद्राकडून येणाऱ्या मदतीविषयीं अनिश्चितता नि सोव्हिएटमध्ये व पक्षाच्या संघटनेंत निर्माण झालेली असहायता, असमर्थता नि त्यातून उद्भवलेली लष्करी कद्राची दुर्बलता इत्यादि

या सर्व गोष्टी स्टालिननें संरक्षक मंडळाच्या कार्यालयाला कळविल्या. तेव्हा पायदळ व घोडदळ मिळून १२०० विश्वासू सैनिक स्टालिनच्या मदतीसाठीं रशियातून पाठविण्यात आले. एका दिवसानंतर पायदळाच्या आणखी दोन तुकड्या गेल्या. २० जानेवारीला ६२ वी रेजिमेंट व ३ री ब्रिगेड ( काळजीपूर्वक 'शुद्ध' करून ) पाठविण्यात आली. या नव्या दमाच्या साहाय्यामुळें ३ ऱ्या आर्मीला जोर येऊन तिने पर्मवर प्रतिहल्ला चढविला. लष्कराच्या पिछाडीवरील सोव्हिएट व 'पक्ष' याचे शुद्धीकरण करण्यांत आलें व्हाएट्का व इतर प्रांतिक शहरातून क्रांतिकारक समित्या स्थापन करण्यात आल्या. खेड्यापाड्यातून क्रांतिवाद्यांच्या बळकट संघटना उत्पन्न केल्या गेल्या. पक्षाची नि सोव्हिएटची सारी कार्यपद्धति नव्या पायावर उभारली गेली. हंगामी खास मंडळाची' हि साफसफाई होऊन त्यात 'पक्षा' तील नव्या कामगाराचा भरणा करण्यात आला

या हालचालीमुळें शत्रूच्या प्रगतीला पायबंद बसला. एवढेंच नव्हे तर १९१९ च्या जानेवारीत पूर्व आघाडीवरील लाल सैन्यानें प्रतिचढाई

सुरु करून उजव्या बगलेवरील उराल्स्क ठाणें जिंकून घेतलें 'अरिष्टाच्या कारणपरंपरेचा शोध' करण्यासाठी गेलेला हा स्टालिन तिसऱ्या आर्मीची संघटना पुरी करून पूर्व आघाडीवर विजय संपादून परत आला.

## ' निर्वाणीचा एक पांडुरंग '

यानंतर स्टालिनचें शौर्य नि धैर्य कसाला लागलें तें पेट्रोग्राडमध्यें[1] १९१९ च्या वसंत ऋतूमध्यें जनरल युडेनिच याच्या श्वेत सैन्यानें लाल श्वेत इस्थोनियन्स, ब्रिटिश नि श्वेत फिन्स याच्या साहाय्याने लाल सैन्यावर अचानक हल्ला चढविला. सेनापति कोलचॅकनें ' पेट्रोग्राड घेण्या ' चे काम या श्वेतसेनेकडे सोंपविलें होतें, तसेंच पूर्व आघाडीवरील क्रांतिकारक पलटणींना पिटाळून लावण्याची कामगिरीहि त्या सेनेकडे होती. पेट्रोग्राडवरती झालेला हा संयुक्त हल्ला चांगलाच जोराचा होता. त्यातून प्रत्यक्ष पेट्रोग्राड शहरामध्यें कट—कारस्थानांना ऊत आला होता, आणि हे कट कोण चडवीत होते ? त्याच्यामागें कोण सूत्रधार होते ? तर सातव्या आर्मीतील व क्रान्सडॉटच्या आरमारी तळावरील लष्करी तज्ज्ञ अधिकारी! युडेनिचच्या पेट्रोग्राडवरील चढाईचें वेळींच स्कोव्हच्या रोखानें अनेक टाणीं हस्तगत करीत बुलक—बालहोव्हिच हा वेगाने चालून जात होता. प्रत्यक्ष आघाडीवरहि बेदिली माजली. लाल सैन्यातील कांहीं संबंध रेजि मेंटस् शत्रुपक्षाला जाऊन मिळाल्या. रेड हिल व ग्रे हॉर्स या किल्ल्यातील शिबंदी तर उघड उघड सोव्हिएट सरकारविरुद्ध सामना करण्यासाठींच बाहेर पडली. बहुतेक ७ वी आर्मी गोंधळून गेली आघाडीवर अदा-धुंदी उत्पन्न झाली. शत्रु जवळजवळ पेट्रोग्राडशी येऊन भिडला आता क्षणाचाहि विलंब नाशकारक ठरला असता

शेवटी ' निर्वाणीचा पांडुरंग ' म्हणून मध्यवर्ति समितीनें स्टालिनलाच हाक मारली. अवघ्या तीन आठवड्यात स्टालिनने पेट्रोग्राडमधील परि-स्थिति आटोक्यात आणली. सैन्यांतील गोंधळ नि हीन प्रवृत्ति यांची

---

१ या शहराचें पूर्वीचे नाव सेंट पीटर्सबर्ग हें होतें, पुढे लेनिनच्या स्मृत्यर्थ त्याचें लेनिनग्राड ' असें नामकरण करण्यात आलें

त्वरित हाकलपट्टी झाली. अधिकारी वर्गाची स्थिरस्थावर करून पेट्रोग्राड-मधील कामगार व कम्युनिस्ट यांच्यात सहकार्य व संघटना निर्मिण्यात आली. शत्रु नि विश्वासघातकी मित्र यांची निर्दयपणें कत्तल झाली. सो लष्करी श्रेष्ठींच्या कारभारातहि हात घालावयास स्टालिननें कमी केलें नाहीं

या प्रसंगा स्टालिननें लेनिनला केलेली एक तार नमुन्यादाखल लक्षात ठेवण्यासारखी आहे. ती त्याच्याच शब्दात देतो. स्टालिननें लिहिलें

" 'रेड हिल'च्या टापाखालींच आम्ही 'ग्रे हॉर्स'चा निकाल लावला. त्याच्या मोठ्या तोफा अजूनहि व्यवस्थितपणें काम देत आहेत. सर्व किल्ल्याची नि नाक्याची ( अक्षर लागत नाहीं ) वेगानें होत आहे रेड हिलचा किल्ला समुद्राच्या बाजूनें हल्ला चढवून सर केल्यास सर्व लष्करी शास्त्राची वाताहात होईल अशी भीति आरमारी मुरब्ब्यांनीं आम्हाला घातली आता त्या नामधारी 'शास्त्रा'च्या विनाशाबद्दल अश्रु गाळीत बसण्याखेरीज दुसरें काही मजपाशीं उरलेलें नाहीं ! आणि ती टेकडी जी आमच्या हातीं इतक्या लवकर पडली त्याचें कारण तरी हेंच कीं, मी नि इतर सर्वसाधारण नागरिकांनीं त्या भानगडींत केलेली ' अतिशय नादान-पणाची लुडबुड ' ! जमीन नि समुद्र यावरील हालचालींसबंधींच्या सर्व आज्ञा रद्द करून मी नव्या सूचना दिल्या हा माझा केवढा गाढवपणा झाला ! तथापि 'शास्त्रा'विषयीं असलेला माझा सर्व आदर मनात ठेवूनहि मी यापुढें असेच वागत राहिलें पाहिजे हें मी माझें कर्तव्य समजतों हे येथें अवश्य घोषित केले पाहिजे ! "

—स्टालिन

मार्मिक, विनोदी, निःसंदिग्ध नि प्रभावी लेखनाचा हा एक सुंदर नमुना नव्हे का ?

कांहीं आठवड्यातच परिस्थिति बदलून फितुरी कमी होऊ लागून श्वेत सैन्याला मिळालेलें काही लाल सैन्य हळूहळू सोव्हिएट लष्कराला येऊन मिळू लागलें याउलट श्वेत सैन्यापैकींच कांहीं भाग लाल सेनेंत येऊ लागला. नवीन मदत वेळेवर येऊन न मिळाल्यानें स्टालिनला थोडी

माघार घ्यावी लागली. परंतु १-२ दिवसातच त्यांनें व्होरोनिनो-स्लेपिनो-कॅसकोव्हो ही शत्रूची फळी फोडली रेड हिलचा किल्लाहि लाल सैन्यानें इस्तगत केला

१९१९ चा शरद् ऋतु अति आणीबाणीचा होता. यादवींतील युद्धाचा निर्णायक काल होता तो डेनिकिनची श्वेत सेना ओरेलवर धावून येत होती. तिला दोस्तांकडून सर्व तऱ्हेचा पुरवठा होत होता नि त्यातील अधिकारी वर्गहि दोस्तांचाच होता अवघी दक्षिण आघाडी शत्रू सत्वरपणे आक्रमीत चालला. अंतर्गत परिस्थितीची अनिश्चितता नि बिकटपणा तर विचारूंच नका अन्नपुरवठा संपुष्टात आला होता. जळणाचे पदार्थ नसल्यानें उद्योगधंदे थंड पडले होते. अतस्थ ब्डाळीन सरकार बेचैन झाले होतें तुला नि प्रत्यक्ष मॉस्को हीं शहरें धोक्यात होतीं.

या भयंकर परिस्थितींतून मार्ग काढणें तर आवश्यकच होतें आणि त्यासाठीं मध्यवर्ति समितीनें क्रांतिकारी लष्करी मंडळाचा सदस्य म्हणून स्टालिनची दक्षिण आघाडीवर रवानगी केली. परंतु ही कामगिरी स्वीकारण्यापूर्वी स्टालिननें तीन महत्त्वाच्या अटी समितीकडून मान्य करून घेतल्या.

१ ट्रॉट्स्कीनें दक्षिण आघाडीवरील युद्धाच्या कोणत्याहि भानगडींत ढवळाढवळ करू नये नि आपल्या आघाडीची सीमा उल्लघू नये.

२ सैन्यातील परिस्थिति सुधारण्यासाठीं नेमलेले जे अनेक कार्यकर्ते स्टालिनला अयोग्य वाटतील त्याची तेथून तावडतोब उचलबांगडी व्हावी

३ स्टालिननें पसत केलेले व कर्तव्य बजावण्यास समर्थ असलेले असे सर्व कार्यकर्ते लोक समितीनें दक्षिण आघाडीवर त्वरित पाठवून द्यावे.

समितीनें या अटींना पूर्णतः मान्यता दिली

व्होल्गापासून पोलिश युक्रेनियन सरसीमेपावेतों रणभूमि पसरलेली होती, तिलाच दक्षिण आघाडी म्हणत कुरस्क–ओरेल–तुला या मुख्य फळीवरील लाल सैन्याला जोराचा मार खावा लागला होता पूर्वेची अगल पुढें सरकण्यास असमर्थ ठरली होती आघाडीवरील हजारोंवारी सैनिक इतस्ततः पसरलेले होते. त्याची सुव्यवस्था लावून नवीन योजना ठरवून

अचूक हालचाली करणे आवश्यक होतें महत्त्वाच्या मान्याच्या ठाण्यावर कसलेल्या सैनिकाच्या तुकड्या नेमणे व बळाचें केंद्रीकरण करणें यामुळेच शत्रूवर जोरदार हल्ला चढविणें शक्य होतें. डॉनच्या गवताळ प्रदेशातून झारिस्टिन आणि नोव्होरोसिस्क याच्या दरम्यान असलेल्या डाव्या बगले-वर मुख्य हल्ला चढविण्याची युद्धयोजना जुन्या सैन्याधिकाऱ्यानी स्टालिन-पुढे माडली परतु स्टालिननें ती धुडकावून दिली डॉनवरील व क्युबन-मध्यें असलेल्या शत्रुसैन्यावर हल्ला चढवून त्या सैन्याची धुळधाण उडवि-ण्याच्या कामी शॉरीनच्या खास तुकडीची योजना करावी नि दक्षिण आघाडीवर चढाई करण्याचा बेत कायम करावा अशी आज्ञा सप्टेंबर १९१९ मध्ये सरसेनापतीकडून आली होती, पण स्टालिनला ती मान्य नव्हती.

लष्करी शास्त्रात त्वरित निर्णयाची फार आवश्यकता असते. स्टालिनच्या अगी हा गुण उत्कटत्वाने वास करतो. त्यानें आपल्या स्वत:-च्या कल्पनेप्रमाणें नव्या योजना आखून त्याप्रमाणें लेनिनला कळविले. दक्षिण आघाडीवरील चढाईची सरसेनापतीची योजना साप्रत किती कुचकामाची व घातकी ठरणार आहे तें सांगून स्टालिन पुढें लिहितो

'सरसेनापतीच्या ( ट्रॉट्स्कीच्या ) मनात त्याच्या 'लष्करी तज्ज्ञ सल्लागारा'नी भरवून दिलेली ही कल्पना म्हणजे एकतरं निव्वळ दुराग्रह दिसतो किंवा या लोकसत्ताक राज्याला अतीव घातक नि मूर्खपणाचा असा हा पक्षाभिनिवेश तरी असावा असें स्पष्ट दिसतें.'

'डॉनमधून नोव्होरोसिस्कवरती हल्ला करण्यानें तेथील कोसॅक लोक बिथरतील नि ते डेनिकिनला मिळतील. अर्थातच त्यामुळें डेनिकिनचा पक्ष अधिक सामर्थ्यवान होईल, यासाठी शॉरिनला केंद्राकडून मिळालेली सूचना मान्य करता येत नाही. डोनेट्झ खोऱ्यापासून रोस्टोव्हपर्यंत चढाई करण्याकरिता खारकोव्हमधून मुख्य हल्ला चढविणेंच श्रेयस्कर आहे.' अशी नवी योजना स्टालिननें लेनिनपुढे माडली नि स्पष्टपणें लिहिलें की, 'ही नवी योजना अमलांत आली पाहिजेच.'

मध्यवर्ति समितीनें या नव्या योजनेला बिनतक्रार मान्यता दिली; स्वत. लेनिननें लष्करी केंद्राला आपल्या सूचना ताबडतोब मागें घेण्यास लिहिलें. अखेर दक्षिण आघाडीवरील सैन्यानें खारकोव्ह–डोनेट्झ खोरें–रोस्टोव्ह या फळीच्या रोखानें चढाई केली नि शत्रूची दाणादाण उडविली डेनिकिननें काळ्या समुद्रात पळ काढला श्वेत लष्करापासून युक्रेन नि उत्तर कॉकेशस ह्या प्रांताची मुक्तता करण्यात आली या सार्‍याचें श्रेय स्टालिनकडे आहे.

## ‘ऑर्डर ऑफ दि रेड बॅनर

दक्षिण आघाडीवरील स्टालिनच्या कामगिरींत आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करणें आवश्यक आहे घोडदळ सैन्याची उभारणी करून त्यासाठीं क्रांतिकारी लष्करी मंडळ स्थापणें व सैनिकांच्या ‘तुफानी तुकड्या’ (Shock Troops) निर्माण करणें या त्या दोन होत घोडदळाच्या अधिपति म्हणून बुडेनी याची व क्रांतिकारी लष्करी मंडळाचे सभासद म्हणून व्होरॉशिलॉव्ह नि चॅडेन्को याची नेमणूक करण्यात आली. हें घोडदळ लष्करी केंद्राच्या इच्छेविरुद्ध स्टालिननें हट्टानें तयार केलेलें आहे. तुफानी तुकड्याची योजना करण्यात स्टालिननें माणसाची पारख, त्याची योग्य जागीं नेमणूक करण्याचे कौशल्य व परिस्थितीबद्दलची अचूक निदानशक्ति हे गुण उत्तम रीतीनें प्रगट झाले, आणि हिटलरच्या तुफानी सैनिकांप्रमाणेच (Storm Troopers) स्टालिनला या त्याच्या “शॉक ट्रूप्स”मधील शेलक्या नि कडव्या शिपायांनी वेळोवेळीं हात दिलेला आहे.

पुनश्च १९२० च्या जानेवारींत रोस्टोव्हपाशीं श्वेत सैन्य उठाव करण्याचा रंग दिसू लागला. आजवर लाल सैन्यानें हाडाची काडें करून मिळविलेला विजय मातीमोल ठरतो की काय अशी धास्ती उत्पन्न झाली. ही परिस्थिति उत्पन्न होण्यास लष्करी केंद्राकडून झालेली घोडचूकच कारणीभूत होती असे व्होरॉशिलॉव्हचें म्हणणें आहे तें कसेंहि असो, परंतु मध्यवर्ति समितीनें याहि वेळीं पुनश्च स्टालिनकडेच धाव घेतली. डेनिकिनचा धुव्वा उडविणारा विजयी सेनापति, पहिल्या प्रतीचा संघटक नि

कुशल रणपंडित म्हणून स्टालिनची कीर्ति त्या काळीं नुकतीच दुमदुम लागली होती. त्यामुळें साहजिकच रोस्टोव्हच्या रक्षणाचें जोखमीचें काम मध्यवर्ति समितीने स्टालिनला देऊ केलें. कॉकेशस आघाडीच्या क्रांतिकारी लष्करी मंडळात प्रवेश करून तेथील परिस्थिति त्यानें सुधारावी असें स्टालिनला कळविण्यात आलें. स्टालिनची प्रकृति कामाच्या अति ताणामुळ त्या वेळीं बरीच बिघडली होती, तथापि स्टालिनला ती कामगिरी अंगावर घेण्याइतका उत्साह होता. परंतु स्टालिननें तें काम स्वीकारण्यापूर्वी एक अडचण उपस्थित केली "वारंवार निरनिराळ्या आघाड्यांवर आपली बदली होत असल्यामुळें स्थानिक पक्षसंघटकांत आपल्याविषयीं कलुषित मत होण्याचा संभव आहे, कारण मध्यवर्ति समितीनें ठरविलेले निर्णय त्यांना कळत नाहींत" अशी ती अडचण होती. समितीला या अडचणीचा विचार करावासा वाटला व त्याची नवी नेमणूक तात्पुरती स्थगित करण्यात आली

मार्च १९२० मध्यें या श्वेत–रक्त सैन्याचें युद्ध संपत आल्याचें दिसलें. कारण कोलचॅक आणि डेनिकिन यांना पूर्ण पराभव खाऊन माघार घ्यावी लागली होती. इंग्लंडनें युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. तथापि फ्रान्सला सोव्हिएट लोकसत्ता नष्ट करण्याची आशा अद्यापि वाटत होती. त्यानें सेनापति रँगल याला भर दिली श्वेत पोलीश जनतेच्या उठावणीचा फायदा घेऊन रँगल क्रीमियांतून हळूच बाहेर पडला. डेनिकिनचें पराभूत व विस्कळित झालेलें सैन्य एकत्रित करून रशियानें नुकताच परत घेतलेला डोनेट्झ प्रांत व संबंध दक्षिण आघाडी यांना रँगलनें मोठी धास्ती उत्पन्न केली. मध्यवर्ति समितीनें त्वरित एका ठरावान्वयें रँगलला तोंड देण्यासाठीं स्वतंत्र रँगल–आघाडी स्थापन करून त्या आघाडीवर स्टालिननें आपलें सर्व बळ एकवटावें असें कळविलें सरसेनापति नि स्टालिन यांच्या परस्पर संमतीनें या आघाडीवर इगोरोव्ह अगर फ्रुंझ याला सेनापति म्हणून नेमावा असेंहि ठरलें. त्याप्रमाणें रँगल–आघाडीवरील सर्व कारभार सर्वस्वीं स्टालिनच्या हातीं येऊन त्यानें तेथें नवी संघटना बळकट पायावर

उभारली परन्तु पुढे त्याची प्रकृति फारच खालावल्यामुळें केवळ अशक्य म्हणून त्याला ती कामगिरी अपुरीच सोडून द्यावी लागली.

श्वेत पोलिश मोहिमेच्या काळात स्टालिन नैर्ऋत्य आघाडीच्या क्रांतिकारी लष्करी मडळाचा सभासद होता. त्या अवधीत पोलिश सैन्याचा धुव्वा उडाला कीव्ह आणि पश्चिम युक्रेन प्रांत शत्रूच्या तावडीतून सोडविले गेले गॅलीशियामध्यें लाल सेनेने बरीच खोलवर चढाई केली. पहिल्या घोडदळ सैन्याकरवी उत्तम कामगिरी घडवून आणली नि त्या सैन्यविभागात उत्तम प्रकारची शिस्त नि एकजूट निर्माण झाली. या सर्व कार्याचं बरेचसे श्रेय स्टालिनच्या कुशल नि समर्थ नेतृत्वालाच द्यावें लागेल या त्याच्या कर्तबगारीचा गौरव म्हणून त्याच्या लष्करी कौशल्याबद्दल त्याला 'ऑर्डर ऑफ दी रेड बॅनर' हा बहुमान अर्पण करण्यात आला

फ्रान्सच्या पाठिंब्यामुळे पोलिश सेनापति पिल्सुडस्की यान युक्रेनवर चढाई करुन कीव्ह शहर सर केले पुनश्च धुमश्चक्रीला प्रारभ झाला पण त्यात रशिया फारसा टिकाव धरीलसें लेनिनला दिसेना म्हणून त्यानें रिगा येथें पोलडशीं स्वतत्र संधि केला रॅंगलला एकाकी गाठून त्याचा पूर्ण पराभव करण्यात आला नि १९२० च्या नोव्हेंबरमध्ये रॅंगलला लाजिरवाण्या पराजित तोंडान रशियाबाहेर निघून जावें लागले

रणक्षेत्रावर स्टालिननें जी अमोल कामगिरी बजावल्याचे हें वर्णन केलें आहे त्यासबधी निरनिराळ्या चरित्रलेखकाचे आक्षेपहि येथें नमूद करणें आवश्यक वाटतें. युजेन लिऑं याच्यासारखे लेखक म्हणतात, की हा इतिहास स्टालिन सर्वाधिकारपदावर आल्यानतर बदलून लिहिलेला असून हे सारें धादात असत्य आहे काही इतिहासकाराचे मत याच्याविरुद्ध आहे त्याच्या म्हणण्याप्रमाणें ट्रॉट्स्की या वेळी हतबुद्ध झाला नि स्टालिननें लेनिनच्या पाठिंब्याच्या जोरावर आपल्या या सरसेनापतीच्याहि आज्ञा वारवार धुडकावून लाविल्या. रणक्षेत्रावर प्रत्यक्ष लढण्यापेक्षा त्या आघाडीवरील अतर्गत सुव्यवस्था, कट-कारस्थानें नि अनुकूल पार्श्वभूमि

सिद्ध करण्याचें कार्य स्टालिननें फारच यशस्वी तऱ्हेनें पार पाडलें याबाबत मात्र कोणाचेंच दुमत नाहीं

या विजयातील स्टालिनची कामगिरी विशेष लक्षात घेण्यासारखी नि त्याच्या उत्तरायुष्यावर चिर परिणाम करणारी अशी आहे. झारिस्टिन, पर्म, पेट्रोग्राड नि सारी दक्षिण आघाडी या रणक्षेत्रावर स्टालिनच्या बुद्धिमत्तेची, माणसाच्या पारखीची नि अविश्रांत मेहनत करण्याच्या शक्तीची चांगलीच पारख झाली आणि त्यात त्याचा दर्जा फार वरचा ठरला हें निःसंशय तसेंच या लढायाच्या काळां सरसेनापति म्हणून ट्रॉट्स्की हाच काम करीत असला तरी स्टालिननें स्वत च्या बाबतीत त्याच्या आज्ञा यत्किंचितहि मानलेल्या नाहीत, उलट त्यावर कडक टीका करुन त्या धुडकावून लावल्या. याचाहि उपयोग त्याचा स्वत बद्दलचा आत्मविश्वास वाढण्यांत व ट्रॉट्स्कीचें पाणी जोखण्यात झाला असावा.

आणि याच आत्मविश्वासातून स्टालिनने आपले स्वत चें आसन स्थिर करण्याचा अवाढव्य परतु कोणाच्याहि प्रथमदर्शनी लक्षात न येण्यासारखा खटाटोप सुरु केला. न बोलता शातपणें काम करण्याची जी अलौकिक हातोटी स्टालिनच्या ठिकाणी आहे त्याचे प्रत्यतर यापुढील अदृश्य पूर्वसिद्धतेत स्पष्टपणें दृग्गोचर होईल

या यादवीला नि परचक्राला तोंड देताना साऱ्याच बोल्शेव्हिक कार्यकर्त्याना अविश्रात परिश्रम करावे लागले विशेषत. लेनिन, ट्रॉट्स्की नि स्टालिन याच्यावर कामाचा बोजा फार पडत असे.

लेनिन व स्टालिन याच्या शारीरिक श्रमाचा अतिरेक झाला होता. दोघांनाहि तो अतिश्रमाचा ताण सहन झाला नाहीं. अनेक चिंता नि निरनिराळ्या जोखीमदाऱ्याचें दायित्व याना त्यांचीं मनेंहि दमूनभागून गेलीं असावीत १९१९ च्या मार्चमध्ये स्वर्डलोव्ह वारला त्यामुळें तर लेनिनवरील कामाचें ओझें त्याला जवळजवळ असह्य झाले.

## एक जिवावरचा प्रसंग

स्टालिन गेलीं काहीं वर्षें अनेक तऱ्हेच्या यातना सोशीत होता. त्यात

झारित्सिनपासून तर दक्षिण आघाडीवरील युद्धापर्यंत त्यानें जे अविश्रांत परिश्रम केले त्यांचा त्याच्या शरिरावर परिणाम झाल्यावेरीज राहिला नाहीं. युद्धावर असताना त्याचें खाणे म्हणजे पाव, मीठ, कांदा, लसूण, तांबडी दारू हेंच होत या आहारामुळें त्याच्या जठरावर वाईट परिणाम होऊन त्याला पोटदुखीचा विकार जडला काहींहि खाल्लें तरी लगेच त्याला त्रास होऊ लागे. त्यामुळें त्याला मिताहार ठेवणें भाग पडलें पण त्यामुळें त्याच्या थोराड शरिराला थकवाहि आपोआप येऊ लागला. अर्थात् हा आजार मधूनमधून सारखा उद्भवत होताच या दुखण्यावर त्याने कांहीं काल उपचार करून घेतले नि तो सुधारूहि लागला. डेनिकिन-विरुद्ध लढून त्याने विजय संपादन केला. त्या मोहिमेनंतर लगेच त्याला पोटदुखीच्या आजाराने भयंकर ग्रासलें त्यामुळें नाइलाजानें त्याला विश्रांति घेत स्वस्थ पडून राहण्यावेरीज दुसरा उपायच नव्हता. लेनिनची इच्छा त्यानें डेनिकिनप्रमाणें सेनापति रँगल याच्याशींहि सामना करून त्याची धूळ-धाण उडवावी असा होता. परंतु स्टालिननेंच निरनिराळ्या सबबी पुढे करून तें काम अंगावर घेण्याचें नाकारलें स्थानिक पक्षाच्या शाखा मला हजार गोष्टींत लुडबूड करणारा ' म्हणून नांवें ठेवितील अशीहि शंका त्याने प्रदर्शित केली तथापि मध्यवर्ति समितीनें त्याला या कामगिरीवर जावयासच पाहिजे अशी आज्ञा पाठविली स्टालिननेंहि निरुपायानं ती जोखीम पत्क-रली परंतु त्यात सुरवातीलाच पराभव खाऊन त्याला परतावें लागलें. १९२० चा सप्टेंबर महिना चालू असताना तर त्याला स्पष्टपणें दिसून आलें कीं ही मोहीम आपण यशस्वी रीतीनें पुढें चालवू शकत नाहीं.

पुढें शरद् ऋतूपर्यंत तो चांगला सुधारला कॉन्स्टडाट येथील बडखो-राचा समाचार घेण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली असल्यानें तो लगेच तिकडे जाण्यास निघाला परंतु तो त्याचा उत्साह थोडक्याच काळात मावळला कारण त्याच्या आजारानें पुन: जोर करून तो जगतो कीं मरतो अशी स्थिति पुनश्च प्राप्त झाली. डॉक्टर रोझानोफ म्हणून एक त्याचा स्नेही होता त्याने त्याची प्रकृति तपासली त्यानें ' ॲपेंडि-

सायटीस ' चें ( आंत्रवृद्धि ) निदान करून शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचें सांगितलें आजार बराच गुंतागुंतीचा असून आत-ड्याचा काही भाग कापून काढावयाचा होता म्हणून मॉस्कोमधील सोल्डाटेक्नोव्हस्की रुग्णालयात स्टालिनला नेण्यात आलें तेथें त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली. परंतु ती पूर्णत यशस्वी ठरली नाही. बराच उशीर झाला असे कारण त्याला देण्यात येतें शस्त्रक्रियेनंतर काही दिवस स्टालिन जीवन-मरणाच्या सीमेवर अटीतटीनें झगडत होता.—पण त्यात तो मरावयाचा नव्हता! अनेक जिवावरच्या प्रसंगातून स्टालिन वाचला, त्यात-लीच हीहि एक वेळ. या त्याच्या आजारपणात लेनिन स्वत रुग्णालयात येऊन अति आस्थापूर्वक त्याची चवकशी करीत असे, नि या प्रसंगींच स्टालिनविषयीं लेनिनच्या मनात अत्यंत खोल असें सहानुभूतीचें नि जिव्हाळ्याचे स्थान निर्माण झाले असं स्टीफन ग्रॅहॅमचं म्हणणें आहे. पुढ डॉ. रोझानोफच्या सल्ल्यावरून स्टालिनला त्याच्या जन्मभूमीमध्ये—जॉर्जिया—पाठविण्यात आलें पूर्ण विश्रांति मिळावी व चालू राजकारणाचा काही ताप त्याला होऊ नये असा हेतु त्या योजनेत होता. लेनिननंहि त्याला संमति दिली.

तो कॉकेशस पर्वतातील आपल्या जन्मभूमीत विश्रांतीकरिता गेला. परंतु तेवढ्या अवधींत ट्रॉट्स्कीचें मात्र चांगलेंच फावले. श्वेत सैन्याला धूळ चारण्याच्या कामीं स्टालिननें केवढाहि पराक्रम गाजविला असला नि बुद्धिकौशल्य खर्चिलें असले, तरी ट्रॉट्स्की त्याला 'दगडबुद्धीचा रानटी कॉकेशियन' यापेक्षा अधिक किंमत द्यायला मुळींच तयार नव्हता. १९२१ च्या पोलिटब्यूरोमध्य स्वत लेनिन, ट्रॉट्स्की, स्टालिन नि कामनेफ एवढीच मंडळी होती या मंत्रिमंडळाच्याच हातीं सर्व राज्य-कारभार होता मध्यवर्ति समितीचे चिटणीस म्हणून काम करणारे, क्रेस्टिन्स्की, सेरेब्रियाकॉफ व स्टासॉफ यांची लायकी कारकुनाहून अधिक नव्हती. लेनिन हा स्वत पक्ष किंवा सरकार या दोघांनाहि वरचढ होता. लेनिनच्या आदेशानुसार पक्षाचें धोरण नि कार्यक्रम ठरविले जात आणि

१९२२ सालापर्यंत पक्षाची पूर्ण सत्ता सरकारवर प्रस्थापित झालेली नव्हती त्यामुळें लेनिनला असा कोणी तरी विश्वासू मनुष्य हाताशीं पाहिजे होता कीं, जो मध्यवर्ति समितीवर राहून सान्यावर दाब ठेवू शकेल. शेवटच्या आजाराची भीषण छाया लेनिनवर या दिवसातच पसरू लागली होती नि स्वत लेनिनलाच फक्त त्याची जाणीव झाली होती. त्याच्या डोळ्यापुढे आपला वारस म्हणून स्टालिनचें नाव आलें असेल, पण त्याच्या-वर पूर्ण विश्वास टाकण्याइतकी त्याची कर्तबगारी आहे असे लेनिनला त्या प्रसंगी वाटले नाही त्याचा उच्छृंखलपणा नि निर्घृणता याचा रागहि लेनिनला येत असे.

## अदृश्य पूर्वसिद्धता

लेनिन अशा मनःस्थितीत असतांनाच स्टालिन बरा होऊन परत आला लेनिनला निर्णय ठरविण्यास अवकाशहि सापडला नसावा. कोणी-तरी दुर्दम्य इच्छाशक्तीचा व जबरदस्त मनुष्य त्याला पाहिजे होता. आप-ल्याला हा सारा व्याप आता झेपू शकत नाही याबद्दल त्याची पुरेपूर खात्री झाली होती त्यामुळें पक्षाच्या चिटणीसपदावर नेमावयाचा मनुष्य आपल्या स्वत.वरील कामाचा बोजा बऱ्याच प्रमाणात उचलू शकेल असाच असणें त्याला आवश्यक नि अपरिहार्य वाटत होतें. स्टालिन त्याच्या दृष्टीनें परिपूर्ण नव्हता पण त्याखेरीज दुसरा कोणीच त्याला योग्य वाटेना अखेर थोड्याशा नाखुषीनेंच लेनिननें पक्षाच्या चिटणीसपदावर स्टालि-नची स्थापना केली.

स्टालिनला आता पाहिजे होतें तेंच नेमके नि योग्य वेळीं मिळालें टॉट्स्कीला त्याची किंमत कळली नसावी, किंवा त्यानें स्वतःच्या कर्तृ-त्वाच्या घमेंडीत जाऊन स्टालिनकडे दुर्लक्ष केलें असावें पण स्टालिनला दैवानें जो वेळोवेळीं हात दिला, त्यातला हा एक अति महत्त्वाचा प्रसंग होता या वेळीं टॉट्स्की पुढे येता नि लेनिनवर त्यानें वजन आणलें असते तर तोच बहुधा या स्थानावर विराजमान व्हावयाचा, पण तसें झालें नाहीं स्टालिनच्या हातात चिटणिशी येताच पक्षाची सर्व शक्ति आपल्या हातीं

केंद्रीभूत करण्यास त्यानें मोठ्या दक्षतेनें, सावधानतेनें परतु जलदीनें सुरवात केली लेनिनला तें दिसत होतें, पण कुरकुरण्यापलीकडे त्याच्या हातीं आता काहीं उरलें नव्हते त्या प्रसगीं स्टालिनसबधीं आपल्या अनुयायाना उद्देशून लेनिनन जें पत्र लिहिले आहे, त्यातील मजकूर लेनिनच्या निःसहायतेची पूर्ण कल्पना आणून देऊ शकेल.

" भाई स्टालिन पक्षाचा सरचिटणीस झाला असून त्यानें आपल्या हातीं प्रचड शक्तीचें केंद्रीकरण केलें आहे. परतु त्या सामर्थ्याचा उपयोग योग्य त्या सावधगिरीनें कसा करावा हें त्याला समजतें कीं नाहीं याबधीं मला धास्ती वाटते. तो एक कमालीचा आडदाड माणूस आहे, आणि हा त्याचा दोष आपणा कम्युनिस्ट सहकाऱ्याच्या दृष्टीनें पूर्णतः समर्थनीयहि आहे. परतु चिटणीसपदावरील माणूस या दृष्टीनें हा दुर्गुण मुळींच खपण्यासारखा नाहीं. तेव्हा माझ्या भाईंना माझी सूचना आहे की, स्टालिनला त्याच्या या स्थानावरून काढून टाकण्यासाठीं काहींतरी मार्ग शोधून काढावा. "

लेनिनच्या या वरील वाक्यावरूनच स्टालिननं त्या वेळा आपली भूमिका किती बळकट व सामर्थ्यसपन्न करून घेतली होती हें दिसून येईल. प्रत्यक्ष क्रातीच्या काळीं जरी ट्रॉट्स्कीचें युद्धकौशल्य प्रकट होऊन ट्रॉट्स्की सेनापति म्हणून चमकला होता, तरी या दुसऱ्या युद्धखंडाचे वेळीं मात्र ट्रॉट्स्कीचे तितकेंसें तेज पडलेलें दिसत नाहीं याचाहि उपयोग स्टालिनला झाला या ३-४ लढायात स्टालिननें विविध अनुभव घेतले होते नि स्वतःचें सघटनकौशल्यहि कसाला लावलें होतें सैनिकाना आपलेसे करून घेण्याचीहि हातोटी त्याला साधली होती त्याला पाहिजे होतीं तींच माणसें त्यानें आपल्या या कारकीर्दीत जागोजागीं अधिकारपदावर नि सैन्यात पेरून ठेविलीं होती या सर्व पूर्वतयारीचा उपयोग अर्थातच त्यानें अधिकारसपादनात करून घेतला.

---

# स्टालिन विरुध्द ट्रॉट्स्की

लिऑ ट्रॉट्स्की ! याच्याइतका दुर्दैवी मनुष्य जगामध्यें झाला असेल का ? ज्या सोव्हिएट क्रान्तीसाठीं त्यानें स्वतःचें बहुतेक आयुष्य वेचलें, त्या क्रान्तीनेंच त्याचा बळी घेतला. दि २१ ऑगस्ट १९४० ला सायंकाळीं ७–३५ वाजता मेक्सिको नगरांत या प्रभावी पण कमनशिबी क्रांतिवीराचे प्राण एका मारेकऱ्याच्या हातोड्यानें हरण करून नेले ट्रॉट्स्कीचा अंत म्हणजे जगाच्या इतिहासातील एक चिरस्मरणीय दु:खा-तिका ठरली आहे !

१९२४मध्ये रशियांतून घालवून दिलेला हा देशनिर्वासित क्रांतिकारक सैबेरिया, तुर्कस्थान, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांत भटकत अखेर अमेरिकेंतील मेक्सिको संस्थानांत येऊन राहिला तेथील सरकारनें कांहीं विशिष्ट स्वार्थी हेतूनें नि कांहीं सहानुभूतीच्या भावनेनें त्याला आपल्या देशांत सरकारी संरक्षणाखालीं आश्रय दिला. ' स्टालिनवाद नष्ट करून रशियांत नव्या क्रांतीची प्रस्थापना करण्यासाठीं हा थोर मनुष्य अखेर-पर्यंत झगडत होता. परंतु स्टालिनच्या सामर्थ्यापुढें त्याला हार खावी

लागली तो स्टालिनवर आपल्या लिखाणात अगदी तुटून पडत असला तरी त्यात वैयक्तिक हेव्यादाव्यापेक्षा स्टालिनवादावरच अधिक तीव्रतेने हल्ला असावयाचा. स्टालिन या रशियन सर्वाधिकाऱ्याबद्दल आपला व्यक्तिगत द्वेष नाहीं असें त्याचे म्हणणें परंतु त्या हुकूमशहानें समाजसत्तावादाच्या गोंडस नावाखालीं चालविलेल्या अमानुष राज्यपद्धतीवर मात्र तो कठोर हल्ला चढवी, नि निदान शब्दानीं तरी त्याचे वाभाडे काढी त्याच्या मताप्रमाणे पाहावयाचें तर रशिया हा आता 'कम्युनिस्ट' देश उरलेला नाहीं !

स्टालिन व ट्रॉट्स्की याचा झगडा जगप्रसिद्ध आहे या लढ्यात ट्रॉट्स्की विजयी होता तर आजच्या राजकारणाचें स्वरूप काहीतरी निराळे दिसलें असते एवढे खास ! परतु बिचारा ट्रॉट्स्की निर्वासित झाला, नि त्याच्या हातीं शक्तिहीन लेखणीखेरीज काहीच राहिलें नाहीं. महाभाग स्टालिन बलाढ्य रशियाचा सर्वाधिकारी बनला, जगातील एका महान् सामर्थ्याचा राजदड त्यानें आपल्या हातीं धारण केला. लिऑं ट्रॉट्स्की यानें स्वत. जोसेफ स्टालिनविषयीं आपलें पहिल्याच दृष्टिभेटीत काय मत झालें ते लिहिले आहे एके ठिकाणीं मोठे मनोरजक नि मार्मिक आहे त्या भेटीचे वर्णन.

तो लिहितो.

" स्टालिनला मीं प्रथमतः व्हिएन्नामधील एका घरात १९१३ सालीं पाहिले. मी माझ्या एका मित्राशीं झारशाही उलथून पाडण्याच्या गोष्टी त्या प्रसगीं बोलत होतों समोरच्या शेगडीवर चहाचे भांडे गरम होत होतें इतक्यात एक सामान्य उचीचा, सडपातळ व देवीचे वण असलेला किकट चेहेऱ्याचा इसम, आगाऊ सूचना वगैरे काहीं न देतां तडक आत आला.

नमस्कार केल्यासारखें करून तो काहीतरी पुटपुटत सरळ शेगडीकडे गेला आणि हातातल्या पेल्यात मुकाट्यानें चहा ओतून घेऊन आला तसाच तो निघून गेला.

मी डोळ्यांनीच माझ्या स्नेह्याला प्रश्न केला.

'कोण ही स्वारी?'

'जुगॉश्विली. बोल्शेव्हिक मध्यवर्ति समितीवर नुकतीच नेमणूक झाली आहे त्याची' माझा मित्र उत्तरला

त्याचें तें अनपेक्षित आगमन व प्रत्यागमन, त्याच्या वागणुकींतील तें अकारण शत्रुत्व, त्याची ओबडधोबड नमस्कारपद्धति नि विशेष म्हणजे त्याच्या चेहेऱ्यावर दृग्गोचर होणारी विषण्ण एकाग्रता—यांनी माझ्या मनाचा गोंधळ उडविला, अगदीं विचित्र परिणाम झाला माझ्या मनावर.'

१९१२ सालीं स्टालिनची पक्षाच्या मध्यवर्ति समितीवर नेमणूक झाल्यानंतर कांहीं महिन्यानंतरचाच हा प्रसंग असावा. परंतु एकंदरींत स्टालिनविषयीं ट्रॉट्स्कीचें मन विशुद्ध कधींच नव्हतें त्याच्याकडे लक्ष देण्याइतकें महत्त्वहि त्याच्यामध्यें ट्रॉट्स्कीला दिसलें नसावें.—आणि ट्रॉट्स्कीच्या या गैरसमजुतीनें व तदुद्भूत निष्काळजीपणामुळेंच अखेर त्याच्यावर देशोधडीला लागण्याची पाळी आली.

सुरवातीला दोघांचेंहि ध्येय एकच पण मार्ग भिन्न पडले. ट्रॉट्स्कीचा जगत्क्रांतिवाद अतिरिक्त स्वरूपाला जाऊं लागलेला पाहाताच क्रांतीच्या वा रशियाच्या हितासाठीं स्टालिननें त्याला विरोध केला आता परिस्थिति अशी उत्पन्न झाली आहे कीं, स्टालिनचा क्रांतीबाबतचा एकदेशवाद अतिरिक्त रूपाप्रत गेला असून चढाऊ राष्ट्रवादाचें स्पष्ट स्वरूप त्यानें उघडपणें धारण केलें आहे जगांतील कामगार संस्थांचा स्टालिनच्या म्हणजे पर्यायानें सोव्हिएट रशियाच्या राजवटीवरचा विश्वास उडाला आहे. राष्ट्रसंघांतून रशियाची हाकलपट्टी झाली जागतिक ट्रेड युनियन कॉंग्रेसमधून त्याला सीमापार करण्यात आलें फिनिश आदि कामगारसंघांतून त्याचा शतशः धिक्कार करण्यात येऊं लागला.[1] अर्थातच ट्रॉट्स्कीला

१ ब्रिटिश स्वतंत्र मजूर पक्षाच्या २५ मार्च १९४० च्या नॉटिंगहॅम-परिषदेत ७० विरुद्ध २१ मतांनीं असा प्रस्ताव मान्य करण्यांत आला कीं, स्टालिनच्या राजवटींतील परराष्ट्रीय नि लष्करी धोरणापासून

स्टालिनविरोधी मोहीम सुरू करण्याला ही उत्तम संधि होती, पण बलाढ्य व अधिकारारूढ अशा सर्वाधिकारी स्टालिनशीं एक असहाय वृद्ध निर्वासित सामना करू शकेल हें संभवनीय नव्हतें.

एक काळ असा होता कीं, रशियाचीं राज्यसूत्रें स्टालिनच्या हातीं जातात कीं ट्रॉट्स्कीच्या हातात येतात याबाबतचें भविष्य परिस्थितीच्या लाटेवर नाजूक हेलकावे खात होतें. लेनिनच्या निधनानंतरचा तो काल होता पण ज्या गोष्टीवर हे दोघेहि विसंबून होते त्या गोष्टीने या दोघा-नाहि एकदमच दगा दिला तो प्रसंग सोव्हिएट रशियाच्या इतिहासात मोठा आणीबाणीचा समजला जातो

## मृत्युपत्रांतील रहस्य

लेनिननं मृत्युसमयी आपल्या राजकीय वारसदारीचा उल्लेख स्पष्टपणें लिहून ठेविला नाहीं त्यानें मृत्युपत्र लिहिलें होतें. परंतु त्यात आपल्या मागं कोणीहि पुढारी आपली जागा चालविण्यास लायक नाहीं, असेंच मत प्रदर्शित करून प्रत्येक नेत्यावर कडक टीका केली होती त्यामुळें कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांच्या संमतीनुरूप त्या मृत्युपत्राचा नाश करण्यात येऊन, तं मुळात लिहिले गेलेलेंच नाही असे समजण्यांत आलें !

लेनिनचें देहावसान झालें त्या प्रसंगीं स्टालिन मॉस्को येथेंच होता. त्यानें ट्रॉट्स्कीला लेनिनच्या मृत्यूची वार्ता तारेनें कळविली ट्रॉट्स्कीच्या त्या वेळीं मनात येतें तर त्याच्या हातात असलेल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर तो सारं राज्ययंत्र आपल्या हातीं घेऊ शकला असता. पण ही संधि ट्रॉट्स्कीनें त्याच्या नेहमीच्या चालढकलीच्या सवयीप्रमाणें गमावली तडक मॉस्कोला न येता तो सुखम येथेंच घोटाळत राहिला

स्टालिननें ट्रॉट्स्कीला मोठेपणा देण्याचा देखावा मोठा चांगला केला. मध्यवर्ति समितीतर्फे फ्रुंझ, टॉम्स्की व इतर काही सदस्यांचें एक शिष्ट-

---

फुटून निघणं हे सोशालिस्टाचे कर्तव्य आहे. त्या प्रसंगी मि फिनर ब्रॉकवे यांना स्पष्टच सांगितलें कीं, फिनलंडवरील आक्रमणामुळें रशियानें जगातील कामगारांची सहानुभूति बहुतेक गमावली आहे.

मंडळ ट्रॉट्स्कीच्या भेटीसाठीं मुद्दाम येथें आलें या कारवायीमागे स्टालिनचा हात होता युद्धखात्यात काही बदल घडवून आणावयाचे होते, त्यासाठी त्या मंडळानें ट्रॉट्स्कीला सहकार्याची विनंति केली पण वस्तुतः हा केवळ देखावा होता ट्रॉट्स्कीला न विचारतांच युद्धखात्यात अनेक घडामोडी नि फेरफार स्टालिननें परस्पर केले होते ट्रॉट्स्कीनें या शिष्टमंडळाचें आगमन म्हणजे निव्वळ एक फार्स होता असें म्हटलें आहे. ट्रॉट्स्कीचे स्नेही अगर त्याच्याविषयी सहानुभूति असणारी माणसें स्टालिननें भराभर अधिकारपदावरून उचलली नि त्याच्या जागी आपल्या विश्वासातील 'त्सारित्सीनचे विजयी वीर' स्थानापन्न केले स्टालिननें परस्पर कांटा काढण्याच्या दृष्टीनें दोन कोंबड्यांची झुंज लावण्याची ही क्लृप्ति अनेकदा उपयोगात आणलेली दिसेल '

फ्रुंझ हा मध्य आशियातील पिशपेकचा ज्यू ट्रॉट्स्कीहि ज्यूच या दोन ज्यू नेत्यांची आपसात स्पर्धा लावून स्टालिननें आपले काम साधले, कारण फ्रुंझ सरसेनापतिपदाची इच्छा करीत होता अखेर ट्रॉट्स्कीनें मॉस्कोंत तर प्रवेश केला अजूनहि त्याच्या लष्करी बडखोरीची शक्यता नष्ट झालेली नव्हती पण आडवा येत होता तो फ्रुंझ शिवाय लेनिनने आपला वारस आपल्यालाच नेमलें असेल या आशेचे माड ट्रॉट्स्की मनात खात होता आणि लेनिननेच जर ट्रॉट्स्कीची योजना त्याच्या जागी केलेली असेल तर रशियन जनतेला ट्रॉट्स्कीच्या सर्वाधिकारपदाला मान्यता द्यावी लागेल, तेव्हा उगीच दगाधोपा माजवून आपल्याविरुद्ध लोकमत कलुषित न करून घेता सरळपणानें व लेनिनच्या आज्ञेनुरूप रशियनांच्या इच्छेवरूनच आपण अधिकारपदावर आलों तर तें अधिक चांगले असाहि दूरवरचा विवेक ट्रॉट्स्कीने केला असावा.

पण लेनिनचे मृत्युपत्र (Testament) स्टालिन व कामनेफ यांच्याच हातीं होतें. तें फोडून वाचण्यापूर्वीहि त्यांत काय मजकूर आहे हे या दोघांना माहीत असावें असा स्टीफन ग्रॅहॅमनें संभव व्यक्त केला आहे

त्या वेळी मॉलोटॉव्हच्या[1] हाताखाली सहचिटणीस म्हणून बाझनॉफ याची नेमणूक झालेली होती त्याने मृत्युपत्राचें वाचन चालू असता स्टालिनच्या चेहेऱ्यावर काय भाव दिसत होते याचें प्रत्यक्ष पाहिलेलें वर्णन केले आहे "एका अध्यक्षीय कोचावर रेलून तो बसला होता त्याची मुद्रा दु:खी नि गळून गेलेली दिसली मी त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहात होतो. त्यानें केलेले आत्मसंयमन व तोंडावर बळेंच ओढून आणलेले गांभीर्य यानीहि त्याच्या मुद्रेवरील विकल भाव झाकले गेले नव्हते जणू त्याचे दैव पणाला लागले होतें होय अथवा नाही—हेंच शब्द त्याच्या उत्कंठित शरिरावर लिहिलेलें आहेत असें कोणाला वाटलें असतें " आपल्या अंतरंगांतील खरे भाव चेहेऱ्यावर मुळींच उमटू न देता इष्ट त्या सोंगाची बतावणी करण्याची ही कला स्टालिन लहानपणींच शिकला होता. आणि त्यामुळें बाझनॉफहि चकला

पक्षाच्या मध्यवर्ति समितीची बैठक भरली होती कामनेफकडे मृत्युपत्रवाचनाचें काम होतें.

"भाई स्टालिन पक्षाच्या मध्यवर्ति समितीचा सरचिटणीस झाल्यानें त्याने आपल्या हातीं अनिर्बंध सत्ता घेतली आहे आणि ती अत्यंत काळजीपूर्वक कशी वापरावी हें त्याला कळलेले नाही " लेनिनच्या मृत्युपत्रात त्यानें केलेली ही स्टालिनची भलावण ! स्टालिनच्या वागणुकींतील काठिण्य नि त्याची पक्षाच्या चिटणीसपदाची हाव याचा उल्लेख करून लेनिनने आपल्या अनुयायांना स्पष्ट इशारा दिला होता पण आता फार उशीर झाला होता स्टालिनने आपले आसन आता पक्के केले होते त्याचा विशिष्ट अनुयायी वर्ग त्याच्या पाठीशी उभा होता. त्याची लेनिनबाबतची एकनिष्ठता अगर पक्षाचा जुना सभासद या नात्याने त्याचे कर्तृत्व यापैकी कोणत्याच गोष्टीसंबंधीं संशय घेण्यास कोणीहि पुढारी धजावला नाही निदान त्याच्या मनांत काहींहि असलें तरी ते जनांत प्रकट करून स्टालिनला उडविण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसत नाही, तें त्यांना अशक्य होते !

कामनेफ नि झिनोव्हीफ या दोघांपैकीं कोणालाच लेनिनने विशेष

---

१ सोव्हिएट रशियाचा हल्लीचा परराष्ट्रीय मंत्री.

महत्त्व दिलं नव्हतें. त्याच्या ठिकाणीं काही कर्तबगारी आहे असें लेनिनला वाटलें नसावें. उलट १९१७ च्या ऑक्टोबर–क्रान्तीचे प्रसंगीं या दोघांनीं दाखविलेल्या बट्याधळी वृत्तीचा निषेध करून लेनिननें त्यांना कस्पटासमान लेखिलें होतें

" भाई ट्रॉट्स्की व स्टालिन हीं दोन माणसें सांप्रतच्या मध्यवर्ति समितीत सर्वांत अधिक कर्तृत्वशाली आहेत. " कामनेफचें मृत्युपत्र–वाचन चालूच होतें " या दोघांतील स्पर्धा पक्षांत अहेतुकपणें दुफळी माजविण्यास कारणीभूत होईल भाई ट्रॉट्स्की हाच बहुधा सर्व पुढाऱ्यांत अधिक बुद्धिमान् ठरेल परंतु त्याची अहमन्यता पराकोटीला गेलेली आहे, आणि शिवाय तो बोल्शेव्हिक नाहीं. "

ट्रॉट्स्कीच्या आशाचा चक्काचूर झाला, लेनिनच्या वचनाचा आधार घेऊन तो पुन कधींहि रशियन जनतेपुढें उभा राहू शकणार नाहीं इतका दूर फेंकला गेला त्याचा डाव उधळला गेला. कारण त्याला 'बोल्शेव्हिक' म्हणून मानण्यास प्रत्यक्ष लेनिनच राजी नव्हता !

ट्रॉट्स्कीवर लेनिनचा फार विश्वास पूर्वीच्या काळीं होता त्याच्या संघटनकौशल्याची तारीफ लेनिन नेहमीं करीत असे. एकदा तर त्यानें ट्रॉट्स्कीला कोरा चेक ( हुंडी ) दिला होता, असें ट्रॉट्स्कीनें आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे. परंतु असाहि एक उल्लेख आहे, कीं लेनिन म्हणे, " ट्रॉट्स्की आमच्याबरोबर आहे, पण तो आमचा नव्हे. "

त्या सभेंत मृत्युपत्राच्या वाचनानंतर ट्रॉट्स्कीनेंच वक्तृत्व गाजवून आपल्या अनुयायांच्या नि व्यक्तित्वाच्या जोरावर आपलें प्रभुत्व नि नेतृत्व प्रस्थापावयास पाहिजे होतें तो अधिकार साहजिक त्याच्याकडेच येत होता. पण झिनोव्हीफनें त्यापूर्वींच एक योजना आखून ठेविली होती. त्या बेताप्रमाणें फक्त स्टालिनविषयींच सभेंत चर्चा झाली. जणू सारें प्रतिनिधित्व त्याच एकट्या माणसाकडे यापुढें आलें होतें !

स्टालिन अत्यंत गंभीरपणें उभा राहिला. त्याच्या मुद्रेवर शांततेचा समुद्र पसरला होता. पण कोणी सांगावें, त्याखालीं वडवानल पेटलेला

असेल ! " भाई हो " तो बोलू लागला.

" मला माहित आहे की, मी कठोर नि तिखट आहें. पण काय करणार त्याला ? मी हा असाच जन्माला आलों खरा. "

त्यावर सभासदांनी टाळ्या वाजवून त्याला उत्तेजित केलें

त्या वक्तव्यानतर झिनोव्हीफनें भाषण केलें डोंबाऱ्यानें दोरीवर चालावें तसें तो बोलत होता. अगदीं तोल सावरून, शब्द आवरून कारण प्रसग नाजूक होता "लेनिनचा प्रत्येक बारीकसारीक शब्दसुद्धा आपल्याला कायद्याप्रमाणे आहे कोणालाच शका नाहीं याविषयी. परतु एक गोष्ट मात्र अशी आहे की, जी आपण सर्वजण आनदानें मान्य करू. लेनिननें केलेले अदाज अद्यापि पक्के झालेले नाहींत ही ती गोष्ट. पक्षाच्या सरचिटणिशीच्या प्रश्नाबद्दल मी बोलत आहें. "

स्टॉलिनला पक्षातूनच अजिबात हुसकून लावावा अशी लेनिनची अतिम इच्छा असल्याचें सभासदाना माहित होतें.

कामनेफनें झिनोव्हीफला पाठिंबा दिला. ट्रॉट्स्कीनें वेडींवाकडीं तोंडें करून नापसती दाखविण्यापलीकडे कांही केलें नाहीं. स्टालिनला अधिकारपदावरून काढून टाकण्याचा ठराव सभेनें औपचारिकरीत्या फेटाळून लावला

वास्तविक हीच खरी वेळ होती कीं, ज्या प्रसगीं ट्रॉट्स्की स्टालिन-विरुद्ध उघड पुकारा करून उठू शकला असता. परतु का कोण जाणे, ट्रॉट्स्की एखाद्या भुतानें पछाडल्यासारखा जागच्या जागी खिळून गेला होता. मग त्याला तितकें धैर्यच नव्हतें कीं लेनिनच्या उद्‌गारानी जो आश्चर्याचा नि दुःखाचा जबरदस्त धक्का त्याला दिला त्यानें तो निचेष्ट होऊन गेला होता, कोण जाणें !

लेनिनने स्टालिनचीहि निर्भर्त्सना केली होती, पण ती मनाला लावून घेण्याइतका हळवेपणा त्याच्या ठिकाणीं नव्हता. बाहेरून त्यानें कदाचित गभीर उदासीनतेचा आव आणलाहि असेल; पण घरीं गेल्यावर आजूबाजूला कोणी नाहीं असें होताच खांदे उडवून तो तुच्छतापूर्वक हसलाच असेल लेनिन जिवत असतांना त्याच्या धमक्याना स्टालिनने जेथें धूप

घातला नाही तेथें लेनिन निवर्तल्यानतर त्याच्या मृत्युपत्रातील–साध्या कागदावरील शब्दाना तो थोडीच किंमत देणार होता ! ट्रॉट्स्की मात्र त्या आघाताने पुरा खचून गेला असावा. तें कांही असो. त्या मृत्युपत्राची किंमत मध्यवर्ति समितीच्या सभेपुढे वाचण्यापेक्षा अधिक राहिली नाही.

कारण लेनिनचें मृत्युपत्र रशियन जनतेपासून नि पक्षापासूनहि लपवून ठेवून त्याचा नाश करण्यात आला. 'अधिकृत'रीत्या असलें कांही मृत्युपत्र अस्तित्वातच नव्हतें मुळीं !

**लेनिन देव बनतो !**

पण स्टालिन एवढ्यावरच स्वस्थ बसणे शक्य नव्हतें. त्याला आपल्या स्थानाचा खुंटा हल्वून बळकट करून घ्यावयाचा होता म्हणून त्यानें मोठ्या कौशल्यानें एक डाव टाकला. जूनमध्यें पक्षाची तेरावी कॉंग्रेस भरली. त्यानंतर लगेच मध्यवर्ति समितीची एक बैठक बोलविण्यात आली. या बैठकींत स्टालिननें एखाद्या विरक्ताप्रमाणें 'आपल्याला सोडवा बुवा या साऱ्या राजकारणाच्या भानगडींतून' अशी सभासदाना विनंति केली. त्याचा योग्य–म्हणजे स्टालिनला पाहिजे होता–तोच परिणाम घडला. कामनेफ, झिनोव्हिफ नि स्थानिक पक्षांतील इतर साऱ्या सभासदांना त्याची ही विनंति अमान्य केली. ट्रॉट्स्कीनेंहि स्टालिननें अधिकारपद सोडूं नये, असें ( मनापासून किंवा मनाविरुद्ध ) प्रतिपादन केलें. अशा रीतीनें पक्षाच्या इच्छेनुरूप तो अधिकारपदावर कायम राहिला. त्याच्या स्थानाला त्यानें पक्षाचें नैतिक पाठबळ संपादन करून घेतलें. पुढच्याहि वर्षी–आपल्या यशाची पूर्ण खात्री अगोदर करून घेऊन–हेंच नाटक त्यानें पुनः एकदा वठवून दाखविलें !

ट्रॉट्स्कीवर लेनिनचा विश्वास कितपत होता हें खात्रीशीर कळण्या-सारखा प्रत्यक्ष पुरावा आज उपलब्ध दिसत नाही. लेनिनच्या मृत्युपत्रा-चाच आधार घ्यावयाचा म्हटलें तर त्यांत ट्रॉट्स्कीबाबत काय लिहिलें होतें तें वर आलेंच आहे. ट्रॉट्स्कीला आपल्या ज्यू रक्ताचा मोठा अभि-मान. 'रानटी,' 'असंस्कृत' स्टालिनपेक्षां तो स्वतःला फार उच्च दर्जाचा

समजे निर्णायक कल्पनाशक्ति नि पहिल्या प्रतीची प्रतिभा स्टालिनपाशीं नाहीं, पण ती आपल्यामध्यें परिपूर्णत्वानें वसत असल्याची ट्रॉट्स्कीची खात्री होती. लेनिनन या आपल्या गुणाची किंमत ओळखूनच आपल्याशीं आदराची वर्तणूक ठेविली होती असें त्याचें म्हणणें. पण तें कांहींहि असो, अखेर ट्रॉट्स्की हरला नि स्टालिन विजयी ठरला.

पक्षाच्या सरचिटणिशीवर आपलें आसन भक्कम होताच स्टालिननें राज्ययंत्र आपल्या व्यक्तिगत देखरेखीखालीं नि खास स्वतःच्या मतानुरूप चालविण्याचे प्रयत्न जोमानें सुरू केले. ट्रॉट्स्कीप्रमाणेंच झिनोव्हीफ व कामनेफ या दोघांचीहि योग्य अवधीत वासलात लावणें, स्टालिनला शक्य होतें. ट्रॉट्स्कीला चाहणारे अनेक अनुयायी होते. यांपैकीं कांहीं तर ट्रॉट्स्कीपेक्षाहि जहाल होते. स्टालिनला उडवून देण्यासाठीं त्यांची संघटना नि कटकारस्थानें चालू होतीं. यासंबंधानें स्टीफन ग्रॅहॅम म्हणतो:

"It appeared that even against his will Trotsky might be made to mount his white horse again and prance in triumph over a confound opposition. There were some critical days."

ॲंटेनोव्हस्कीसारख्या लोकांना ट्रॉट्स्कीकडून उठावणी होण्याची बरीच आशा वाटत होती. 'ट्रॉट्स्कीच्या केसालाहि धक्का लागला तर संबंध लाल सैन्य त्याच्या पाठीशीं रक्षणार्थ उभें राहील' अशा अर्थाचें एक पत्रहि ओव्हसेयेनकोकडून पोलिटब्यूरोला आलेलें होतें. स्टालिनगटाचें धाबें या सूचनेनें दणाणलें हें निःसंशय.

ट्रॉट्स्कीचें बंड या घटकेला घडतें कीं पुढील घटकेला, असाच प्रश्न जणू आपसांत विचारला जात होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ट्रॉट्स्की स्वतः मात्र अगदीं निश्चल होता. निराशेनें खचून गेलेल्या माणसासारखा तो दिसे. स्टालिननें फ्रुंझला खारकोव्हहून बोलावून घेतलें. आणि त्यापुढें हळूहळू ट्रॉट्स्कीच्या उठावणीचें वादळ वा वादळाची धास्ती कमी होऊं लागून अखेर ट्रॉट्स्कीनें हताश होऊन तडजोड केली.

लगेच ट्रॉट्स्कीवादाच्या विध्वंसनाची चक्रे जोरानें फिरू लागलीं. ट्रॉट्स्कीच्या स्थानाविषयी चर्चा करण्याकरिता मॉस्को, लेनिनग्राड आणि इतर प्रांतातून शेकडों प्राथमिक गुप्त सभा भरूं लागल्या. त्या काळचें वर्णन ट्रॉट्स्कीच्याच शब्दात देणें बरें "जेव्हा गुप्त तयारीचें कार्य पुरें झालें तेव्हा 'प्रवदा'कडून एक इषारा दिला गेला तत्क्षणींच ट्रॉट्स्की-वादाविरुद्ध एक समयावच्छेदेंकरून सर्व व्यासपीठावरून, प्रत्येक पृष्ठावरून नि प्रत्येक स्तंभामधून मोहीम सुरू झाली पक्षाच्या प्रचंड सभासद्-संख्येला तो एक मोठाच आघात होता मी तापामुळें अंथरुणाला खिळून पडलो होतो आणि शांतपणें सर्व काही पहात होतो "

१९२४ च्या उन्हाळ्यातील ही गोष्ट त्याच वेळीं लेनिनला देवपण देण्याचा एक मोठा कट चालला होता "लेनिनचें प्रेत त्यांनी माझ्या-विरुद्ध लढण्यासाठी उपयोगात आणलें" असें ट्रॉट्स्की वैतागानें लिहितो. आणि खरोखरच तशी स्थिति होती. लाल चौकात ( रेड स्क्वेअर ) लेनिनच्या मृत देहाचें भव्य स्मारक उभारण्याची स्टालिनची योजना अशासाठीच निर्माण झाली होती का, लेनिनला एकदा देवकोटीला नेऊन बसविला कीं त्याच्या नावाचा वाटेल तसा उपयोग आपण करून घेऊं शकू. लेनिनच्या सदेह स्मारकाला ट्रॉट्स्कीनें विरोध केला होता कारण लाल चौकात एक भव्य मंदिर तयार करून त्यात लेनिनचा मृत देह ठेवणें आणि अशा रीतीनें त्याचें चिरकालिक स्मारक उभारणें ही कम्यु-निझममध्ये बसणारी गोष्ट नव्हती. पण स्टालिननें तें स्मारक उभारलेंच

एवढ्यावरच स्टालिन थांबला नाही. स्टीफन ग्रॅहॅम म्हणतो·

He made Lenin's books into a Bible of the Revolution, a sacred Gospel "

लेनिनच्या ग्रंथाना स्टालिननें क्रान्तीच्या धर्मग्रंथाचें रूप दिलें खरें, परंतु त्या धर्मग्रंथातील तत्त्वाचें आचरण करण्यापेक्षा त्यानें ती उल्लंघिलींच अधिक अर्थातच रशियन क्रांतिवाद्यांपुढें आता दोनच मार्ग शिल्लक उरले एकतर लेनिनपंथी बनणें किंवा स्वत:ला सोव्हिएटचा शत्रु ठरवून घेणें–अर्थात् मृत्यूला आवाहन करणें!

## ट्रॉट्स्कीची हाकलपट्टी

पुढच्याच जानेवारींत ट्रॉट्स्कीकडून युद्धमंत्रिपद काढून घेण्यात आलें. त्यामुळें ट्रॉट्स्कीच्या हातीं असलेलें एकमेव साधनहि नष्ट झालें आता तो सेनापति राहिला नाहीं. म्हणजेच त्याचें लष्कराचें पाठबळ नाहींसें झालें!

आता सर्व सत्ता झेरझिन्स्की, बुखारीन, ऑर्डझोनिकिडिझ, मॉलोटॉव्ह, बुडनॉफ व इतर काहीं यांच्या हातीं केंद्रीभूत झाली होती पण लेनिनच्या जागीं कोणीतरी देव वा दगड स्थापन करणें आवश्यक होतें. देव अति-मानव म्हणून व निर्गुण म्हणून निष्क्रिय, नि दगड तर बिचारा मुका, बहिरा नि आंधळा! रिकॉफ राज्यकारभार चालविण्याच्या लायकीचा माणूस होता, परंतु ते पडले मदिराभक्त व्होडका (दारू)चें नाव 'रिकॉफ' म्हणूनच उपयोजिलें जात असे त्या वेळी ट्रॉट्स्कीविरहित असलेला ट्रॉट्स्कीचा गट अद्यापि गाडला गेलेला नव्हता जी काहीं धुगधुगी नि आशा त्याच्यात होती त्यावरच त्यानें हातपाय हालविण्यास पुनश्च सुरवात केली मात्र त्यातील प्रत्येक मनुष्यावर विरोधी पक्षाच्या गुप्त हेराची करडी नजर होती

झिनोव्हीफ नि कामनेव्ह हे स्टालिनचे एकनिष्ठ अनुयायी अगर त्याला पाठिंबा देणारे कट्टे स्टालिनवादीहि नव्हते. आपल्याला पक्षामध्यें बहुमत मिळू शकेलच, तेव्हा ट्रॉट्स्कीचाहि पाठिंबा जर मिळविता आला तर तें अधिक बरें, असा विचार या जोडीच्या मनात येऊ लागला, म्हणून ते ट्रॉट्स्कीला पाठीशीं घालण्याचा विचार करू लागले. स्टालिनला वाटत होते का, या दोघानांहि आपण आता पूर्णपणें जिंकलें आहे; ते ट्रॉट्स्कीला जाऊन मिळू शकत नाहींत "ट्रॉटस्कीवादाला बोल्शेव्हिक पक्षांत एखादें कायदेशीर स्थान आहे असें जे म्हणत असतील, ते स्वतःच मुळीं बोल्शेव्हिक नव्हेत–" १९२५ मध्यें झिनोव्हीफनें उच्च स्वरात केलेली ही घोषणा होती "पक्षाच्या विरुद्ध जें जें म्हणून काहीं आहे त्याचें चिन्ह ट्रॉट्स्की या बोल्शेव्हिझम्–विरोधाच्या साथीला आळा घालण्यासाठीं आपण सर्व उपायांचा अवलंब केला पाहिजे–" जवळ जवळ त्याच सुमाराला कामनेव्हनें झिनोव्हीफची री ओढली होती, त्यातील हे

उद्गार; यावरूनच स्टालिननें आपला कयास बांधला होता

तथापि ते ट्रॉट्स्कीकडे झुकू लागले. पण झिनोव्हीफ व कामनेव्ह याची ही धडपड व्यर्थ ठरली. त्याना उचलून धरणारे लोक हळूहळू त्याना सोडून जाऊ लागले. स्वतः स्टालिन तर तरुणाच्या गळ्यातला ताईत बनला होता. तो कॉलर वापरीत नसे, आणि अधिकारपदावर स्थानापन्न झाला तरी एखाद्या साध्या कामकऱ्यासारखी त्याची राहाणी होती. या साधे-पणाचा परिणाम साहजिकच लोकावर होऊन त्याची लोकप्रियता वाढीला लागली.

झिनोव्हीफ व कामनेव्ह यांनी मॉस्को–पक्षाचा मुख्य म्हणून अग्लीएनॉ-फचें नाव सुचविलें स्टालिननें लगेच त्यांच्या म्हणण्याला रुकार दिला ही जोडगोळी मनात मांडे खात होती कीं अग्लीएनॉफ आपला माणूस आहे; पण वस्तुतः तो स्टालिनचाच हस्तक होता त्यामुळें दोघेहि चागलेच तोंड-घशी पडले त्यानंतर हळूहळू त्याचे शिल्लक असलेलें थोडेबहुत तेजहि फिकें पडत चाललें.

ट्रॉट्स्कीला जानेवारीमध्यें सेनापतिपदावरून दूर केल्यापासून मेपर्यंत तो रिकामाच होता. जानेवारींत त्याच्या हातून सैन्य काढून घेण्यात आलें तरी त्याने त्या वेळीं कांही प्रतिकार केला नव्हता स्टालिननें त्याला जसजसा चेपीत नेला, तसतसा तो, कुरकुरत का होईना, चेपला गेला. त्याला नतर कन्सेशन्स बोर्डाचे अध्यक्षपद देऊ केलें. ट्रॉट्स्कीनें चटकन् त्याचा स्वीकार केला 'ट्रॉट्स्कीचे मन आतरराष्ट्रीय होतें' स्टीफन म्हणतो, आणि त्यामुळें त्याला तें काम योग्य असेंच मिळालें. हें परराष्ट्रीय संबधाचें खातें त्याच्या हातीं आल्यापासून त्यानें आपल्यासारखी आतरराष्ट्रीय मनो-वृत्तीची माणसें आपल्याभोंवती जमविली. त्यात रॅकोव्हस्की नि क्रॅसीन हे प्रमुख होते.

कामनेव्ह नि झिनोव्हीफ हेहि कट्टे आतरराष्ट्रीयवादी परतु स्टालिन मात्र त्यात मोडत नव्हता स्टालिनचे तत्कालीन धोरण रशियाची पुन-र्घटना, देशातील अतर्गत सुधारणा नि शेतीविषयक प्रगति यावरच विशेष

आधारलेलें होतें. कामनेव्ह व झिनोव्हीफ यांनी आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञानाने भरलेलीं पल्लेदार भाषणें करून विरोधी पक्षाला नामोहरम करण्याचा प्रयत्न सुरू केला पण त्यांत ते फारसे यशस्वी ठरूं शकले नाहींत उलट त्यांच्या या भाषणाचा स्टालिननेंच चांगला उपयोग करून घेतला नि आपल्या अनुयायांची नि साहाय्यकांची संख्या वाढविली अखेर कामनेफ व झिनोव्हीफ यांनी स्टालिनच्या वैयक्तिक राजकीय कार्यक्रमास उघड विरोध करण्यास सुरवात करतांच स्टालिननें आपल्या बहुसंख्य अनुयायांच्या जोरावर त्यांची अधिकारपदावरून उचलबांगडी करण्याचें ठरविलें पोलिटब्यूरोमधील त्यांचें बहुमत नष्ट झालें होतें नि पक्षांतहि त्यांना कोणी विचारीनासें झालें होतें १९२५ च्या शरदृतूंत झिनोव्हीफ व कामनेव्ह यांना अधिकारपदावरून काढून टाकण्यांत आलें.

चौदावी कॉंग्रेस स्टालिनने बोलाविली होती. त्या प्रसंगीं स्टालिननें आपल्या पाठीशीं इतकी प्रचंड शक्ति उभी केली होती कीं, तो मनांत आणता तर तेव्हांच ट्रॉट्स्कीला पक्षांतून हाकून लावूं शकता पण अजून ती वेळ आली नव्हती. रानांतील गवत चांगलें वाळून तापलें म्हणजेच वणवा लावणें अधिक श्रेयस्कर असतें ! स्टालिनला त्याची जाणीव होती. पण त्यानें या अपरिहार्य विलंबाचाहि उपयोग आपल्याला अनुकूल असा करून घेण्याचें ठरविलें कामनेव्ह व झिनोव्हीफ यांनी ट्रॉट्स्कीची अधिकारावरून हाकलपट्टी करण्याबद्दल आपल्यामागें लकडा लावला आहे असें सांगून तो आपल्या भाईंना म्हणाला,"पण, भाई हो ! कामनेव्ह नि झिनोव्हिफ यांची ही मागणी आपण मान्य करूं शकत नाहीं कारण आपण जाणतोंच कीं, पक्षांतून सभासदांना काढून टाकण्याचें धोरण धोक्याचें असतें हाकलपट्टीची पद्धति—रक्तपाताची पद्धति—कारण त्यांची रक्ताचीच मागणी होती !—(यांत स्टालिन ट्रॉट्स्कीचा मृत्युच सूचित करीत नाहीं काय ?) ही भयंकर नि सांथीप्रमाणें फैलावणारी आहे. आज आपण एकाला काढून टाकूं, उद्यां दुसरा, परवा तिसरा, आणि मग पक्षामध्यें शिल्लक तरी काय राहणार ?" हा मानभावीपणा दाखविण्याचें कारण म्हणजे तत्कालीन

अनिश्चित परिस्थिति. स्टालिन आपल्या विरोधकाशीं त्या काळीं अगदीं सावधगिरीनें वागत होता पक्षातून सभासदाची हाकलपट्टी करणें हें त्या वेळीं धोक्याचें ठरलें असतें ही जाणीव त्याला होती. या वेळीं त्यानें आपलें साहसी, अविवेकी मन व 'घे सुरी नि घाल उरी' ( अर्थात् दुसऱ्याच्या ) ही आततायी वृत्ति आवरून धरली होती. तो अधिऱ्या मनोवृत्तीचा नाहीं, परंतु एकदां त्याचा निर्णय ठरला म्हणजे मात्र त्याच्या बजावर्णात त्याजकडून कसूर व्हायची नाहीं !

लवकरच शक्य ती जवळची संधि साधून स्टालिननें ट्रॉटस्कीला राज्य-कारभाराच्या क्षेत्रातून कायमचे सीमापार केलें. कामनेव्ह व झिनोव्हिफ हीं दोन वटवाघळी वृत्तीचीं माणसें अद्यापि अधिकारपदाची हाव धरून अधेमधे लुडबुडत होतीं. स्टालिनपेक्षा ट्रॉट्स्कीची योग्यता अधिक आहे असा त्याचा ठाम विश्वास होता. म्हणून स्टालिनलाच उडविण्याच्या उद्योगाला ते लागले. ट्रॉट्स्की अद्यापि आजारीच होता. कोणी म्हणतात त्याचा हा 'राजकीय आजार' होता. पण तो हवापालट करण्यासाठीं अधिक गरम हवामानाच्या व सुरक्षित स्थानीं गेला हें खरें त्यामुळे ट्रॉट्स्कीवर विश्वासून बसण्यात आता अर्थ नाहीं असें दिसून आल्यानें ही जोडगोळी स्टालिन-च्याच पायाशीं परतली त्यांनीं पदर पसरून क्षमायाचना केली नि पश्चा-त्तापाचे सुस्कारे टाकले ! स्टालिन त्याना पूर्णपणें ओळखून होता. तथापि त्यानें त्यांना क्षमा केल्याचें सांगितलें, पण त्याना अधिकारावर मात्र घेण्यात आलें नाही.

१९२६ साल सुरु होताच ट्रॉट्स्की हवापालटासाठी व निष्णात डॉक्ट-रचा सल्ला घेण्यासाठीं जर्मनीला जाण्याचा विचार करु लागला. ऑगप्यूनें[1] त्याच्या परदेशगमनाला अडथळा करण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्याला न जुमानता ट्रॉट्स्की जर्मनींत निघून गेला तेथे त्याच्या घशातील गाठीवर शस्त्रक्रिया करण्यात आली. परंतु तरीहि त्याचा ताप थांबेना तथापि तो रशियाला परतला. काहीं तरी योजना ठरवूनच

---

१ G P U. सोव्हिएट रशियाचें स्टालिननिर्मित गुप्तहेर खातें.

तो स्वदेशी आला असावा. कारण रशियात पाऊल ठेवताच त्याने राजकीय क्षेत्रात ढवळाढवळ करण्याचे प्रयत्न सुरू केले.

१९२६ मधील मे महिन्याच्या सार्वत्रिक संपाचे अखेरीला ब्रिटिश ट्रेड युनियन कॉंग्रेसनें अंगिकारलेलें धोरण ट्रॉट्स्कीला पसत पडलें नाहीं. ब्रिटिश ट्रे. यु. कॉं. शी असलेले आपले संबंध रशियन कम्युनिस्टांनी आता तोडलेच पाहिजेत असें तो आग्रहपूर्वक म्हणू लागला. झिनोव्हीफची पुनः चलबिचल होऊन तो ट्रॉट्स्कीकडे वळला. ट्रॉट्स्कीपंथीयांनीं स्टालिन-विरोधी मोहिमेला पुनश्च तोंड पाडलें. त्यांच्या गुप्त सभा भरू लागल्या. पक्षातच एक स्वतंत्र उपपक्ष निर्माण होण्याची चिन्हें दिसू लागली. कामगारांच्या मजुरीत वाढ व गरीब शेतकऱ्यावरील कराचा बोजा कमी करणें ह्या दोन घोषणा करून, त्यांनीं आपल्या पक्षाला बहुजनसमाजाचा जोरदार पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. पक्षभेद उघडपणें स्पष्ट होऊ लागले. स्टालिनहि कांहीं डोळे मिटून स्वस्थ बसला नव्हता, पण तो या विरोधकांना चेंचण्याची योग्य संधि पाहात असल्यानें वरून शांत दिसत होता इतकेंच !

## युद्धाला उघड प्रारंभ

स्टालिन आपल्या पक्षाची बळकटी वाढवीत होता. विरोधी गटावर मात करण्याइतके सामर्थ्य आता आपल्या पक्षात निर्माण झालें आहे असें दिसून येताच त्यानें १९२६ च्या ऑक्टोबरात विरोधी गटाशी उघड युद्ध पुकारून त्याला शरण येण्यास भाग पाडलें.

तथापि ट्रॉट्स्की अद्यापि पूर्ण निराश झाला नव्हता. कोणत्या तरी भावी घटनेकडे दृष्टि लावून तो वाट पाहात बसला होता. तो काळ चिनी राज्यक्रांतीचा होता. बुखारीन नि हिंदुस्थानातील भाई रॉय हे दोघेजण चीनमधील समाजसत्तावादी लढा लढवीत होते तेथील परिस्थिति बरीच बिकट झाली होती. अशा वेळा स्टालिनने त्या प्रकरणात हात घातला. त्याच्या सूचनेनुसार चीनमधील कम्युनिस्टांनी मा. चँग-कै–शेक या चीनच्या सेनापतीशीं ऐक्य केलें. ट्रॉट्स्कीनें या मध्यस्थीबद्दल स्टालिनविरुद्ध काहूर

उठवून स्टालिननें चॅंगशी मैत्री करण्यात घोडचूक केली असें प्रतिपादण्यास सुरवात केली. त्याच्या या कृत्यानें चिनी कामगारवर्गाचा घात झाला, असें त्याचें म्हणणें होतें. या नव्या भानगडीमुळे रशियातील लोकमत स्टालिनविरुद्ध थोडेसें खवळून उठलेंहि होतें, परंतु या असंतोषाचा योग्य तो उपयोग ट्रॉट्स्की करून घेऊं शकला नाहीं. आलेली सुसंधि गमावण्याचा हा ट्रॉट्स्कीचा नेहमाचाच दोष होता !

चालू परिस्थितींत जरा कोठें बदल होतो असें दिसलें कीं कामनेव्ह नि झिनोव्हीफ या जोडगोळीची धावपळ सुरू व्हावयाची हे जवळजवळ आता ठरून गेल्यासारखेंच होते कोडग्या माणसाप्रमाणें त्याचें वर्तन झालें होतें या वेळींहि चिनी राज्यक्रान्तींत स्टालिनने केलेला हस्तक्षेप दुष्परिणामी व अयोग्य आहे या भूमिकेवरून त्याच्याविरुद्ध उठविण्यात आलेली असंतोषाची लाट पहाताच ही जोडगोळी दुरळली ती विरोधी पक्षाला जाऊन मिळाली. चळवळीला जरा स्वरूप येऊं लागलें. कामगार वर्गावर होणारी दडपशाही नि शेतकऱ्यावर केला जाणारा जुलूम यामुळें त्या दोन्ही वर्गांत नव्या राजवटीविषयी असंतोषाचा अग्नि धुमसू लागला होता, ट्रॉट्स्की व झिनोव्हीफ यांना प्रकट रीतीनें सहानुभूति दाखविण्यासाठी कामगाराच्या मिरवणुकी रस्तोरस्तीं दिसू लागल्या असंतुष्ट शेतकऱ्यांनी ट्रॉट्स्कीविषयीं आपुलकी दर्शविणारी वृत्ति उघडपणे जनतेसमोर स्पष्ट केली हे प्रकार वारंवार होऊं लागले ह्या प्रकारापैकीं एक म्हणजे ' पहिली गिरणी–कामगाराची मिरवणूक ' लेनिनग्राड शहरात निघाली. त्याचें पुढारीपण झिनोव्हीफनें स्वीकारलें होतें. म्हणून त्या वेळेपासून वृत्तपत्रांनी त्याला ' लेनिनग्राडिस्ट ' (लेनिनग्राडवाला) असें नाव देण्यास सुरवात केली १९२७ च्या ऑक्टोबरमधील ही गोष्ट त्यानंतर लगेच बोल्शेव्हिक राज्यक्रान्तीचा दहावा स्मृतिदिन येत होता त्या वेळीं मॉस्को शहरात लेनिनग्राडमधील प्रकाराचीच पुनरावृत्ति करण्यात आली. लेनिनग्राड येथे झिनोव्हीफला जो पुढाकार मिळाला, त्यामुळें स्वारी चढून गेली होती. त्यानें स्टालिनविरोधास उघडपणें प्रारंभ केला नि मोठ्या

उत्साहानें तो चळवळीचा जोर वाढविण्याचा प्रयत्न करूं लागला. पण या त्याच्या उत्साहाला ट्रॉट्स्कीनेंच विरजण घातलें. स्टीफन ग्रॅहॅमच्या मताप्रमाणे अशा प्रकट प्रदर्शनाला ट्रॉट्स्की भीत असल्याने त्यानें झिनो-व्हीफच्या कृत्याला नापसती दर्शविली.

लेनिनग्राडनतर मॉस्को येथें जे विरोधनिदर्शन झालें, त्या प्रसगीं जमलेल्या जनसमुदायाला वाईट रीतीनें वागविण्यात आलें ट्रॉट्स्कीच्या मोटारीवर गोळ्या झाडण्यात आल्या कोणीतरी हातांत कुऱ्हाड घेऊन त्याच्या मोटारीच्या पायरीवर झेप घेतली नि मोटारीच्या 'विंडस्कीन 'ची नासधूस केली. या वेळींच ट्रॉट्स्की समजून चुकला असावा कीं, आपण स्वतः नि आपले साहाय्यक यांची यापुढें धडगत नाहीं कदाचित् रक्तपातानेंहि आपल्या विरोधनिदर्शनाचा बदला घेतला जाईल ! त्यामुळें त्याने नोव्हेंबर महिन्यातच आपल्या साहाय्यकाना नि अनुयायाना कळविले कीं, यापुढे मोठ्या प्रमाणावरील प्रकट सभा भरविल्या जाऊ नयेत. त्या काळच्या ट्रॉट्स्कीच्या मन.स्थितीचें वर्णन स्टीफन ग्रॅहमनें केलें आहे:—"He was frightened by the extent of his turbulent success '" या अनपेक्षित विजयाच्या महापुराने तो पुरा गोंधळून गेला होता !

पण स्टालिनची सिद्धता आता पुरी झाली कोणत्याहि तऱ्हेच्या नि शक्तीच्या विरोधाला तोंड देण्यास तो सज्ज झाला होता. त्यामुळें त्याने नोव्हेंबर सपताच्च बरेच दिवस मनाशीं ठरविलेली गोष्ट फाडादिशीं करून टाकली त्याने ट्रॉट्स्कीला पक्षातून हाकून लाविलें ! झिनोव्हीफने क्षणाचाहि विलंब न लावता स्टालिनला शरणागति दिली डिसेंबरमध्ये पक्षाची पध-रावी वार्षिक परिषद भरली होती या अधिवेशनात ट्रॉट्स्की--गटाला पूर्णत. बाहेर हाकलण्याचें कार्य स्टालिनने यशस्वी केल. ट्रॉट्स्कीवाद्याचा गट यापुढें 'क्रान्तीचा शत्रु ' म्हणून समजण्यात येऊन ओगप्यूच्या करड्या निमन्त्रणाखाली त्याचें नावच फक्त जिवत राहिलें

## ट्रॉट्स्की कां हरला ?

वस्तुत. या प्रसंगीं स्टालिनच्या आज्ञेनें ट्रॉट्स्की एखाद्या सोव्हिएट

बदुकीचें भक्ष्य ठरावयाचा; पण स्टालिननें थोडा विवेक केला कारण अद्यापि ट्रॉट्स्कीचा अनुयायी गण विचारात घेण्याइतका मोठा होता. त्यामुळें परलोकाऐवजीं रशियन मध्य आशियातील एका दूरच्या प्रदेशात त्याची पाठवणी करण्यात आली. जिवावर आलें होतें तें अशा रीतीनें फक्त सीमापारीवरच निभावलें ! पण ट्रॉट्स्की मध्य आशियात काय अगर जर्मनीमारख्या दुसऱ्याहि कोणत्या लांबवरच्या देशात गेला तरी त्याच्या मागचा ऑगप्यूचा ससेमिरा चुकण्यासारखा नव्हता. ते त्याच्यामागे अगदी सावलीसारखे असत. ट्रॉट्स्की निर्वासित झाल्यानंतरहि हे ऑगप्यूचे हस्तक त्याच्या पाठीशीं हात धुवून लागले होते. सीमापारीची शिक्षा ऐकून आपल्या निवासस्थानीं ट्रॉट्स्की येऊन पोहोंचतो आहे नाहीं तोंच ऑगप्यूचे पहारेकरी त्याच्या दाराशीं दत्त म्हणून उपस्थित ! ट्रॉट्स्कीनें या वेळीं थोडा हट्ट करून पाहिला. त्यानें प्रथम कपडेच घालण्याचें नाकारलें. परतु अखेर ऑगप्यूच्या पोलिसांनीच स्वतः त्याच्या अगावर कपडे चढविले, त्याचे पाय बुटात कोंबले. त्याना या गोष्टी बळजोरीनें कराव्या लागल्या. ट्रॉट्स्कीला अजून आशा होती कीं, आपल्याला सहानुभूति दाखविण्यासाठीं जनतेकडून काहींतरी लहानमोठा प्रकार घडेल नि कदाचित् स्टेशनवर पोहोंचेपर्यंत आपले साहाय्यक आपली सुटकाहि करितील. परतु ऑगप्यूच्या लोकानीं ही शका त्याच्या अगोदरच घेतली असल्याने त्यानीं ट्रॉट्स्कीच्या निर्गमनाची नक्की वेळ त्याला नि त्याच्याविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्यानाहि चुकीचीच कळवून दिली. सांगितलेली वेळ बरोबर टाळून पोलिसानीं ट्रॉट्स्कीला स्टेशनवर नेला रस्त्यातील जमावाच्या तें लक्षातहि आलें नाहीं आणि अगदी सहज रीतीनें, कसलीहि भानगड, गडबड उपस्थित होऊं न देता स्टालिनच्या करड्या आज्ञेनुसार 'भाई' लिऑं ट्रॉट्स्की या क्रांतिवीराला मॉस्कोपासून २००० मैल दूर हाकून लाविण्यात आलें. १९२८ च्या जानेवारीत घडलेल्या या घटनेचा परिणाम तत्कालीन सोव्हिएट राजकारणावर काहीं विशेष झालेला दिसत नाहीं. या वेळीं ट्रॉट्स्कीप्रमाणेंच त्याच्या शेकडो सहकाऱ्याची सैबेरियांत पाठवणी झाली.

निर्वासनाच्या पहिल्या वर्षात ट्रॉट्स्कीनें आपल्या इष्टमित्राशीं खूप मोठा

पत्रव्यवहार चालू ठेविला होता. ट्रॉट्स्की निर्वासित होता तरी रशियातील विरोधी पक्षाचें नेतृत्व त्याच्याचकडे होतें. आपल्या पक्षाला सल्लामसलत देणें व प्रसंगीं त्याच्या वाढीला उत्साह पुरविणें व चालना देण याहि गोष्टी तो आपल्या नव्या निवासस्थानीं बसल्या बसल्या करीत होता, परंतु लवकरच स्टालिनच्या आज्ञेवरून त्याच्या नावावर जाणारें व येणारें सर्व टपाल सरकारनें अडविण्यास सुरवात केली

डिसेंबरमध्यें ऑगप्यूचा एक हस्तक ट्रॉट्स्कीकडे धाडण्यात आला त्यानें ट्रॉट्स्कीची भेट घेऊन त्याच्यापुढें दोन गोष्टी मांडल्या. एक तर त्यानें रशियातील विरोधी पक्षाचें नेतृत्व सोडून त्याच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध यापुढें ठेवू नये; अगर तसे करावयाचें असेल तर सोव्हिएट सरकार योग्य तो इलाज करून त्याचें राजकीय जीवनातील स्थानच पूर्णत' नष्ट करून टाकील. पण ट्रॉट्स्कीनें त्याची थट्टा केली. या धमकींत कांहींच अर्थ नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें असल्यास नवल नाहीं. राजधानीपासून ३००० मैल दूर अशा ठिकाणीं हाकून लावलेल्या नि पत्रव्यवहारालाहि बंदी केलेल्या इसमाचें राजकीय जीवन नष्ट करावयाचें ते यापेक्षा काय राहिलें होतें! ट्रॉट्स्कीनें त्या ऑगप्यूच्या माणसाला 'तुझा निरोप तोंडी आलेला आहे, तेव्हा मी कांहींहि उत्तर देऊं इच्छित नाहीं.' असे सांगून धुडकावून लावलें. ऑगप्यूकडून लेखी निरोप आला तर त्याला आपण खलिता पाठवून उत्तर देऊं असेंहि तो म्हणाला त्याच वेळीं त्यानें आपल्या तत्कालीन स्थितीचें वर्णन करणारें पत्र मध्यवर्ति समितीला पाठविण्यासाठीं तयार केलें. परंतु ऑगप्यू-हस्तकानें ते नेण्याचें नाकारलें. अखेर तें एका जासुदाकरवीं धाडण्यात आलें.

ऑगप्यूच्या हस्तकाचे त्याच्याकडून उत्तर मिळविण्याचे प्रयत्न त्यानंतरहि कांहीं दिवस चालू होते, पण ट्रॉट्स्कीनें दाद दिली नाहीं त्या ऑगप्यूच्या हस्तकानें एक महिना वाट पाहिली शेवटीं महिना उलटून गेला नि एक दिवस ट्रॉट्स्कीच्या राहत्या घराला ऑगप्यूच्या सशस्त्र पोलिसांचा गराडा पडला. यु. एस्. एस्. आर. च्या सीमेबाहेर ट्रॉट्स्कीला हाकलून देण्याची आज्ञा मॉस्कोहून आली होती, तिची बजावणी करण्यासाठीं हे

पोलीस आले होते. या संकटातून ट्रॉट्स्कीची सोडवणूक करण्यासाठीं त्या वेळीं कोणी पुढे आलेला दिसत नाहीं १९२९ च्या १२ फेब्रुवारीला या दुर्दैवी क्रांतिवीराला युरोपीय तुर्कस्थानात निःसहाय होऊन पडावें लागलें. या ठिकाणाहून त्याने इंग्लंड, फ्रान्स अगर अमेरिका या देशात अशांतता उत्पन्न करण्याचा प्रयत्न करून पाहिला तोहि निष्फळ ठरला. तेथून त्याच्या कमनशिबाने त्याला अनेक देशातून नि खंडातून हिंडविलें नार्वेत गेला, तेथून हाकलपट्टी झाली काहीं दिवस भटकल्यानंतर तो मेक्सिकोत जाऊन राहिला. इतिहासजमा व्यक्तींत त्याची गणना लोक करू लागले. तथापि त्यानें चौथी आंतरराष्ट्रीय परिषद् स्थापून स्टालिनच्या उच्चाटनाचे प्रयत्न तेथेहि सुरू केले

लेनिन फिनलंडमध्यें अज्ञातवासात असता स्टालिनने काहीं विशेष कार्य केले असें नव्हे परंतु ट्रॉट्स्कीहि घडणाऱ्या प्रसंगाकडे आश्चर्यभूतपणें पाहात बसण्यापेक्षा अधिक काहीं करू शकलेला नाहीं ट्रॉट्स्की प्रभावी वक्ता होता कामगारांचीं, सैनिकांचीं नि शेतकऱ्यांचीं अंतःकरणें वक्तृत्वाच्या अफाट ओघात आपल्या बरोबर खेचून नेण्याचें सामर्थ्य त्याच्या वाणींत होतें. त्याच्या ठिकाणी कर्तृत्वहि नव्हतें असें नाहीं. तो कुशल सेनापति होता रशियन सोव्हिएटवरील परचक्र नि यादवीचें संकट नष्ट करण्याच्या कार्यांत त्याच्या कुशल रणपांडित्याचा भरपूर वाटा आहे.—पण तो जगत्क्रांतीच्या मृगजळामागे धावू लागला नि फसला! लेनिनचें शिष्यत्व असें त्यानें कधींच पत्करल्याचे दिसत नाहीं लेनिनविषयीं त्याला गाढ आदर होता, हें निःसंशय, परंतु आवश्यक तेथें त्याने लेनिनलाहि विरोध केलेला आहे या उलट स्टालिनच्या आयुष्यात अशी एकहि घटना घडल्याचे ऐकिवात नाही कीं, जींत त्याने लेनिनशीं विरोध मांडला. प्रसंगीं सागकाच्या वृत्तीनेंहि स्टालिन लेनिनशीं वागला. आणि या त्याच्या एकनिष्ठतेचा ( कदाचित् ती दिखाऊहि असेल ) योग्य तो उपयोग लेनिनच्या पश्चात् तो करून घेऊ शकला.

जर ट्रॉट्स्कीनें आपली जगत्क्रान्तीची कल्पना लोकांपुढें आस्तेकदम मांडली असती तर तो कदाचित् अधिकारपदावर येऊन काहीं अधिक

कालपर्यंत तरी टिकता परंतु अखिल विश्वातील मजुरांसाठी काही आपल्याला करावयाचें असतें ही कल्पनाच त्या बिचाऱ्या रशियन कामगारांच्या गळीं उतरेना ! अर्थातच त्यांनीं ट्रॉट्स्कीची पाठ सोडली. जुलुमी भांडवलशाहीच्या नि क्रूर झारशाहीच्या छळातून मुक्त होण्यासाठी रशियातील खालच्या वर्गांनी क्रान्तीच्या वेळीं ट्रॉट्स्कीला मदत केली, परंतु पुढे तो जेव्हा जागतिक क्रान्तीची अगडबंब भाषा बोलू लागला, तेव्हा साहजिकच त्या वर्गाचा त्याच्यावरील विश्वास उडाला, शिवाय थोडेसें डोकें वर निघाल्यानें त्याची गरजहि तात्पुरती भागल्यासारखी झाली होती.

**' मला सबबी सांगावयाच्या नाहींत '**

स्टालिननें लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणाचा ('नेप') पाठपुरावा केला, कारण रशियावरील आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीची पकड अद्यापि ढिली झालेली नव्हती समाजवादी स्वरूपाच्या कारखान्याना लागणारें भांडवल व मनुष्यबळ त्या वेळीं रशियापाशी नव्हते अर्थातच जनतेला स्टालिनविषयीं थोडा थोडा विश्वास उत्पन्न होऊं लागून ती त्याच्या बाजूला वळली

स्टालिनच्या हातीं 'पक्षाची'च सरचिटणीशी येताच त्यानें अत्यंत कौशल्यानें सत्तेचें आक्रमण कसें केलें हें मागील प्रकरणात आलेलेंच आहे. ते आक्रमण ट्रॉट्स्की ओळखू शकला नाही तो तितका धूर्त नव्हता किंबहुना ट्रॉट्स्कीला 'एक साधा शिपाई गडी ' असेंच काहींनीं संबोधले आहे. अर्थातच अशा छक्केपंजे न जाणणाऱ्या माणसाची डाळ महापाताळयंत्री नि कारस्थानी स्टालिनपुढें शिजली नाहीं, यांत काय नवल ?

ट्रॉट्स्की देशोधडीला लागला-रशियातून सीमापार झाला, तेव्हाच वस्तुत त्याच्या राजकीय जीवनाचा अंत झाला आता तो पुनश्च अधिकारावर येईल, फार काय स्टालिन सर्वाधिकारी असेपर्यंत रशियात जिवंत परतू शकेल याचा सुतराम् संभव कोणाला दिसत नव्हता ट्रॉट्स्की निर्वासित होता, तरी त्याच्या पाठीमागचा ऑगप्यूचा ससेमिरा संपलेला नव्हता आणि असें म्हणतात कीं, अखेर त्यांनींच त्याचा बळी घेतला स्वत ट्रॉट्स्कीनेंहि ' ऑगप्यूच्याच हस्तकाकरवी माझा मृत्यु घडला ' असे उद्गार

अल्प समयी काढले आहेत. नाझींचा किंवा फॅसिस्टांचा हात या कृष्णकृत्या-मागें असावा हे म्हणणें मात्र मुळीच पटण्यासारखें नाहीं.

ट्रॉट्स्की जगाच्या डोळ्याआड झाला. क्रांतीनेंच त्याला खाऊन टाकलें! पण, म्हणून त्याच्या कर्तृत्वगारीला मालिन्य येण्याची शक्यता नाही. क्रांती-साठी त्याने जें महान् तप केले नि शरीर झिजविलें त्याचें चीज झालें नसलें तरी त्यातील श्रेयाचा योग्य तो वाटा त्याच्या नावावर लिहिणे इतिहासाला भागच आहे. ट्रॉट्स्कीचें अमोघ वक्तृत्व, अलौकिक लेखनपटुता, कुशल सेनानेतृत्व, यशस्वी संघटनचातुर्य या गुणांचे तेज त्याच्या चरित्रावर निःसंशय आहे. परंतु आंतरराष्ट्रीय क्रांतीचें तत्त्वज्ञान मुळातच गंधर्वनगरींतील कल्पनारम्य प्रासादासारखें असल्यामुळें तग धरणें शक्य नव्हतें. तसेंच ट्रॉट्स्कीच्या पराभववादामुळें किंवा विध्वंसवादामुळेंहि त्यानें जगातील आपल्या-विषयींची सहानुभूति गमावली तो मरताना मात्र म्हणाला, " मित्र हो, असेच पुढें चला. चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचें कार्य पुढे नेण्याचें दायित्व तुम्हांच पार पाडले पाहिजे. "

ट्रॉट्स्कीची मतें कशीहि असली तरी तो एक महान् कर्तृत्वशाली नेता नि प्रामाणिक ध्येयनिष्ठ कार्यकर्ता होता, एवढें कोणीहि मान्य करील असें वाटतें आपल्याला अपयश का आलें या प्रश्नाचे विवेचन करिताना त्यानें स्वच्छच सांगून टाकिलें आहे की, ' मला त्यासंबंधी कसल्याच सबबी सांगावयाच्या नाहींत. ' परंतु व्यक्तिगत द्वंद्वापेक्षाहि हा दोन परस्परविरोधी परंतु सहोदर तत्त्वपथांचा लढा होता, हे लक्षात घ्यावयास पाहिजे या झगड्यात स्टालिनचा एकराष्ट्रीय क्रांतिवाद नि ट्रॉट्स्कीचा आंतरराष्ट्रीय स्थिरक्रांतिवाद असे दोन पक्ष मांडत होते त्यात अखेर स्टालिनचा एक-राष्ट्रीय क्रांतिवाद प्रभावी ठरून त्याने आंतरराष्ट्रीयवादी सांप्रदायाचें निदान रशियातून तरी समूळ उच्चाटन केलें. इतरत्र या सांप्रदायानें कोठें फारसें मूळच धरलें नसल्याने त्याच्याशी झगडून तें उखडण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. ट्रॉट्स्की–सांप्रदायाचे जर काहीं मोडकेतोडके अवशेष अद्यापि जीव धरून असतील तर त्यांचेंहि आयुष्य ट्रॉट्स्कीच्या मृत्यूबरोबरच भरलें असें निःशंक समजावें ट्रॉट्स्कीनें स्थापिलेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या

चळवळीचें जीवनहि ट्रॉट्स्की स्वत बरोबरच घेऊन गेला आहे!

'कसेहि करून आपण राहात असलेल्या देशाचा युद्धात पराजय झाला पाहिजे' या विचित्र विचारसरणीचे जे कांहीं लक्षात न येण्यासारखे अनुयायी जगावर वावरत आहेत, त्यांची नक्की मोजदाद आजच्या क्षणी करणे अवघड दिसतें. परतु फ्रान्ससारख्या बलाढ्य राष्ट्राचा फक्त अकरा दिवसात पराभव व्हावा नि त्याला नाझी सत्तेपुढें दातीं तृण धरून शरण जावें लागावें, या घटनेमागें उपरोक्त 'विघ्नसतोषी' चळवळ्याचाच हात असावा असें खात्रीपूर्वक वाटते. असे विघ्नसतोषी लोकच देशातील कारखान्यात स्फोट घडवून आणणें, युद्धसाहित्याचे उत्पादन बद पाडणें किंवा त्याचा नाश करणे असलीं विध्वसक कार्यें करीत असले पाहिजेत. 'सबोताज' म्हणून जो प्रकार प्रचलित युद्धतत्रात रूढ आहे त्याचे प्रवर्तक याच पथातील.

या ट्रॉट्स्की-पथासबधी लिहिताना १९३७ जून मध्ये कोणा एका फ्रेंच कर्नलने जें भविष्य वर्तवून ठेविलें आहे, तें नुसतें आपलें ऐकून ठेवावें त्यानें लिहिलें आहे. "रशियातील समाजवादी क्रांति नष्ट होऊन तेथें साम्राज्यशाहीचा नगा नाच सुरू होईल, नि त्यामुळें अर्थातच जगातील कामगाराचा रशियन राजवटीवरील विश्वास उडून जाईल. किंवा रशियांत कांहीं काळानतर प्रतिक्रांति घडून सारी सत्ता पुनश्च धनिक वर्गाचे हातीं जाईल आणि तेथील सोव्हिएट राज्ययत्र धुळीला मिळेल. साहजिकच याचा परिणाम कामगाराच्या असतोषात नि तदुद्भूत सार्वत्रिक उठावात होईल. म्हणजे पर्यायानें कांहीं झालें तरी तिसऱ्या आतरराष्ट्रीय परिषदेला मूठमाती मिळून चौथी आंतरराष्ट्रीय परिषद म्हणजे ट्रॉट्स्की-पथ हाच काय तो जगांतील एकमेव क्रांतिपक्ष शिल्लक उरेल अर्थातच तिसऱ्या आतरराष्ट्रीय परिषदेचें स्थान रिकामे पडून त्या जागीं चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची प्रस्थापना अपरिहार्यच ठरेल."

आशावाद ठीक आहे ! आशा सफल होतील कीं नाहीं हाच वाद राहील !

# पंचवार्षिक योजनांचें अरिष्ट

१९२० अखेर सोव्हिएट रशियाविरुद्ध उठलेली परचक्राची वावटळ हळूहळू शांत होऊं लागली हें परचक्र होतें असें म्हटलें तरी त्यांत याद-वीचाहि भाग नव्हता असें नव्हे फरक इतकाच कीं, ही यादवी परकीयांच्या स्वारीला पूरक ठरली त्यामुळें या युद्धाला 'यादवी' हें नाव देतां येत नाहीं तथापि या अरिष्टाला तोंड देण्यासाठीं लेनिननें उपयोगांत आणलेले उपाय यादवी नष्ट करण्यासाठींच अधिक प्रमाणांत होते. लेनिनच्या पाठी-मागे लष्करी यंत्राचें पाठबळ उभें होतें त्यामुळें कोणतीही कडक उपाय-योजना करून आपल्याला इष्ट तसा कारभार घडवून आणणें त्याला कांहीं काळ शक्य झालें त्याप्रमाणें लेनिननें खाजगी व्यापार बंद केला. शेत-कऱ्यांपाशीं गरजेपेक्षा अधिक असलेलें धान्य ठराविक किंमत देऊन सर-कारच्या ताब्यांत घेतलें व बरेच कारखाने राष्ट्रीय मालकीचे केले या नव्या धोरणाला 'लष्करी समाजसत्तावाद' ( War Communism ) असें नाव आहे. युद्ध संपेपर्यंत हें लष्करी समाजसत्तावादी धोरण चालू होतें.

यादवीची कमान चढू लागली नि परराष्ट्राच्या रशियाविरोधी हालचालींचा जोर वाढू लागला, तेव्हा देशांतील कारखानदारहि क्रांतिविरोधी बनून शत्रूला जाऊन मिळू लागले अर्थात्च हा प्रकार भयकर धोक्याचा होता. त्यामुळें १९१८ च्या जून अखेरीला सोव्हिएट सरकारच्या एका वटहुकुमान्वयें ४०००० कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करून टाकण्यात आले. तथापि देशातील कांहीं कारखाने व खाणी यावर अद्यापि कारखानदाराची खाजगी मालकी कायम राखण्यात आली होती. परतु धान्याच्या तुटवड्यामुळें शहरातील कामगार कामे सोडून खेड्यातील आपापल्या शेतीवर जाऊ लागल्यानें मजुराच्या अभावीं हेहि कारखाने हळुहळू बद पडू लागले. बर, शेतावर उदरनिर्वाहासाठी परतलेले कामगार धान्याची पैदास मोठ्या प्रमाणावर करितील तर तेंहि शक्य नव्हतें, कारण युद्धप्रारभापासून धान्याच्या खुल्या व्यापाराला कायद्याने बदी झालेली होती त्यामुळें फक्त आपल्या कुटुबपोषणापुरतेंच धान्य हे शेतकरी पिकवीत कुलक[1] तर उघडपणें शत्रूच्याच गोटांत शिरले मध्यम स्थितींतील शेतकऱ्याची मन प्रवृत्ति द्विधा झाली लाल सैन्यात बहुसख्य वर्ग शेतकरी सैनिकाचाच असल्याने देशातील या घडामोडींच्या परिणामातून तेहि सुटले नाहीत. लष्करी बळानें कारखान्याचे राष्ट्रीयीकरण झालें नि खुल्या व्यापाराला बदी झाली हे खरें, परतु तरीहि रशियातील बहुसख्य शेतकरी समाज खाजगी मालमत्ता बाळगून नफेबाजीची हाव धरीत होता अद्यापिहि रशिया शेतकीप्रधान असल्यानें देशातील उद्योगधद्याचा कांहीं भाग राष्ट्राच्या मालकीचा झाला तरी त्याचा फारसा उपयोग नव्हता. तथापि स्वत. लेनिननें या वर्गावर दडपशाहीचें हत्यार चालविलेलें नव्हतें, तें स्टालिननें केलें. लाचलुचपत, राज्यकारभारातील दिरगाई, मक्तेदारी नि अधिकारशाही यावर नियत्रण ठेवण्यासाठी कडक उपाययोजना करून राज्यकारभारावर बहुजनसमाजाची पूर्ण सत्ता राहील नि रशियाचें नवें सरकार सर्वस्वीं कामकऱ्याचे सरकार बनेल, अशी योजना लेनिननें

१ श्रीमत रशियन शेतकरी किंवा जमीनदार

असली लेनिनच्या या योजनेला स्टालिनची पूर्ण संमति होती असें एका शास्त्रज्ञाचें म्हणणें आहे.

बहुजनसमाजाचे हितसंबंध सुरक्षित राखावयाचे या धोरणाने राज्य-कारभार चालू ठेवावयाचा हे खरें असलें, तरी प्रत्येक लहानसहान बाब-तींत जनतेच्या मताचा कौल घेण्याची आवश्यकता नाहीं, स्वमतप्रचा-राने जनतेच्या विचारसरणीला वाटेल तसें वळण देणें शक्य आहे, असें ट्रॉट्स्कीला वाटत होते. ' जागतिक क्रांति ', ' जागतिक क्रांति ' याचाच घोष त्यानें चालविला होता ! त्यामुळें जगातील सर्व औद्योगिक राष्ट्रें समाजसत्तावादी बनल्याविना सार्‍या बाजूंनीं मागासलेला रशिया समाज-सत्तावादी बनू शकणार नाही, हाच जवळजवळ त्याचा सिद्धांत बनला होता. रशियातील समाजवादी क्रांति हें जागतिक क्रांतीच्या मार्गावरील प्रथमपदार्पण असें तो समजे, नव्हे तसें बोलून दाखवी जागतिक क्रांति लेनिनलाहि पाहिजे होती, परंतु तो व्यवहारवादी होती. आकाशातल्या ध्येयामागे लागून प्रत्यक्ष व्यवहाराचा खडकाळ मार्ग दृष्टिआड करण्याचा मूर्खपणा करण्यास तो सिद्ध नव्हता रशियन क्रांति हा जगत्क्रांतीचा एक घटक समजून तो जगविण्यासाठी पाश्चात्य राष्ट्रांच्या साहाय्याची आव-श्यकता तो मान्य करी. परंतु असें सांगे—" भवितव्यता आपण पूर्णत्वानें निश्चित करू शकत नाहीं. व्यवहारातील घडामोडी अगदी आपल्याला पाहिजेत तशाच घडत नसतात. जगत्क्रांति आज ना उद्या घडेल—खात्रीनें घडून येईल, परंतु तिची सिद्धता मंदगतीने चालू आहे. भांडवलशाही पाश्चात्य राष्ट्रें रशियावर एकजुटीने चालून आलीं तरी सोव्हिएट रशिया या परचक्रात सुरक्षित टिकून उभा राहिला आहे, आणि आज रशियात समाजसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना करणें शक्य कोटीत आलें आहे रशियानेंच हें सामर्थ्य संपादिलेलें आहे. " स्वत: लेनि-नहि जगत्क्रांतीची भाषा सुरवातीला घसा फोडून फोडून बोलत असे, विश्वबंधुत्वाची कल्पना त्याला मोठी सुरम्य वाटे परंतु वस्तुस्थितीचा कठोर चटका बसतांच तो शुद्धीवर आला होता. त्याला कळून चुकलें कीं, जगाला

सुधारण्याचे हे प्रयत्न सध्यातरी विफल आहेत. ज्या एका देशात म्हणजे रशियांत आपण रहातों त्याची तरी प्रकृति चांगली राखण्याचा प्रयत्न करू या !

ट्रॉट्स्कीप्रमाणेंच इतरहि अनेक लोक जगत्क्रांतीची भाषा बोलून राहिले होते. पहिल्या महायुद्धाच्या शेवटच्या काळात कांही कल्पनावादी जीव जागतिक क्रांतीच्या स्वागतार्थ जणू सिद्ध झाले होते. पण रशियाच्या तहानंतर त्याच्या या आशांना उतरती कळा लागली नि १९२३ च्या पावसानें बिचाऱ्यांच्या जागतिक क्रांतीच्या आशा पार धुवून नेल्या. जर्मनींतील राष्ट्रीय समाजसत्तावादी पक्षाचा कर्णधार हेर हिट्लर जर्मन राज्यकारभाराच्या केंद्रस्थानीं आला, आणि जर्मनीमधील क्रांतिकारक चळवळींना त्याच वेळीं मूठमाती मिळाली. लेनिनला १९२१ सालीच या परिस्थितीची कल्पना आली होती म्हणतात. आणि त्या अनुरोधानेच रशियाची स्वतंत्र आर्थिक योजना इतर देशाच्या परिस्थितीवर अवलंबून न ठेवता त्याने आंखली होती

## लेनिनचें मनोराज्य नि कारभार

क्रांतीनंतरच्या यादवीनें रशियाची आर्थिक स्थिति अधिक हलाखीची बनविली त्या काळात रशियातील बहुतेक कारखान्यातील भट्ट्या थंड पडल्या. कोळशाची हाकाहाक होऊन मोठमोठ्या रस्त्यावरहि दिवे लागेनासे झाले. साथीचे रोग, उपासमार, थंडीचा कहर इत्यादि कारणांनीं शेकडों कामगार नि गरीब जनता मृत्युमुखीं पडूं लागली. दुष्काळी परिस्थितीत जसे उपाशी लोकांचे थवे धान्याच्या शोधार्थ भटकूं लागतात तसे रशियन कामगार इतस्ततः हिंडूं लागले. आणि अशा वेळीं या बिकट परिस्थितीत रशियाचें औद्योगीकरण करून नवयुगाचा प्रातःकाल उजडवायच्याचा अशा चेतोहारी कल्पनाचें मनोराज्य लेनिन उभारीत होता ! यादवी नि परचक्र यातून रशिया निभावला खरा पण भीषण आर्थिक संकटांना त्याला तोंड द्यावें लागत होतें. औद्योगिक नि शेतीच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता

स्पष्ट दिसत होती. उद्योगधंदे व शेतकी उत्पादनाचीं सारीं साधनें लष्कराच्या ताब्यात द्यावी नि या लष्करी सामर्थ्यांच्या बळावर जीवनावश्यक वस्तूंची हवी तेवढी पैदास करावी अशा मोटेशाही प्रवृत्तीच्या एक गट या वेळीं अस्तित्वात आला. अर्थातच ही गोष्ट अपरिहार्य म्हणून करावी असेंच त्याचे म्हणणे होतें पण लेनिनला ती योजना समत झाली नाहीं त्याच्या 'सरकार' या सस्थेविषयींच्या कल्पना फार निराळ्या होत्या सरकार म्हणजे जनतेवर अनियंत्रित सत्ता गाजविणारी सस्था नव्हे, तर लोकाचे व्यवहार सुव्यवस्थित व सुयंत्रित चालण्यास मदत करणारी सस्था आहे असें लेनिनचें म्हणणें होतें. त्यामुळें या मुद्यावर बोल्शेव्हिक नेत्यात दुमत झालें. कामगार सस्था नि उद्योगधद्यातील त्याच्या कार्यक्षेत्राची व्याप्ति हा प्रश्न मोठा विवाद्य होऊन बसला कामगार सघाच्या योजना सिद्धीस नेण्यास लष्करी सामर्थ्यांचा उपयोग करावा असें म्हणणारा ट्रॉट्स्की वगैरेचा पक्ष होता. उलट स्वतः लेनिन, स्टालिन, कॅलिनिन नि रुड्झुटक आदि पुढाऱ्यानीं या पक्षाशा विरोध आरभिला झाले, पुनश्च दुफळी नि त्यातून उद्‌भवलेली यादवी रशियाच्या कपाळीं आली. सपाचे हत्यार कामगारानीं बोल्शेव्हिकाविरुद्धच उलटविलें. परिस्थिति दिवसानुदिवस गभीर नि भयप्रद होऊ लागली. सर्वत्र कम्युनिस्टाचा विद्वेष पसरू लागला. सपवाल्यानीं शहरात लुटालूट आरभिली. मेन्शेव्हिक नि सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षातील नेत्यानीं या वेळीं पुढें पाऊल टाकावे असा एकच आग्रह सुरू झाला. कम्युनिस्टाना सार्वजनिक सभातून तोंड काढणें महामुष्कील होऊन बसलें. लाल सैन्यात पळून जाण्याची साथ पुनश्च उद्‌भवली. कॉन्स्टॅटच्या सागरी सैनिकानीं बोल्शेव्हिकाविरुद्ध बड उभारलें ता १ मार्च १९२१ रोजीं मुख्य प्रधान कॅलिनिन याला भर सभेत विरोध करण्यात आला. लष्करी समाजसत्तावादाचें धोरण शेतकीच्या क्षेत्रातहि लागू झाल्यानें शेतकरी वर्गाला ते नापसत होऊन त्याच्यातहि असतोष धुमसू लागला. सोव्हिएट रशियावर उद्‌भवलेले हें एक नवें अरिष्ट होतें. आणि कदाचित् लष्करी समाजसत्तावादाचे धोरण यापुढें अधिक काळ ताणण्यात आलें असतें तर देशातील यादवीनें उग्र रूप धारण करून १९१९ च्या इतिहा-

त्याची पुनरावृत्ति केली असती.

## नवें आर्थिक धोरण

दूरदर्शी लेनिनला या परिस्थितीची कल्पना आली. बोल्शेव्हिक पक्षाच्या दहाव्या अधिवेशनात लष्करी समाजसत्तावाद प्रचंड बहुमतानें मागें घेण्यात आला. शेतकऱ्याच्या जप्त केलेल्या धान्याबद्दल त्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी नि त्यासाठीं धान्यावर वाढता कर बसवावा असें ठरले. लेनिनचें सुप्रसिद्ध नवें आर्थिक धोरण 'नेप' ( New Economic Policy ) याच वेळीं पुढें आलें. मार्च १९२१ मधील दहाव्या कम्युनिस्ट कॉंग्रेसमध्यें हें नवें धोरण संमत करण्यात आलें.

समाजसत्तावादी योजनांच्या कार्यक्रमांत ही परागति होती हें स्पष्ट आहे. या नव्या आर्थिक धोरणाचें समर्थन करतां येईल. परंतु त्यावरून एक गोष्ट सिद्ध होत आहे कीं, आर्थिक विषमता नष्ट करणें हें वाटतें तितकें सोपें नाहीं मी मी म्हणणाऱ्या लेनिनलाहि अखेर त्यापुढें हात टेकावे लागले, अधिक स्पष्ट म्हणजे आपल्या ठरलेल्या धोरणांत माघार घ्यावी लागली. तथापि याबद्दल त्याला दोष मात्र देतां येणार नाहीं. कारण आर्थिक विषमता नष्ट व्हावी ही कल्पना सुखदायी व बहुजनसमाजाच्या हिताची असली तरी ती प्रत्यक्षांत आणणें महा अवघड आहे. लष्करी सामर्थ्याच्या जोरावर कदाचित् कांहीं काळ ती पद्धति यशस्वी झाल्यासारखें दिसेल, परंतु त्या लष्करी बळाचा जोर जरा का ढिला पडला कीं ती पद्धति कोलमडून पडावयास फार अवधि लागत नाहीं. लेनिनच्या पाठीमागें उभें असलेलें लाल सैन्याचें सामर्थ्य कोणत्यांना कोणत्या कारणांनीं शिथिल झालें नि म्हणूनच लष्करी समाजसत्तावादांतून इष्ट व आवश्यक ती कार्यसिद्धि लेनिन मिळवूं शकला नाहीं. लेनिन सर्वाधिकारी होता नि त्याच्या रक्तांत थोड्याबहुत प्रमाणांत हुकूमशाही प्रवृत्तींचीं बीजें साठविलेलीं होतीं हें निःसंशय, आणि तदनुसार त्यानें शक्य तेथें सोटेशाही गाजविलीहि. परंतु सोटेशहाच्या हातां जें प्रचंड लष्करी सामर्थ्य लागतें त्याचा लेनिनजवळ अभाव असल्यानें त्याची सोटेशाही

पूर्णत्वाला जाऊ शकली नाहीं इतकेंच.

स्टालिनच्या अंगी संघटकाचा गुण उत्कटत्वानें वसत आहे नि त्याच गुणाच्या जोरावर त्यानें रशियातील दोन प्रसिद्ध पंचवार्षिक योजना आखल्या

"He is first, last and all the time an organiser in an age an organisation is everywhere what matters most The Dictator of the Proletariat is the perfect managing director." मि ई. एच्. कार यांनी केलेले स्टालिनचें हें वर्णन यथार्थ आहे.

पंचवार्षिक योजनांतून निष्पन्न काय झालें हा प्रश्न जरी थोडा वेळ बाजूला ठेविला तरी त्या योजनांमागील नियोजक स्टालिनच्या योजकतेचें, कल्पकतेचें नि ठरविलेली योजना पार पाडण्यासाठी त्यानें उपयोगांत आणलेल्या महाकारस्थानीपणाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे !

परंतु याचेंहि श्रेय स्टालिनकडे न देणारे कांही लोक आहेतच, आणि त्यांचे म्हणणें कित्येक ठिकाणीं विश्वासार्ह वाटतेंहि. स्टालिनचें कर्तृत्व उत्पादन, कृषि, इत्यादि सर्व क्षेत्रांत प्रभावी, अनुपमेय आहे असें म्हणून त्याला सर्वगुणसंपन्न बनवून देवकोटीला नेणें मात्र मूर्खपणाचें नि इतिहासाशीं विश्वासघात केल्याचें ठरेल.

१९१८ त पहिलें महायुद्ध थंडावलें. महायुद्धामागोमाग युरोपांत सर्वत्र क्रांतीचीं वादळें माजलीं १९२४ पर्यंत तींहि शांत होत आलीं. भांडवलशाहीला तात्पुरतें स्थैर्य येत असल्याचें दिसू लागलें. तथापि १९१७ सालींच रशियांत घडून वा घडवून आणलेल्या क्रांतीचीं पाळें-मुळें अद्यापि खोलवर रुजली गेलीं नव्हतीं. सोव्हिएट राज्यपद्धतीचा वृक्ष विरोधाच्या प्रचंड झंझावाताशीं यशस्वीपणें टक्कर देऊं शकेल अशी शाश्वती वाटत नव्हती. जागतिक क्रांतीची आशा अंधुक होऊन सोव्हिएट जर्मनी अगर सोव्हिएट फ्रान्स यांच्याकडून सोव्हिएट रशियाला साहाय्य मिळण्याची अपेक्षा करणें अशक्य होतें. आणि याच आणी-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६१५८



बाणीच्या काळात पक्षाचा नामधारी सूत्रधार म्हणून ज्याचें स्थान अद्याप बाह्यतः तरी मानलें जात होतें, तो लेनिन २१ जानेवारी १९२४ रोजीं दिवंगत झाला.

सर्वाधिकारी राज्यपद्धतींत सर्वाधिकाऱ्याच्या बलनाशानंतर अगर देहपातामागून जी अनिष्ट बजबजपुरी नि मतमतांतराची रणधुमाळी माजते तोच प्रकार सोव्हिएट रशियांत घडला. रशियाचें सुदैव एवढेंच कीं, स्टालिनसारखा पोलादी मनगटाचा नि कणखर मनाचा कारस्थानी पुरुष हा गडगडणारा गाडा सावरण्यास त्याच काळांत पुढें आला.

ट्रॉट्स्कीविरुद्ध स्टालिन हें द्वंद्व या वेळीहि चालूच होतें. 'भूमिजनाची बहुसंख्या ( शें. ८० टक्के ) असलेल्या रशियांत समाजसत्तावादी आर्थिक रचनेची वाढ करावयाची तर कामगार वर्गाला बाहेरच्या जगाची मदत अत्यावश्यक आहे, नि जगत्क्रांतिविना या लढ्यांत रशियन कामगार वर्ग यशस्वी होऊं शकणार नाहीं. तेव्हा प्रथम जागतिक क्रांतिच व्हावयास पाहिजे' असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें. याउलट समाजवादी आर्थिक पुनर्घटना कृषिप्रधान रशिया एकट्यानेंच सिद्ध करूं शकेल असा आग्रह स्टालिननें चालविला होता; त्याच्या या आग्रहाला लेनिनचा आधार तो घेत असे.

## पहिल्या योजनेंतून पेटलेला वणवा

रशियांतील उत्पादनपद्धतीचा संबंध तेथील मध्यम शेतकरी वर्गाशींच प्रामुख्यानें येत असल्यामुळें त्यांच्या पूर्ण सहकार्याखेरीज कोणतीहि आर्थिक सुधारणेची योजना यशस्वी ठरणें अशक्य होतें. अर्थात् यांचें सहकार्य ज्या विशिष्ट योजनेसाठीं मिळवावयाचें होतें, ती योजना या मध्यम शेतकरी वर्गाला नि त्याहून वरिष्ठ वर्गाला अपायकारक होणार हें त्यांना स्पष्ट दिसत होतें. अशा परिस्थितींत सहकार्याची नि पाठिंब्याची तर भाषाच नको, पण विरोध मात्र उभा राहाणें अपरिहार्य होतें. स्टालिन हें संकट जाणून होता; आणि त्याच अनुरोधानें त्यानें आपलें पुढील धोरण मोठ्या कौशल्यानें आंखलें.

कामगार वर्ग नि गरीब वा निकृष्ट दर्जाचे शेतकरी यांचा मध्यम शेतकरीवर्गाशीं निकटचा संबंध आणून त्या परस्परांत स्नेहभाव निर्माण करणें ही गोष्ट नव्या आर्थिक योजनेसाठीं आवश्यकच होती. परंतु खाजगी मालमत्ता संपादून बसलेला मध्यम शेतकरी वर्ग नि कामगार यांचे परस्पर संबंध एकजिनसी असणें शक्य नव्हतें तथापि भांडवलवाल्यांचा स्वार्थ या मध्यम शेतकरी वर्गाची पिळणूक थोडी करीत होता असें नव्हे. अर्थातच कोणातरी अमित्राचाच आश्रय या वर्गाला करावा लागणे अपरिहार्य होतें

अशा परिस्थितींत स्टालिनने आपलें धोरण पुढीलप्रमाणें घोषित केलें. ( १ ) कामगार वर्ग व कनिष्ठ शेतकरी वर्ग यांचे मध्यम शेतकरी वर्गाशीं स्नेहसंबंध दृढ करणें. ( २ ) मात्र या संबंधांत कामगार वर्गाचेंच नेतृत्व नि वर्चस्व कायम ठेवणें, ( ३ ) भांडवलदार वर्गाचे खेडेगावांतील प्रतिनिधि 'कुलक' नि शहरांतील भांडवलवाले यांची मध्यम शेतकरी वर्गाशीं फारकत करून त्यांना मध्यम वर्गाचें सहकार्य नि पाठिंबा न मिळू देणें या धोरणानेंच स्टालिनने आपला पुढील कार्यक्रम आखला उत्पादनांत वाढ करणें, देशाचें शेतकीप्रधान स्वरुप बदलून तो त्वरित उद्योगप्रधान बनविणें, भांडवलदारी उत्पादन पद्धतीवर समाजवादी धोरणाचें प्रभुत्व कायम ठेवणें, सोव्हिएट यूनियन आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व भांडवलशाहीपासून स्वतंत्र व स्वावलंबी करणें अशा प्रकारचा कार्यक्रम त्यानें ठोकळ मानाने ठरविला. सुमारें तीन वर्षें या पद्धतीनें कार्य घडविल्यानंतर 'पहिल्या पंचवार्षिक योजने'चा ( १ आक्टो १९२८ ते ३१ डिसें. ३२ ) पाया घातला गेला.

पंचवार्षिक योजना आखतांना स्टालिनने लेनिनच्या अनुभवाचा नि सिद्धांताचा हवाला दिलेला होता. त्यापैकीं लेनिनच्या 'संकलित ग्रंथां'तील कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहे: लेनिनने लिहिलें आहे:–" कम्युनिझम म्हणजे सोव्हिएट सत्ता+विद्युत्शक्तीची वाढ. आपला आर्थिक पाया प्रचंड प्रमाणावरील उद्योगधंद्यांनीं बनविलेला असला पाहिजे विद्युच्छक्तीची वाढ केल्यानेच आपली शेती, आपले उद्योगधंदे, आपली वहातूक पद्धति आधुनिक मोठ्या प्रमाणावरील औद्योगिक नि नव्या तांत्रिक पायावर आप-

त्याला उभारता येईल या मार्गानेंच आपण यशाचें अत्युच्च शिखर गाठूं शकू." ('लेनिन–सकलित ग्रथ,' खड १७, पृ. ४२८) अर्थातच स्टालिनला विरोध करणारा ट्रॉट्स्की नि बुखारिन इत्यादि बोल्शेव्हिक लेनिनच्याच कारकीर्दीत चमकले असल्यानें त्यानीहि आपल्या विरोधी मताच्या समर्थनार्थ लेनिनचा आधार आपल्या बाजूनें दिला पण हें वाग्द्वद्व नव्हते चाणक्याच्या कुटिल कारस्थानीपणाचें सामर्थ्य ज्याच्या-पार्शी अधिक तो विजयी होणार हें ठरलेलें होतें. स्टालिनपार्शी तें भरपूर असल्यानें तो विजयी ठरला स्टालिन वारा येईल तशी पाठ देणारा असल्यानें व ध्येयसिद्धीसाठीं तत्त्वाचा होम करण्यास त्याची नेहमीच सिद्धता असल्यानें 'लेनिन काय म्हणाला होता' यापेक्षा 'आज काय आवश्यक आहे' याकडेच त्यानें अधिक लक्ष दिलें. प्रसगी आवश्यकते-नुसार लेनिनला आपल्याला पाहिजे तसें म्हणावयालाहि त्यानें लावलें, आणि केवळ लेनिनप्रणीत तत्त्वज्ञानाचीच स्टालिननें री ओढली नाहीं अगर क्वचित् तें उलथूनहि टाकलें. या गोष्टीबद्दल त्याला सहसा कोणीहि दोष देण्यास सिद्ध होणार नाहीं 'रशियाच्या हितासाठीं' (जगाच्या नव्हे) त्यानें जे केलें तें खरोखरीच समर्थनीय आहे.

ई. एच् कार यांनी स्टालिनसबधीं म्हटलें आहे:

Soviet Russia is the pioneer of planning, and Stalin ranks as the pioneer of planning in Soviet Russia" (The Spectator १८-९-३९; पृ. ८५३)

अगदीं यथार्थ उद्गार आहेत हे. योजना आखणे व त्यानुसार काम घडविणें ही गोष्ट सोपी नाहीं परंतु स्टालिनने तें सहज साध्य केलें आहे

पहिल्या पचवार्षिक योजनेंत समाजवादी उत्पादनपद्धतीला प्रधान समजूनच सारी आर्थिक योजना आखण्यात आलेली होती औद्योगिक व शेतकी या क्षेत्रात नव्या तत्राचा उपयोग करून घेणें ही गोष्ट नुसती घोषणेंत न ठेवता त्याचा प्रत्यक्ष अमल करणें आवश्यक होतें; परतु त्याला बरेच अडथळे निर्माण झाले. जनतेच्या दैनिक जीवनाला आवश्यक अशा

अन्न, वस्त्र इत्यादि वस्तूंचें उत्पादन झपाट्यानें वाढविण्यास प्रारंभ झाला. इंजिनीअरिंग (वास्तुशास्त्र) व कोळसा, लोखंड, रासायनिक उत्पादन, विद्युत् इत्यादि विविध क्षेत्रात बरीच प्रगति होऊन उद्योगप्रधान देशाला लागणाऱ्या औद्योगिक पायाची बळकटी रशियात वाढू लागली.

[illegible] हा एक अभिनव प्रकार या योजनेत सुरू करण्यात आला आधुनिक अजस्र शेतकी–यन्त्राचा उपयोग करावयाचा तर त्यासाठी शेतजमिनीचे बारीक बारीक तुकडे पाडून उपयोग नसतो, त्यासाठी प्रचंड नि अफाट जमिनीचा सलग भाग असला तरच या नव्या साधनाचा उपयोग फायदेशीर ठरतो. त्या दृष्टीने ही समायिक शेतीची कल्पना आवश्यक होती, परंतु वाडवडिलानीं जिवापाड जतन करून राखलेल्या जमिनीच्या–कितीहि लहान का होईना–तुकड्यावरील मालकी हक्क सोडावयास सुखासुखी कोणी तयार होणें शक्य नव्हतें. म्हणून सक्तीच्या सुरी'चें तन्त्र उपयोजावें लागलें. नुसत्या शेतकी उत्पादनात तूट पडली असें नव्हे, तर इतरहि सर्वसामान्य उत्पादनाचें प्रमाण घटलें. अन्नवस्त्राची ददात पडू लागली. सर्वसामान्य जनतेंत भयंकर असंतोष उसळला. परंतु अखेर पहिली पंचवार्षिक योजना सर्वस्वी कोलमडून पडली. त्यामुळे आधीच चिडलेली जनता अधिक खवळून उठली. परंतु स्टालिननें त्याचा बंदोबस्त करण्यासाठी ऑगप्यूची तरतूद आगाऊच करून ठेविली होती!

## बणवा विझविण्यासाठीं

हा असंतोषाचा वणवा विझविण्यासाठी स्टालिनने भयंकर दडपशाही सुरू केली ऑगप्यूचे हस्तक नि हेर यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला. देशात एक मोठा सार्वत्रिक व देशव्यापी कट झाल्याची अफवा उठविण्यात येऊन वृत्तपत्रांना त्या वार्तेची प्रसिद्धि करण्याविषयी सक्ति करण्यात आली. या कटाच्या संशयाचा फायदा घेऊन सहस्रावधि रशियन लोकांची पोलिसांनी धरपकड केली. मोठमोठ्या जागावर काम करणाऱ्या तन्त्रविशारदांना, इंजिनीअर्सना ( वास्तुशास्त्रज्ञांना ) व इतर निष्णात कामगारांना

पकडण्यात आलें. सक्तीच्या खुषीचे कबुलीजबाब घेण्याचे सत्र याच वेळीं सुरू झाले. याचें वर्णन स्टीफन ग्रॅहमनें मोठ्या मार्मिकपणें केले आहे[1]—

'The era of 'novel writing' in prisons commenced. The elaborate confessions spun out by the police officials were often sheer fiction, and they entered into questions of character and motive and they contained petty biographies like novels'

दुसऱ्या पचवार्षिक योजनेची ही पूर्वसिद्धता होती. त्या योजनेंत कोणी अडथळे आणू नयेत, कोणी विरोध करू नये यासाठीं विरोधी मताच्या अनेक वरिष्ठ दर्जाच्या लोकाची उत्तर व पूर्व भागातील स्थानबद्धांच्या छावण्यातून पाठवणी करण्यात आली

समायिक शेतीपद्धतीमुळें शेतकीच्या उत्पादनातील मुख्य घटक जो शेतकरी वर्ग त्याचीच अचूक उचलबागडी झाली. 'कुलक' हा श्रीमत शेतकरी वर्ग यापूर्वी आपल्या खाजगी कोठारांत धान्याचे मोठे साठे करून ठेवी व जनतेवर उपासमारीची पाळी आणी. आतां या नव्या पद्धतीमुळें धान्याचे साठे सरकारच्या हातीं आल्यानें ती आपत्ति थोड्याबहुत प्रमाणात टळली. या कुलकाची आर्थिक व राजकीय नाकेबदी करून त्याला नष्टप्राय करण्यासाठीं एक मोठी मोहीम सुरू करण्यात आली. त्याच्या जमिनी व मालमत्ता जप्त झाल्या. इतर सर्वांप्रमाणेंच शेतकऱ्यानाहि मोजकें अन्न मिळू लागलें.

अशा असतुष्ट परिस्थितीत दुसऱ्या पचवार्षिक योजनेला ( १ जानेवारी १९३३ ते ३१ डिसेंबर १९३७ ) हात घालण्यात आला. दुसऱ्या पचवार्षिक योजनेंत औद्योगिक प्रगतीचा वेग बराच मोठा होता. या योजनेनुसार औद्योगिक, शेतकी नि व्यापार या त्रिविध क्षेत्रात समाजवादी सामाजिक पद्धतीचा अवलब करून रशियाला स्वयपूर्ण बनवावयाचे ठरले होतें; परतु हा प्रयोग पूर्णतः यशस्वी ठरलेला दिसत

[1] Stalin P 95

नाहीं. किंचित् काल खाजगी, भांडवलदारी व नफेबाजी पद्धतीचें उच्चाटण झालेलें दिसलें तरी थोडक्याच अवधीनतर स्वतः सरकारला खाजगी मालमत्तेला समति द्यावी लागलेली आहे. तथापि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें रशिया पुष्कळ सुधारला एवढें नि.सशय उद्योगधंदे व शेती यात सर्वत्र यत्रांनी कामें होऊं लागली. वीज, कोळसा, पोलाद, यत्रसामुग्री या धद्याची झपाट्यानें वाढ झाली.

रशियावर पडलेला आर्थिक ताण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळें थोडथोडा ढिला पडूं लागला क्रांतिपूर्वीची स्थिति जरी अद्यापि निर्माण झाली नव्हती तरी खायलाप्यायला पुरेसें मिळूं लागलें शेतकऱ्यांचे सामुदायिक शेती—पद्धतीविरुद्ध झालेले कट नि कारस्थानें हाणून पाडण्यात आलीं होतीं शेतमजुराच्या शिस्तबद्ध सैनिक तुकड्या बनविण्यात आल्या कामांतील निष्काळजीपणा अगर कामचुकारपणा यासाठीं जबर शिक्षा दिल्या जाऊं लागल्या. लागवडीला लायक असलेली सर्व जमीन सामायिक शेतीपद्धतींत समाविष्ट करण्याचा स्टालिनने चग बांधला

रशियात केल्या गेलेल्या या आर्थिक नि तदगभूत समाजिक प्रयोगाविषयीं एन् द् ऑसिली यानें आपलें मत असें स्पष्टपणें प्रकट केलें आहे [१]

'Soviet experiment has brought upon the immence country such misfortunes that their example should serve as a serious warning to anyone who might be tempted to seek through violence a remedy for economic and social ills. To its economic and social plans the Soviet policy has sacrificed the human being with his indestructible material interests and spiritual aspirations.'

या पंचवार्षिक योजनांतून जर कांहीं निर्माण झालें असेल तर तें कामगाराचें सुरक्षित, उन्नत, उदात्त जीवन नव्हे. त्याच्या उलटच प्रकार त्याबाबत घडला. आणि निर्माण झालें काय, तर हुकूमशाही राजवटीला

१ Russia under Soviet Rule ( P 466 467 )

बळकटी आणणारी प्रचंड लष्करी शक्ति व औद्योगिक सिद्धता. रशियाचें हवाई सामर्थ्य जगात नुकते परवापर्यंत सर्वश्रेष्ठ गणले जात होतें: तें याच योजनातून निर्माण झालें.

या योजनेची गति असह्य होती कारागृहात सश्रम शिक्षा भोगणाऱ्या बद्यानाहि, काळ्या पाण्यावरील राजकीय बंदिवानानाहि काम करण्यासाठी जितका छळवास सोसावा लागला नसेल, असा भयंकर त्रास स्टालिनच्या 'तुफानी तुकड्या' नीं कामगाराना दिला यातून फारसें कांहीं विधायक कार्य निर्माण होऊं शकलें नाहीं जो माल तयार झाला तो अद्यावत् सुधारलेल्या परकीय उत्पादनाच्या तोडीचा निघालेला नाहीं. कसबी कामगाराची परंपरा नष्ट झाली असल्यानें यापुढेंहि ती उणीव लवकर भरून निघेल असे वाटत नाहीं १९३७ पूर्वीचा एक काळ असा येऊन गेला कीं, कामगारवर्ग या छळामुळें असंतुष्टतेने धुमसत होता. त्यातच ट्रॉट्स्कीपंथीयाच्या समूळ उच्छेदासाठीं स्टालिनने आपल्या हस्तकाकरवीं अशी समजूत करून दिली कीं, राज्यकारभाराची व उद्योगधंद्याची प्रत्येक शाखा जणू शत्रूनी नि विनाशकानीं भरून गेली आहे १९३७ च्या हत्याकांडाची नि नरयज्ञाची ही पूर्वसिद्धता होती

# क्रान्तीनें गिळलेले क्रान्तिवीर

कदाचित् रशियन क्रांतिवीराच्या हत्याकांडाविषयीं जी माहिती आज जगापुढें आलेली आहे ती तशीच अंधारात राहिली असती, परंतु केवळ जनरल[1] क्रिव्हिटस्की यानें १९३७ नंतर अमेरिकेंतून रशियात परत न जाण्याचा शहाणपणा केल्यामुळें या भीषण दुर्घटनेवर थोडातरी प्रकाश पडू शकला!

---

१ जनरल डब्ल्यू. जे. क्रिव्हिटस्की हा १९१९ सालापासून १४ वर्षें सोव्हिएट रशियाच्या लष्करी गुप्तमाहिती खात्यांत नोकरी करीत होता. त्यानंतर दोन वर्षें सोव्हिएट वॉर इंडस्ट्रीज इन्स्टिट्यूटच्या (युद्धसाहित्याच्या उद्योगधंद्याची संस्था) डायरेक्टर म्हणून काम केल्यावर तो १९३७ च्या नोव्हेंबरपर्यंत पश्चिम युरोपीय सोव्हिएट लष्कराच्या गुप्तवृत्त खात्याचा मुख्य अधिकारी होता. सोव्हिएट राजवटीच्या अंतर्गत कारभाराविषयीं जनरल क्रिव्हिटस्की याला पूर्ण माहिती होती स्टालिनचा एके काळचा अत्यंत विश्वासू सहकारी व रशियन सेनानी म्हणून प्रसिद्ध असलेला हा पुरुष याच वर्षी अमेरिकेंत मृत्यु पावला असें कळतें.

स्टालिन ह्या हत्याकांडाला का नि कसा प्रवृत्त झाला, याचें वर्णन जनरल क्रिव्हिटस्की पुढीलप्रमाणें करतो: “ ३० जून १९३४ ला रात्रीं स्टालिननें क्रेमलीनमध्यें पोलिटब्यूरोची एक खास बैठक बोलाविली होती हेर हिटलरच्या जर्मन शुद्धीकरणाच्या पहिल्या नरमेधाला या वेळीं नुकताच प्रारंभ झाला होता हिटलरच्या या शुद्धीकरणाचें वृत्त जगाच्या कानावर पडण्यापूर्वीच स्टालिनला त्याचा सुगावा लागला होता व जर्मनातील या नव्या घटनेचे परिणाम अदाजून आपले धोरण आखण्याची आवश्यकता स्टालिनला भासू लागली होती. पोलिटब्यूरोच्या या खास बैठकीला पोलिट-ब्यूरोचे सभासद नसलेले असेहि कांहीं अधिकारी बोलाविण्यात आले होते, त्यात लाल सैन्याच्या वृत्तखात्याचे मॉस्को येथील अधिकारी जनरल बसुझीन, परराष्ट्रमत्री लिट्व्हिनॉफ, कम्युनिस्ट पक्षाच्या माहिती खात्याचे डायरेक्टर कार्ल रॅडेक आणि ऑगप्यूच्या परराष्ट्रीय शाखेचे मुख्याधिकारी असटझॉफ हे निवडक लोक होते हिटलरच्या हत्याकांडाचा हेतु जाणून रशियाचे परराष्ट्रीय धोरण ठरविणें हा या बैठकीचा खास उद्देश होता. ” ज क्रिव्हिटस्की स्वत. या बैठकीला उपस्थित होता.

हिटलरच्या या शुद्धीकरणामुळे जर्मनींत त्याची सत्ता संपुष्टात येऊ लागली आहे असें सामान्य जनतेला वाटत होते परतु वरील बैठकीच्या समारोपात स्टालिननें उद्गार काढले, “ जर्मनातील या घडामोडीमुळें हिटलरचें सामर्थ्य कमी होत आहे असें मला मुळींच वाटत नाहीं उलट या रक्तपातामुळं हिटलरचें सामर्थ्य वाढीला लागलें असल्याचें मला दिसतें ! ”

असें म्हणतात कीं, हिटलरी शुद्धीकरणाचा साफसफाईचा प्रथम वृत्तात स्टालिनच्या कानीं पडताच तो हिटलरला उद्देशून उद्गारला,— ‘ आहे, एक लायक पुढारी आहे ! ’

रशियातील Liquidation म्हणजे साफसफाईची ही पूर्वसूचनाच होती म्हणायची ! !

लेनिनचा प्रतिस्पर्धी वा कांहींच्या मताप्रमाणे स्टालिनचा हाडवैरी

ट्रॉट्स्की यानें स्टालिनची त्याच्या विरोधकाशीं वर्तणूक कशी असते याबाबत एके ठिकाणीं म्हटलें आहे: "विरोधकाशीं झगडण्याचा प्रसंग आला तर स्टालिन कधीं त्याच्या टीकेला सरळ उत्तर देण्याच्या भानगडींत पडत नाहीं. त्याच्या त्या टीकेला शत्रुत्वाचें भयंकर स्वरूप देऊन ती टीका त्याच्यावरच उलटवावयाची असा त्याचा प्रयत्न असतो. 'अमर्याद असत्याचा सिद्धांत' हिटलरपूर्वीच स्टालिननें संशोधिला. कल्पनातीत धादांत अनृताचा जनतेची फसवणूक करण्याच्या कामीं कसा उपयोग करून घ्यावयाचा तें स्टालिन उत्तम रीतीनें जाणतो मॉस्को–कटाच्या अभियोगांत पद्धतशीरपणें वापरण्यांत आलेल्या या अभिनव तंत्राला 'स्टालिनगड' असें नांव देण्यांत येईल." या 'स्टालिन–गडां'तच आगामी सोव्हिएट हत्याकांडाचें प्रतिबिंब कोणी पाहूं शकला असता !

या दोन अधिकारी व्यक्तींचें अभिप्राय या हत्याकाण्डासंबंधीं प्रथमतः देण्याचें कारण एवढेंच कीं, प्रस्तुत लेखकाकडून कोणतेंहि मत वाचकावर लादलें जाऊं नये वाचकाचें मन अगोदरच कलुषित करण्याचा दोष स्वतः लेखकाच्या पदरीं येऊं नये

हिटलरनें शुद्धीकरणासाठीं जे वरेवाईट मार्ग उपयोगांत आणले त्याला कोणाचा अडथळा होण्यासारखा नव्हता त्याबद्दल कोणा गुरूच्या उदात्त तत्त्वांना वा बंधनानांहि तो बांधला गेलेला नव्हता. स्टालिनची स्थिति मात्र थोडी निराळी होती. त्याच्या मार्गांत हजार विघ्नें होतीं. अधिकारारूढ असलेल्या अगर कोणाहि जुन्या बोल्शेव्हिकाला देहांत शासन दिलें जाऊं नये असें लेनिननें आपल्या अनुयायांना सांगणें होतें. फ्रेंच राज्यक्रांति घडवून आणणाऱ्या 'जेकोबिन्स'नीं स्वपक्षांतील सभासदांची कत्तल केल्यानें झालेल्या दुष्परिणामावरून लेनिननें हें आपलें धोरण ठरविलें होतें असें सांगतात पधरा वर्षपर्यंत लेनिनची ही आज्ञा पाळली गेली. बोल्शेव्हिक पक्षांतील अधिकारारूढ गटाशीं समत नसणाऱ्या सभासदांची 'पक्षा'तून हाकलपट्टी करण्यांत येई, त्यांच्या नोकऱ्या काढून घेण्यांत येत, त्यांना सीमापार केलें जाई. परंतु कोणत्याहि राजकीय अपराधासाठीं

'पक्षा'तील कोणाहि सभासदास देहदंडाची शिक्षा तोंपर्यंत दिली गेली नाहीं.

परंतु १९३२ सालीं 'पक्षाच्या मॉस्को शाखेंतील नेत्यांपैकीं रियूटिन यानें एक नवीन विरोधी गट स्थापून सवता सुभा आरंभिल्यानें त्याबाबत विचार करण्यासाठीं पक्षाच्या वरिष्ठ राजकीय मंडळाची बैठक बोलाविण्यात आली. त्याच बैठकींत प्रथम स्टालिननें विरोधी सभासदांच्या देहांतशासनाचा प्रश्न उपस्थित केला त्यानें सुचविलें कीं, 'विरोधी सभासदास देहांताचीहि शिक्षा आवश्यक तर द्यावी. या सूचनेच्या ठिणगीनें त्यापुढील हत्याकांडाचा वणवा पेटविला.

जनरल ब्रसझीन यानें रियुटिनची गुप्त योजना चौकशी समितीपुढें वाचून दाखविली स्टालिनला 'पक्षाचें थडगें बांधणारा', 'रशियाचा व क्रांतीचा नायनाट करणारा' असें म्हणून स्टालिनच्या उच्चाटनासाठीं आपण पुढाकार घेण्यास सिद्ध आहोत अशा अर्थाची घोषणा रियुटिननें त्या, योजना-पत्रकात केली आहे असें त्यानें दाखवून दिलें.

स्टालिनला ही आयती संधि चालून आली. लेनिनचा शब्द मोडल्यासारखा न दिसता आपलें काम त्याला साधावयाचें होतें रियुटिनचा खटला हें एक बरें साधन या नेमक्या वेळीं त्याच्या हातीं आलें. तथापि लेनिनग्राड शाखेचा चिटणीस किरॉफ व बुखारिन इत्यादि पुढाऱ्यांच्या परिश्रमामुळें रियुटिनला ठार करण्याचा स्टालिनचा कावा उधळून गेला; तो स्टालिनच्या मृत्युपाशातून तात्पुरता तरी सुटला पुढील चार वर्षें-पर्यंत आपलें आसन स्थिर करण्याची स्टालिनची अविश्रांत धडपड सुरू होती. त्या अवधींत रशियातील सार्वत्रिक असंतोष शिगेला पोंहोचला होता. शेतकी संपूर्ण सांघिक बनविण्याच्या प्रयोगामुळें जमीन प्राणाहूनहि प्रिय मानणारे शेतकरी बिथरले होते. अर्थातच त्यांनीं उघडपणें वा गुप्तपणें विरोध दर्शविताच कत्तल अथवा सीमापारी त्यांच्या वाट्याला सहाजिकच येई. त्या काळीं असे लाखों शेतकरी आपल्या मायभूमीला पारखे झाले नि सहस्रावधि भूमिजन लाल सैनिकांच्या गोळ्यांना बळी पडले. देशांतील दारिद्र्याबरोबरच दंडपशाहीचीहि कमान चढू लागली.

रशियांत सर्वत्र भयंकर खळबळ माजून गेली होती. राष्ट्रांतील अति सुपीक अशा प्रांतांतूनहि दुष्काळाचें भीषण स्वरूप प्राप्त झालें. जनता अन्नान्न दशेप्रत गेली सैन्यामधील शिपायांत असंतोषाचा अग्नि धुमसत होता तर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बंडाचे वणवे पेटविले होते. 'पक्षा' तहि ह्या असंतोषाचा भुंगा शिरून त्यानें स्टालिनचें आसन पोखरण्यास सुरवात केली. 'पक्षा' त नवनवीन विरोधी उपपक्ष स्थापले जाऊन धोरण नि पुढारीपण यांत बदल होण्याबद्दल चोहोंकडून मागणी केली जात होती स्टालिनचे आसन डळमळूं लागल्यासारखें दिसत होते, पण स्टालिन मात्र डगमगलेला दिसला नाहीं!

## एक ऐतिहासिक भीषण खून

अखेर १९३३ च्या अखेरीला 'पक्षा'च्या 'शुद्धीकरणा'ला सुरवात झाली. दोन वर्षांच्या अवधींत लक्षावधि सभासदांची पक्षांतून हकालपट्टी झाली असेल लेनिनच्या काहीं जुन्या सहकाऱ्यांवर स्टालिनने दडपण आणून त्यांच्याकडून 'चुकीची कबुली' सक्तीच्या खुबीनें घेण्यास प्रारंभ केला. तथापि तेंहि शास्त्र अपुरें व निरुपयोगी आहे असे त्याला पुढे पुढे वाटूं लागलें. जुन्या पुढाऱ्यांचें वर्चस्व नष्ट करून सर्व विरोधी गटांची मुस्कटदाबी करणें त्याला आवश्यक वाटूं लागलें. परंतु हें जनतेच्या डोळ्यांवर येणार नाहीं व ती एकदम बिथरून बंड करून उठणार नाहीं अशी दक्षता घेणेंहि तितकेंच आवश्यक होतें. स्टालिन हे ओळखण्याइतका धूर्त नि त्यांतून योग्य मार्ग काढण्याइतका कावेबाजहि आहे. लवकरच एक चमत्कारिक व भीषण घटना घडून आली—वा घडवून आणण्यांत आली!

१ डिसेंबर १९३४ हा दिवस होता. लेनिनग्राडचा राजकीय वरिष्ठ अधिकारी सर्जी किरॉफ हा आपल्याच विचारांत गुंग होऊन एकटाच रस्त्यांतून चालला असतां निकोलीफ नांवाच्या एका सामान्य अधिकाऱ्यानें गोळी झाडून त्याचा खून केला. खुनाच्या जागीं त्या दोघांखेरीज कोणीहि नव्हतें निकोलिफला कोणी साथीदार असावेत असें दिसत

नाहीं उलट ऑगप्यूनें किरॉफचें संरक्षण ढिलें केलें होतें असें मात्र दिसतें. या खुनामागें रहस्य आहे असें नुसतें ऑगप्यूनें म्हणण्याने भागत नाहीं; उलट रहस्य अगर कांहीं चमत्कारिकपणा असलाच तर तो पोलिसांच्याच वागणुकीबाबत दिसतो. निकोलीफ आपल्या मनांत गुप्तपणानेंहि काय विचार करतो याची माहिती पोलिसांना होती. असें असताहि निकोलीफ-पासून किरॉफचें रक्षण करण्यासाठीं योग्य ती तजवीज घेतली गेलेली दिसत नाहीं.

निकोलीफ स्वतः होऊन पोलिसांच्या हातीं गेला असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. त्याच्या बंदिवासांत त्याच्याकडून एक लांबलचक कबुलीजबाब लिहून घेण्यात आला व चौकशी होऊन खुनानंतर कांहीं आठवड्यांच्या आतच त्याला फांशींहि देण्यात आलें.

लिओनीड निकोलीफने किरॉफचा केलेला हा खून म्हणजे केवळ रशियांतीलच नव्हे तर जगाच्या इतिहासांतील एक अति रहस्यमय व दुष्परिणामी घटना आहे! ऑक्टोबर १९३४ मध्ये निकोलीफ या कम्यु-निस्ट युवकाला किरॉफच्या पोलिसांनीं लेनिनग्राड येथें पकडलें त्या प्रसंगीं त्याच्यापाशीं एक रिव्हॉल्व्हर नि एक दैनंदिनी सांपडली. या दैनंदिनीचा उपयोग करून घेण्यात आला, परतु तिच्यातील एक शब्दहि प्रसिद्ध झालेला नाहीं. त्यामुळें तिला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. त्यानंतर लेनिनग्राड 'ऑगप्यू'च्या दुय्यम अधिकाऱ्यासमोर त्याची चौकशी झाली या अधिकाऱ्यासमोर येताच हा संशयित तरुण एकाएकीं मुक्त करण्यांत आला. हें काय गौडबंगाल आहे याचा खुलासा करण्यासाठीं ऑगप्यू अधिकारी झापोरोझट्स हा यागोडाला भेटण्यासाठीं मॉस्कोला गेला पण त्याचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं!

किरॉफचा खून होताच एक आश्चर्यजनक घटना घडून आली. स्वत. स्टालिन या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं जातीनें लेनिनग्राडला गेला. ऑगप्यूचा वरिष्ठ अधिकारी यागोडाहि अर्थात तेथें उपस्थित झाला, परंतु त्याला या प्रकरणांत हात घालण्यास स्टालिनने मनाई केली

स्टालिन–यागोडा यांच्यामधील वैमनस्याचा स्फोट याच रात्रीं प्रथम उघडपणें झाला ह्याच सुमाराला यागोडाला ठार मारण्याचा एक निष्फळ प्रयत्न झाला असें म्हणतात !

किरॉफच्या खुनाची चवकशी सुरू झाली. लेनिनग्राडच्या ऑगप्यू अधिकाऱ्यांचें यात आंग असल्याचा ठपका ठेवण्यात आला परतु त्याविषयीं अधिक खोलात शिरून चौकशी न होता त्या अधिकाऱ्यांपैकीं १२ जणांची कारागृहात पाठवणी झाली निकोलीफच्या बरोबरीच्या १६ तरुण कम्युनिस्टांना गुप्त चौकशीनंतर गोळ्या घालून ठार मारण्यात आलें.

जुन्या बोल्शेव्हिकांना देहान्त शासन देण्याच्या आड येणारी अडचण अशी आपोआपच दूर झाली म्हणायची कारण आता स्टालिनला शुद्धीकरणासाठीं नैतिक पाठिंबा मिळाल्यासारखें झालें किरॉफचा खून पडला त्याच दिवशीं स्टालिननें एक नवीन घोषणा केली: ' राजकीय खुनास उत्तरदायी असणाऱ्या वा त्याशीं संबध असणाऱ्या सर्व अपराध्यांची दहा दिवसांचे आत लष्करी न्यायासनापुढें चौकशी व्हावी, ही चौकशी गुप्त असावी, आरोपीला वकील देण्याचा अधिकार नसावा व झालेली देहान्ताची शिक्षा तावडतोब अमलात आणावी ' असा त्या घोषणेचा आशय आहे राजरोस कसलीचा सदर परवाना असेंच याला म्हणावें लागेल ! सोव्हिएट यूनियनच्या अध्यक्षाला गुन्हेगारासाठीं जो क्षमादानाचा खास अधिकार असतो तोहि या प्रकारच्या अभियोगाच्या बाबतींत रद्द ठरविण्यात आला.

यापुढील सोव्हिएट यूनियनच्या इतिहासाचीं बरींच पानें रक्तानें लिहिलीं गेलीं आहेत, आणि त्याला आधार म्हणून घेण्यात आलेलें कारण म्हणजे–किरॉफचा खून ! –किंवा ? स्टालिनची राक्षसी आकांक्षा !!

## लेनिनचीहि आहुति पडली !

" स्टालिनला होणारा विरोध व्यापक प्रमाणावर पसरलेला परंतु नेतृत्वहीन होता, म्हणून त्यानें आपलें पाऊल धीरे धीरे टाकण्यास सुरवात केली " असें या शुद्धीकरण प्रकरणीं ज. क्रिव्हिट्स्कीनें लिहिलें आहे.

## १९३४ मधील स्टालिन नि सहकारी



पुढील रांगः—सर्जो ऑर्डझनोकिइझ–१९३६त मृत्यु, स्टालिन, पर-राष्ट्रमंत्री मोलोटॉव्ह, सर्जो किरॉफ–१९३४ त मृत्यु

मागील रांग.—ॲबेल येनुकिइझ–हत्याकाण्डाचा वळी एके काळचा युद्धमंत्री व्होरॉशिलॉव्ह लाझार कागनोव्हिच, व्हॅलेरिअन कुआीबिशेव्ह मृत्यु १९३७.

रूसो-जर्मन मैत्रीची घोषणा:



जर्मन परराष्ट्रमंत्री हर व्हॉन रिबेनट्रॉप
सर्वाधिकारी स्टालिन व रशियाचा परराष्ट्रमंत्री मॉ मोलोटॉव्ह,

यागोडाशीं मतभेद होताच जुन्या ऑगप्यूवरचा स्टालिनचा विश्वास उडाला. यागोडा मृत्युमुखीं पडला व येशाव्हच्या मदतीनें त्यानें नव्या ऑगप्यूची उभारणी केली. येशॉव्हची पोलिसच्या मुख्य अधिकारपदावर स्थापना केल्यावर त्याने आपलें सारे सहकारी हाताशीं घेतले जुन्या ऑगप्यूची अर्थातच हळूहळू वासलात लागली. मात्र नवीन ऑगप्यूवर लाल लष्कराचा दाब नसल्यामुळें त्याच्यात आपसात खटके उडू लागलेले पाहाताच, स्टालिननें आपल्या पाठीमागे भक्कम लष्करी यंत्राची उभारणी केली यागोडाच्या कारकिर्दीत ऑगप्यूवर लाल सैन्याच्या बळाचा दाब होता, त्यामुळे ऑगप्यू शेफारून जाण्याची भीति नव्हती. परतु यागोडा-नतर तो जमाना पालटला नि त्यामुळें स्टालिनला लाल लष्कराच्या साम-र्थ्याकडे धाव घ्यावी लागली.

किरॉफच्या खुनानतर ट्रॉट्स्कीवादाचा मेलेला मुडदा गाडण्याची मोहीम सुरू झाली कोण जाणे, जगातील सारी फितुरी, सारा विश्वासघात नि हरामखोरी रशियात त्या काळीं एकवटली असेल! तेव्हा या फितु-रीचा, विश्वासघाताचा नि हरामखोरीचा पुरा नायनाट करणं स्टालिनला अत्यावश्यक वाटणं साहाजिक होते!! आणि त्यासाठींच त्यानें हा एक नरमेध आरंभिला—कदाचित् लेनिन या प्रसंगीं जिवत असता तर ‘इंद्राय तक्षकाय स्वाहा’ असा मंत्र जपून स्टालिनने त्याचीहि आहुति दिली असती की काय, अशी शंका मनात डोकावून गेल्यावाचून राहात नाही!

त्या सुमाराला जगाला आश्चर्याचा धक्का देणारें वृत्त एके दिवशीं वृत्त-पत्रात प्रकट झाले. ‘रशियात राष्ट्रद्रोहाचा खटला!’ मथळे सर्वत्र दिसत होते

त्यातील पहिला सुप्रसिद्ध अभियोग जून १९३६ मध्यें न्यायालयात आला झिनोव्हिफ, कामनेफ आदि १४ आरोपी त्यात होते पैकी १२ जणांनीं कबुलीजबाब लवकर दिले, दोघेजण बधेनात. स्मॅचकॉव्हस्की हा तर मुळींच दाद देईना. परतु स्टालिनला तर सर्व आरोपींवर एकदम अभियोग

सुरू करावयाचा होता. तेव्हां स्लाउटस्की या ऑगप्यू अधिकाऱ्याकडे त्याचा कबुलीजबाब घेण्याचें काम सोपविण्यात आलें. स्लाउटस्कीनें एकूण ९० तास म्रॅचकॉव्हस्कीची कसून तपासणी केली. त्या अवधींत सतत तीन दिवसपर्यंत म्रॅचकॉव्हस्कीला क्षणभरहि झोंप घेऊं देण्यात आली नाहीं. स्वतः स्टालिननें म्रॅचकॉव्हस्कीला अधिकारपदाचें आमिषहि दाखविलें होतें म्हणतात, पण तें निष्फळ ठरलें.

अखेर सोव्हिएट राज्यसत्ता चिरस्थायी करण्यासाठीं हा आत्मत्याग करावा लागत आहे, याच जाणिवेनें म्रॅचकॉव्हस्की व स्मर्नाव्ह या दोघांनीहि कबुलीजबाबावर स्वाक्षऱ्या केल्या झिनोव्हीफ आणि कॉमनेव्ह यांच्यावर अभियोग करण्यापूर्वी स्वत. स्टालिननें त्यांच्याशीं बोलणें करून त्याबद्दल त्यांची मान्यता मिळविली होती असें क्रिव्हिटस्की म्हणतो

इंग्लंडमध्यें रशियाचा वकील म्हणून काम केलेला सोकोल्निकॉव्ह याच्यावर ' गुप्त हेर ' असा आरोप ठेवण्यात येऊन त्याची वासलात लावण्यात आली

जगापुढे अत्यंत पद्धतशीर रीतीनें मांडण्यात आलेले असे एकूण तीन अभियोग ( किंवा त्यांची नाटकें ) अनुक्रमें ऑगस्ट १९३६, जानेवारी १९३७ नि मार्च १९३८ मध्यें मॉस्कोच्या (अ-) न्यायालयात चालविण्यात आले.

दुसऱ्या अभियोगातील १७ आरोपींपैकीं राडेक सोकोल्निकॉव्ह आणि इतर आरोपी यांच्याकडून 'कबुलीजबाब' घेण्यासाठीं ऑगप्यूच्या दोन अधिकाऱ्यांची नेमणूक झाली होती त्या दोन अधिकाऱ्यांचीच तेवढी शिक्षा कमी होऊन अखेर बाकीच्या सर्वांना बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडावें लागले

जून १९३७ मध्य गुप्त चौकशी होऊन लाल सैन्यातील आठ प्रमुख सेनाधिकाऱ्यांची परलोकीं पाठवणी करण्यात आली जुलै १९३७ त सात प्रमुख कॉकेशियन बोल्शेव्हिकांना गोळ्या घालून मोक्षाला धाडण्यांत आलें त्यानंतर पांच महिन्यांना आणखी आठ बोल्शेव्हिकांची हीच वाट

लागली. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यापैकी एकानेंहि कबुलीजबाब दिलेला नव्हता.

अल्पायुषी हंगेरियन लोकसत्ताक राजवटीचा सूत्रचालक बेलाकुन यानें हंगेरियन लोकसत्तेच्या नाशानंतर रशिया गाठला. अल्पकाळातच कॉमिंटर्नचा तो एक प्रमुख कार्यकर्ता म्हणून ओळखला जाऊं लागला. तथापि ह्या दुर्दैवी पुढाऱ्यावर 'जर्मन गुप्त हेर' असा ठपका ठेऊन मे १९३७ मध्यें स्टालिनच्या सत्रात त्याचा स्वाहाकार झाला. मॉस्कोमधील कारागृहाचें तत्कालीन स्वरूप महाभयंकर होतें; तथापि अनंत हालअपेष्टा व यातना सोसूनहि कबुलीजबाब नाकारणारे असे कांहीं लोक येथें निघालेच. त्यांत आरमार खात्याचा मुख्य मुक्लेव्हीच व बोल्शेव्हिक मध्यवर्ती समितीचा एक सभासद नोरीन आणि बेलाकुन हे प्रमुख होते.

## कबुलीजबाब कां दिले ?

सोव्हिएट यूनियन उलथून पाडण्याचें कारस्थान केल्याची कबुली फक्त ५४ आरोपींनींच दिली, परंतु सहस्रावधि कम्युनिस्ट चौकशीविनाच लाल सैनिकांच्या गोळ्यांचें भक्ष्य बनले. महत्त्वाचे असे तीन अभियोग व त्यांच्या चौकशा—अगर चौकशीचीं प्रहसनें—जगापुढें आलीं, परंतु असे कितीतरी महान् क्रांतिकारक पुढारी वा पांथिक होते कीं, ज्यांना या विसाव्या शतकांत देखील चौकशीचीहि सवलत न मिळतां प्राणास मुकावें लागलें ! बोल्शेव्हिकांच्या एकूण सहा तुकड्यांचा भल्याबुऱ्या मार्गांनीं नाश करण्यांत आला, त्यापैकीं तीन तुकड्यांतील लोकांनीं कबुलीजबाब मान्य केले. बाकीच्या तीन तुकड्यांची 'गुप्त चौकशी' झाली असावी !

ऑगप्यूचा अध्यक्ष यागोडा याचा एका काळीं "क्रान्तीची तळपती तलवार", "सोव्हिएट राजवटीचा मार्गदर्शक दीप" असें म्हणून गौरव करण्यांत येई, परंतु त्याच यागोडाच्या कपाळीं कांहीं महिन्यांच्या अवधींत "सोव्हिएट जनतेचा वैरी" म्हणून गुन्हेगाराच्या पिंजऱ्यांत उभें राहाण्याची पाळी आली, नि अखेर त्याला मृत्यूला कवटाळावें लागलें.

यागोडा गेला नि त्या स्थानीं येझॉव्ह आला. दुर्दैवानें त्याचीहि

कारकीर्द अल्पायुषी ठरली त्याची छायाचित्रे सार्वजनिक ठिकाणीं झळकूं लागलीं, लोक त्याला डोक्यावर घेऊन नाचले पण अखेर एके दिवशी सोव्हिएट न्यायदेवतेनें त्यालाहि मृत्यूची शिक्षा सांगितली ! ( किंवा तो 'गुप्त' झाला म्हणतात ! ) गुप्त हेर खात्याच्या अधिऱ्यांकाची ही अशी वासलात लागली

ज्या लाल सैन्यावर स्टालिनची सारी भिस्त, त्याच्या अधिकाऱ्याच्याहि नशिबीं याहून दुसरें वैभव नव्हते !

१९३६ सालीं 'आर्मी मार्शल' हा नवा हुद्दा निर्माण करण्यात आला लाल सैन्याच्या मुख्याधिपतीचे हें स्थान होतें ट्रॉट्स्कीच्या अभिजात लष्करी संघटनाचातुरीने निर्माण केलेल्या लाल लष्करांचे एकामागून एक असे पांच सेनापति झाले व्हॉरॉशिलॉव्ह, तुकाचेव्हस्की, येगोरोव्ह, ब्लूशर आणि बुडेनी त्यांपैकीं तुकाचेव्हस्की व येगोरोव्ह यांना परलोकचा रस्ता सुधारावा लागला ब्लूशर निर्वासित झाला बुडेनी बेपत्ता ठरला, आणि व्हॉरॉशिलॉव्हच्या आयुष्याचे तारू १९४० सालापर्यंत स्टालिनच्या कृपासागरावर तरंगताना दिसले

१९३७ च्या जूनमध्ये तुकाचेव्हस्की व लाल सेनेचे इतर कांहीं अधिकारी यांच्यावर 'नाझींचे हेर' असल्याचा आरोप ठेवून त्यांना गोळ्या घालण्यात आल्या

याखेरीज शेकडो वृत्तपत्रकार, लेखक, साहित्यिक, प्राध्यापक, राजकारणी मुत्सद्दी नि एकनिष्ठ कम्युनिस्ट, सोव्हिएट राजवटीचे विद्रोही ठरले नि अर्थातच त्यांची या ना त्या रीतीनें वासलात लागली सहस्रावधि जुन्या नव्या बोल्शेव्हिकांची सररहा कत्तल करण्यांत आली "रशियातील प्रत्येकजण एक हेर तरी किंवा देशद्रोही तरी असला पाहिजे" या संशयपिशाचानें स्टालिनला ग्रासून टाकलें होतें, असें वर्णन मि लुई फिशर यांनी केलें आहे या शुद्धीकरण—हवनकुंडांत ज्यांची आहुति पडली त्यांच्या मुलाबाळांची स्थिति अति केविलवाणी झालेली असून दारिद्र्य, असहाय जिणें नि पोरकेपणा हेंच त्यांच्या वाट्याला आलेलें आहे.

मजा अशी कीं, यापैकीं जे जे लहानमोठे अधिकारी स्टालिनच्या या साफसफाईला बळी पडले, त्यातील बहुतेकानी आपल्या हातीं सत्ता असता या अनन्वित प्रकाराना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष साहाय्य केलें–नव्हे गुन्हेगाराच्या यातना अधिक वाढविण्यासाठीं नवनवीन शोध लावले होते, नवनवीन तंत्रें उपयोगात आणलीं होतीं ! मग त्याचीं हीं कृत्यें स्टालिनला प्रसन्न करून आपला जीव वाचविण्यासाठी किंवा उत्कर्ष संपादण्यासाठी असोत, किंवा सोव्हिएट राजवटीला चिरस्थायी स्वरूप यावें या प्रामाणिक नि सात्त्विक इच्छेने त्यानी तीं केलेलीं असोत तथापि त्यानीं संशोधिलेल्या, उपयोजिलेल्या नि ठरविलेल्या सर्व न्यायावाईट साधनाचा उपयोग त्याच्यावरील जुलमातच्च झाला नि त्यानीं निर्माण केलेला हा भस्मासुर त्याच्यावरच उलटला हा खरोखर दैवदुर्विलास आहे.

वरील प्रकारचे अनेक प्रसग तत्कालीन इतिहासात घडून आले. त्यांपैकीं जगद्विख्यात साहित्यिक मॅक्झिम गॉर्की याच्यावरील विषप्रयोगाची हकीगत अत्यत भीषण, रोमांचकारी नि अद्भुत अशी आहे ' ऑगप्यूचा एकेकाळचा मुख्याधिकारी यागोडा यानेंच हें कृत्य केले असे म्हणतात [1]

१९३७ च्या मार्च महिन्यात कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति मडळाची बैठक भरली होती. त्या बैठकींत स्टालिनने ' पक्षा ' च्या शुद्धीकरणाची आवश्यकता प्रतिपादन केली, तेव्हा प्रत्येकजण एकमेकावर घसरू लागला. ऑगप्यूचा माजी मुख्याधिकारी यागोडा याच्यावर नाही नाहीं ते आरोप करण्यात आले. त्यानतरच्या पक्षाच्या दुसऱ्या एका बैठकीत कम्युनिस्ट इटरनॅशनलचा एक भूतपूर्व अध्यक्ष बुखारिन व सोव्हिएट रशियाचा पतप्रधान रायकॉव्ह ह्याना आणण्यात आले होते बुखारिननें आपल्यावरील आरोप असत्य असल्याविषयीं अत्यत कळकळीचे व हृदयद्रावक भाषण तेथे केलें. परतु " तुमच्या निर्दोषीपणाचा पुरावा आणा " असे

१ रोमाँ रोलाँ या फ्रेंच लेखकाला या दुर्घटनेची पूर्ण माहिती आहे असे E H Carr याचे म्हणणे आहे.

म्हणून स्टालिननें त्याची परत कारागृहाकडे पाठवणी केली.

मार्च १९३८ मध्यें जगप्रसिद्ध ' राष्ट्रद्रोही ' अभियोगाच्या चौकशीला मॉस्को येथें प्रारंभ झाला हा प्रकटपणें झालेला शेवटचा—आतापर्यंत—अभियोग. बुखारिन, रायकॉव्ह इत्यादि प्रमुख २१ बोल्शेव्हिक गुन्हेगार म्हणून या अभियोगात गोवण्यात आले होतें ह्यापैकीं बहुतेक सर्व बोल्शेव्हिक राज्यकारभारात महत्त्वाच्या जागावर काम केलेले, निदान क्रांतीचे एकनिष्ठ पायिक होते. ह्यांचे कबुलीजबाब मिळविण्यासाठीं एक वर्षपर्यंत चौकशीचें काम रेंगाळत ठेवण्यात आलें होते.

या थोर थोर पुढाऱ्यांपैकीं प्रत्येकजण जेव्हा न्यायासनासमोर येई नि आत्मनिंदेचें कल्पनातीत प्रदर्शन करी, तेव्हा आश्चर्याला पारावार राहात नसे क्षमायाचनेसाठीं स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धिशीं इतके विश्वासघातकी ठरतील असे हे गुन्हेगार ' खासच नव्हते—आणि शिवाय स्टालिनच्या पाषाणहृदयत्वाची पुरेपूर जाणीव या सर्वांना नव्हती असें म्हणवत नाही. ' आम्ही सोव्हिएट राजवटीशीं विश्वासघातकी वर्तन केलेलें आहे. आम्ही बोल्शेव्हिक क्रान्ति उलथून टाकण्यासाठीं कट केले अमकातमका कारखाना उडवून देण्यासाठी कारस्थान रचलें. आम्ही सोव्हिएट राष्ट्रसंघाचे शत्रु आहोंत.' अशासारखीं वाक्यें रशियन राज्यक्रान्तींतील रथी—महारथींच्या तोंडून बाहेर पडल्याचें जेव्हा जगाला सांगण्यात आलें, तेव्हा ते ऐकून जगाला आश्चर्याचा भयंकर धक्का बसला.

या अनेक रहस्यमय नि भीषण अभियोगात अनेक लहानमोठ्या आरोपींनी आपल्यावरील आरोपांना मान्यता का दिली, हा प्रश्न मोठा गूढ आहे. या कबुलीजबाबाच्या प्रकरणात ज्याचा विशेष निकटचा संबंध होता अशा जनरल क्रिव्हिटस्कीचें या रहस्याबाबत काय म्हणणें आहे तें पाहणें आवश्यक व वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारें असलें पाहिजे.

ज क्रिव्हिटस्की लिहितो: " या सर्व अभियोगात आरोपी, न्यायाधीश अगर सरकारी वकील या नात्यानें भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा या अभियोगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन राजकीय होता. ध्येय साध्य करण्या-

साठीं कोणतेंहि साधन वापरण्यास प्रत्यवाय नाहीं असें बोल्शेव्हिक मानतात. राजकीय लढ्यात केलेलीं खोटीं विधानें लढ्याचें एक विशिष्ट तत्र या नात्यानेंच समजलीं जातात. या अभियोगाशीं संबंध असणारी प्रत्येक व्यक्ति वरील मनोभूमिकेनेंच त्यात भाग घेत होती, व पक्षाशीं निकटचा संबंध असणारी प्रत्येक व्यक्तिहि या अभियोगाकडे त्याच दृष्टीनें पाहात होती."

"या आरोपींपैकीं प्रत्येक स्टालिनविरोधी लढा चालवून अपयशाचा धनी झाला होता. 'स्टालिन क्रूर आहे, पण दुसरा मार्ग नाहीं' असे उद्गार त्याच्या तोंडून निघत त्या उद्गारात निरुत्साह भरलेला स्पष्ट दिसे, पण— त्यात मत्सर, द्वेष ही भावना मात्र नव्हती. त्याचा हा उदारपणा लक्षात घेण्यामारखा आहे."

या असंख्य 'गुन्हेगारां' नीं कबुलीजबाब कां दिले याला इतरहि अनेक कारणें आहेत.

ऑगप्यूकडून होणाऱ्या यातना सहन करण्याइतकी मानसिक वा शारीरिक शक्ति त्यांच्यात शिल्लक उरलेली नव्हती. आपण मरणार हें ठरलें तर निदान आपल्या नातेवाईकांना तरी हालअपेष्टा भोगाव्या लागूं नयेत, हाहि उद्देश या कबुलीजबाबात होता.

हे कबुलीजबाब घेण्याचें ऑगप्यू-तंत्र रोमांचकारी नि भीषण तर खरेंच; परंतु त्यात ऑगप्यूच्या बुद्धिमत्तेचेंहि कौशल्य कल्पनातीत दिसून येतें! आणि या रशियन क्रांतिकारक अभियोगातील अत्यंत दुर्दैवी प्रकार म्हणजे हा कीं, कबुलीजबाब घेऊनहि, क्षमापत्रावर स्वाक्षरी उठवूनहि अखेर त्या आरोपींची कत्तल होणें चुकावयाचें नाहींच!

स्टालिनच्या हस्तकानीं या आरोपींच्या गतायुष्याची नोंद ठेविली होती, तिचा उपयोग चौकशीसाठीं करण्यात आला. अशा एकाद्या अभियोगापूर्वी त्याची कुणकुण कानावर येई आरोपींपैकीं कांहीं माफीचे साक्षीदार म्हणून पुढें आणले जात आणि मग चौकशी सुरू होई.

डोळे दिपविणाऱ्या नि आगीची लाही करणाऱ्या अत्यंत प्रज्वलित अशा विद्युत्प्रकाशाचा झोत सतत ५०–५५ तास आरोपीच्या डोळ्यावर

पाडणें, २०—२० तास चौकशीसाठी त्याला उभें करून ठेवणे, इत्यादि प्रकार मासल्यादाखल सांगता येतील

" तू हेर आहेस हें मान्य कर " आरोपीला प्रकाशाच्या स्रोतासमोर उभे करून आज्ञापिण्यात येई

" पण तें खरे नाही ! " एखादा धीट आरोपी उत्तर देई

" परंतु, आम्ही सांगतों ना तें खरें आहे म्हणून ! पुरावा आहे आमच्याजवळ. " त्यानंतर शिव्यांची लाखोली नि प्रश्नांचा भडिमार हाच प्रकार सर्वत्र चालावयाचा.

बोल्शेव्हिक पक्षाचा एक जुना सभासद ' या नात्याने या कबुलीजबाबाच्या रहस्याविषयीं ज क्रिव्हिट्स्की याने जो अभिप्राय व्यक्त केला आहे तो विशेष उल्लेखनीय वाटतो तो लिहितो " आपले हे कबुलीजबाब राजकारणाचे दृष्टीने सोव्हिएट रशियाच्या अंतिम कल्याणाचे आहेत असेच त्या प्रत्येक हाडाच्या बोल्शेव्हिक आरोपीला वाटत असले पाहिजे आपण शेवटचा श्वासोच्छ्वास करीपर्यंत पक्षाचें हित पाहिले, मरणाच्या द्वारीं उभा असतानासुद्धा सोव्हिएट रशियासाठींच लढलो असे त्याना जगाला दाखवून द्यावयाचे असावें ते सर्व कसलेले नि मुरलेले बोल्शेव्हिक होते, क्रांतीसाठी त्यांनी आपल्या रक्ताचे पाणी नि हाडाचीं काडें केलीं होतीं. "

## हत्याकाण्ड समर्थनार्ह आहे !

रॉलिटा फोर्ब्ज या इंग्लिश विदुषीनें स्टालिनची एकदा भेट घेतली होती नि त्या प्रसंगीं तिनें स्टालिनला या हत्याकांडासंबंधीं प्रश्न केला त्यावर त्या पाषाणहृदयी जॉर्जियननें शांतपणें उत्तर केले ' आमचे कार्य सर्व मानवजातीच्या हिताचे आहे त्या दृष्टीनें ही नुकसानी काहीच नाहीं "

लेनिनग्राडमधील एका ऑगप्यूच्या अधिकाऱ्याला एका रात्रीं एकाएकी पकडण्यात येऊन त्याला सहा आठवडेपर्यंत कारागृहांत डांबण्यात आलें होतें वस्तुत• हा अधिकारी स्टालिनच्या विश्वासातला पुढें जेव्हा त्याची मुक्तता करण्यात आली तेव्हा स्टालिनने त्याला भेटीला बोलाविलें व

' मित्रत्वा ' च्या नात्याने तो त्या अधिकाऱ्याला म्हणाला, " अरे, मी वाटेल त्यावर विश्वास टाकला असता तर तुला मी आज जिवत दिसलो नसतो. प्रथम कृति करून नतर पाहिजे तर प्रश्न विचारावयाचे असा माझा शिरस्ता आहे मी स्वत सबधी मुळीच काळजी करीत नाही. पण मी नाही म्हणजे रशियाहि नाही हे लक्षात ठेव. " हा प्रसग मोठा मार्मिक असून स्टालिनच्या विचारप्रणालीचे सूत्र लक्षात आणून देणारा आहे हत्याकाडाच्या रहस्याचा उगम या त्याच्या स्वतःविषयीच्या कल्पनेत तर नसेल !

तथापि मी या क्रूर हत्याकाडाचे एका दृष्टीने समर्थन करतो—हो, समर्थन करतो हे हत्याकाड न होते तर स्टालिन आज रशियाच्या सर्वाधिकारपदावर—नव्हे, या जगावर राहाता किंवा नाही याबद्दल शका वाटते राजकारण हे असेच न्यायनिष्ठुर आहे ! ' शत्रूविषयी अतःकरणात दया' बाळगणाऱ्या महाभागाचे राजकारण आत्मघातकी असते. ते राष्ट्राचा नाश करते, हा एक प्रकार आज विसाव्या शतकात दिसतो बरोबर त्याच्याच विरुद्ध हा दुसरा प्रकार पहा—' मित्राविषयीहि अतःकरणात कठोर कर्तव्यान्वित द्वेष ' बाळगणाऱ्या भाई ' चे हे राजकारण आज या विसाव्या शतकात रशियासारख्या अफाट देशात विजयी ठरल आहे त्याचे चिरस्थायित्व कितपत राहील हा प्रश्न निराळा ! पण आज तरी ते जिवतपणाने—नव्हे इग्लड—अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राना आव्हानीत ताठरपणाने उभे आहे कोण विचारतो तुमच्या दया—माया—प्रेम या भावनाना ? एका हातात तिखट खड्ग नि दुसऱ्या हातात आपल्या जगत्संहारक निसर्गविरुद्ध तत्त्वाचा भेरगी जुडगा घेऊन सैतानासारखा धावणारा हा जॉर्जियन पाहिला, की एका हातात विध्वसक मतप्रणालीचा विषारी साठा धरून इतस्तत थैमान घालणाऱ्या महमदाची आठवण झाल्यावाचून राहात नाही !

तेव्हा हे राज्ययत्र सुरळीत चालावे, समाजसत्तावादी किंवा बोल्शेव्हिझमवर आधारलेल्या तत्त्वावर उभारलेला हा रशियाचा डोलारा अधिक

काळ उभा राहावा, म्हणून स्टालिननें हें हत्याकांड केलें. त्यात त्याच्या दृष्टीनें—राज्यकर्ता या नात्यानें त्याने कांही चूक केली नाहीं ट्रॉट्स्की अगर अन्य कोणी त्या वेळीं अधिकारावर असता तरी त्याला हेंच करावें लागलें असते स्टालिनला प्रामाणिकपणें वाटत आहे कीं, रशिया उन्नत व्हावा, मी त्याचा सर्वाधिकारी असावे. बस्स, एवढें एकच ध्येय त्याच्या डोळ्यापुढें आहे नि होतें. जगत्क्रांतिवाद कोठच्या कोठें वाहून गेलेला आहे आणि तो वाहून गेला म्हणूनच आज रशिया हें एक प्रभावशाली राष्ट्र म्हणून जगात उभें राहू शकतें —आणि तो वाहून जावा, म्हणजेच रशियात चढाऊ राष्ट्रवाद निर्माण व्हावा, यासाठींच स्टालिननें हा नरमेध केला त्या नरमेधात बळी गेले ते जगत्क्रांतिवादी होते—अतएव रशिया या राष्ट्राच्या राष्ट्रीयत्वावर घाला घालणारे होते. म्हणून त्यांची आहुति पडली अर्थात सुक्याबरोबर ओलें हे जळावयाचेंच ! परंतु रशियन राष्ट्र ' राष्ट्र म्हणून जगविण्यासाठीं स्टालिनला हे हत्याकांड करणें आवश्यक होतें.

---

# अपूर्व राज्ययंत्र

" रशियाचा सर्वाधिकारी " या शब्दांना आता आख्यायिकेचें स्वरूप धारण केलें आहे, त्याचें—स्टालिनचें नांव म्हणजे एक असें एक चिन्ह आहे कीं, ज्यासाठीं तेथील माणसें लढतात नि मरतातहि "

मि. ग्रेगरी ग्रीनस्टॉक या लेखकानें रशियाच्या हुकूमशहाविषयीं काढलेले वरील उद्‌गार यथार्थ नाहींत काय ?

' इझवेस्ता[1] ' या सोव्हिएट मुखपत्रांतील एक गोष्ट वरील विधानाची सार्थकता सहजतेनें पटवू शकेल.

एकदा शेतकऱ्याच्या दोन मुली शेतावरील आपलें काम उरकून घराकडे परतत होत्या मजेंत गप्पागोष्टी चालल्या होत्या दोघींच्या. एकजणीनें दुसरीला विचारलें, " मला स्टालिनला पाहाण्याची अनिवार इच्छा झाली आहे: कधीं पुरी होईल का ही माझी उत्कंठा ? "

त्यावर दुसरी हसून उत्तरली, " हत् वेडे, अग स्टालिन तर आपल्याबरोबरच आहे नेहमीं ! आत्ता तो आपल्याला पाहात असून आपल्या

१ इझवेस्ता—५ ऑगस्ट १९३९.

गप्पागोष्टींत सामील झालेला आहे फार काय, तू, मी, सर्वजण स्टालिनच आहोंत. स्टालिन म्हणजेच सर्व काहीं !"

मि ग्रेगरी बीनस्टॉकनें स्टालिनच्या यशाचें मर्म म्हणून सांगितलें आहे,–"मार्क्स नि एंजल्स हे ईश्वरी पुरुष होते; लेनिननें ऐहिक सामर्थ्याचें खड्ग हातीं घेतलें होतें. तर स्टालिननें या दोन्ही साधनांचें एकत्रीकरण केलें आहे. भौतिक शक्तींच्या सपन्नतेबरोबरच दैवी अवडंबराचें वलय त्यानें स्वतःभोंवतीं निर्माण करून ठेविलें आहे "

हिटलरला जर्मनींत 'फ्यूरेर' म्हणतात तसें रशियन सर्वाधिकाऱ्याला व्होझ्द' ( Vozhd ) या नावानें संबोधिलें जातें त्याची व हिटलरची राज्यपद्धति बरीच एकसारखी दिसते हिटलरचें एक प्रसिद्ध वाक्य आहे. "परमेश्वर सत्य व असत्याचा निर्णय देऊं शकतो, जनता हाच परमेश्वर आहे;—त्या जनतेनें हिटलरला म्हणजे मला आपला प्रतिनिधि नेमला आहे,— म्हणून मी परमेश्वर आहें" किती बेमालूम युक्तिवाद ! तसेंच स्टालिनचेंहि "रशिया म्हणजेच मी" हें त्याचें ब्रीदवाक्य. यालाच निरनिराळ्या नावानें Prolaterian Dictatorship अगर कामगारी सर्वाधिकारित्व असें म्हणतात

## बादशाहा औरंगजेबाची प्रतिकृति

परंतु स्टालिनचें नांव काढताच माझ्या डोळ्यांपुढें मात्र चटकन् जर कोणी उभा राहात असेल तर तो जुलमी मोगल सम्राट औरंगजेब. एका साच्यांतून काढावे तसे दिसतात दोघेहि ! तो मोगल नि हा जॉर्जियन एवढाच फरक तरीहि फार मागें गेल्यास त्यांचें मूळ रक्त एकच सापडतें. दोघांतील पहिली नि तंतोतंत साम्याची जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे त्यांच्या मनांतील संशयपिशाच्चाचें भयंकर थैमान लेनिननंतर रशियन लोक स्टालिनसंबंधीं यथार्थतेनें ( अर्थात् कोणा ऑगप्यूच्या हस्तकाला न कळेल अशी पूर्ण दक्षता घेऊन ) म्हणतात, "लेनिनचा विश्वास स्टालिनवर, पण स्टालिनचा मात्र कोणावरच नाहीं."

त्याची शरीररक्षणाची कडक व्यवस्था लक्षांत घेतली तरी त्याच्या'

या विलक्षण संशयी वृत्तीची कल्पना येऊ शकेल. 'शुद्धीकरण' करताना त्यानें जी लहानमोठ्या बोल्शेव्हिकाची नि कम्युनिस्टांची सररहा कत्तल केली, त्यामागे हाच संशयाचा समध दडलेला होता; नि अजूनहि त्यानें स्टालिनची मानगूट पूर्णपणें सोडली असेल असे म्हणण्याचे धाडस करवत नाही त्याच्या प्रत्येक सहकाऱ्याच्या खोलींत बसविलेले डिक्टोफोन हें त्याचेंच प्रतीक औरंगजेबाची क्रूरता, पाताळयंत्री कारस्थानें, क्वचित गबाळेपणात जमा होणारा साधेपणा, आपल्या वरचढ कोणी होऊं नये याविषयीं त्यानें घेतलेली दक्षता, निष्ठुरता, हे आणि इतर अनेक गुण (!) स्टालिनमध्येंहि तितक्याच उत्कटत्वानें वसत असलेले दिसतील. औरंगजेबाचें त्याच्या रोशनआरा या मुलीवर कमालीचें प्रेम होतें, तसेंच स्टालिनहि आपल्या स्वेटलाना या एकुलत्या एक मुलीवर प्राणापलीकडे प्रेम करतो. आपल्या विरोधकांचा परस्परात भांडणें लावून 'फोडा नि झोडा' या तत्त्वावर औरंगजेबानें गादी बळकावली, तीच स्थिति स्टालिननें ट्रॉट्स्कीप्रभृतींशी झगडताना निर्माण करून आपलें आसन बळकट नि स्थिर केलें मराठ्यांचा राजा संभाजी याला विश्वासघातानें पकडवून त्याचा वध करणारा नि त्या वीराला पकडून देणाऱ्या फितूर कबजीला हत्तीच्या पायीं देणारा औरंगजेब आणि येझॉव्हकरवीं यागोडा याचा खून करवून अखेर येझॉव्हलाहि गोळ्या घालून ठार करणारा स्टालिन याचें साम्य इतिहासात मोठें उठून दिसतें स्टालिनच्या ठिकाणीं कलात्मक वृत्तीचा संपूर्णतः अभाव दिसून येतो, नि संगीताची प्रेतयात्रा काढणाऱ्या औरंगजेबाची अरसिकता भारतीय इतिहासाशीं परिचय असणारांना वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. बुद्धिमान, धूर्त, आतल्या गाठीचा, मितभाषी, आपलें मत सहसा बाहेर प्रकट न करणारा हें औरंगजेबाचे वर्णन स्टालिनला बहुतेक अशीं लागू पडण्यास प्रत्यवाय नाहीं

औरंगजेबाशींच तुलना पुढे चालवावयाची म्हटली तर एका कटु सत्याकडे, अप्रिय भविष्यत्कालाकडे डोळेझाक करता येणार नाहीं. 'औरंग-

जेबानें स्वार्थासाठीं वा बादशाही आसनाच्या स्थिरतेसाठीं आपल्या भावाची नि बापाची, मित्राची नि सहकाऱ्याची, स्वजनाची नि शत्रूची सररहा कत्तल केली तो इतिहास अति भयंकर दुर्घटनांनी खचून भरलेला आहे. त्याच इतिहासाची पुनरावृत्ति स्टालिननें रशियाच्या भूमीवर घडविली. औरंग-जेबाच्या मनःपात्याला जसे सारेच जण विश्वासघातकी नि गुप्त शत्रु दिसत. तसेच स्टालिनला त्याच्या आसपास वावरणारा प्रत्येक जण एक हेर तरी किंवा देशद्रोही तरी असला पाहिजे, या संशयानें ग्रस्त केलेले असते —आणि औरंगजेबाच्या त्या संशयीपणाचा परिणाम पुढें फार घातकी ठरला

औरंगजेबानें आपले सहकारी नि कर्तबगार सेनापति यांना या ना त्या रीतीनें परलोकाची वाट दाखविल्यानें दक्षिणेत चिवट मराठ्यांशीं लढताना त्याच्यापाशीं समर्थ, अनुभवी नि कुशल सेनानी शिल्लक उरले नाहींत. जे जे काहीं पडेल तें त्याला स्वतःला करावें लागे. त्यामुळे अखेर अपयश पदरी घेऊन निराशेने त्यानें दक्षिणेतच प्राण सोडला त्याच्यामागें दिल्लीचें विस्तृत साम्राज्य तोलून धरील असा कोणीहि बलशाली पुरुष त्यानें निर्माण केलेला नव्हता, वा होते त्याचा संहार केला होता, त्यामुळें औरंगजेबाच्या पश्चात् एवढी मोठी, प्रचंड मोंगल बादशाही हां हां ढासळून पडली, मातीला मिळाली. कोण जाणे स्टालिननंतर या अफाट रशियन राज्याचें काय व्हावयाचें आहे ते ! स्टालिनने केलेल्या क्रूर शिरकाणात अनेक कुशल अर्थशास्त्रज्ञ, समर्थ सेनानी, विद्वान साहित्यिक, महान् संशोधक, एकूण राज्ययंत्राचे आधार असे सर्वच सररहा बळी पडले चिमकुल्या फिनलंडशीं लढताना एवढ्या बलशाली समजल्या जाणाऱ्या सोव्हिएट यूनियनला नाकीं नऊ यावे ही गोष्ट काहीं मोठीशी भूषणास्पद नव्हे आणि त्याचे कारण एकच—स्टालिननें रशियात आपल्याखेरीज कोणीहि प्रभावी व्यक्ति जिवंत ठेविली नाहीं. जे शिल्लक उरलेले दिसतात ते सर्व होयबा नि निकृष्ट दर्जाचे पुरुष आहेत स्टालिनच्या पश्चात् हे लोक सोव्हिएट युनि-यनचा अफाट व्याप सावरून धरू शकतील काय ?

## आयत्या बिळावरील नागोबा

'रशियन क्रांतीच्या आयत्या बिळावरील नागोबा' असें स्टालिनचें वर्णन एका लेखकानें केलें आहे बॉरीस सुव्हारीननें आपल्या "स्टालिन, बोल्शेव्हिझमची शास्त्रीय छाननी" या ग्रंथांत त्याच्यासंबंधीं लिहिलें आहे:
"आशिया खंडातील निर्बुद्ध पण महत्त्वाकांक्षी असा एक शेतकऱ्याचा मुलगा क्रांतीसाठीं गुप्तपणें कार्य घडविण्याकरितां पुढें आला. त्याच्या ठिकाणीं विचाराचा अभाव होता परंतु तो अविश्रांत परिश्रम करीत असे. इतर मोठमोठ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशीं सावलीप्रमाणें वावरून दुसऱ्याच्या श्रमानें घडून आलेल्या क्रांतीचें फळ स्वतःच्या पदरांत पाडून घेण्यासाठीं कारस्थानें करणारा नि झार, नेपोलियन व फॅसिस्ट हुकूमशहाचा अर्क असा सामर्थ्यसंपन्न पुरुष म्हणजे स्टालिन !"

बॉरीसचें हें म्हणणें पूर्णतः खरें नसलें तरी त्यांतील कांहीं भाग सत्य आहे. स्टालिनच्या वैयक्तिक कर्तबगारीविषयीं शंका घेणें हें अज्ञानमूलक ठरेल, तसेंच त्याच्या आजच्या व्यक्तित्वाचें सर्व श्रेय त्याच्या कर्तृत्वाला देणें हेंहि शहाणपणाचें ठरणार नाहीं.

पण एवढी गोष्ट खरी कीं, बोल्शेव्हिक 'धर्मा'चा प्रणेता म्हणून लेनिनची पूजा होऊं लागली, त्याच्या विभूतिमत्वाचा पुरेपूर उपयोग स्टालिन–कामनेव्ह–झिनोव्हीफ या प्रत्येकानें पक्षासाठीं वा स्वतःसाठीं हवा तसा करून घेतला. लाल चौकांत ठेवण्यांत आलेलें लेनिनचें सदेह स्मारक हें त्याचेंच द्योतक आहे

बोल्शेव्हिकांच्या गूढवादांतूनच स्टालिनची आजची विभूतिपूजा अपरिहार्यतेनें निर्माण झाली हें विसरतां येणार नाहीं 'स्टालिन आतां नुसता थोर पुढारी राहिला नसून त्याच्या ठिकाणीं देवत्व प्राप्त झालें आहे' असें एका अर्थानें बॉरीस म्हणतो, तें खोटें नाहीं. –आणि हिंदुस्थानांतील जनतेच्या दृष्टीनें विचार करतां त्याहूनहि एक अधिक गोष्ट घडून आली आहे–ती ही कीं, रशियन अज्ञ जनतेलाच स्टालिनच्या अद्‌भुततेंत देवपण दिसतें असें नव्हे, तर आमच्याकडील कांहीं चांगल्या

सुज्ञ नि सुशिक्षित लोकातहि स्टालिनला देव म्हणून डोक्यावर घेऊन नाचण्याची प्रवृत्ति निर्माण झाली आहे !

स्टालिन आज केवढाहि मोठा दिसत असला, तरी त्याची प्रतिभा पहिल्या दर्जाची नव्हे. विधायक प्रतिभा अगर इंग्रजीत ज्याला Creative Genious म्हणतात तिचा स्टालिनपाशीं अभाव आहे. तो स्वतः शिकलेला नसल्याने, विद्वत्तेच्या क्षेत्रात प्रवेश करून चर्चा नि तत्त्वाचा काथ्याकूट करण्याच्या भानगडीत तो पडत नसावा तसेंच त्यानें केवढीहि महनीय कामगिरी केलेली असली तरी, कांहीं अभिनव, नवीन असें त्यानें संशोधिलेले नाहीं. मुसोलिनी फॅसिझमचा प्रणेता आहे, मार्क्सनें समाजसत्तावादाच्या काहा नव्या अंगाचा शोध लाविला, पण तसे कांहींहि स्टालिननें केलेलें नाहीं, आणि म्हणून त्याचा दर्जा पहिल्या वर्गाच्या अभिजात सर्वाधिकाऱ्यात वा तत्त्ववेत्त्यात नि राजकार्यधुरधरात गणता येत नाहीं. 'बहुजनसमाजाच्या आकांक्षा जाणून घ्याव्यात नि नंतर शांतपणें स्वतःचाच निर्णय म्हणून उपदेशीत सुटावे' अशी स्टालिनची कार्यपद्धति स्टीफन ग्रॅहमने वर्णिली आहे.

प्राप्त परिस्थितींत बिनचूक पाऊल कसें टाकावे हें तो चांगलें जाणतो. मग त्या वेळीं तो आवश्यक तर गोगलगाय बनेल, हवें तर राक्षसहि होईल!

१९१७ च्या क्रांतींत त्याला जातीनें भाग घेता आला नाहीं, तेव्हा तो मागें पडल्यासारखा झाला होता म्हणून त्यानें प्रथम तत्कालीन सूत्रधार लेनिन याची दृढ कास धरली. स्वत.चे अनुयायी उत्पन्न करून त्यांना संघटित करण्याचें एक विशिष्ट तंत्र निर्माण करून त्यानें आपलें आसन हळूहळू स्थिर करून घेतलें त्याचा व्यक्तिस्वावर विश्वास नाहीं, तशीच बहुजनसमाजाच्या मतालाहि किंमत द्यावयास त्याची सिद्धता नाहीं. कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय परिषदेला 'लावोच्का' ( घाणेरड्या व अति क्षुद्र वासनांचा तळ ) असें स्टालिन संबोधित असे असें टॉट्स्की लिहितो. त्याला फक्त एकच माहित आहे—सरकारी राज्ययंत्र (State Machine). या एकाच पायावर त्याच्या यशाची, कर्तबगारीची, सर्वाधिकारित्वाची

उभारणी झालेली आहे. या राज्ययन्त्राला 'Appıatchık' म्हणतात. बोल्शेव्हिक श्रेष्ठीत लेनिन, स्वर्डलोव्ह नि झेरझिन्स्कि या तिघानतर कोणी डोळ्यात भरे तर तो स्टालिन. पाशवी सामर्थ्य, पोलादी, कणखर स्वभाव, बेडर वृत्ति याची ती मूर्ति होती. बुखारिन, कामनेव्ह, झिनोव्हीफ नुसते पडित, वाक्शूर स्टालिनची धडाडी नि राजनीति ऊर्फ पहिल्या दर्जाचे कपटपाटव त्याच्यात नव्हतें म्हणून ते चिरडले गेले ट्रॉट्स्की गोंधळला कीं फसला ? का डावपेंचात कमी पडला हे नक्की सागणें अवघड आहे, परतु तो स्टालिनवर मात करू शकला नाही. उलट तो स्वत:च हरला; आणि स्टालिन विजयी झाला सोव्हिएट यूनियनचा बलशाली सर्वाधिकारी म्हणून त्याचें नाव जगापुढे आलें.

सरकारी राज्ययंत्र म्हणजे रेसभरहि कमी न होणारा आज्ञाधारकपणा. त्या यत्राचा चालक म्हणजे सर्वाधिकारी त्यालाच तेवढी बुद्धि नि भावना; इतर घटकाना, सहकाऱ्याना, कार्यकर्त्याना वा बुद्धिमताना तेथें बुद्धि असताच कामा नये. असली तरी तिचा उपयोग सर्वाधिकाऱ्याच्या मर्जी-प्रमाणेच झाला पाहिजे. इतराना भावना असता कामा नयेत, असल्या तर हुकूमशहाच्या शब्दासाठीं त्याची होळी तत्क्षणीं पेटावयास हवी --म्हणून क्रातिवीराचें भीषण हत्याकाड झालें, नि हेहि तितकेच सत्य की--म्हणूनच रशिया जिवत राहिला म्हणूनच आज रशिया हें एक राष्ट्र आपण स्वतत्र असलेले पाहू शकतो

रॉसिटा फोर्ब्ज या इंग्लिश विदुषीनें स्टालिनची एकदा भेट घेतली होती नि त्या भेटींत स्टालिननें पुढील वाक्यें सहकाऱ्यांच्या हत्याकाडा-नतर उच्चारली असल्याचे सागतात. ही वस्तुस्थिति की सोव्हिएट प्रचा-राचा एक मासला, हे त्यांचें तेच जाणोत--पण ते उद्गार असे. "मी हुकूमशहा नाही लेनिननेंच कार्य पुढें चालवीत आहे मी थाबणे शक्य नाही व धरसोडहि योग्य नाही परतु दहावीस वर्षांत नव्या सस्कृतीची कल्पना सवाना बरोबर रीतीनें येणे अशक्य भावी युद्धाकरिता आम्ही नवीन पद्धति निर्माण आहात आजचें कार्य हा त्या आगामी सस्कृतीचा

पाया आहे पण अद्यापि कोणतीच गोष्ट पुरी वा चिरकालिक झालेली नाहीं. ”

## हें यंत्र चालतें कसें ?

सोव्हिएट रशियाचें राज्ययंत्र ही विसाव्या शतकातील एक अपूर्व चीज आहे. समाजसत्तावादातून निर्माण झालेला कामगार वर्गाच्या सर्वाधिकारित्वाचा हा भस्मासुर कामगाराच्या स्वातंत्र्यावर तर घाला घालून राहिलाच आहे, पण इतर लोकशाही राष्ट्रांत बहुजनसमाजाला जे नागरिक स्वातंत्र्याचे अधिकार उपभोगावयास मिळतात तेहि बिचाऱ्या रशियन जनतेला मिळू शकत नाहींत हिटलर नि मुसोलिनी यांच्या एकतंत्राला शिव्या देणाऱ्या आणि ब्रिटिश नि फ्रेंच लोकशाह्यांना तिरस्कारपूर्वक नाकें मुरडणाऱ्या सोव्हिएट श्रेष्ठींची राज्यपद्धति काहीं आदर्श नि अनुकरणीय नव्हे. उलट काहीं बाबतींत तिचा धिक्कारच करावा लागेल. मात्र हें सोव्हिएट राज्ययंत्र निर्माण करण्याला स्टालिनच बहुतांशी कारणीभूत आहे. विशिष्ट कार्यपद्धति, प्रचार नि दडपशाही यांतून उत्पत्ति झाली आहे या यंत्राची. अभेद्य, बळकट नि सुतासारखें चालणारें यंत्र आहे हें मि. कार यांनीं एक प्रश्न उपस्थित केला आहे कीं, ‘ हें रशियाचें राज्ययंत्र स्टालिन ही व्यक्ति चालविते, का हें राज्ययंत्रच स्टालिनला नियंत्रित करतें ’ हें एक गूढ आहे ‘ आतां शत्रुरहित अशा अत्युच्च स्थानीं जाऊन स्टालिन पोहोंचला असून त्याचें नाव नि त्याचें छायाचित्र सोव्हिएट राज्ययंत्राचा एक अत्यावश्यक भाग होऊन बसला आहे असेंहि मि कार यांनीं त्याविषयींचें आपलें मत प्रकट केलें आहे.

State म्हणजे सरकार ही संस्था नष्ट करा, असें मार्क्सचें सांगणें होतें. तर स्टालिननें बरोबर त्या उलट आचरण केलें आहे. राज्ययंत्र सुस्थिर करण्यासाठीं सरकार ही संस्था त्यानें अधिकात अधिक शक्तिसंपन्न नि आपल्या कामांत पूर्णत. निष्णात अशी बनविली आहे. ‘एखाद्या कंपनींतील डायरेक्टर्सच्या भांडवलशाही मंडळाची उपमा सांप्रतच्या स्टालिनच्या सरकारला मि. कार यानें एके ठिकाणीं दिली आहे ‘ त्यानें नोकरशाही राज्ययंत्र स्वत. निर्माण केलें असें नाहीं, तर त्या राज्ययंत्रानेंच आजचा

सोव्हिएट हुकुमशहा उत्पन्न केला ' असें म्हणून ट्रॉट्स्की एके ठिकाणीं लिहितो. "Stalin is the outstanding Mediocrity of the Soviet Bureaucracy-" सत्ताधारीवर्गाची आत्मसंरक्षक भावना स्टालिनइतकी दुसऱ्या कोणातहि उत्कटत्वानें पाहावयास मिळणार नाहीं, आणि हेंच स्टालिनच्या वर्चस्वाचें रहस्य असल्याचें ट्रॉट्स्की सांगतो.

दुबळ्या लोकशाहीबद्दल स्टालिनला तिरस्कार वाटतो आणि हुकूमशहाच्या कर्तबगारीविषयीं त्याला तितकाच आदर आहे या त्याच्या स्वभावातच त्याची हुकुमशाही प्रवृत्ति नि तीतून उद्भवलेल्या जागतिक घडामोडी यांचा उगम सापडू शकेल ब्रिटन-फ्रान्स या राष्ट्रांना वाटाण्याच्या अक्षता लावून स्टालिनने हिटलरशीं मैत्रीचा तह केला याचेंहि एक कारण या स्वभावात मिळू शकेल.

हें सोव्हिएट रशियाचें अभिनव राज्ययंत्र चालतें तरी कसें असा प्रश्न साहाजिकपणेंच अनेकांच्या उत्कंठा जागृत करीत असेल या राज्ययंत्राचा चालक १९४१ म्हणजे या वर्षाच्या मेपर्यंत त्या यंत्रावर बसलेला असे, तो आता मेच्या प्रारंभापासून यंत्राचा मुख्य भाग म्हणून यंत्रांत घेऊन बसला आहे याचा अर्थ असा–मे १९४१ पर्यंत मॉ. स्टालिन हा सोव्हिएट राज्यघटनेंत कोणत्याहि प्रत्यक्ष अधिकारावर नव्हता. कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस हा त्याचा हुद्दा असे परंतु सर्व राज्यकारभाराचा करविता, चालविता नि बोलविता धनी मात्र स्वत: स्टालिनच ! तो म्हणेल तो कायदा, सांगेल तो निर्णय, मग त्यावर कोणाचेंहि नियंत्रण नाहीं ! राज्यघटनापंडिताच्या मतें हा परम अन्याय होता आता तो अन्याय होता म्हणून वा पंडितांच्या भीतीनेंहि नव्हे, स्टालिननें सोव्हिएट राज्यघटनेतील पंतप्रधानाचें ( Chairman of the Council of the Peoples Commissars ) पद आपल्याकडे घेतलें आहे अलीकडे बराच गाजलेला मॉ मोलोटॉव्ह ह्याच्याकडेच परराष्ट्रीय खातें नि पंतप्रधानपद इतके दिवस होतें आतां त्यानें 'वारंवार केलेल्या विनंतीवरून ' त्याला त्या दुहेरी कांचातून सोडविण्यात आलें आहे, असें मॉस्को नभोवाणीनें सांगितलें

यू. एस्. एस्. आर. च्या सरकारी भाषेत बोलायचें तर 'जागतिक कामगारवर्गाचा नि यू. एस्. एस्. आर. मधील सर्व संस्थानाचा पुढारी' स्टालिन यानें १९३६ मध्यें चालू केलेली नवी राज्यघटना पूर्वीच्या धनिक किंवा भाडवलशाही राज्यघटनेपेक्षा निराळी नाही. आणि स्टालिननें आपल्या कारकीर्दीत सोव्हिएट राज्यघटनेत जो सत्य बदल घडवून आणला त्याचें स्वरूप लोकशाहीची उत्क्रांति किंवा व्यक्ति-स्वातंत्र्याची प्रगति या मापानें मोजतां येणार नाहीं. एन्. द बॅसिली यांच्या मताप्रमाणें हा केवळ स्टालिनचा वैयक्तिक सत्तासंपादनाचा स्वार्थी खेळ होता. बॅसिली लिहितात.

"Its (i. e. Stalin Constitution) profound meaning is to be found in the fact that it consecrates Stalin's victory in the struggle for personal power which he had persued for many years ... both in the country and in the party itself." [1]

ज्या कम्युनिस्ट पक्षामध्यें स्टालिनचा अनियंत्रित अधिकार चालत असे, त्या पक्षाचें एक उपांग इतकाच आता सोव्हिएट राज्यघटनेचा अर्थ आहे हें घडविण्याकरिता स्टालिननें अनेक वर्षें सतत नि मोठ्या कौशल्यानें परिश्रम घेतले होते. या पक्षाच्या पोलिट-ब्यूरोतील आता असा एकहि सभासद शिल्लक नाही की ज्याच्या हातीं सोव्हिएट राज्ययंत्रातील कसले तरी महत्त्वाचें सूत्र नाहीं. १९३५ मध्ये यू. एस. एस्. आर. च्या मध्यवर्ति कार्यकारी समितीच्या प्रेसिडियमचा एक सभासद म्हणून स्टालिनची निवड झाली. आज तो अवघ्या रशियाचा पंतप्रधान अतएव कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी शक्ति असलेला 'कामगार-राज्या' चा शास्ता नि द्रष्टा बनला आहे. अदृश्यपणें पक्षाच्या सरचिटणीशीच्या पडद्याआडून बोल्शेव्हिक विश्वाची सूत्रें हालविणारा हा शेतकऱ्या–कामकऱ्यांचा 'देव' आता प्रधानमंत्र्याच्या साकारस्वरूपात वावरू लागला आहे!

---

1 Russia Under Soviet Rule P. 186

सांप्रत ( १९३६ पासून ) रशियन राष्ट्रसंघाची सर्वोच्च प्रातिनिधिक कार्यकारी सभा म्हणजे 'सुप्रीम कौन्सिल ऑफ दि यूनियन' ( वरिष्ठ विधिमंडळ ) या कौन्सिलचे दोन भाग:— एक 'कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटीज्' आणि दुसरें 'कौन्सिल ऑफ यूनियन'. हीं समानाधिकाराचीं दोन्ही मंडळें 'वरिष्ठ विधिमंडळा'च्या कार्यकारिणीची (प्रेसिडियम ) व लोकप्रधानमंडळाची ( सोव्हनोरकोम ) निवडणूक करितात. पैकी कार्यकारिणीमध्यें एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक चिटणीस आणि २४ प्रतिनिधि असतात यांचे अधिकार धनिकशाहीमधील राजा किंवा अध्यक्ष याइतकेच अनियंत्रित आहेत लोकप्रधानमंडळहि एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, पॅन–यूनियनिस्ट नि यूनियन रिपब्लिक्स यांचे मंत्री इतक्यांचें बनविलेलें असतें

कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति समितीचें कार्य सोव्हिएट संघटनेतील मध्यवर्ति कार्यकारी समितीप्रमाणेंच चालते पक्षाचीं कार्यकारी मुख्यें तीन' ( १ ) राजकीय विभाग– ( पोलिटब्यूरो ), ( २ ) संघटना विभाग– ( ऑर्गब्यूरो ), ( ३ ) मंत्री विभाग– ( सेक्रेटेरियल ब्यूरो ) यांपैकी मंत्री विभाग म्हणजे पक्षाचा सूत्रचालक. त्यातील सभासदांची संख्या कमी-अधिक ( सांप्रत पांच ) असते त्यांपैकीं पहिला मंत्री ( किंवा पूर्वीचा सरचिटणीस ) हाच 'व्होझ्द', 'पुढारी' म्हणजे रशियाचा सर्वाधिकारी. त्याच्यावर कोणत्याहि कायद्याचें बंधन नाहीं, किंवा कोणत्याहि मतदारसंघाचें दडपण त्यावर पडूं शकत नाहीं. तसेंच कोणत्याहि न्यायालयाचे निर्णय त्याला बंधनकारक नाहीत किंवा जनतेच्या सार्वजनिक अधिकाराचाहि बंध त्याला अडवूं शकत नाहीं. फार काय, याच्या मुखातून प्रकट झालेला शब्द सरकारी कायद्यात रूपांतरित होण्यासाठीं विधिमंडळांत चर्चिण्याची सुद्धां आवश्यकता नसते पहिलें वाचन, दुसरें वाचन इ. कांहीं भानगड नाहीं. स्टालिनचा शब्द म्हणजे सोव्हिएट कायदा. या 'सर्वाधिकार'-पदावर येण्यासाठीं अंगीं कोणती योग्यता असावयास पाहिजे यासंबंधीं कोणताहि लिखित नियम नाहीं अलिखित नियम आहे तो हाच की त्यासाठीं लढून विजय पावेल त्याची ती जागा !

आपला हा सर्वशक्तिमानपणा कायम राखण्यासाठीं स्टालिनला ' प्रथम मत्री ' राहणें आवश्यक आहे तसेंच मध्यवर्ति समितिहि त्याच्याच हातीं राहिली पाहिजे ही समिति पक्षाच्या पॅन–यूनियनिस्ट कॉंग्रेसकडून निवडली जात असल्यामुळें त्या पॅन–यूनियनिस्ट मडळात आपलें विश्वासू बहुमत कायम राखावयास पाहिजे या पक्षाच्या कॉंग्रेसमध्यें बसणारे प्रतिनिधि वस्तुत प्रत्येक प्रात नि लोकसत्ताक सस्थाने यांच्या स्वतन्त्र पक्षपरिषदातून निवडले गेलेले असावेत असा कायदा आहे. परतु वस्तुस्थिति मात्र अशी कीं, या निरनिराळ्या प्रादेशिक विभागांचे प्रतिनिधि मध्यवर्ति समितीचे मत्रीच पसत करितात. ही सर्व माणसें स्टालिनच्या पुढ्यातलीं अतएव कॉंग्रेसला धाडण्यास पूर्णतः पात्र ' हाच प्रकार सर्व लहानमोठ्या ' निवडणुका ' त चालतो याशिवाय मतदारसघानीं उभ्या केलेल्या मतदाराची पात्रता–अपात्रता ठरविण्याचा अतिम अधिकार मध्यवर्ति समितीच्या हाती असतोच.

## नांव नि चित्र, व्यक्ति नव्हे !

स्टालिननें आपल्या विशिष्ट प्रचार पद्धतीनें रशियन जनतेची विचारप्रणाली मतें नि वृत्ति कशी बदलून टाकली आहे याचें उदाहरण म्हणून खाली एका पत्रातील भाग उद्धृत केला आहे ' शशेना ' या नावाच्या रशियन बाईनें हिंदुस्थानांतील आपल्या एका हिंदु मैत्रिणीला प्रस्तुत पत्र लिहिलें आहे.

" हुकुमशाहीचें प्रस्थ आम्ही रशियांत कधीहि चालू देत नाहीं, हें तुम्हाला ठाऊकच आहे परतु त्याबरोबरच राष्ट्राचा इतिहास बनविताना पुढाऱ्याना शिस्तीची आवश्यकता असते व त्या शिस्तीवर जनतेनें विश्वास ठेविला पाहिजे. पुढाऱ्यांच्या आज्ञाचा कीस काढून जर प्रत्येकाच्या स्वतत्र मताचें प्राबल्य देशात आम्ही माजविलें असतें, तर आम्हाला आमची क्रांति कधीहि यशस्वी करता आली नसती " ( २१-१-३८ 'सह्याद्रि' )

' लोकाना न आवडणाऱ्या अगर न समजणाऱ्या गोष्टींना त्यानीं कर्तव्य म्हणून मान्यता द्यावी अशी शिकवण त्यानें राष्ट्राला उत्तम रीतीनें दिली

आहे ' असे लुई फिशर[1] म्हणतो

पामीर पर्वताच्या अत्युच्च टेकडीला स्टालिन व त्याखालच्या टेकडीला लेनिन अशीं नावें दिलेलीं आहेत. शहरें, कारखाने, संस्था, कालवे नि आगगाडीचे रस्ते यांचेंहि 'स्टालिन' असें नामकरण करण्यात आलें आहे. आणि याचें कारण काय, तर आपले नाव लोकांच्या डोळ्यापुढे सतत राहिलें पाहिजे स्टालिन—स्टालिन—स्टालिन ! रशियात सर्वत्र स्टालिन या एकाच व्यक्तीचें नाव दुमदुमले पाहिजे ही इच्छा. तथापि या प्रसिद्धीकरणाची एक विचित्र तऱ्हा आहे. स्टालिन या व्यक्तीबद्दल प्रत्यक्ष माहिती फारच थोड्याना आहे त्याची जी काहीं प्रसिद्धि व्हायची ती चित्रांतून नि पुतळ्यांतून. इमारती, दुकानें, सरकारी कार्यालयातील प्रत्येक खोलींत अगर इतरत्र—कुठेंहि जा, तेथें स्टालिनचें एखादें तरी चित्र तुम्हाला आढळेलच. 'लाइफ-साइझ'च्या किंवा त्याहून मोठ्या अगर लहान अशा स्टालिनच्या सर्व प्रकारच्या प्रतिमा नि छायाचित्रें रशियात सर्वत्र दिसतात पुठ्यापासून ( कार्डबोर्ड ) ब्रॉंझपर्यंत प्रत्येक पदार्थाचे नि धातूचे स्टालिन-पुतळे सर्वत्र पसरलेले आहेत

तुम्ही एकाद्या विश्रांतिगृहातील पोऱ्याला किंवा मोटारहाक्याला, नाहींतर कोणा वाटसरूला विचारलेंत कीं, 'कायरे बाबा, तू स्टालिनला प्रत्यक्ष कधी पाहिले आहेस का ? '

तो पोऱ्या, मोटारहाक्या अगर वाटसरू क्षणमात्र तुमच्याकडे चमत्कारिक नजरेनें पाहील नि चटकन् म्हणेल—' छे बुवा, आपण त्याला प्रत्यक्ष काहीं नाहीं पाहला '—आणि त्यातूनहि कोणी पाहिलेला असेल तर तो १०—१५ वर्षांपूर्वीची त्या भेटीची आठवण सांगेल. हें प्रमाण १० त ९ असे सापडतें मि. ई. एच्. कार यानें म्हटले आहे, "सोव्हिएट नागरिकांना स्टालिन हें एक नाव नि चित्र आहे, व्यक्ति अगर माणूस नव्हे !"

रशियन क्रांतीपूर्वीची व नंतरची खरी माहिती देणारी बहुतेक सर्व पुस्तकें आज रशियात आक्षिप्त ठरलेलीं आहेत स्टालिनच्या व्यक्तिम-

१ लुई फिशर—नामवन्त अमेरिकन लेखक व वृत्तपत्रप्रतिनिधि.

त्याला कमीपणा आणणारी कोणतीहि गोष्ट उरू द्यावयाची नाहीं असा जणूं विडाच सोव्हिएट सरकारनें उचललेला दिसतो. स्टालिनच्या राज-वटींत जुनीं मार्क्सवादी इतिहासाचीं पुस्तकें सुधारण्यात आली असून पीटर दि ग्रेटला पुनः विभूतीच्या सदरात घालण्यात आलें आहे

फॅसिस्ट विचारसरणीलाहि मागें टाकील इतकी हुकुमशाही निय-त्रणाची छाप अलिकडे रशियन वृत्तपत्रावर पडत आहे

## तो एक विश्वासघातकी होता

हुकूमशहाचें जीवन म्हणजे अत्याचारी विरोधकाच्या टागत्या तलवारी-खालील अनिश्चित आयुष्य! —आणि आश्चर्य कसले त्यात? अनेकाच्या शिव्याशापाचे धनी होण्यासारखी बरींच कृत्यें त्याच्याकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घडलेलीं असतात स्वतःचे व पक्षाचें आसन स्थिर करण्यासाठीं या हुकुमशहांना जीं बरीवाईट कारस्थाने लढवावीं लागतात, त्यांचे परिणाम त्याच्या दैनंदिन जीवनावर होणे अपरिहार्यच होतें

स्टालिन स्वसरक्षणार्थ अतिशय दक्ष असतो. याचा अर्थ तो भित्रा आहे असा मुळीच नाही तो निधड्या छातीचा बेडर पुरुष असल्याचें त्याचा वैरी ट्रॉट्स्की यानेंच लिहिलें आहे त्याला तितकें सरक्षण ठेव-ण्याची आवश्यकताच आहे

१९३७ साली तो एका अध्यक्षपदावरून भाषण करीत असता एका-एकीं त्यानें आपलें भरलेलें पिस्तूल खिशातून बाहेर काढलें विशिष्ट बाजूला नेम घेऊन गोळी झाडली निशाण साधलें गोळी लागलेला मनुष्य तत्क्षणी मरून पडला

"तो एक विश्वासघातकी होता" पिस्तूल खिशात ठेवीत स्टालिन शातपणें उद्गारला.

हा प्रसग एके ठिकाणीं मी वाचला खोटा असेल असें म्हणवत नाहीं कारण इतका भयकर, कोणाचीहि यत्किंचित् तमा न बाळगणारा, कोणत्याहि गोष्टीचा निकाल तडकाफडकी करून टाकणारा नि निडर मनो-वृत्तीचा माणूस तो आहे

त्याच्या स्वभावात द्रुतनिर्णयी वृत्तीचा अंश अधिक आहे हें खरें परंतु क्वचित् प्रसंगी तो थोडा उतावळाहि आहे असें वाटतें बंदुक भरण्यापूर्वीच गोळी उडविणाऱ्या माणसाची उपमा देऊन स्वतः लेनिननें स्टालिनच्या या उतावळेपणाबद्दल त्याला एकदा दोष दिला होता

स्टालिनचा उतावीळपणा हा स्वभाव नव्हे तरीपण काहीतरी एक विशिष्ट गोष्ट करायची हा निर्णय तो फार त्वरित घेईल आणि एकदां तो निर्णय झाला, बेत ठरला, की तो पार कसा पाडावयाचा याच्या विचारात नि सिद्धतेंत मात्र तो वर्षानुवर्षे घालवील त्याच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग येऊन गेले आहेत निराशा त्याला माहीत नाहीं. आज ना उद्यां योग्य संधि येऊन वा आणवून आपला कार्यभाग आपल्याला साधता येईल, याविषयीं तो निश्चित असतो १९१७ च्या क्रांतींत याचा प्रत्यक्ष वाटा किंचित्‌हि नसता त्याने पक्षाच्या सरचिटणिशीची आकांक्षा धरून त्यासाठीं वर्षानुवर्षे चिकाटीने, शांतपणाने पडद्याआड राहून सिद्धता केली याचे मर्महि त्याच्या याच गुणात आहे

जोसेफ स्टालिन जिवावरच्या अनेक प्रसंगातून निभावून गेला आहे. सैबेरियातील शेवटच्या सीमापारीतून तो सुटून जिवंत परत आला, हाच आधीं दैवाचा एक मोठा भाग [1] आणित्याचे लहान पणापासूनचे सारेंच आयुष्य धकाधकीच्या मामल्यात गेलेले पूर्वायुष्यात त्यानें अनंत हाल-अपेष्टा नि यातना सोसलेल्या. कणखरपणा तर सीमेचा आहे त्याच्या आंगी अंधारकोठडीतील बंदिस्त जीवनापासून सैबेरियातील उघड्या भूमीवरील उपासमारीपर्यंत, चाबकाच्या फटक्यापासून तर बंदुकीच्या दस्त्याच्या मारापर्यंत अनेक प्रकारचे अनुभव त्याच्या मनाने नि शरीरानें घेतलेले आहेत त्याचा जीव घेण्याचे प्रयत्न आतापर्यंत अनेकदा झाले निरनिराळे उपाय त्यासाठीं योजण्यात आले होते. त्यापैकीं सर्वांचीच माहिती उपलब्ध नसली तरी एखादा प्रसंग सांगता येईल.

## विषाच्या कॉफीचा पेला

स्टालिनला रशियन भाषेखेरीज दुसरी कोणतीच भाषा अवगत नाहीं.

त्यामुळे दुभाष्याची गरज त्याला नेहमी भासते. त्यासाठीं स्टालिनच्या सांगण्यावरून मध्यवर्ति कार्यकारी समितीचा सरचिटणीस एबेल एनुकिड्झ यानें एका प्रतिष्ठित उमराव घराण्यातील सुस्वरूप युवतीची योजना दुभाषी म्हणून केली. इंग्लिश, जर्मन, फ्रेंच व इटालियन भाषांतील वृत्तपत्रें स्टालिनला वाचून दाखवून त्याचा रशियन भाषेंत अर्थ सांगण्याची कामगिरी या नव्या दुभाषीकडे देण्यात आली. स्टालिनच्या खाजगी कार्यालयात दररोज सकाळीं जाऊन परभाषातील ताज्या वृत्त-पत्रांमधील महत्त्वाचें वृत्त रशियन भाषेत स्टालिनला समजावून द्यावयाचें हें काम तिच्याकडे असे.

असेंच एकदा स्टालिनचें वृत्तपत्रश्रवण चाललेलें असता त्याला कॉफी घेण्याची लहर आली. तुर्की कॉफी त्याला फार आवडते. त्या कॉफीचे दोन पेले त्यानें मागविले. एक स्वत.साठीं व दुसरा त्या बाईसाठीं. स्टालिनला पुष्कळ साखर लागते हें तिला माहित होतें. त्या तरुणीनें आपल्या पेल्यातील कॉफीचा घोट घेतला नि ' अगबाई, साखर कमी झाली आहे का कॉफींत ' असें पुटपुटून शेजारच्या मेजावरील भांड्यातून साखरेचा एक खडा स्टालिनच्या पेल्यांत टाकला

स्टालिनला काहीतरी संशय आला त्याचा चाणाक्षपणा या वेळीं त्याच्या उपयोगी पडला, त्याच्या संशयखोर वृत्तीनेंच त्याचा जीव वाच-विला त्यानें पेल्याला स्पर्शहि केला नाहीं. त्याचें श्रवण शांतपणें चालू होतें. तरुणी आपलें काम संपवून बाहेर निघून गेली स्टालिननें तात्काळ तो कॉफीचा पेला प्रयोगशाळेंत तपासणीसाठीं पाठविला स्टालिनचा संशय खरा ठरला कॉफीच्या पेल्यात साखर म्हणून टाकली तें विष होतें असें आढळून आलें

ऑगप्यूनें अर्थातच त्या तरुण सुंदरीला पकडलें. कॉफींतील विषा-सारखेंच विष व एक लहान पिस्तुल तिच्यापाशीं सापडलें अगदींच नवखी असावी बिचारी या प्रकाराला तिच्या 'कटा'चा सुगावा काढण्यासाठीं तिचा अनेक परींनी छळ झाला, परंतु तिनें आपले साथीदार कोणीहि

नाहीत ' असेंच उत्तर अखेरपर्यंत दिलें शेवटीं स्टालिनच्या आज्ञेनुसार गोळी घालून तिची परलोकीं पाठवणी करण्यात आली एबेल एनुकिड्झ-चाहि यात हात असावा असा संशय घेऊन त्याला सैबेरियाची हवा दाखविण्यात आली. काही 'अपघात' ( सोव्हिएट पद्धतीचा ! ) होऊन तेथे तो मरण पावला अशी बातमी थोड्याच दिवसानंतर आली

## रोखठोक व्यवहारवादी

१९२२ च्या मार्च महिन्यात स्टालिन सोव्हिएट रशियाचा सूत्र-चालक बनला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. १९२१ साली लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणाला त्यानें उचलून धरलें. जागतिक क्रांतीची भाषा त्याला आवडत नव्हती म्हणून किंवा लेनिनची मर्जी संपादावयाची यासाठी त्यानें ही गोष्ट त्या वेळीं केली हे कळण्याला मार्ग नाही परंतु पुढे मात्र जगत्क्रांतिवादी ट्रॉट्स्कीवाद्यांचा नि बुखारीनपंथीयांचा संपूर्ण नायनाट करून तो निःशत्रु बनला निःशत्रु म्हणण्याचे कारण इतकेंच की त्याला बाह्यत तरी आता कोणी प्रकट शत्रु उरलेला-अर्थात् रशियात-दिसत नाहीं तथापि अंत.शत्रूंचा बुजबुजाट मात्र रशियाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यात माजलेला आहे हे नि'संशय

ट्रॉट्स्कीवाद्यांची पाळेमुळें खणून काढण्यासाठीं लक्षावधींची कत्तल करण्यात आली वा अन्य तऱ्हेनें वासलात लावण्यात आली काहींजण हा आकडा दहा लक्षापर्यंत नेतात यापैकीं बरेच गुन्हेगार ' पांढरा समुद्र-बाल्टिक महासागरास जोडणारा प्रचंड ' स्टालिन कालवा ' तयार करण्या-साठीं पाठविण्यात आले होतें त्या प्रदेशातील निवास म्हणजे मृत्यूच्या जबड्यातीलच जीवन होतें तेथें गेलेल्यापैकीं कोणी परत आल्याचे इतिहास सागत नाहीं

सोव्हिएट यूनियनची सूत्रें हातीं येताच या कामगार सर्वाधिकाऱ्याने प्रथमच घोषणा केली की, सोव्हिएट रशिया लष्करी व औद्योगिक दृष्ट्या पूर्ण सामर्थ्यसंपन्न बनवून प्रथम फक्त एकाच देशात कम्युनिझम अत्यंत भरभक्कम पायावर स्थिर झाले पाहिजे. कोणतीहि आपल्या साध्याकडे

जाणारी बरीवाईट गोष्ट करताना मार्क्सवादाचीं, लेनिनच्या शिकवणुकीचा अगर समाजसत्तावादाचीं लहान वा मोठीं तत्त्वें पायदळीं तुडविलीं जाताहेत कीं काय, आपल्या वचनांशीं आपल्या कृतीचा मेळ पडतो आहे कीं नाहीं याबाबत त्यानें कसलाच विचार करण्याची चिंता कधीं केली नाहीं. जणू 'मी सांगेन तोच समाजसत्तावाद–तेंच बोल्शेव्हिझम नि तेंच सर्वांनीं मान्य केलें पाहिजे' असें तो आव्हानीत होता. मात्र त्यानें एक काळजी सुरवातीपासूनच घेतलेली आहे जागतिक क्रान्तीची कल्पना आज व्यवहार्य नाहीं अशी त्याचा प्रामाणिक समजूत दिसत असली तरी बाह्यत: तो जागतिक क्रान्तीची गर्जना सतत करीत आला बोल्शेव्हिक क्रान्तीच्या १५ व्या स्मृतिदिनाचे प्रसंगीं ( १९३२ ) त्यानें घोषणा केली: "परकीय राष्ट्रांतील सांप्रत चालू असलेली राज्यपद्धति उलथून पाडावी व क्रांतिकारक तत्त्वाचा फैलाव अखेरपर्यंत नि पूर्णत: व्हावा अशी सोव्हिएट सरकारची इच्छा आहे." त्याच वेळीं त्यानें एक सूचना देऊन टेविली होती कीं, "अधीर होऊं नका आणि विलंबाबद्दल संतापूंहि नका. जागतिक युद्ध आता अपरिहार्यच असून तेंहि फार दूर नाहीं." म्हणजे लोकांना जगत्क्रांतीच्या गोड गोड थापा देऊन त्यांच्याच हातून चढाऊ राष्ट्र कसें निर्माण करावयाचें याचा उत्तम धडा या कर्तबगार नि कुशल सर्वाधिकाऱ्यानें घालून दिला आहे. काय दुर्दैव कीं, हा बोल्शेव्हिकाचा 'भाई' जगत्क्रांतीची भाषा बोलत बोलत एक सामर्थ्यसंपन्न, प्रभावी नि लढाऊ राष्ट्र (आंतरराष्ट्रीय नव्हे) निर्माण करतो आणि आमच्या देशांतील 'महात्मा' तोंडानें राष्ट्रीय स्वातंत्र्याचा घोष निनादवीत, जगत्क्रान्तीचा वृथा प्रयत्न करीत बसतो, आणि त्यात उरल्यासुरल्या हिंदु–वा त्यांच्या शब्दांतील 'हिंदी'–राष्ट्रीयत्वाचा होम करून टाकतो!

साऱ्यांना जिंकून सोव्हिएट रशियाच्या सर्वाधिकारपदावर तो प्रत्यक्ष येईपर्यंत बहुतेक महत्त्वाकांक्षी क्रांतिकारकांकडून स्टालिनची गणना दुय्यम दर्जाच्या माणसांतच केली जात असे झिनोव्हिफ त्याला पिवळ्या

डोळ्याचा कॉकेशस माकड ' म्हणून संबोधी, टॉट्स्की तर त्याला 'कॉकेशियन रानवटा'पेक्षा अधिक किंमत देण्यास राजी नव्हता पण 'पक्षा'च्या सेक्रेटेरिएटमध्ये काम करीत असताना स्टालिननें निरनिराळ्या कार्यकर्त्यांच्या, पदाधिकाऱ्याच्या नि कामगाराच्या बदल्या वा नेमणुका करण्यास मोठ्या धडाक्याने सुरवात केली आपल्या विश्वासातील, वर्गातील असेच लोक लहानमोठ्या जागावर येतील अशी दक्षता त्याने या बदल्या—नेमणुकाच्या कारवायात मोठ्या कौशल्यानें नि लोकाच्या डोळ्यावर न येऊ देता घेतली. चतुर मुत्सद्यानाहि त्या हालचालीचा अर्थ प्रथम उमगला नाहीं —आणि पुढें जेव्हा तो समजला तेव्हां त्याचा काही उपयोग नव्हता. कारण त्या वेळी स्टालिनची शक्ति दुर्जय झाली होती. मात्र वेळोवेळीं अनेक राजकीय डावपेच करताना स्टालिनने लेनिनच्या मोठ्या नावाचा पुरेपूर उपयोग करून घेतला हे नि.सशय.

साऱ्या हुकुमशहाचे तत्र बहुधा एकच आहे 'हुकुमशहा' या शब्दातच त्याचा अर्थ सामावलेला आहे परतु स्टालिनची गोष्ट इतर सर्वाधिकाऱ्यापेक्षा थोडी निराळी आहे तो स्वयसिद्ध सर्वाधिकारी अगर हुकुमशहा नव्हे लेनिनच्या स्वाभाविक वा अपरिहार्य एकचालकानुवर्तित्वातून निर्माण झालेला हा भस्मासुर आहे केव्हांतरी स्वत.च्याच डोक्यावर हात ठेवून त्याचा नाश होणार हे भाकीत बहुधा चुकावयाचे नाही—पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे लष्करी शिक्षणाच्या शाळेत कधी एखादाहि पाठ न घेतलेला हा शिपाई गडी विसाव्या शतकांत एक लष्करी सोटेशहा बनू शकला ! परिस्थितीने मनुष्य घडविला जातो यावर माझा विश्वास आहे. ' Time finds the man ' हेच खरें. स्टालिनचा सत्तासपादनाचा नि चढत्या श्रेणीचा इतिहास पाहिला असता हा सिद्धात अधिक स्पष्ट होण्यासारखा आहे. तो रशियन सोव्हिएटचा सर्वाधिकारी झाला यात त्याच्या बुद्धिमत्तेपेक्षा, कर्तृत्वापेक्षा, नेतृत्वापेक्षा दैवाचाच अश अधिक आहे ही गोष्ट कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. स्टालिनमध्यें टॉट्स्कीप्रमाणें प्रभावशाली वक्तृत्व नाही, लेनिनसारखें लेखनकलेंतील

सव्यसाचित्व नाही, कॉर्निलॉफसारखी लष्करी डावपेचातील निपुणता नाही. एकच गोष्ट त्याच्यापाशीं अत्यंत प्रभावशाली अशी आहे—माणसाची उत्तम पारख. कामनेव्ह नि झिनोव्हिफ याना सतरादा शरण आल्यानंतर- हि जीवदान देणारा नि व्होरोशिलॉव्हसारख्या होयबाला जवळ करणारा स्टालिन माणसाची अचूक पारख करण्यात पटाईत आहे. त्याच्या या गुणालाच सुदैवाची जोड मिळाली. परिस्थितीनें हात दिला नि त्याचें 'साहस' धाडस ठरलें, क्रौर्य शौर्य समजलें जाऊं लागलें, तत्त्वच्युति राज- कारणी मुत्सद्देगिरी म्हणून गौरविली जाऊ लागली—नि अखेर असाच एक दिवस सान्याना खालीं चेपून तो यू. एस्. एस्. आर्.चा सर्वाधिकारी बनला.

Lenin remains undoubtedly a clever theorist and subtle tactician; while Stalin is a matter of fact and often primitive 'realist'" ‡

स्टालिन एक रोखठोक व्यवहारवादी माणूस आहे असें एन्. द बॅसिली वरील अवतरणांत सांगतात. माझ्या मताप्रमाणें त्याच्या या कठोर व्यवहारवादित्वातच त्याच्या यशाचें नि सर्वाधिकारपदाचें मर्म साठविलेलें आहे आणि याच दृष्टिकोनातून त्याच्या चमत्कारिक व प्रसंगा गूढ वाटणाऱ्या अशा परराष्ट्रीय धोरणाकडे पाहिलें पाहिजे.

---

‡ "Russia under Soviet Rule" by N De Basily (P 119)

# अपवित्र संगनमत !

१९३९ साली दि. २२ ऑगस्ट रोजी सबंध जगाला नि त्याबरोबरच मलाहि एका अनपेक्षित वार्तेने आश्चर्याचा धक्का भयंकर दिला. 'रूसो-जर्मन अनाक्रमणाचा करार,' 'हिटलर-स्टालिनचे सख्य ' अशा ठळक मथळ्याच्या भडक बातम्या वृत्तपत्रांत झळकल्या. मी मी म्हणणारे मुत्सद्दी नि राजकारणीहि गोंधळून गेले राजकारणाचा सारा रंग पालटला. आपल्या बुद्धिमत्तेचा, राजनीतीचा नि मुत्सद्देगिरीचा गर्व वाहणाऱ्या इंग्लिश राजकारणी पुढाऱ्यांनी मांडलेला राजकीय डाव संपूर्ण उधळला गेला. कित्येकांचा तर त्या अनपेक्षित वृत्तावर विश्वासहि बसेना !

पण ते एक पूर्ण सत्य ती एक विश्वासार्ह घटना होती. दोन हाडवैऱ्यांचा भयंकर सामना पाहाण्यासाठी उत्सुकतेने उभ्या असलेल्या प्रेक्षकांना एकाएकी ते दोन हाडवैरी एकमेकांच्या गळ्यात गळा घालून गप्पागोष्टी करू लागलेले पाहून जो आश्चर्याचा धक्का बसेल तसाच प्रकार याहि वेळी मोठ्या प्रमाणावर घडला

इंग्लंडच्या इतिहासांत जो एक 'अपवित्र करार' प्रसिद्ध आहे, त्याच्या अनुरोधानें या नव्या नाझी—बोल्शेव्हिक कराराची 'अपवित्र सगनमत' अशी हेटाळणी आजकाल केली जात असते.

पण तसें पाहिलें तर ही घटना वाटते तितकी नवलपूर्ण नव्हती. सोव्हिएट सर्वाधिकाऱ्याच्या परराष्ट्रीय धोरणाचे तीन भाग, इंग्लंडचे साम्यवादी लेखक भाई एच्. एन्. ब्रेल्सफोर्ड यांनीं केले आहेत.

१९२२ सालीं व्हर्सायच्या विजेत्याविरुद्ध 'पवित्र' सगनमत करून रशिया व जर्मनी एकत्र आले तो रॅपॅलोचा करार, हा पहिला भाग. दुसरा भाग हिटलर अधिकारारूढ झाल्यानंतर सुरू होतो. मॉस्कोचा पश्चिम दिग्विजयाचा प्रयत्न, राष्ट्रसंघांत प्रवेश, फ्रान्सबरोबर मैत्री नि पीपल्स फ्रंटची योजना या घडामोडी साधारणपणें त्यांत समाविष्ट होतात. परंतु ह्या दुसऱ्या भागांत स्टालिनला चांगलीच थप्पड बसली. राष्ट्रसंघाचे तीन तेरा वाजले, 'पीपल्स फ्रंट' चा फ्रान्स, स्पेनमध्यें बोजवारा उडून अखेर म्युनिचमध्यें त्याची इतिश्री झाली. नंतर कांहीं काळ स्टालिनची वृत्ति द्विधा होऊन तो सर्वसंगत्यागाकडे वळला. यापुढें त्याच्या मुत्सद्देगिरीच्या नाटकाचा तिसरा अंक सुरू झाला आहे. त्याचें प्रत्यंतर म्हणजे रशिया व जर्मनी यांच्यातील अनाक्रमणाचा करार. मि. ब्रेल्सफोर्ड यांचें हे विशदीकरण सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाचे धागेदोरे स्थूलमानानें आपल्या हातीं देऊं शकतील.

जनरल क्रिव्हिट्स्कीनें हिटलरच्या स्टालिनकृत अनुनयाचा जो लांबलचक व चमत्कृतिपूर्ण इतिहास अलिकडे निवेदिला त्यावरून रूसो-जर्मन तह झाला ही कांहीं आश्चर्यजनक गोष्ट वाटत नाहीं. लेनिनची 'जिवंत दारूगोळा' ( Living ammunition ) म्हणून संबोधिली जाणारी आगगाडी १९१७ च्या एप्रिल महिन्यांत रशियामध्यें आली, तेव्हांच लेनिननें जर्मनीला आश्वासन दिलें होतें कीं, नवा पक्ष ( म्हणजे बोल्शेव्हिक ) जर्मनीशीं मित्रत्व राखील. केरेन्स्कीला तें नको होतें. मित्रराष्ट्रांशीं सगनमत करण्याचें त्याचें धोरण होतें परंतु पुढें केरेन्स्की-सरकार कोल-

मडले. बोल्शेव्हिक पक्ष अधिकारावर आला. श्वेत सैन्यानें मित्रराष्ट्राच्या साहाय्यानें रशियात नि त्याच्या सरसीमावर धुमाकूळ माडला युक्रेनमधून जर्मनीहि चाल करून येऊ लागला. अशा तऱ्हेनें १९२० पर्यंत सोव्हिएट रशिया यादवीच्या नि परचक्राच्या फेऱ्यात सापडला होता. १९२० साल-अखेर हें अरिष्टांचें तुफान शात झालें नि लेनिनप्रभृतींना रशियात प्रस्थापित झालेल्या समाजसत्तात्मक राज्यपद्धतीचें दृढीकरण करण्यास अवसर मिळाला.

पुढें ट्रॉट्स्की आदि जगत्क्रांतिवादी पुढाऱ्यांनी असें प्रतिपादावयास सुरवात केली की, 'रशियातील समाजसत्ताक राज्याचे परराष्ट्रीय सबंध जागतिक क्रांतीला पोषक असेच असावयास पाहिजेत जगातील सारीं औद्योगिक राष्ट्र समाजसत्तावादी बनल्याखेरीज रशियात पूर्ण समाजसत्ताक राज्यपद्धति स्थापन होणें केवळ अशक्य आहे. रशियन राज्यक्रांति ही जगत्क्रांतीच्या मार्गावरील प्रथमपदार्पण आहे' परंतु लेनिनला ही गोष्ट इष्ट दिसेना. त्यानें जागतिक क्रांतीच्या या आकांक्षाला गवसणी घालणाऱ्या ट्रॉट्स्कीपथीयाच्या धोरणाला विरोध केला. जागतिक क्रान्तीचें एवढें स्तोम माजविण्यास लेनिन सिद्ध नव्हता. सोव्हिएट सत्ता रशियात दृढमूल करणें व रशियाला प्रचड प्रमाणावर औद्योगिक वनविणे यावर लेनिननें आपलें लक्ष केंद्रीभूत केले होतें. परराष्ट्रांशी कसेंहि करून शातता राखणे हेच ध्येय त्या वेळी लेनिनचें होतें यादवी सपली पोलडशी मित्रत्वाचा सधि करण्यात आला.

१९१८ च्या अखेरी अखेरीला लोकाना मोठी आशा वाटत होती की, आता जागतिक क्रान्तीची मोठी लाट उसळणार. सोत्सुक नयनानी जगत्क्रान्तीची मार्गप्रतीक्षा त्यांनी चालविली होती. जणू एखादा प्रेषित वा देवदूत येईल नि अखिल जगतावर प्रेमाची पाखर घालील, शाततेचें साम्राज्य प्रस्थापील अशी वेडी आशा होती त्याची. पण व्हर्सायच्या आक्रमक तहानें या मुखाशाच्या चिंधड्या उडविल्या १९२३ मधील धावमाळ्यात जर्मनीतील क्रांतिकारक चळवळ्याचा पूर्ण नायनाट करण्यात

आला. मग तर त्या निंध्याहि विरून गेल्या. ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या तहावर लेनिनने आपल्या सहकाऱ्यांशीं विरोध पत्करूनहि स्वाक्षरी केली.

सबंध देशावर उदासीनतेची घनदाट छाया पसरली होती. कम्युनिस्ट पक्षाच्या अकराव्या कॉंग्रेसचें अधिवेशन १९२२ च्या मार्चअखेरीला भरलें. लेनिनने कॉंग्रेसपुढें हेंच शेवटचें भाषण केलें. त्यात त्यानें स्पष्टपणें विचारलें होतें. " आपल्या शेजारचा भांडवलदार ( राष्ट्र ) आपल्या व्यवहारात दक्ष आहे अट्टल सोदेगिरी नि नफ्याची एकमेव दृष्टि त्याच्यापाशीं आहे आणि तुम्ही कम्युनिस्ट मात्र नव्या पद्धति रुजव़ पाहात आहा. तुमचीं ध्येयें उदात्त आहेत, तुम्ही पवित्र माणसें आहात—अगदीं जिवलपणीं स्वर्गात जाण्याची योग्यता आहे तुमची परंतु व्यवहार कसा करावयाचा हे तुम्हाला माहीत आहे का? कम्युनिझमचा अहंकार आपण सोडून दिला पाहिजे."

## स्टालिननें हिटलरशीं मैत्री कां केली ?

यानंतर स्टालिनची कारकीर्द सुरू झाली १९२२ मध्यें तो कर्तबगार पुरुष सत्ताधिकारी झाला तो तत्त्वज्ञ नाहीं, तसेंच उदात्त तत्त्वांशीं बेइमानी करण्यात नि जनतेचा विश्वासघात करण्यात त्याला कसलीच अपकीर्ति वाटत नाहीं. तो तत्त्ववेत्ता नाहीं, तत्त्वप्रणेता नाहीं, तसाच तत्त्वांशीं इमानेंइतबारें वागणारा विश्वासार्ह नेताहि नव्हे त्यामुळे आज ब्रिटन-फ्रान्स या तथाकथित लोकशाह्यांशीं सगनमत करताना तो दिसेल तर त्याच क्षणीं नाझी हुकूमशाहीचा अनुनयहि करीत असलेला दृष्टीस पडेल जगातील कामगार संघटनांना आपापल्या प्रस्थापित सरकाराविरुद्ध बंड करून उठण्याचा जहाल संदेश तोंडानें देईल नि हातानें चिमकुल्या स्वतंत्र राष्ट्राचें स्वातंत्र्य हिरावून घेईल. स्वतःच्या देशात एखाद्या कामगाराने बंड तर राहोच पण एखादा टीकेचा शब्द उच्चारला तरी त्याला तत्क्षणीं गोळी घालून ठार करील कामकऱ्यांचा सर्वाधिकारी स्टालिन याची अशी ही राजवट आता सुरू आहे त्याच्या परराष्ट्रीय धोरणाचें एका वाक्यात वर्णन करावयाचें तर—१९३८ पासून स्टालिनचें नाझी-मैत्रीसाठीं

प्रयत्न सुरु झाले नि अखेर त्याची परिणति १९३९ ऑगस्टमध्यें रूसो-जर्मन अनाक्रमणाचा करार होण्यात झाली मि. लुई फिशर यांनी या धोरणाची दोन कारणें दिलीं आहेत (१) स्वदेशातील अडचणी, आणि (२) रशियातील राष्ट्रवादाचा पुनर्जन्म एका हिंदी समाजसत्तावाद्यानें या परराष्ट्रीय धोरणासंबंधी असे लिहिल्याचें आठवतें-' रशियांतील नवा 'होयबा'चा वर्ग म्हणजे सरकारी अधिकारी, इंजिनीअर्स, शास्त्रज्ञ व 'स्टॅक्नोव्हाइट्झ' याचा गट हेंच रशियाचें सामर्थ्य. इतर भांडवलशाही राष्ट्रांमधील सत्ताधारी वर्गांप्रमाणेंच हा गट बलवान् आहे आणि या गटाचें धोरण म्हणजेच सोव्हिएट रशियाचें परराष्ट्रीय धोरण.' या वाक्याला टीकेची अगर भाष्याची आवश्यकता आहे काय ?

" सोव्हिएटाच्या सुपीक भूमीमध्यें तोंड खुपसणाऱ्यास जन्माची आठवण राहील असा मार देण्यात येईल हेंच आमचें परराष्ट्रीय धोरण." कम्युनिस्ट पक्षाच्या ८ व्या अधिवेशनांत चार तासाचें पल्लेदार भाषण करून अखेर सोव्हिएट सर्वाधिकारी स्टालिन यानें स्वत हें वाक्य उच्चारलें होतें विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, या अधिवेशनात त्यानें तयार केलेल्या नव्या राज्यघटनेला १५४००० उपसूचना आलेल्या होत्या असें म्हणतात, तथापि स्टालिननें अखेर आपलाच विजय करून दाखविला. या वरील उद्गारातून संरक्षक राष्ट्रवाद स्पष्टपणें प्रतीत होत आहे, असें म्हणणें चूक होईल काय ?

चालू दुसऱ्या महायुद्धाचे सुरवातीची परिस्थिती अत्यंत अस्थिर नि अनिश्चित झाली होती. दोस्ताच्या आणि सोव्हिएट रशियाच्या तहासाठीं वाटाघाटी सुरू होत्या या वाटाघाटींची लांबण इतकी दीर्घकाल चालली होती कीं अखेर 'आमचीं सर्व विमाने सुखरुप परतलीं' असें वृत्त ज्याप्रमाणें आज ब्रिटिश हवाई खात्याची युद्धपत्रिका न चुकता दररोज देत असते, त्याचप्रमाणें 'वाटाघाटी चालू आहेत' याच वृत्ताचा कायम ठोकळा ( Block ) करून ठेवण्याचा मोह त्या वेळीं कित्येक वृत्तपत्रकाराना झाल्यावाचून राहिला नसेल !

रशियाचा तत्कालीन परराष्ट्रीय मन्त्री मॅक्झीम लिटव्हिनॉफ याला ता. ३ मे १९३९ रोजी सोव्हिएट सरकारने काढून टाकले आणि त्याच्या जागी कौन्सुलेट ऑफ दि पीपल्स कमिसारचा अध्यक्ष व्ही. एम्. मोलोटॉव्ह याची नेमणूक केली या वृत्ताने जगातील बऱ्याच मुलखाना आश्चर्याचा धक्का दिला नि त्यामुळे रशियाच्या धोरणाचे सामान्य स्वरूपहि त्याना तर्कित आले एम् लिटव्हिनॉफ याचे प्रयत्न ब्रिटन–फ्रान्सशी मित्रत्व जोडण्याचे होते परतु त्या वाटाघाटी मॉस्कोला मान्य झाल्या नाहीत कारण एकतर त्यात रशियाला जपानविरुद्ध लष्करी साहाय्याची हमी दिलेली नव्हती व दुसरे रशियन सोव्हिएटचा ब्रिटनच्या हिटलरप्रतिरोधक (Stop–Hitler) मोहिमेवरचा विश्वास उडाला होता मॉस्कोला परस्पर साहाय्याचा करार हवा होता, नुसती दोस्ताच्या मदतीला धावण्याची फुकटी दगदग नको होती परतु ब्रिटन त्याला सिद्ध नव्हते. बाल्कन राष्ट्राचे स्वातत्र्य धोक्यात आल्यास युद्धप्रसगी रशियाने दोस्ताना साहाय्य करावे एवढेच स्वार्थी धोरण ब्रिटन–फ्रान्सचे होते, त्यामुळे सहाजिकच रशियाने त्याच्या मित्रत्वाचा हात झिडकारला इझवास्ता 'ने ठणकावून सागितले " This absurd nonsence has nothing in common with the attitude of U S S R

योगायोग असा की, फॅसिझम वा नाझीझम विरुद्ध बोल्शेव्हिझम याचे तुमुल युद्ध माजेल नि तेच दुसरे जागतिक महायुद्ध ठरेल अशी अपेक्षा लोक त्या काळी करीत असता, नेमकी त्या अपेक्षेविरुद्ध घटना घडून आली नाझी जर्मनी व बोल्शेव्हिक रशिया याचे सख्य घडून आले. आधुनिक रशियाच्या इतिहासात तरी सोव्हिएट सरकारचा विशेष सबध जर्मनीशीच आला, नि तोहि शत्रूपेक्षा मित्र या नात्यानेच अधिक ज क्रिव्हिट्स्कीने सागितले आहे की, 'लेनिनच्या पश्चात जर्मन–सहकार्याची उत्सुकता जर कोणत्या पुढाऱ्याने दाखविली असेल तर ती स्टालिननेच, नि क्रेमलीनमध्ये जर्मनीचा मित्र जर कोणी असेल तर तो स्टालिनच !' ही विचित्र विधिघटना दिसते ! फॅसीझमचा नायनाट कर-

ण्यासाठीं ज्याचा जन्म झाला तोच समाजसत्तावादाचा पुजारी स्टालिन, समाजवादाशीं उभा दावा असणाऱ्या हिटलरशीं सख्यत्व जोडण्याचा, वाटेल ती किंमत देऊनहि, प्रयत्न करतो हें नवल नव्हे काय! स्टालिननें हिटलरचा अनुनय केला असें सिद्ध करण्यासाठीं अनेक खरींखोटीं विधानें केलीं जातात परंतु स्टालिनसारखा पोलादी हुकमशहा स्वत:च्या पाठीमागें प्रबल लष्करी सामर्थ्य उभें असतांना हिटलरशीं एखाद्या नादान दुर्बला-सारखें वर्तन करील ही गोष्ट शक्य दिसत नाहीं, तो इतिहास कांहींसा विकृत स्वरूपातच जगापुढें मांडला गेला आहे असें म्हटल्यास ती चूक ठरणार नाहीं तथापि स्टालिन हिटलरचें प्रचंड सामर्थ्य जाणून होता नि आहे नि म्हणून त्याच्याशीं सख्यत्व जोडण्यासाठीं त्यानें आपल्या उदात्त तत्त्वाचाहि स्वहस्तें होम करण्यास कमी केलें नाहीं, हें खरें. आजहि तोच प्रकार मागील अंकावरून पुढें चालू आहे.

जर्मनीनें जिंकलेल्या पोलंडचा लचका तोडणारें रशियाचें धोरण नि फिनलंडवर निर्दय स्वारी करून त्याच्यावर एका नामधारी सरकारचें बाहुलें स्थापन करण्याचें सोव्हिएट यूनियनचें धोरण हें समाजसत्तावादी, आंतरराष्ट्रीय नि श्रेष्ठेऽव्हिक तत्त्वज्ञानात 'योग्य' म्हणून बसू शकतें काय?

लेनिननें मागेंच बजावून ठेविलें होतें.[1] "नका, रशियन लोकांनो, फिनलंडवर आपली इच्छा लादण्याचें धाडस करू नका दुसऱ्यावर जुलूम करणारा कोणताहि समाज स्वत: स्वतंत्र असूच शकत नाहीं हें लक्षांत ठेवा." लेनिनच्या या उपदेशाला रशियानें गुंडाळून ठेविलें कॅरेलियन इस्थमसवरती एकादें रिपब्लिक' म्हणजे लोकसत्ताक राज्य स्थापन कर-ण्याची योजना आखून रशिया यापुढें जगाच्या डोळ्यांत धूळ फेकू शकत नाहीं. त्याचा लाडगेपणा आता साऱ्याच्या प्रत्ययास आलेला आहे त्याच्या तत्त्वच्युतीची कबुली त्याच्याच भक्तांनीं निःसंदिग्धपणे, प्रांजलपणें दिली आहे.

जर्मनी नि रशिया यांचे हे परस्परसंबंध कसकसे वाढत गेले तो इति.

१ लेनिन, १२ मे १९१७

हास मोठा मनोरंजक आहे. पहिल्या महायुद्धानंतर रशियांत बोल्शेव्हिक राज्यपद्धति सुरू झाली नि १९२३ साली हिटलरनें पराभूत जर्मनींत नाझीवादाची प्राणप्रतिष्ठा केली. हिटलरनें आपल्या योजना मूर्त स्वरूपांत आणण्यासाठीं रशियाचें साहाय्य घ्यावयाचें ठरविलें होतें व त्याप्रमाणें ता. १३ आक्टोबर १९३० रोजीं, नाझी अनुयायांपुढें भाषण करताना तो म्हणाला कीं, 'रशियाच्या व इटालीच्या साहाय्यानें मी इंग्लंडचा नाश करीन आणि हिंदुस्थान रशियाला नि ब्रिटन इटालीला देऊन टाकीन.' अशा प्रकारचा एक उल्लेख "लंडन टाईम्स" च्या रोममधील वार्ताहरानें एकदा केलेला होता.

ज. क्रिव्हिट्स्की यानें रेपॅलो कराराची उपपत्ती लावताना लिहिलें आहे कीं, "हिटलर सत्तारूढ होण्यापूर्वी बरींच वर्षं रशिया व जर्मनी यांचें सख्य समदुःखी या नात्यानें जुळून आलें होतें. १९२२ च्या रेपॅलो तहानें रशिया नि जर्मनी यांची जूट झाली. महायुद्धांतील विजेते म्हणून मित्रराष्ट्रें रशिया व जर्मनी यांच्याकडे साशंकतेनें पाहात होतीं, रशिया नि जर्मनी वाळींत पडलीं होतीं. व्हर्सायचा तह जर्मनीप्रमाणेंच रशियानेंहि तीव्रपणें निषेधिला होता. उभयतांचे आर्थिक हितसंबंध परिस्थितीनें व परंपरेमुळें परस्परांशीं निगडित झाले होते. नाझी पक्ष सत्ताधारी होण्यापूर्वी दहा वर्षं सेनापति व्हॉन सीक्त यांच्या नेतृत्वाखालील जर्मन सैन्य व रशियन सेना यांच्यामध्यें मैत्रीचा गुप्त करार करण्यांत आला होता व तो दोन्ही पक्ष पाळीत होते." व्हर्सायच्या अपमानकारक तहाचा पुरेपूर सूड उगविण्यासाठीं नाझींच्या चळवळीची निर्मिति झालेली आहे, अशी कल्पना स्टालिननें करून घेतल्यानें त्या चळवळीबद्दल त्याला सहानुभूती वाटू लागली व त्यानें नाझीश्रेष्ठांशीं आपले अधिकाधिक निकटचे संबंध आणण्याचें धोरण कायम केलें.

## बोल्शेव्हिझमचें व नाझीझमचें बंधुत्व

रशिया व जर्मनी या दोन्ही देशांतील दीर्घकाळ अनुभव घेऊन आलेले अमेरिकन लेखक मि. चेंबरलेन यांनीं नाझी व बोल्शेव्हिक

याचें साम्य दाखवितांना जर्मन नाझीवादाला पिंगट बोल्शेव्हिझम नि रशियन कम्युनिझमला लाल नाझीझम म्हटलें आहे.

मि. फ्रॅंक न्यून्स यांनीं "लंडन टाईम्स"मध्यें लिहिलेल्या एका लेखात प्रस्तुत साम्य सप्रमाण सिद्ध केलें आहे. तें त्यांच्याच शब्दात देणें बरें:

( १ ) या दोन्ही राष्ट्रांत त्यांच्या विशिष्ट पद्धतीनुसार एक हुकूमशहा आहे जनतेकडून प्रत्यक्ष स्वतंत्र मतदानानें अगर त्यांनीं निवडलेल्या एखाद्या विधिमंडळामार्फतहि स्वतंत्रपणें या सर्वाधिकाऱ्याची निवड होत नाहीं.

( २ ) नाझीवाद व समतावाद अस्तित्वात असलेल्या या दोन्ही राष्ट्रांत मुद्रणस्वातंत्र्याचा लवलेशहि नसून तेथील वृत्तपत्रादिकांना सरकारी धोरणा-चाच पुरस्कार करावा लागतो.

( ३ ) दोन्ही ठिकाणीं प्रचंड स्वतंत्र हेरखातें आहे. संबंध राष्ट्रावर धाक ठेवून दडपशाही गाजविणें व जनतेच्या प्रामाणिक स्वतंत्र मतांनाहि वाचा फुटूं न देणें हें या खात्याचें काम ( जर्मनींतील 'गस्टापो' व रशि-यातील ' ऑगप्यू '. )

( ४ ) दोन्ही देशात स्थानबद्धांच्या छावण्या असून, त्या छावण्यातून कोणाहि व्यक्तीला, केव्हा व किती काळ डांबून ठेवण्यांत येईल याची कल्पना बांधता येणार नाहीं इंग्लंडमधील हेबियस कॉर्पस्सारखा व्यक्ति-स्वातंत्र्याचा एकहि कायदा या दोहोंपैकीं एकाहि देशात नाहीं

( ५ ) सरकार ठरवील त्या जनहिताच्या व्याख्येप्रमाणें कोणत्याहि देशहिताच्या कामगिरीवर कोणाहि नागरिकाला सक्तीनें, त्याच्या निवास-स्थानापासून कितीहि दूर अंतरावर, पाठविण्याचा अधिकार दोन्ही सर-कारांना आहे. रशियातील 'स्टालिन कालव्या'च्या बांधकामासाठीं याप्रमाणें १० लक्ष कामगारांची रवानगी झाली व तो पुरा करण्यात आला. जर्मनीमधील सिगफ्रिड तटबंदीची बांधणीहि याच पद्धतीनुसार झालेली आहे

( ६ ) जर्मनांनीं ज्यू लोकांची व रशियनांनी सरदार, सावकार व

मध्यम वर्ग याची केलेली ससेहोलपट तत्वत. सारखीच. बोल्शेव्हिझमची सत्ता सुरू होण्याच्या पहिल्या काळात रशियातील ३० लक्ष नागरिकाना अत्यन्त हालअपेष्टात रशियातून परागंदा व्हावें लागले. त्याची मालमत्ता सरकारजमा झाली. त्याच्या साहाय्यासाठी कोणत्याहि प्रकारचा द्रव्यनिधी जमविण्यात आला नाहीं आणि ज्या सहस्रावधि दुर्दैवी जीवाना रशियाची सरसीमा वेळेवर ओलाडणें शक्य झालें नाहीं त्याची सररहा कत्तल झाली जर्मन ज्यूचीहि गत हीच झाली.

( ७ ) दोन्हीहि देशाच्या निवडणुकाच्या पद्धतीन्वयें उपयोजिल्या जाणाऱ्या मतापैकीं शे ९७ मतें मिळविणाऱ्या एका उमेद्वारास सरकारी मान्यता दिली जाते

( ८ ) जर्मनी व रशिया या दोन्ही देशामध्यें अनुक्रमे नाझी व कम्युनिस्ट या अधिकारारूढ पक्षाचे सख्याबल अल्प म्हणजे प्रत्येकीं सुमारें ४० लक्षाइतके आहे. तथापि या पक्षाखेरीज त्या त्या राष्ट्रात दुसरा कोणताहि पक्ष बेकायदा समजला जातो.

( ९ ) ट्रेड यूनियन्सबाबतहि तीच स्थिति. नाझींनी ट्रेड युनियन्सना जरी सपूर्णतः वगळले असले तरी त्यानी मालक व नोकर याच्या प्रतिनिधींची एक समिति प्रत्येक कारखान्यात स्थापन करण्याचे धोरण ठेविलें आहे रशियनानीं आपल्या ट्रेड यूनियन्सचें स्वरूप सर्वस्वी इतकें बदलून टाकले आहे कीं, त्याच्या प्रतिनिधींना आंतरराष्ट्रीय ट्रेड यूनियन्स कॉंग्रेसला उपस्थित होऊ देण्याला इंग्लिश ट्रेड यूनियन्स कधीच मान्यता देणार नाहीत. नाझींप्रमाणेंच प्रत्येक कारखान्यात एक समिति स्थापण्याची पद्धति बोल्शेव्हिकानीहि चालू केलेली आहे

( १० ) समतावाद धर्म ( ख्रिश्चन )—विरोधी आहे. ग्रीक धर्मपथाचा निःपात करण्यास समतावाद बहुताशी कारणीभूत आहे. ख्रिश्चन धर्मपथातील एकाद्या विशिष्ट व सघटित पथाला नाझींनी अद्यापि नेस्तनाबूत केला नसला तरी नाझीवादाचे धर्मसबधी धोरण शत्रुभावाचेंच आहे. धर्मगुरु निमॉलर व आणखी इतर बरेच लोक याना नाझी हुकूमशाहीनें वेळो-

वेळीं जो ' प्रसाद ' दिला त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होण्यासारखी आहे

( ११ ) प्रत्येक गोष्टीला ' सामाजिक ' स्वरूप देण्यापासून बोल्शेव्हिकानीं राजवटीला प्रारंभ केला, तथापि याहि धोरणात स्थित्यंतर होत असल्याचें सांगितलें जात आहे आता तर खाजगी धंदे व खाजगी मालमत्ता याना सरकारकडून वाढत्या प्रमाणात संमति दिली जात आहे नाझींच्या कारकीर्दीचा प्रारंभ ' समाजीकरणा '—पासून झाला नसला तरी त्याचें धोरण बहुधा त्याच अनुरोधानें हालत आहे बोल्शेव्हिक व नाझी धोरणातील या बाबतींतील अगदीं क्षुल्लक स्वरूपाचे व लक्षात न येण्यासारखेच काय ते भेद यापुढें शिल्लक उरतील.

१९३७ च्या एप्रिलमध्यें स्टालिननें आपला खाजगी ( व्यक्तिगत ) वकील म्हणून डेव्हिड कॅंडेलकी याला हिटलरकडे धाडला पण स्वत चें सामर्थ्य रशियाशीं टक्कर देऊं शकेल इतकें वरचढ झाल्याखेरीज स्टालिनशीं मैत्रीचा तह करण्यास तो संमत नव्हता हिटलरनें कॅंडेलकीला नकार दिल्यानें कॅंडेलकी हात हालवीत मॉस्कोला परतला याच वेळी स्टालिननें हिटलर—सख्यत्वासाठीं एक जगड्व्याळ योजना हातीं घेतली होती. जगातील सर्व देशात कम्युनिस्टाबरोबर ' पॉप्युलर फ्रंटस् ' निर्माण करून, हिटलरवर रशियाशीं मैत्री करण्यासाठीं दडपण आणावयाचें असें तें कारस्थान होतें. कॉमिंटर्न पक्ष हा मध्यस्थी म्हणून स्टालिननें त्यासाठीं हातीं धरला होता तथापि हीं कारस्थानें चालू असता स्टालिनचा जप मात्र असाच चालू होता कीं, ह्या साऱ्या घडामोडी जगातील सर्व राष्ट्रीय स्वातंत्र्यवाद, लोकशाहीचें खूळ नि वाढती हुकूमशाही सत्ता याना जगांतून नष्ट करावें यासाठींच घडविल्या जात आहेत

स्पेनकडे पाहिलेंत तर रशियाची हीच अरेरावी लुडबूड तिथेहि चालली होती असें दिसेल स्पेनमधील अर्वाचीन यादवीचा इतिहास आता बहुतेकांच्या परिचयाचा झालेला आहे रशियन कम्युनिस्टांनीं पडद्यामागें राहून तेथील राजकारण कसें हालविलें याचा वृत्तांत फार मोठा आहे. तथापि त्यांत अधिक खोलवर न शिरता एवढेंच सांगता येईल कीं, स्पॅनिश

यादवीचें मूळ कारण स्टालिनचा आगलावेपणा. स्पेन सरकारकडून शस्त्रास्त्रा-साठीं सोव्हिएट रशियानें पिळणूक करून पैसे उकळले असें बोललें जातें. कॅबेलेराचा नाश, नेग्रीनचा नायनाट नि कम्युनिस्ट पक्षापुढें मान वाकविण्यास सिद्ध नसलेल्या स्पॅनिश सरकारपक्षीयाच्या ऑगाप्यूमार्फत केलेल्या कत्तलीचे प्रसग रशियाच्या जगत्क्रांतिवादी धोरणाला भूषणावह खास नाहींत 'स्टालिननें स्पॅनिश लोकशाहीच्या पाठींत कायमची सुरी खुपसून ठेविली आहे' असें ज. क्रिव्हिट्स्की स्पष्टपणे म्हणतो

## लाल आक्रमणापासून सावध रहा

स्टालिननें जर्मनीचें मित्रत्व सपादन केलें, त्यात स्टालिनची फार दूरदृष्टि आहे असे सांगितलें जातें भांडवलशाही व हुकूमशाही राष्ट्रांचें परस्परांत भांडण लावून त्यांचा एकमेकाकरवीं नाश करावा, अगर तीं आपसात लढून निर्बल झालीं म्हणजे आपलें समाजसत्तावादी क्रान्तीचें उद्दिष्ट साधून घ्यावें असा स्टालिनचा डाव आहे. इतर राष्ट्रें परस्पर झुजत असता मिळणाऱ्या अवधीत रशिया लष्करी दृष्ट्या व औद्योगिक बाबतींत बलसंपन्न करावा अशा विचारानें रशियन सरकारनें जर्मनीशीं सख्य जोडलें आहे अखिल जगतावर कामगारांचें राज्य स्थापन करावयाचे आहे, समाजसत्तावादी जगत्साम्राज्याची निर्मिति करावयाची आहे. यासाठीं स्टालिननें पोलडचे लचके तोडले, फिनलड घशात टाकला, उद्यां आशियातील एखाद्या राष्ट्रावर त्याची धाड पडेल! –आणि हें कशासाठीं? तर– जगावर वर्गरहित आदर्श समाजरचना नि सरकार नसलेलें राज्य निर्माण करण्यासाठी! कधींहि प्रत्यक्षांत दिसू न शकणाऱ्या सोव्हिएटवाद्याच्या या स्वप्नाच्या पूर्ततेसाठीं ही सारीं पवित्र पापें' घडत आहेत! मृगजळामागें धावण्याचाच हा प्रकार. हिंदुस्थानची पिळणूक करणारी ब्रिटिश नोकरशाही, अॅबिसीनियावर आक्रमण करणारी इटालियन साम्राज्यशाही, युरोपातील देश घशाखालीं घालणारी हिटलरशाही, चीनची लाडगेतोड करणारी जपानी भांडवलशाही यांपैकीं प्रत्येक शाही अट्टाहासानें असेंच म्हणत आहे कीं, 'हें सारें आम्ही त्यांच्या कल्याणा-

साठींच करीत आहों यात आमचा स्वार्थ कोणताहि नसून अज्ञानात गुरफटलेल्या या बिचाऱ्या कोकरांच्या अंतिम हिताचीच काळजी आम्हाला लागलेली आहे ! ' ( अंतिम हिताची तर नव्हेच पण अन्ताची मात्र काळजी लागलेली असावी ! )

अशा तऱ्हेनें कोणीहि लुटारू, खुनी वा दरवडेखोर आपल्या कृत्याचें समर्थन नाहीं का करू शकणार? मग ब्रिटिश राजवटींतील क्रूर-डायरशाहीचें, इस्थोनियात इटालियन सैनिकांनी केलेल्या अमानुष अत्याचारांचें, हॉलंड-बेल्जममध्ये नाझींनीं केलेल्या भयानक कत्तलींचे नि चिनी जनतेवर जपान्यांनी चालविलेल्या पाशवी जुलुमाचेंहि समर्थन नाहीं का करता येणार ? याला कांहीं सीमा उरेल का मग ?-पण बुद्धिमतांनी, विचारवतांनीं या मोहक घोषणांमागील आक्रमक वृत्ति नीट लक्षात घेतली पाहिजे नाहींतर कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं गरीब, निःशस्त्र मजुरावर केलेल्या ' अहिंसावादी ' गोळीबाराचेंहि समर्थन करण्याचा अनवस्था प्रसंग उद्भवेल ! सोव्हिएट रशियाला जगावर शांततेची पाखर घालावयाची असेल तर त्यासाठीं जीवघेण्या बॉम्बचा राक्षसी वर्षाव करण्याची काय आवश्यकता?

याचा स्पष्ट अर्थ असा आहे ! आता तो जुना रशिया-क्रांतिकालातील लेनिनचा आदर्श रशिया-शिल्लक उरलेला नाहीं जागतिक हित वगैरे त्याला कांहीं माहीत नाहीं. चढाऊ राष्ट्रवादानें चेतविली गेलेली लाल सेना जेवढा प्रदेश पादाक्रान्त करणें शक्य असेल तेवढा करून रशियन साम्राज्याचा विस्तार करील. फक्त फरक एवढाच कीं जुन्या काळचा निकोलस झार जाऊन त्याच्या जागीं बादशहा स्टालिनची प्रतिष्ठापना झालेली असेल जागें झालेले हिंदुराष्ट्र या लाल आक्रमणाला बळी पडणार नाहीं याची दक्षता आपण घ्यावयास नको काय ?

# रशिया–चढाऊ राष्ट्र

[1]असें म्हणतात कीं, सोव्हिएट रशियाचा सर्वाधिकारी मॉ. जोसेफ स्टालिन याने " हितोपदेश " नि " पञ्चतन्त्र " या ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास केला आहे गोष्ट खरी–खोटी त्याचा तोच जाणे ! पण एवढें मात्र खरें कीं, त्याच्या राजकारणाची इमारत ज्या पायावर उभी आहे, तो पाया ' पञ्चतन्त्रा ' तील नीतीचीच प्रतिकृति आहे

नव्या रशियाचा निर्माता भाई लेनिन याच्या मृत्यूनंतर–नव्हे त्याला अखेरची घरघर लागली त्या वेळेपासूनच–भाई स्टालिनकडे सोव्हिएट राज्ययंत्राची वारसदारी आली, नि त्या वेळेपासून आजपर्यंत राजनैतिक क्षेत्रात स्टालिननें मिळविलेले विजय अखंड परंपरेनें चालत आलेले आहेत.

आज या १९४१ च्या मार्च–प्रारंभाला जगाच्या राजकारणाची जी स्थिति आहे, त्यात सोव्हिएट यूनियनचें स्थान अपरिहार्य महत्त्वाचें असल्याचें दिसून येईल. गेल्या महायुद्धात ' दोस्ता ' च्या बाजूनें लढून रशि-

[1] " झंकार " साप्ताहिक २३ नि ३० मार्च १९४१

थार्म जे गमावलें त्याच्या अनेक पटींनी मोठें घबाड या दुसऱ्या महायुद्धात न लढता, फक्त जर्मनीच्या बाजूला उभें राहून, रशिया प्राप्त करून घेणार आहे आणि याला कारण जशी स्टालिनची मुत्सद्देगिरी, तशीच ब्रिटिश राजकर्त्यांची रशियाशीं अप्रामाणिक वर्तणूक.

सोव्हिएट रशियाच्या धोरणाचा विचार करून त्याची कांहीं एक निश्चित रूपरेखा सांगणे ही गोष्ट आज गेले कित्येक दिवस खरोखरीच दुर्घट होऊन बसली होती परस्परविरोध, गूढता, तत्त्वच्युति इत्यादि विविध रंगांनीं युक्त असलेलें सोव्हिएट राजकारण हें नुकतें नुकते एक ' अनाकलनीय कोडें ' होऊन राहिलें होते क्रेमलीनच्या या पुरातन राजवाड्यात काय घडत आहे, याचा अजमास घेण्यासाठीं तेथें जाऊन राहिलेले सर स्टॅफोर्ड क्रिप्ससारखे इंग्रज मुत्सद्दीहि त्या बाबतीत अयशस्वी ठरले. परंतु १९४१ सालानें या कोड्याचा बराच उलगडा केल्यासारखा दिसेल

पोलंडवरील आक्रमणाचा किंवा रशियाच्या भाषेत त्याच्या न्याय्य विभागणी ' चा प्रश्न उपस्थित होईपर्यंत चालू महायुद्धाच्या दृष्टीनें रशियन सोव्हिएटला युरोपच्या राजकारणात लक्षात घेण्यासारखें दृश्य स्थान नव्हते. तोंपर्यंत ब्रिटन–फ्रान्स नि जर्मनी–इटाली आपापले डावपेच रशियाचा विचारहि न करितां पार पाडूं शकत होते परंतु पोलिश लढ्यापासून त्या स्थितीत पालट पडला आहे पोलिश स्वातंत्र्याचा अपहार होणें किंवा रुमानिया जर्मन रीशशीं जोडला जाणे याचा सरळ नि स्पष्ट अर्थ, नाझी जर्मन सरसीमा बोल्शेव्हिक रशियाच्या सीमेला येऊन भिडणें. अर्थात् या दोन परस्परविरोधी, एकमेकाच्या हाडवैरी तत्त्वोपासकांची गाठ पडणें म्हणजे त्या संघर्षातून ठिणग्या निर्माण होणें अपरिहार्य होतें. दूरदर्शी हिटलरनें ही सर्व परिस्थिति लक्षात घेऊनच स्टालिनच्या मतप्रवाहाची चाचपणी करण्यासाठीं बृहत्तर युक्रेनचा प्रश्न निर्माण केला. त्या प्रश्नाच्या उपस्थितीबरोबरच तर्किल्याप्रमाणें सोव्हिएट रशियानें हालचालीस किंवा तशा घडामोडीस सुरवात केली हिटलरनें तेवढ्यात मॉस्को सरकारचें पाणी जोखलें नि तें परावलंबित्वामुळें थोडें कमजोर आहे हें समजूनच

आपले थोडे पुढे टामटलें तेवढ्यात इतर अनत उलाढाली करून जर्मनीने मेमेलचा घास गिळला नि ढेकर देत पोलंडकडे दृष्टि वळविली

इंग्लंड फ्रान्सनी पोलंडला सरक्षणाची हमी दिली पण त्याची परिपूर्तता करण्याची शक्यता रशियन मैत्रीशिवाय संभवत नव्हती. लगेच इतके दिवस ज्याला ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अस्पृश्य लेखून दूर ठेविलें होतें, नि ज्याला ते पाण्यात पाहात होते—आजहि पाहात आहेत—त्याच यू एस् एस्. आर शी लष्करी साहाय्याच्या करारासाठी वाटाघाटी सुरू केल्या. गरज लागताच वैद्याकडे धावण्याच्या ब्रिटिश राजनीतीला उद्देशून रशियाचे सरकारी वृत्तपत्र " इझवास्ता " यानें मार्मिकपणे लिहिले आहे' " वास्तविक पाहता ब्रिटन—फ्रान्सच्या मनातून सोव्हिएट युनियनविषयी कमालीचा द्वेषभाव आहे, आणि याचाच फायदा घेऊन जर्मनी, इटाली व जपान यांनी रशियाविरुद्ध एक ' अॅन्टीकॉमिटर्न पॅक्ट ' निर्माण करण्याचे बुजगावणें उभें केले त्या बुरख्याखाली दडून त्या तीनहि राष्ट्रांनी आपले लष्करी सामर्थ्य उत्तम रीतीनें वाढविलें पण तोंपर्यंत ब्रिटनला वा फ्रान्सला रशियाच्या साहाय्यार्थ जाण्याची आठवणसुद्धा झाली नाही. मात्र आता जव्हा त्या तीनहि सघटित नि प्रबल राष्ट्रांनी ब्रिटन—फ्रान्सच्या अस्तित्वाच सुरुग लावण्यास सुरवात केली, तेव्हा त्यांचे डोळे खाडकन् उघडले. नि त्यांनी रशियाकडे धांव घेतली. पण कशासाठी ?—तर स्टालिनच्या युनियनला फॅसिस्ट सर्वाधिकारशाहीविरुद्ध लढवून दोघांचाहि समूळ नाश करण्यासाठी ! "

या वाटाघाटी चालल्या असतानाच एकाएकी रुसो—जर्मन अनाक्रमणाच्या कराराचा जन्म झाला नि दुसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटला

यानतर रशियानें ३० नोव्हेंबर १९३९ ला फिनलंडवर आक्रमण केलें. परतु त्यात सुमारें साडेतीन महिने लढून लाल सैन्यानें जगभर आपल्या लष्करी सामर्थ्याची नाचक्की करून घेतली रशियाला त्या वेळीं कळून आलें की. आपल्या अवाढव्य प्रदेशातील दळणवळणाची साधनें अपुरी असून हत्याकांडात ठार झालेल्या कसलेल्या सेनापतीची वाण त्वरित भरून

काढणें अत्यावश्यक आहे. अखेर स्टालिनला पाहिजे होत्या त्या सवलती त्यानें फिनलंडमध्यें मिळविल्या, पण त्यांत नवल नाहीं !

## युद्ध टाळण्याची पराकाष्ठा

यापुढे मात्र स्टालिनचें धोरण खरोखरीच अत्यंत कुशल मुत्सद्देगिरीचें नि कावेबाज राहिलें आहे आपल्या अंगाला किंचित्‌हि कुठें खरचटा पडणार नाहीं किंवा सरकारी दारूगोळ्यापैकीं एखादीहि गोळी उपयोजावी लागणार नाहीं अशा बेतानें नुसत्या दमदाटीवर नि राजनैतिक डावपेचांनीं जें मिळेल तें घशात टाकावयाचें ही सांप्रत स्टालिनची राजनीति आहे. चालू महायुद्धांत सोव्हिएट यूनियनला पडावें लागू नये म्हणून तर नाझी जर्मनीशीं स्टालिनने सगनमत केलें. द्वितीय महायुद्धाची झळ आपल्याला लागू नये अशी दक्षता सोव्हिएट रशिया घेत असला तरी, त्याला त्या युद्धांतील फायदे मात्र अवश्य पाहिजे आहेत, नि त्याकरिताच तर त्यानें 'ॲंटी–कॉमिंटर्न' करारांतील एका भागीदाराशींच मित्रत्वाचा संधि करण्याचें साहस केलें !

आजपर्यंत वरील धोरणाप्रमाणें वागूनच रशियानें पोलंडचा काहीं भाग नि फिनलंडमधील महत्त्वाचा प्रदेश हस्तगत करून, लिथुआनिया, लाटव्हिया नि इस्थोनिया हीं तीन बाल्टिक राष्ट्रें सोव्हिएट यूनियनमध्यें समाविष्ट करून घेतलीं हिटलरच्या नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम नि फ्रान्सवरील आक्रमणाशीं रशियाचा प्रत्यक्ष संबंध येण्यासारखा नव्हताच. पुढें जेव्हां बाल्कन्सच्या राजकारणांत नि डॅन्यूबियन प्रदेशांत नाझींचा हात शिरकू लागला, तेव्हां रशिया नि जर्मनी यांचे हितसंबंध एकमेकांशीं संघर्ष पावण्याची शक्यता उत्पन्न झाली

१९४१ च्या मार्च पहिलीला हर हिटलरनें जो रक्तशून्य विजय मिळविला, त्या विजयापर्यंतचा सारा इतिहास विचारांत घेतला तर सहजपणें एक असें दृश्य दिसेल की, चालू महायुद्धांत बाल्कन्समधील प्रश्न हिटलर–स्टालिन यांच्या पूर्वयोजनेप्रमाणें सोडविले जात आहेत हंगेरी, स्लोव्हाकिया नि रुमानिया यांनीं जर्मन रीशशीं एकनिष्ठा व्यक्त करून

त्रिराष्ट्र करारात आपल्याला समाविष्ट करून घेतलें, हा केवळ कागदी चिटोऱ्यावरचा खेळ नव्हे बाल्कन्समध्यें जर्मनीप्रमाणेंच रशियाचेहि घनिष्ठ संबध गुतलेले होते नि आहेत. परंतु बाल्टिक संस्थानें सोव्हिएट यूनियनला जोडली जातांना हर हिटलरनें जसा ब्रहि उच्चारला नाहीं, तसाच बाल्कन संस्थानांचें जर्मन अधिराज्याशीं संयोजन केलें जात असतां स्टालिननेंहि शब्द बोलावयाचा नाहीं असा संकेत ठरलेला असावा सोव्हिएट रशियाच्या धोरणासंबंधीं दि. २४ फेब्रुवारीला " डेली टेलिग्राफ " च्या सोफिया–वार्ताहरानें पाठविलेली माहिती अवश्य विचारांत घेण्यासारखी आहे तो लिहितो, " सोव्हिएट परराष्ट्रमंत्री मॉ. मोलोटॉव्ह यांच्या लवकरच व्हावयाच्या प्रगट भाषणाची प्रत नाझी-श्रेष्ठींना आगाऊच मिळाली होती नि त्या भाषणात असा सूर होता की, जर्मनीनें दक्षिणेकडे पाय पसरले तरी सोव्हिएट यूनियन त्याला संमति दर्शवील. यामुळें अर्थातच अत्यंत वेगानें नाझी अधिकाऱ्यांनी आपले बल्गेरियन मोहिमेचे बेत योजिले "

George Solovevtchik या लेखकानें " The Nineteenth Century and After " या मासिकाच्या १९४० च्या डिसेंबर अंकात स्टालिनच्या तत्कालिन उद्देशांविषयीं लिहिलें आहे. His interests are simple enough to recognise First and foremost, he is concerned with maintaining his dictatorship over the terrorised two hundred million slaves who now live under his rule."

" Secondly—to keep out of war at any price " आणि याचें कारण म्हणून तो सांगतो की, Neither the internal political nor the economic position of the Soviet Union enables Stalin to risk an armed conflict with anybody

याचा इत्यर्थ असा की, स्टालिनला सोव्हिएट यूनियनवरील आपलें अनियंत्रित सर्वाधिकारित्व कायम राखावयाचें असून, रशियाला युद्धाची

झळ लागू द्यावयाची नाहीं. आणि रशियाची अंतर्गत राजकीय नि आर्थिक स्थिति परराष्ट्राशीं युद्ध जुंपलें तर रशियाला त्यांतून यशस्वी-पणानें पार नेऊं शकेल इतकी समाधानकारक वा विश्वासार्ह नाहीं

सोव्हिएट यूनियन म्हणून ज्याला म्हणतात तो रशिया हाहि एक देश असून तें स्वयंशासित राष्ट्र आहे याची जाणीव जर विसरू दिली नाहीं, तर सोव्हिएट श्रेष्ठींच्या उद्देशाविषयीं गोंधळांत पडण्याचें कांहींच कारण नाहीं तसेंच स्टॅलिन हा एक कर्तबगार, महत्त्वाकांक्षी, मानवी गुणांनीं युक्त असा पुरुष असून अद्यापि त्यानें आपपरभावाचा त्याग करून नि अंगाला राख फासून साधुत्व अंगिकारलेलें नाहीं, ही गोष्ट जर आपण नीट लक्षांत ठेविली, तर त्याच्या हेतूविषयीं 'अनाकलनीय' असे उद्गार काढण्याची पाळी आपल्यावर येणार नाहीं. एका वाक्यांत सांगावयाचें तर, राष्ट्रवादाचा समूळ नाश करावयास निघालेल्या या 'कामगारांच्या स्वर्गांत' जहाल राष्ट्रनिष्ठेची जी शिकवण आज प्रत्यक्ष दिली जात आहे तिची बरोबरी फक्त नाझीच करू शकतील !

सोव्हिएट यूनियनला एक गोष्ट कसेंहि करून टाळावयाची आहे, नि ती म्हणजे एकाच वेळीं दोन शत्रूंशीं झुंज देणे आजचें स्टॅलिनचें धोरण याहिपेक्षा अधिक सुरक्षिततेचें म्हणजे युद्धापासूनच सर्वस्वी अलिप्त राहण्याचें आहे, परंतु तें जमलें नाहीं तर निदान एकाच वेळीं दोन रणक्षेत्रावर लढाई देण्याचा दुर्धर प्रसंग ओढवू नये, याकरिता सोव्हिएट श्रेष्ठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत पूर्व व पश्चिम या दोन्ही ठिकाणीं एकाच वेळीं युद्ध करायला लागू नये म्हणून लाल सैन्याचा अधिकारी वर्ग अत्यंत दक्षता आतापर्यंत घेत आला आहे. 'लाल नेपोलियन' म्हणून ओळखला जाणारा कर्तबगार सोव्हिएट सेनापति मार्शल तुकाचेव्हस्की यानें हा दुर्घट प्रश्न सोडविण्यासाठीं आपला सारा उत्साह नि श्रम खर्ची घातले. परंतु अखेर त्यांत अपयश पावून नि हताश होऊन त्याला उद्गार काढावे लागले कीं, 'कांहीं झालें तरी सोव्हिएट यूनियन जर्मनीची बरोबरी करू शकत नाहीं ! हा प्रश्न इतका बिकट होण्याचें प्रमुख कारण म्हणजे

सोव्हिएट यूनियनचा ८१४४००० चौ मैल पसरलेला अवाढव्य प्रदेश. त्यातहि दळणवळणाची नि विशेषत लष्करी वाहतुकीची साधने याचा अभाव असल्याने त्यातील बिकटपणा वाढलाच आहे. सैबेरियात फक्त एकच एक लोहमार्ग आहे. आणि या साऱ्या अडचणींत स्टालिनने 'धक्के-खाऊ' किंवा 'सीमा राष्ट्रे' ( Buffer States ) निर्माण करून शत्रु आपल्या घराच्या दारापासून दूर ठेवण्याचें लेनिनचें धोरण बदलून तीन बाल्टिक राष्ट्रे सोव्हिएट यूनियनमध्यें जोडल्यामुळें प्रादेशिक विस्ताराची एक नवीन अडचण उपस्थित झाली आहे आणि यातच सोव्हिएट धोरणाचे खरें रहस्य सापडेल.

जर्मनी, जपान नि इटाली यानी कम्युनिस्ट इंटरनॅशनलविरुद्ध म्हणजे पर्यायाने रशियाविरुद्ध एक 'अँटी-कॉमिंटर्न' करार केला परंतु या करारानें रशियाचे प्रत्यक्ष नुकसान असें काही झाले नाही आणि हा करार झालेला असल्यामुळें रशिया नि जर्मनी याचे सूत जमणें शक्य नाही असा समज काहीं प्रामाणिक मुत्सद्द्यानी—म्हणण्यापेक्षा तत्त्वोपासकानी—करून घेतला होता पण लवकरच तो 'समज' गैरसमज ठरला, नि मॉस्कोमध्यें रूसो-जर्मन अनाक्रमणाच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आणि तरीहि जर्मन अधिकारी म्हणालेच कीं, या नव्या कराराने अँटी-कॉमिन्टर्न कराराला किंचितहि बाध येत नाहीं पुढें बर्लिनमध्यें जर्मनी, जपान नि इटाली याचा परस्परसाहाय्याचा करार झाला आणि तरीहि मॉस्को-बर्लिन अनाक्रमणाचा भक्कम करार नि त्यातील कलमें जशींच्या तशींच शाबूत राहिलीं ! राज-कारणातील हे खेळ खरोखरी भातुकलीच्या खेळातील पोरस्वभावालाहि लाजविणारे आहेत '

## तथापि रूसो-जर्मन युद्ध पेटलेंच

समीपचा भूतकाल एकमेकाच्या हाडवैरात गेला, वर्तमानात एकमेकानी एकमेकांच्या गळयात गळे, केव्हां तरी कापण्याची संधि आणूच अशा अंतस्थ उद्देशानें घातले, मॉस्को-बर्लिन अनाक्रमणाचा करार, संयुक्त डॅन्यूबिअन कमिशनमध्यें जर्मनाशीं केलेला सहकार, १२ नोव्हेंबर १९४०

ला सोव्हिएट परराष्ट्रमंत्री मॉ. मोलोटॉव्ह याने बर्लिनला दिलेली भेट नि नुकताच १० जानेवारी १९४१ मध्ये झालेला रूसो-जर्मन व्यापारी देव-घेवीचा करार—या प्रमुख घटनांनीं त्या मैत्रीचें दृढीकरण झालें.

[1]आणि दि २२ जून १९४१ ला पहाटे ३ वाजता जर्मन सर्वाधिकाऱ्यानें सोव्हिएट रशियाविरुद्ध युद्ध पुकारले. १९३९ मधील रूसो--जर्मन मित्रसंधीनें जेवढा धक्का दिला नसेल एवढा प्रचंड विस्मयाचा धक्का साऱ्या जगाला बसला! रुसो—जर्मन अनाक्रमणाच्या कराराच्या चिंधड्या उडाल्या, त्याचे कागद वाऱ्यावर विरून गेले पण ही अनपेक्षित—म्हणजे इतक्या लवकर—घटना घडण्यास कारणेंहि तशींच जबरदस्त घडलेली आहेत अनाक्रमणाच्या करारावर स्टालिननें जी स्वाक्षरी केली होती ती त्याच्या नेहमींच्या कपटी धोरणाला धरूनच, असें आता सिद्ध होत आहे. स्टालिनला नाझीवादाचा उत्कर्ष व्हावयाला हवा होता असे मुळीच नाही उलट त्याच्या नाशाची तो डोळ्यांत तेल घालून वाट पाहात होता. परतु तसें घडतांना इतर दुसरी कोणतीहि सत्ता जगात बरचढ होऊन बसणार नाही, त्या परिस्थितीचा रशियाला पूर्णपणे फायदा घेता येईल याची दक्षता त्याला अत्यत काळजीपूर्वक घ्यावयाची होती नाझी जर्मनीचें सकट दाराशी होतें त्याच्याशीं उघड शूरासारखे दोन हात करून त्याचा निःपात करण्याचें नैतिक वा भौतिक सामर्थ्यहि स्टालिनच्या रशियापाशी नव्हतें, आज नाहीं! म्हणून त्याने आपल्या नेहमींच्या हातचलाखीला प्रारभ केला. रशियात सत्ता-सपादनासाठी त्यानें जी कुटिल नीति अवलबिली तीच नीति त्यानें या प्रसगीं उपयोगात आणावयाचे ठरविलें. हिटलरशी नावापुरता सख्यत्वाचा करार करून त्या मित्रत्वाच्या बुरख्याखाली नाझींचे डाव हाणून पाडण्याची कारवायी त्यानें सुरू केली. ही स्टालिनची राजनीति होती, परतु हिटलर त्या बाबतात त्याला पुरून उरण्याइतका चाकबगार आहे जर्मनीने रशियाशी केलेला मित्रत्वाचा करार अखेरपावेतों टिकविण्याचे आटोकाट प्रयत्न केले, परतु स्टालिननें जर्मनीच्या पाठीत मागून

( १ ) परिशिष्ट पहा.

सुरा खुपसण्याचे प्रयत्न अखेर इतक्या थरापर्यंत नेले की, हिटलरला त्याकडे दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें, जर्मन परराष्ट्रमंत्री हर व्हॉन रिबेनट्रॉप यानें या बाबतीत सोव्हिएट वकिलाला दिलेल्या तक्रारखलित्यात म्हटले आहे तें खोटें वाटत नाही

एकदरीनें पाहता यापुढे तरी सोव्हिएट राज्यकर्त्यांचें प्रचलित धोरण हें काही अनाकलनीय कोडें राहिलें आहे असे मला वाटत नाही. रशियाला युद्धापासून सर्वस्वी अलिप्त ठेवून, त्याची आर्थिक पुनर्घटना करावयाची आणि त्याला जागतिक राजकारणात उच्च राजकीय स्थान प्राप्त करून द्यावयाचे, हा सांप्रतच्या सोव्हिएट श्रेष्ठींचा म्हणजे स्टालिनचा म्हणा—संकल्प असून त्याच अनुरोधानें रशियन राजकारणाची सूत्रे हालत राहतील सोव्हिएट यूनियनचें नियंत्रक हे व्यवहारवादी असून, शक्तीवर त्यांचा संपूर्ण विश्वास आहे, तत्त्वोपासनेच्या खुळचट फंदात पडून राष्ट्राच्या हिताची राखरांगोळी करणारे 'महात्मे' अद्यापि त्यांच्यात कोणी नाहीत-निदान त्या सर्वांचा चालविता, बोलविता नि करविता धनी स्टालिन तरी तसा नाहीच नाही. यामुळें आज रशिया देश जो आर्थिक दृष्ट्या खालावला आहे नि सामर्थ्यानें कमी पडला आहे, ती त्याची हलाखीची स्थिती सुधारण्याकडे स्टालिनचें सारे लक्ष केंद्रित झालें आहे

आणि या दृष्टिकोणातून पाहता ब्रिटन-अमेरिकेतहि तथाकथित "लोकशाह्या"—शीं सख्य जोडून त्याला काय फायदा? त्यांच्याकडून जर काहीं मिळणार असेल, तर फक्त युद्धात प्रत्यक्ष भाग घेण्याचें 'सन्मान्य' निमंत्रण! बरें, रशियातील चालू तिसऱ्या ( १९३८—१९४२ ) पंचवार्षिक योजनेत येणारें भयंकर अपयश सावरून धरण्यासाठी तंत्रविशारद, यंत्रें नि काही विशिष्ट माल यांचा पुरवठा या लोकशाह्या रशियाला आज करू शकत नाहीत, कारण स्वतःचा जीव वाचविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या धडपडीखालींच त्यांचा जीव अर्धमेला होत आहे तसेंच या लोकशाह्यांनी आजवर केलेला रशियन राजवटीचा द्वेषहि स्टालिन विसरू शकत नाही.

याउलट जर्मन रीश त्याची प्रत्येक गरज भागविण्यास समर्थ आहे. शेकडों नाझी तंत्रविशारदांनीं नि शास्त्रज्ञांनीं सोव्हिएट यूनियनमध्ये जाऊन तेथील उद्योगधंदे, शेती नि इतर उत्पादन याची पद्धति सुधारली असून, दळणवळणासंबंधी नव्या योजनाहि आखल्या होत्या असें कळतें. रशियानें आज तटस्थ राहणें हेंच जर्मनीला फायदेशीर असल्यामुळें युद्धात ओढले जाण्याचा धोकाहि जर्मनीकडून त्याला संभवत नव्हता. उलट 'शांतते' च्या धोरणानें एक एक प्रदेश गट्ट करण्याची संधि जर्मनी त्याला देत असल्याचें दिसत होतें अर्थातच जोंपर्यंत या परस्परपूरक, पोषक नि साहाय्यक संबंधाना बाध येत नव्हता, तोंपर्यंत स्टालिन–हिटलरचें युद्ध जुंपल्याच्या कितीहि विश्वसनीय ' वार्ता कानावर येऊन आदळल्या तरी त्यावर विश्वास ठेवणे शक्य नव्हतें

त्रिराष्ट्र करारातील दुसरा एक भागीदार इटाली यांशींहि भांडण करण्याची रशियाला आवश्यकता नव्हती सोव्हिएट तेलाचें तें एक मोठें गिऱ्हाईक असून इटालीचे जहाजें बांधण्याचे कारखाने आजवर सोव्हिएट सरकारला बरेंच फायदेशीर ठरले आहेत, नि शिवाय ती सत्ता हिटलर-च्या जवळच्या मित्रात मोडते

परंतु इतकें असलें तरी आज जर्मनी व इटाली यांनी रशियाशीं युद्ध घोषित केलें आहे त्याचा इतिहासहि मोठा मनोरंजक आहे त्रिराष्ट्र करारातील तिसरा भागीदार हाहि रशियाच्या जुन्या हाडवैऱ्यांपैकीं एक मध्यंतरी जर्मनी–इटालीप्रमाणेंच जपानशींहि रशियाचें सूत जमल्याचें आपण पाहिलेंच मित्रत्वाचा करारहि परस्परात झाला परंतु आता नवीन घडलेल्या घटनेनें म्हणजे रूसो–जर्मन युद्धानें या संबंधावर पाणी पडेल असे वाटतें. आतापर्यंतच्या प्रकट-अप्रकट इतिहासावरून या सुसंधीचा फायदा जपान रशियाविरुद्ध करून घेतल्याखेरीज राहणार नाहीं, असें अनुमान तज्ज्ञ माणसें काढीत आहेत

स्टालिननें हुकूमशाही गटाशीं सगनमत केले ही गोष्ट स्पष्टच दिसते. परंतु त्याचा फार मोठा डाव होता. ह्यासंबंधींचें विवेचन पुढें येईलच

हुकूमशाही राष्ट्राशी स्टालिननें केलेल्या सगनमताच्या निषेध करताना इंग्लंडमधील साम्यवादी भाई एच्. एन्. ब्रेल्सफोर्ड लिहितात. " हा रशियाचा लाल झार समाजसत्तावादाचें थडगें खणीत असून आपल्या साम्राज्यवादी विरोधकाच्या जाळ्यात अधिकाधिक गुरफटत आहे. "

स्टालिनच्याच एका भाईबंदाकडून त्याला मिळालेला हा आहेर आहे ! या साऱ्या उलटसुलट कोलांट्या उड्यातून खरे साम्राज्यवादी कोण तें एक मार्क्सच जाणे !

हे सारें साधलें, रशिया आर्थिक, राजकीय नि लष्करी दृष्ट्या बलाढ्य झाला, आपसात झुजून शिल्लक उरलेल्या विजयी भांडवलशाही शक्तींशीं एकट्यानें दोन हात करण्याइतका विश्वास स्टालिनच्या ठिकाणीं उत्पन्न झाला, तर मग पुढें जागतिक क्रान्तीची कल्पना—तीसुद्धां दुर्दैवी ट्रॉट्स्की म्हणत होता तसली नव्हे; जगावर सोव्हिएट साम्राज्य—हो साम्राज्य, अगदी सोटेशाही जुलुमी राज्य—स्थापन करण्याची मनीषा ! कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा चिटणीस नि स्टालिनचा एक कर्तबगार हस्तक डिमिट्रॉव्ह यानें मागें एकदा सांगितलें आहे —" But all the deviations and all the ins and outs, our tactics are directed to a single end — The World Revolution. " विश्वास ठेवा अगर नका ठेवू, सोव्हिएट पुढारी तसें म्हणतात खरें !

या रशियन राष्ट्राची लोकसंख्या १८ कोटींच्या वर आहे आणि एवढ्या अवाढव्य संख्येतून लाल सैन्यातील पलटणी उभारल्या जातात. १९३९ सालात रशियन सरकारने सैनिकसिद्धतेसाठीं ४०,८८,५०,००,००० रुबल्स खर्च केले. १९४०–४१ सालाकरिता सोव्हिएट युनियनच्या एकूण उत्पन्नाचा एक तृतीयांश भाग म्हणजे ५७ अब्ज रुबल्स लष्करी खर्चासाठीं मंजूर करण्यात आले आहेत रशियाची लाल सेना संख्येनें जशी प्रचंड आहे, तसेंच तिला सर्व तऱ्हेच्या युद्धपद्धतींचें शिक्षण देऊन सेनापति व्होरॉशिलॉव्हनें तरबेज केलें आहे संरक्षक सैन्या-

तून आक्रमक सेना उभारण्याची योजना रशियन लष्करी श्रेष्ठींपाशीं केव्हाच तयार होऊन राहिली आहे.

१९२४ पासून १९४१ पर्यंत लाल सैनेची संख्या नि गुण या दोन्ही दृष्टींनी झालेली प्रगति पाहून स्तिमित व्हावें लागेल. १९३२ मध्ये रशिया युद्धसामुग्रीच्या बाबतींत पाश्चिमात्य लष्कराच्या बरोबरीला आला. १९३४ च्या सुमाराला आधुनिक शस्त्रास्त्रें लाल सैन्याला पुरविण्यात आलीं. जनरल ग्विडेरिन या जर्मन सेनानीच्या मताप्रमाणें रशियापाशीं १९३७ मध्यें प्रत्येक सैनिकामागे १२ अश्वशक्तीचें यंत्रसामर्थ्य सुसज्ज झालें रण-गाडे, विमानें वगैरे बाबतींतहि तो मागें नाहीं. प्रतिवर्षी सुमारें २४ लक्ष नवीन तरुण या सैन्यात भरती केले जात आहेत आणि हें एक राष्ट्रीय' सैन्य आहे !

रशियाचे आरमारी, वैमानिक नि भूचर सैन्य आज कोणत्या स्थितींत आहे याची आंकडेवारीनें छाननी करून ते जगांतील बलाढ्य सत्ताना तोंड देण्याच्या बाबतीत कितपत यशस्वी ठरेल हा वादाचा प्रश्न आहे. परंतु त्यासंबंधीं एवढें लक्षात ठेविलें तरी पुरे, जगातील प्रथम श्रेणीच्या लष्करी सामर्थ्यांत त्याची गणना केली जाते.

आणि अशा लष्करी शक्तीनें युक्त असलेल्या या देशाचे कर्णधार जगाला ओरडून सांगत आहेत कीं, ' आमचा हा सारा खटाटोप जगाच्या कल्याणाकरिता चालला आहे. सोव्हिएट क्रान्तीचें अपुरें कार्य पार पाडण्या-साठीं आम्ही हें व्रत स्वीकारलें आहे ' !

## हिंदी व रशियन महात्म्याचे उपकार

पण वस्तुस्थिति काय आहे ?

स्टालिननें—ट्रॉट्स्कीच्या मताप्रमाणें—क्रांतीचा विश्वासघात केला, दुसऱ्या एका विद्वानाच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें क्रांतीचें रसशोषण केलें आहे, तिचें चिपाड बनवून टाकिलें आहे माझ्या मतें स्टालिनने रशियन क्रांतीचें देवतास्वरूप काढून टाकून तिला चालत्याबोलत्या मनुष्यात आणून सोडलें आहे आणि त्या थोर माणसानें जगावर हा एक महान् उपकारच करून

ठेविला आहे. वर्गरहित समाजरचना, सरकाररहित राज्ययंत्र, विषमता-रहित जगद्व्यापार, यक्षनगरींतील मनोरम कल्पना !—पण कल्पनाच !! त्या व्यवहारांत उतरू शकणार नाहीत हें भविष्य विचारवंतानीं केव्हांच वर्तवून ठेविलें होतें. पण लेलिनला वाटलें, आपण ते प्रत्यक्षांत उतरवूं. तो मोठ्या उत्साहानें, आत्मविश्वासाने, सात्विक ईर्षेनें पुढें सरसावला. पण ज्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा व्यवहार रशियाच्या अफाट भूमीवर घडवि-ण्यासाठी या महात्म्यानें चंग बांधला, त्या मार्क्सवादाचा 'लेनिनवाद' कसा होत आहे, तें त्याला स्वतःलाहि बिचाऱ्याला प्रथम उमजलें नाहीं. पुढें तें जेव्हां त्याला समजलें, तेव्हां तो हेंहि उमजला कीं, ही मार्क्सवादाची मान-गड काहीं जमण्यासारखी नाहीं तेव्हां आपला त्या शहाण्या माणसानें 'लेनिनवादा'चा पुरस्कार केला आपल्या अनुयायांना त्याचेच धडे दिले. पण तो सांगे. 'हें आपलें तात्पुरतें आहे बर का मग जेव्हां आपण सुस्थिर नि बलसंपन्न होऊं तेव्हां तो अस्सल मार्क्सवादाचा दिवा आपण रशियांत लावूं. तोंपर्यंत हा आपला 'लेनिनवादा'चाच कमी प्रकाशाचा दिवा वापरू या. त्या तेजस्वी दीपाचा प्रकाश सहन होणार नाहीं इतक्यांत जनतेला.' मार्क्सवादाची ती तारका अशा रीतीनें निखळून जमिनीवर आदळली दगड बनला तिचा पण चतुर लेनिननें तिची एक कमनीय मूर्ति बनवून तिला मॉस्कोच्या मंदिरांतील क्रेमलिनच्या देव्हाऱ्यांत स्थानापन्न केलें पण तिची पूजा बांधतां बांधतांच लेनिन एक दिवस असमाधानाचे निश्वास टाकीत हा मृत्युलोक सोडून गेला

पुढें स्टालिन आला. तो पूर्ण व्यवहारवादी. रुपये-आणे-पैंत हिशोब सारा त्याचा. तत्त्वबित्त्व तें तिकडे पुस्तकांत ! त्यानें बर म्हटल्याप्रमाणें त्या देवतेला मानव बनविलें. पण मौज ही कीं, त्यानें लेनिनची स्वर्गांतल्या देवांत प्रतिष्ठापना केली, नि स्वतः तो मृत्युलोकांतला देव बनला. तोच देव्हाऱ्यांत जाऊन बसला क्रांतिदेवता मानवस्वरूपानें या स्टालिनदेवाची सेवा करूं लागली. केवढा महापुरुष ! क्रान्तीला आपल्या सेवेला लावलें !! —आणि स्टालिन म्हणजे रशिया. या रशिया देशाची सेवा बोल्शेव्हिक

क्रांति करूं लागली क्रांति देशासाठीं होती देश क्रांतीसाठीं, तिच्या प्रयोगासाठीं, तिच्या खेळासाठीं नव्हता

मी स्टालिननें जगावर उपकार केले असें म्हणतो तुम्ही विचाराल. कसे ? आंतरराष्ट्रीय वादाचे स्वप्नाळू तत्त्वज्ञान आज जगाला पचण्यासारखें नाहीं त्या मृगजळाच्या पाठीमागें जें राष्ट्र आज धावूं लागेल त्याचा सर्वनाश झाल्याशिवाय राहाणार नाहीं ही वस्तुस्थिति स्टालिननें ओळखली आंतरराष्ट्रीय वादाच्या, जगत्क्रान्तीच्या कल्पनांचा प्रयोग करण्याच्या भरात ट्रॉट्स्की प्रभृतीकडून रशिया हें राष्ट्र नेस्तनाबूद होऊन जाईल, हें भविष्य त्याला दिसूं लागले. त्याला तसें घडावें अशी इच्छा नव्हती. जन्मभूमीवर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या जॉर्जियनचे रक्त त्याच्या नसानसातून धावत होतें ते जागृत होऊन उठले. 'थाम्बा !' तो ओरडला. 'अशानें रशिया देशाचें नाव जगाच्या इतिहासातून पुसून टाकलें जाईल. आपल्या प्रिय मायदेशाचा विध्वंस होऊन जाईल' त्याने बजावले—आणि म्हणून रशियाच्या राष्ट्रीयत्वाला विरोध करणाऱ्या, रशिया देशाच्या हिताआड येणाऱ्या लक्षावधींची सैबेरियांत पाठवणी झाली, सहस्रावधींचीं डोकीं उडालीं, शेकडो बंदुकांच्या गोळ्यांना बळी पडले !! तसें झालें म्हणून रशिया वाचला तें राष्ट्र जगलें तसें न होतें तर हा घातक खेळ खेळण्याचा मोह इतर अनेक राष्ट्रांना अनावर झाला असता आणि आता तसा मोह कोणाला झाला तरी तो या खेळाचा प्रयोग करण्यापूर्वी हजार वेळा विचार करील. जगाला स्टालिननें एक चांगला धडा शिकविला आहे.

याचाच समकालीन इतिहास म्हणून आणखी एक कटु सत्य सांगतों. रागवूं नका आपल्या हिंदुस्थानातीलच आहे ते. विश्वशांतीच्या, परम अहिंसेच्या, स्वर्गीय तत्त्वज्ञानाच्या साहाय्यानें राष्ट्रीय स्वातंत्र्याचा ढासळलेला प्रासाद उभारूं पाहाणारे गांधीजीहि जगाला एक नवा धडा शिकवीत आहेत. जसा ( अपभ्रष्ट ) मार्क्सवादाचा किंवा साम्यवादाचा प्रयोग रशियांत यशस्वी ठरूं शकला नाहीं; तसाच शांति—अहिंसा—अनत्याचार—सत्य

याच्या रसायनाचाहि प्रयोग हिंदुस्थानात अयशस्वी झाला, असें ते आता कठरवानें ओरडून सांगत आहेत. एकाचा धडा रक्तानें लिहिलेला आहे तर दुसऱ्याचा अश्रूंनी लिहिलेला. कृतज्ञ जगानें या दोन्ही महात्म्यांचें ऋण केव्हाहि विसरता कामा नये ! परमेश्वर दोघांनाहि उदंड आयुरारोग्य देवो !

आणि त्यातील रशियन महात्म्याच्या वैयक्तिक जीवनात प्रवेश करणें मोठें मनोरंजक आहे हें का सांगावयास पाहिजे ? तिकडेच वळणार आहोंत आपण आता.

# स्टालिन म्हणजे रशिया

उंचापुरा मजबूत शरीरबांधा, रुंद खांदे नि बारीक काळेभोर डोळे अशा मूर्तीचें छायाचित्र तुम्हीं अनेकदां पाहिलें असेल. त्या चेहेऱ्यावर चाणाक्षपणाचें हास्यहि पुष्कळ वेळा विलसतांना दिसेल—तोच स्टालिन

कोणाहि मोठ्या व्यक्तीविषयीं, अलौकिक माणसाविषयीं—फार काय असामान्य वस्तूविषयींहि अनिवार कुतूहल वाटणें हा मनुष्यस्वभाव आहे. त्यातहि आज स्टालिन हा पुरुष जागतिक राजकारणात प्रामुख्यानें व प्रभावानें चमकत असल्यानें तर ती उत्कंठा तीव्रतर होणें साहजिक आहे. परंतु त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहाण्याची शक्यता जवळजवळ नाहींच. जिथें खुद्द रशियातील जनतेला त्याची प्रत्यक्ष मूर्ति दिसणें अवघड, तिथें माझ्यासारख्या एका दूर देशात— नि तेहि परतंत्र भारतात— राहाणाऱ्या एका सामान्य माणसाला त्याचें दर्शन घडणें केवळ अशक्यप्राय. तथापि त्याच्या छायाचित्रावरूनच (कारण हिटलर-मुसोलिनीप्रमाणें वृत्तपटातहि तो कधीं दिसत नाहीं.) जो कांहीं अंदाज बांधता येईल तो बांधणें क्रमप्राप्त आहे.

स्टालिनला प्रत्यक्ष पाहिलेलींहि काहीं माणसें आहेत, तेव्हा त्यांनीं केलेल्या त्याच्या वर्णनाचा आधार विश्वासार्ह समजावयास प्रत्यवाय नाहीं

## रशियन घोड्यावरील ' जॉकी

स्टालिनचें छायाचित्र गोअरिंग, हिटलर वा मुसोलिनी याच्यासारखें लष्करी गणवेषात बहुधा दिसत नाहीं अगदीं साधा आहे हा मनुष्य. ( अर्थात् हा ' राजकीय ' साधेपणा की सत्य साधेपणा असा प्रश्न कोणी विचारीलहि ). गोअरिंगच्या भपकेबाजीची तो टिंगल करतो म्हणे. परंतु धिप्पाड नि मजबूत हाडाचा हा जॉर्जियन दिसावयाला थोडासा रानवटच दिसतो विशेषतः त्याचे राठ केस तरी त्याच्या पहाडी मुलुखातील दांडगेपणाची साक्ष देतात त्याच्याकडे प्रथम दृष्टिक्षेप केल्यानंतर आदरापेक्षा साशंक भीतीचाच प्रादुर्भाव होण्याची शक्यता सर्वांत अधिक त्या व्यक्तीकडे पाहिल्यानंतर एक गोष्ट मात्र निःसंशय पटेल कीं, हा मनुष्य अरेराव असावा.

कॉकेशस पर्वतातील वज्रतुल्य ग्रेनाइट दगडापासून बनविलेला अभेद्य पुतळा असें त्याचें वर्णन कोणीतरी केलें आहे.

मागे फिरविलेले दाट काळे केंस, किंचित् आठ्या पडलेलें रुंद नि उतरतें कपाळ, ओठावरील फसवी हास्यछटा लपविणाऱ्या झुपकेदार नि भरपूर मिशा, भलेंमोठें, किंचित् बाकदार, लांब नि पुढें डोकावणार नाक, ठाशीव चौकोनी हनुवटी अशा चेहेऱ्याचा पुरुष आहे हा. देवीच्या वणांनीं ओबडधोबड झालेली त्याची नी मुद्रा भव्य नि थोराड दिसत असली तरी १८ कोटी जनतेवर अनियन्त्रित सत्ता गाजविणारा हा कोणी लष्करी हुकूमशहा असेल असें म्हणण्याचें धाडस, प्रथमदर्शनी करवत नाहीं. हिरवट रंगाच्या कातडीचा हा जॉर्जियन स्वभावानेंहि बराच हिरवट आहे हें सांगण्याची आवश्यकता बहुधा नसावी नाझी सैन्यातील 'स्टॉर्म ट्रुपर्स'पुढें उभा राहून उत्क्षोभक भाषणें करणारा हिटलर किंवा फ्रेंच सैन्यातील हुजरातीच्या स्वारासमोर सागराच्या गंभीरतेप्रमाणें सावकाश भाषण करणारा नेपोलियन हे आपापल्या सैनिकांना जे समाधान देऊं शकत असतील, तें समाधान काहीं

स्टालिनच्या लाल शिपायांना मिळत नाहीं. जातिवंत सैनिकाला ज्याच्या-कडे पाहून स्फूर्ति मिळावी, 'आपला सेनापति' म्हणून अभिमान वाटावा असें स्टालिनच्या त्या रेंगाळणाऱ्या भाषणात किंवा त्याच्या एकंदर व्यक्तित्वाच्या रुबाबात काहीं नाहीं थोर माणसे फार भरभर चालतात असें कुठेसे वाचले आहे मी. परंतु राजकीय क्षेत्रात झपाट्यानें पुढे सरसावलेला हा क्रेमलिनचा रशियन म्होरक्या अतिशय मंदगतीनें चालतो. पायात उंच अवजड बूट चढवून नि त्याच्या त्या जगद्विख्यात खाकी जाकिटावर एक साधारण हिरव्या रंगाचा रेनकोट घालून वावरणारा हा सर्वश्रेष्ठ असा सोव्हिएट अधिकारी—साऱ्या रशियाचा सूत्रधार—इतर सोव्हिएट अधिकाऱ्यांपेक्षा काहीं निराळा उठून असा दिसत नाहीं याच्या डोक्यावर दिसणारी ती जॉकी टोपी लोकांना कशाची निदर्शक वाटते कोण जाणे. परंतु मला मात्र त्या कपाळावर पुढें ओढलेल्या लोकरी टोपीकडे पाहून असें वाटते कीं, जणू जगातील महान् महान् सत्ताच्या शर्यतीत रशियन घोड्यावर स्वार होऊन बसलेला हा 'जॉकी' शर्यत जिंकण्याच्या चिवट ईर्षेनें आपल्या घोड्याला तुफान वेगानें पळविण्याचा प्रयत्न करीत आहे मग त्याच्या या प्रयत्नांत त्या बिचाऱ्या घोड्याच्या तोंडातून फेस येत आहे, तो धावायला असमर्थ झाला आहे—कशाकशा-कडेहि लक्ष देण्याला त्यावरील स्वाराला अवसर नाहीं, त्याला त्याचे भानहि राहिलेलें नसेल आणि कोणा भविष्यवाद्यानें या 'जिंकणाऱ्या' घोड्याचे 'फ्लूक' असें भविष्य वर्तविलें असल्यास कोण जाणे! जाऊ द्या हल्लीं युद्धामुळें आपल्या इकडच्या घोड्याच्या शर्यती बंदच आहेत नाहींतरी.

या रशियन सर्वाधिकाऱ्याचा वर वर्णन केलेला वेष उन्हाळा नि पावसाळा यात सारखाच असतो फक्त कडक हिवाळ्यात रेनकोटाच्या ठिकाणी अगडबंब सैनिक डगला येतो नि लोकरीच्या टोपीची जागा फरची टोपी घेते. ह्या स्वारीला कोणाचें बंधन आवडत नाहीं. म्हणूनच कीं काय, या पाश्चात्य पोषाखातूनहि गळफास किंवा नेकटॉय यांची हाकलपट्टी झालेली आहे.

वैद्य—डॉक्टर्सवर विश्वास नाहीं त्याचा त्याला हृदयाची व्यथा आहे.

त्यामुळें मधूनमधून त्याची तपासणी करणें आवश्यक असते, परंतु स्वारीला आपल्या तब्येतीची विशेष काळजी दिसत नाहीं सहकाऱ्यांनीं नि इष्टमित्रांनीं सारखा लकडा लावला कीं मग केव्हांतरी एखादे वेळीं डॉक्टरना तो तपासणी करूं देतो. त्याला कॅन्सरचा रोगहि जडलेला आहे अशी कुणकुण अलीकडे ऐकूं येते, परंतु त्यांत तथ्य नाहीं. उलट त्याची प्रकृति सुदृढ नि निरोगी अशीच दिसते

वयाला ६० वर्षे उलटून गेलीं तरी मूळचा उत्साह नि तेज स्टालिन-मध्यें अद्यापि कायम आहे असें मि. कार म्हणतो

## भ्रुकुटिभंग म्हणजे शरीरभंग

बेशिस्त नि धादरट माणसाची अति चीड आहे त्याला स्वतः तो फार शिस्तशीर नि विचारपूर्वक शांतपणें वागत असल्यानें त्याला इतर कोणीं धादरटपणा केला तर राग येणें साहजिक आहे तसा एखादा प्रसंग घडला तर त्याच्या रागाचा पारा मग किती चढेल ते कांहीं सांगतां येणार नाहीं आणि याच्या रागामुळें होणारा भ्रुकुटिभंग म्हणजे रागाला पात्र ठरलेल्या माणसाचा शरीरभंग असें जणूं समीकरणच !

स्टालिन स्वतःसंबंधी फारसा बोलत नसल्यानें अगर हिटलर-मुसोलिनी यांच्याप्रमाणें त्यानें आत्मचरित्रहि लिहिलें नसल्यानें त्याचें व्यक्तिचित्रण करणें अवघड होऊन बसलें आहे

अशी एक दंतकथा आहे कांहीं वर्षांमागें प्रसिद्ध रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यानें स्टालिनचें चरित्र प्रसिद्ध करण्याविषयीं त्याची परवानगी मागितली. मॅक्झिम गॉर्कीची योग्यता स्टालिन त्यावेळीं जाणून होता, व त्याची थोडी भीड पडून त्यानें प्रथम लहानसहान सबबी पुढें करून टोलवाटोलवीहि करून पाहिली त्याला एकदम नकार देण्याचें मात्र त्याच्या जिवावर आलें पण गॉर्की पडला पक्का खमंग, तो स्टालिन-च्या मनपटीलाच बसला अखेर स्टालिननें एका प्रसंगीं त्या लेखक महा-शयांना तडकन् उत्तर दिलें—"असल्या क्षुल्लक गोष्टी करीत बसण्या-इतका मला वेळ नाहीं. मेलेल्यांचीं नि ज्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता

झाली आहे अशाचीं चरित्रें लिहावींत वाटलें तर. माझें जीवनकार्य अद्यापि किती तरी व्हावयाचें आहे इतक्यात माझें चरित्रबिरित्र लिहिण्याची काहीं आवश्यकता नाहीं."

गोष्ट खरी असो वा खोटी असो; परंतु प्रश्न असा आहे कीं, ही त्याची विनयशालीनता की इरसाल ढोंगीपणा ?

जसे त्याचें जीवन अनेक रहस्यमय घटनांनीं भरलेलें आहे तसाच त्याचा स्वभावहि अनेक विसंगतींनीं परिपूर्ण आहे. त्या विसंगतीची संगति वा उपपत्ति लावणें ही गोष्ट पूर्णतः शक्य नाहीं, त्याचें कारण वर उल्लेखिलेल्या प्रयत्नाप्रमाणे स्वतःबाबत खरी माहिती बाहेर पडू न देण्याविषयी कळत वा नकळत स्टालिनकडून केले जाणारे प्रयत्न तो सर्वाधिकारी झाल्यानंतर त्याची प्रथम मुलाखत घेण्याचा मान युजेन लिऑं याला मिळाला.

तो जेव्हां सार्वजनिक व्यासपीठावर येऊन भाषण करितो, तेव्हा काही मोठ्या उत्सुकतेनें श्रोतृवर्ग त्याची वाट पहात कान टवकारून असलेला असेल असें नाहीं त्याला एक माहीत आहे. हजारदा नाना तऱ्हानीं तीच तीच गोष्ट लोकांच्या कानीं कपाळीं ओरडत राहिलें, थोडा धाकदपटशाचा उपयोग केला म्हणजे लोक ती ऐकतात; त्यांना ती पटते. यास्तव स्टालिन आपल्या भाषणात आपलें म्हणणे वारंवार पुनरुक्ति करून आग्रही वृत्तीनें श्रोत्यांच्या कानात घुसवितो. तीनदा माणसें त्या वाक्याचा विचार करितात. चौथ्या वेळीं तेंच वाक्य त्यांची मनें जिंकतें. त्यावर स्वार होऊन त्याना इष्ट दिशेला सहजासहज घेऊन जातें

तो मंदगतीनें बोलतो. विचार करून सावकाशपणें एकेक शब्द तोंडातून बाहेर पडावा असें त्याच्या संभाषणात दिसतें. कोणाशी बोलत असतांना त्याच्या हाताना काहीतरी चाळा लागतो टिपकागदावर मन मानेल तशा वेड्यावाकड्या रेघोट्या ओढीत नि समोर बोलणाऱ्या व्यक्तीकडे पूर्ण दुर्लक्ष करून तो बोलत असल्याचें वर्णन रॉसिटा फोर्ब्ज हिनें केलें आहे. त्याची लेखणी कागदावर झरझर चालत असताना त्याचा श्वासोच्छ्वास जड येऊ लागतो.

## तो वागतो कसा, बोलतो कसा ?

गप्पाचा तिरस्कार आहे त्याला. आवडता काळा पाईप पेटवून शात-पणें विचार करीत कुठेतरी दूरवर दृष्टि स्थिर करून अनेक तास अचल उभें राहाण्याची सवय आहे त्याला. अशा वेळीं निस्तब्ध शांतता त्याला हवी असते. वक्तृत्वाची देणगी परमेश्वरानें त्याला दिलेली नाहीं. त्याची विचारशक्ति मध्यम दर्जाचीच असून लेखनात नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचा विलास नसला तरी दुसऱ्याच्या मनाची पकड घेण्याचा गुण आहे. त्याचें वैशिष्ट्य कशात असेल तर तो सर्वोत्कृष्ट संघटक, परिस्थिति ओळखून नेमका घाव घालणारा योजक आहे, यात '

त्याचा आवाज धातुनादासारखा मजुळ आहे; पण तो फारसा बोलतच नाहीं. खाजगी सभाषणें जशीं कमी, तशींच प्रकट व्याख्यानेंहि तो क्वचितच देत असतो. वर्षातून फक्त दोनदा, मे व नोव्हेंबर महिन्यातील सार्वत्रिक लष्करी कवायतीच्या वेळी तो सार्वजनिक ठिकाणीं येतो. तेथीलहि प्रेक्षक नि श्रोते निवडक असतात. उपस्थित नागरिकानाहि लष्करी शिस्तीत उभें राहावें लागतें परवानगीविना कोणालाहि त्या प्रसगीं लाल चौकात जाता येत नाहीं पूर्वी तयार केलेलें असें भाषण वर्षातून तीन अगर चार वेळा तो करतो या भाषणाना अतिशय विस्तृत प्रमाणावर प्रसिद्धी दिली जाते. ही भाषणे पक्षाच्या अधिकृत वार्षिक अधिवेशनापुढें ( काँग्रेसपुढें ) होतात

उजाडणारा प्रत्येक नवा दिवस म्हणजे स्वतःचे व बोल्शेव्हिकांचें आसन स्थिर करण्यासाठीं करावी लागणारी धडपड असें त्याच्या दिनक्रमाचें वर्णन एकानें केलें आहे रोज सर्वसाधारण सतरा तास तो काम करतो असे सांगतात तो परकीयाच्या भेटी फारशा घेत नाहीं अनेक वर्षेपर्यंत त्यानें कोणाहि परकीय इसमाशीं भाषण केलें नव्हतें. तसेंच त्याने रशियातील अगर इतरत्र दुसऱ्या एखाद्या शहराला वा स्थानाला भेट दिल्याचें ऐकिवात नाहीं. सदा काम हेंच त्याचें जीवन आहे. त्याला जिव्हाळ्याचे सुहृद वा जवळचे स्नेहीहि कुणी नसावेत. ' मला सल्लागार कोणी नाहींत; फक्त सहकारी

आहेत ' अशी त्याची दर्पोक्ति असते

पोलिट ब्यूरोमध्यें त्याचे दहा सहकारी आहेत त्यापैकीं युद्धमंत्री व्हॉरॉशिलॉव्ह, परराष्ट्रमंत्री मोलोटॉव्ह व आबालवृद्धाना प्रिय असलेला कालिनिन हे त्याच्या विश्वासातील आहेत लाझार कागुनोव्हिच हा उद्योगधंदे खात्याचा मंत्रि स्टालिनप्रमाणेंच चर्मकाराचा मुलगा असून लहानपणींच त्यानें कम्युनिस्ट पक्षाची दीक्षा घेतली तो ज्यू असला तरी त्याचें प्रस्थ रशियात इतकें मोठें आहे की, स्टालिनशेजारीं त्याचें छाया-चित्र झळकतें स्टालिन ज्यूद्वेष्टा असला तरी लाझार कागुनोव्हिच त्याचा जीवश्चकण्ठश्च आहे म्हणतात. स्टालिननंतर त्याच्या स्थानाची वारसदारी कोणाकडे जाईल याबद्दल मोलोटॉव्ह, कागुनोव्हिच नि व्हॉरॉशिलॉव्ह यांचीं नांवें अनुक्रमानें ऐकू येतात.

ट्रॉट्स्की लिहितो. ' काठिण्य हें त्याच्या हाडींमासीं खिळलेलें आहे. कालगतीप्रमाणें स्टालिननें या गुणाचा उपयोग शस्त्रासारखा करून घेतला. स्टालिन जितका कठोर तितकाच चिडखोर आहे. एखाद्या वादात पराजय झाला तर तो तेथून पाय काढतो, एखादा कोपरा गाठतो नि आवडता पाईप शिलगावून सूडाच्या विचारात मग्न होऊन जातो ' हें त्याच्या रानटी व संकुचित मनाचें द्योतक नव्हे काय ? असा प्रश्न एका टीका-कारानें विचारला आहे. त्याचें शरीर जसें लोखंडी तसेंच मनहि कणखर, निश्चयी आहे, आणि त्याच्या या निश्चयी मनात एकदा सूडाचा अग्नि प्रादुर्भूत झाला, की दयामाया सर्व कांही त्यात भस्मसात् होऊन जातें ! आणि एकदा ठरविलेल्या मार्गापासून तो रेसभरहि कधी ढळावयाचा नाहीं.

बाहेरच्या लोकांशीं वागताना त्याची वर्तणूक अति साधी नि सौजन्य-पूर्ण असते नाटकी वृत्ति तर रोमरोमात भिनली आहे त्याच्या. त्याच्या मनाचा ठाव लागणें महा कर्म कठीण. एकान्तात असताना त्याचें उसनें हास्य मावळतें असें त्याच्या निकटवर्ती असलेले लोक सांगतात. औदा-सिन्याची लहरहि कैक वेळा त्याला येते तथापि त्याचा नैसर्गिक स्वभाव उदासवाणा नि एकलकोंडा आहे, असेंच म्हणावें लागेल

दिवसाचे दिवस अखंड काम करण्याची त्याची तयारी असते पण मधेंच लहर आली की उठून तो चित्रपट पाहाण्यास अगर नृत्याच्या समारंभानाहि जातो मात्र हॉलीवुडच्या चित्रपटाचा त्याला भयंकर तिटकारा आहे. त्याचा विश्रांतींतील आवडता खेळ म्हणजे बुद्धिबळें भग तासन्तास तो त्या डावात रंगून जातो. उरल्यासुरल्या वेळात पुष्कीन नि शेक्सपीअर ( अर्थात रशियन भाषेत रूपांतरित झालेले ) यांचें वाचन तो करतो असेंहि कांहीजण लिहितात.

' लेनिनप्रमाणेंच छानछोकी, दिखाऊपणा नि बडेजाव याचा तो तिरस्कार करतो ' असें त्याच्या खाजगी चिटणिसानें म्हटलें आहे. खाकी साधा पोषाख घालून वावरताना तो दिसतो मुसोलिनीचें नि या सोव्हिएट हुकूमशहाचें या बाबतीत दोन केसांइतकें साम्य आहे. स्टालिनच्या पोषाखावर एकहि बिल्ला वा पदक रुळताना आढळणार नाहीं.

स्टालिनची लेखनशैली सुस्पष्ट निःसंदिग्ध व शत्रूवर थेट हल्ला चढविणारी भेदक अशी आहे. त्याला निर्बुद्ध म्हणणारांनी या लेखनशैलीशीं परिचय करून घेतल्यास त्याच्या या आरोपाचें परस्पर निराकरण होण्यासारखें आहे त्यानें अनेक पुस्तकें लिहिलेली असून[1] हस्तपत्रकें तयार करण्यातहि त्याचा बराच लौकिक आहे पूर्ववयातच त्यानें दरिद्री माणसाला कुठेंहि उपयोगी पडतील अशा अनेक कला हस्तगत केल्या आहेत. मासे पागणें, पाकसिद्धि शिवणकाम, सुतारकाम यात तो चांगला निष्णात आहे उत्तम निशाणबाज म्हणूनहि तो ओळखला जातो मागें एकदा त्यानें एका भरसभेत पिस्तुलाच्या गोळीनें एका 'विश्वासघातक्या' चें काळीज टिपलें, तो प्रसंग त्याच्या अचूक लक्ष्यवेधाची साक्ष देईल.

## त्याचें कार्यालय व घर

झारच्या मॉस्कोमधील इतिहासप्रसिद्ध क्रेमलिन या राजवाड्यात

---

१ " लेनिन नि लेनिनवाद," " लेनिन, भाग १, २, ३" वगैरे त्याची पुस्तकें जगप्रसिद्ध आहेत अर्थातच तीं सर्व रशियन भाषेंत लिहिलेली आहेत

सोव्हिएट सर्वाधिकाऱ्याचें कार्यालय आहे. राजवाड्यातील तीन खोल्यांत त्याचे सरकारी कामकाज चालतें. अधिकाऱ्याच्या गाठीभेटी, पत्रव्यवहार, भाषणें तयार करणें इत्यादि कामें तो येथेंच उरकतो.

मॉस्कोपासून १५ मैलावर 'गॉर्की' नावाची एक टुमदार बंगली आहे हेंच स्टालिनचें घर. पूर्वी एका कोट्याधीश व्यापाऱ्याच्या मालकीची असलेली ही बंगली काही वर्षें स्वतः लेनिननें उपयोगात आणली होती. लेनिनचें निधन येथेंच झालें त्यानंतर स्टालिन तेथें राहू लागला बंगलीच्या सभोवार भली मोठी तटबंदी आहे, तिचा उपयोग स्वसंरक्षणार्थ होऊ शकतो. या निवासस्थानी जाण्यासाठीं एक खास रस्ता तयार केलेला असून त्यावर गुप्त हेर व सशस्त्र रक्षक यांचा १००–१०० यार्डांवर पहारा असतो. बंगलीपाशीं जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला व वाहनाला प्रथम अटकावून त्याची कडक तपासणी होते, आणि नंतरच रक्षकांना इष्ट वाटलें तर पुढें प्रवेश मिळतो. ऑगप्यूचे १५ हस्तक या ठिकाणीं पहाऱ्यावर असतात म्हणे.

सांप्रत घरीं त्याच्या तैनातीसाठीं नोकरांचा एक ताडा आहे. जुन्या जमान्यातील फर्निचर, विलासी ऐश्वर्याचीं साधनें, मेजें, खुर्च्या, जुन्या काळचीं मोठमोठ्या पुरुषांची नि प्रसंगांचीं छायाचित्रे सर्व कांहीं जसेंच्या तसेंच आहे. स्टालिननें त्यात काहीं बदल केलेला नाहीं. तें सामान त्यानें तेथून काढून टाकलें नाहीं हें खरें, परंतु त्याच्या साधेपणानुसार तो त्याचा उपयोगहि कधी फारसा करताना दिसत नाहीं.

त्याच्या स्वतःच्या खोलींत कागदपत्र, पुस्तकें नि इतर काम यांचा ढिगारा पडलेला दिसतो. त्यातच रंगून गेलेला तो आढळतो याच ठिकाणीं त्यानें कांहीं दिवस इंग्रजी शिकण्याचा प्रयत्न केला, परंतु पुढें ए–बी–सी च्या खडकाळ प्रदेशातून प्रवास करता करताच कंटाळून त्यानें ती पुस्तकें कायमचीं बांधून ठेविलीं. शेजारील दुसऱ्या खोलींतहि तो मधून मधून जाऊन बसतो. तेथें त्याचें आवडतें वाद्य–पियानोला– आहे. लेनिनला बुद्धिबळाचा नाद होता, नि त्यांत तो प्रवीणहि होता.

त्याचेंच अनुकरण करून स्टालिन बुद्धिबळें खेळू लागला नि देशभर त्या खेळाला उत्तेजन दिले जावे अशा त्यानें आज्ञा सोडल्या. गॉर्कीमध्यें तो सहसा कोणाचीच भेट घेत नाहीं. पक्षाच्या केंद्रातील त्याचा तिसरा चिट-णीस कागनोव्हिच, त्याचा जॉर्जियन सहकारी ऑर्डझोनिकिड्झ आणि मायकोयान हे तिघेच कम्युनिस्ट त्याच्या निवासस्थानी त्याची भेट घेऊ शकतात या ठिकाणी


क्रेमलिन या सुप्रसिद्ध ऐतिहासिक राजवाड्यातूनच हुकुमशहा स्टालिन रशियाच्या राजकारणाची सूत्रे हालवीत असतो.

क्रेमलिनला जरी राजवाडा असें म्हटलें जात असलें, तरी क्रेमलिन हा काही एकच राजवाडा असा नाहीं अनेक राजमहाल, चर्चेस ( ख्रिस्ती देवळें ), निवासस्थानें, शस्त्रागारें, सैनिकांची राहण्याची ठिकाणें, रुग्णालयें, बाजूना उंचच उंच तटबंदी असलेली मैदानें यांचा समुच्चय असलेली अशी ही एक लहानशी नगरीच आहे. मॉस्क्व्हा ( Moscva ) नदीच्या काठी ही क्रेमलिनची नगरी वसलेली आहे मॉस्को या शहराच्या सपाटी-पासून ही बरीच उंचावर आहे

ही बंदिस्त नगरी गेली अनेक शतके रशियन राज्यकर्त्यांचे निवास-स्थान म्हणून उपयोगात आणिली जात आहे. परकीय व स्वकीय शत्रूंनी त्यातील अनेक भागाची नासधूस केली, परंतु नुकतीच ही नगरी पुनश्च बादशाही थाटावर बांधण्यात आलेली आहे रशियन राज्यक्रान्तीनन्तर बोल्शेव्हिक अधिकाऱ्यांनी क्रेमलिनचा नादुरुस्त झालेला भाग ताबडतोब दुरुस्त करून आपली कार्यालये तेथे सुरू केली. लेनिन काही काल येथे राहात असे आज कालिनिन, मोलोटॉव्ह वगैरे सोव्हिएट श्रेष्ठी येथेच राहातात. तसेंच बुखारिन, रायकॉव्ह, झिनोव्हीफ हे हत्याकांडांत बळी पडलेले बोल्शेव्हिक नेतेहि येथेंच राहात असत.

क्रेमलिनमधील ज्या सभागृहात झारचा दरबार भरत असे, त्याच ठिकाणीं आता कम्युनिस्ट व सोव्हिएट कॉंग्रेस भरविल्या जातात लहान लहान महालात परदेशांतील सरकारी पाहुण्यांच्या स्वागताच्या जागा व

येथून तो राज्यसूत्रें हालवितो



क्रेमलिन राजवाडा

खलबतखाने आहेत. परंतु काहीं ऐतिहासिक इमारती व मंदिरें मात्र लोकाना प्रदर्शनीय म्हणून मोकळीं ठेविलीं आहेत.

क्रेमलिन राजवाड्यातून ( समतावाद्याना कदाचित् कसेंसेंच होईल हा शब्द ऐकून ! ) खाजगी निवासस्थानाकडे दिवसातून एकदा एक गोळी-बंद मोटार वायुवेगानें धावत जाते. ' बुलेट ' म्हणतात तिला सायंकाळी अगर रात्री बऱ्याच उशिरा स्टालिन आपल्या ' गॉर्की ' निवासस्थानाकडे परततो, त्या वेळचा हा प्रकार आहे. सकाळीं बरोबर ९ वाजता न चुकतां ' गॉर्की ' मधून ' क्रेमलिन ' कडे जातानाहि हीच तऱ्हा. दिवसातून अनेक वेळा मॉस्कोच्या काहीं विशिष्ट रस्त्यांवरील रहदारी एकाएकीं थांबविली जाते आला ' आला ' असें म्हणून आजूबाजूचे लोक कुतूहलानें पाहू लागतात. पण स्टालिनची मोटार केव्हा येते नि निघून जाते तें कळतहि नाहीं. त्यातूनहि ती गाडी बंद असते. दोन सशस्त्र रक्षक गाडीच्या पायऱ्यावर उभे राहातात मागें पोलीसाची मोटार तीन ' पॅकर्ड ' गाड्या नेहमी त्याच्या स्वारीबरोबर असतात यापैकीं कोणत्याहि एकात मोटार-हाक्याशेजारी तो बसलेला असतो रस्त्यातहि गाडी बदलण्याची लहर त्याला येते म्हणतात. अमेरिकन चित्रपट त्याला डोळ्यासमोर नको असले तरी अमेरिकन बनावटीच्या मोटारगाड्या त्याला विशेष आवडतात.

जगांतील सर्व हुकूमशहांत स्टालिनचा पगार कमी आहे. रशियन हुंडणावळीचे दर सदोदित बदलत असल्याने त्याचें नक्की प्रमाण सांगतां येणार नाही. परंतु सुमारें ३०० पासून ७५००० रुपयापर्यंत त्याचे वार्षिक वेतन आहे त्याला तसा फारसा खर्चहि नाहीं, कारण गरजाच कमी. जो कांही होईल तो सर्व खर्च सरकारी खजिन्यांतूनच चालतो. हिटलर अगर मुसोलिनीप्रमाणें त्याची खाजगी प्राप्ति नाहीं. पुस्तके लिहिली असलीं तरी त्यावर पैसा मिळालेला नाहीं.

## सुट्टींतील आराम जीवन

तो आपली सुट्टी कॉकेशस पर्वतांतील जॉर्जिया या त्याच्या जन्मभूमीत जाऊन घालवितो. जुलै–ऑगस्टच्या सुमाराला वृत्तपत्रातून ठळक मथळे

दिसू लागतात—“ भाई स्टालिन सुट्टीसाठीं कॉकेशसमध्यें रवाना. ”

या त्याच्या उन्हाळ्यातील विश्रांतिस्थानींहि कडक बंदोबस्त असतो. येथून अर्ध्या मैलावर यायचें म्हटलें तरी पोलिस–परवाना लागतो. स्टालिनच्या जुन्या स्नेह्याच्या भेटीचें हें ठिकाण आहे. हे दोन महिने नाचरगातच जातात. खाणेंपिणें, मद्यपान, नृत्य याचा बहर उडतो या प्रासादात. सोची हें काळ्या समुद्रासन्निध असलेलें लङ्गनसें गाव त्याचें आवडतें आहे. सभोंवार दाट फळझाडाची बाग नि मध्यें गर्द हिरव्या रंगाचा हा वाडा मोठा खुलून दिसतो. आपल्या बागेंतील फळाफुलाचा स्टालिनला मोठा अभिमान असून आलेल्या पाहुण्याला बाग दाखविणें त्याला आवडतें. तेथें पाहुणचार भोगून आलेल्या एका भाग्यशाली गृहस्थानें आपल्याला स्टालिन तेथें कसा दिसला याचें वर्णन करताना ‘ तो मोठा हौशी, प्रेमळ, साधासुधा नि कामाचा कधींहि कंटाळा नसलेला असा आहे, ’ असें म्हटलें आहे.

## त्याचें मन व काळा पाईप

विशिष्ट अमेरिकन तंबाखूचा काळा पाईप तोंडात धरून आपल्या महत्त्वाकांक्षेच्या गगनभराऱ्यात दंग झालेला हा राक्षसी पुरुष प्रत्यक्ष पाहाण्याचा योग क्वचितच, परंतु त्या एकान्तात नि नैसर्गिक मनःस्थितींत तो कसा दिसत असेल याची कल्पनाच मोठी रम्य वाटते. तो मद्यपानहि करतो त्याचा आहार मोठा असून गोड पदार्थांचा भरणा त्यात विशेष असावा लागतो वैद्यकीय सल्लागाराना त्याला नियमित आहार ठेवण्याची सूचना वारवार द्यावी लागते, परंतु तो नियम पाळण्यापेक्षा मोडलाच अधिक जातो. हुकुमशहाना हितकारक अगर विरोधी असा कोणताच सल्ला ऐकण्याची सवय नसते असे अनुमान यावरून काढल्यास तें चूक ठरणार नाहीं असें वाटते.

मासाचे तुकडे घालून शिजविलेला भाजीचा रस्सा त्याला फार आवडतो. त्याचें जेवण आधुनिक देशी पद्धतीच्या ताटातूनच होतें, त्यांपैकीं काहींवर अद्यापि झारचें नाव आहे. तो दुपारीं नि सायंकाळीं आपली

प्रियतमा नि मुलें यांच्यासह भोजन करतो. या घरगुती जेवणाचे वेळीं सहसा बाहेरचे कुणी पाहुणे नसतात जेवताना त्याची फक्त हाता-तोंडाची गाठ असते, बोलणें क्वचितच. दिवसात घडलेले प्रसग वा राज-कारण या कशाहि बाबत आपल्या पत्नीशी चर्चा करीत बसण्याची त्याला आवड नाहीं. जेवण पुरें होताच खुर्ची मागें सरकवायची, पाईप पेटवा-यचा नि मनाशी कल्पनारम्य चित्रें रेखाटण्यात गढून जावयाचें हा त्याचा नित्यक्रम. या वेळीं त्याच्या मनःसागरावर कसली राजकीय खळबळ चालू असते अगर त्या वेळी त्याच्या मानससरोवरावर त्याच्या यशस्वितेचा गूढ गुजारव चालू असतो हें कळणें कठीण.

या मनःस्थितीचे वर्णन एका लेखकानें—S Dmitrievsky—केलें आहे. “Calm and immobile sits Stalin, with the stone face of a prehistoric dragon, in which alone the eyes are living His thoughts, wishes, plans crowd upon his mind . . .

He knows all that is happening in the spaces of immense Russia But nothing agitates him He has no doubts ”

**पहिलें लग्न**

इतर क्रांतिकारकांप्रमाणें स्टालिनच्याहि कपाळीं संसारसुख फारसें नाहीं. त्याच्या आयुष्याची पहिलीं बरींच वर्षें त्यानें ब्रह्मचर्यावस्थेंतच घालविलीं. कॉकेशस पर्वतातील आपलें निवासस्थान सोडून तो मॉस्कोकडे आला, त्या वेळीं त्यानें आपल्या पत्नीची घेतलेली भेट शेवटची ठरली. कारण ती लवकरच ( १९०७ सालीं ) क्षयाला बळी पडली. १९०३ मध्यें म्हणजे वयाच्या २४ व्या वर्षी स्टालिननें हें लग्न केलें होतें. ही त्याची प्रथम पत्नी स्वानिद्झ नावाची एक निरक्षर जॉर्जियन तरुणी होती ही पतिसेवाधर्माच्या जुन्या परंपरेत वाढलेली असल्यानें एकीकडे तिचा पति क्रांतिकारकांच्या गुप्त सभांतून अत्याचारी कारस्थानें करण्यात गढलेला असे तर घरी त्याच्या सुरक्षिततेसाठीं ही माउली परमेश्वराची प्रार्थना

करीत बसे. आपल्या ध्येयमार्गाशी समरस होणारी सहचरी या नात्यानें त्याने तिच्याकडे कधीच पाहिले नसल्यानें तिच्या त्या धार्मिकतेस स्टालिननें अडथळा केला नाही. ती वारल्यानंतर तिचा मुलगा याशा उघडा पडला या पोरक्या बालकाचें पालनपोषण करण्याइतका वेळ स्टालिनला नव्हता. त्याच्या स्नेह्यांनीच ते काम केले. गृहजीवनाचे सौख्य स्टालिनला फारसे लाभलेंच नव्हतें त्या काळीं त्यामुळे पति अगर पिता यापैकी कोणतेंच कर्तव्य तो पार पाडू शकला नाही

## लोहाराच्या मुलीची प्रेमकथा

हुकूमशहा स्टालिनचे दुसरें लग्न म्हणजे नाडयेझडा या लोहाराच्या मुलीशीं झालेला प्रेमविवाह होय, असें सांगितलें असताना काही अरसिक मानसशास्त्रज्ञांच्या कपाळावर आठ्या चढतील. त्या चढोत वा न चढोत, स्टालिनचा सहकारी ॲलील्यूव्हा याची कन्या नादीय्या या १७ वर्षें वयाच्या सुकुमार बालिकेशीं ४० वर्षांच्या तरुण (!) स्टालिनचा प्रीति-विवाह झाला हें ऐतिहासिक सत्य आहे. त्याला कोणी बाल–जरठ विवाह असें म्हणून नाकेंहि मुरडतात. (बोल्शेव्हिकांच्या या 'देवा' ला नांवें ठेवण्याची अशी सवय अनेकाना आहे!) हें लग्न १९१९ मध्यें झालें

या दोघांमधील प्रणयप्रसगाचे रसभरित वर्णन एका लेखकानें केलेलें आहे. त्या प्रणयलीलेविषयीं प्रथम शंका प्रदर्शित करूनच ती हकीगत खालीं देण्याचें धाडस मी करीत आहे

ही कोमल बालिका आपल्या वयाच्या १२ व्या वर्षीच ३५ वर्षें वयाच्या स्टालिनचें व्यक्तिमत्त्व पाहून मोहित झाली ॲलिल्यूव्हा याची स्टालिनवर आत्यंतिक निष्ठा होती, म्हणून त्यानें नादीय्याचा धर्मपिता (God-father) होण्यासाठीं स्टालिनला विनंति केली. अर्थातच स्टालिननें त्याला नकार दर्शविला त्या काळीं स्टालिनला पकडण्याची आज्ञा (वॉरंट) सुटलेली होती नि त्यामुळें ॲलील्यूव्हाकडे तो अज्ञात-वासात होता पुढें स्टालिन पकडला जाऊन सेंट पीटर्सबर्गच्या कारागृहांत बंदिस्त झाला. त्या वेळीं कैद्यांना मांसाचें पॅटीस विकण्याचे निमित्त करून

ही लहानगी मुलगी तेथें जाई नि स्टालिनचे गुप्त निरोप निरनिराळ्या ठिकाणीं पोंचविण्याचे नि निरनिराळ्या स्थानाहून ते आणण्याचें काम ती कौशल्याने करी

—आणि या प्रेमकथेचा शेवट एखाद्या कादंबरीप्रमाणें प्रेमाला आंधळें करून परस्पराच्या प्रीतिविवाहात झाला स्टालिनच्या या चिमुकल्या प्रणयिनीने त्याला एकदा जिवावरच्या प्रसंगातून वाचविल्याचेंहि सांगतात. स्टालिनचा राग शांत करण्याचें बिकट काम ती करीत असे अत्यंत शांत, सुंदर, कमनीय, बुद्धिमान नि प्रेमळ असे तिचें गुणवर्णन केलें जातें दोन मुलें झाल्यावरहि औद्योगिक महाविद्यालयात ती शिकण्यासाठीं जात असे ती भूतदयाशील असल्यानें लोकप्रियही झालेली होती

ह्या स्त्रीच्या देहान्ताविषयीं इतके विलक्षण भीषण नि परस्परविरोधी लोकप्रवाद वा दंतकथा पसरलेल्या आहेत कीं, त्यातील खरी कोणती तेंच कळणें कठीण होऊन बसलें आहे दि. ९ नोव्हेंबर १९३२ रोजीं या दुर्दैवी बाईचा अकालीं अंत झाला हें मात्र निर्भेळ सत्य आहे या मृत्यूबद्दल निरनिराळे प्रवाद आहेत परंतु स्टालिनचे हिच्यावर निस्सीम प्रेम होतें येवढें खरें रशियातील कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रस्थानी एका महत्वाच्या जागेवर काम करणारा निकोलाय मासीच या नावाचा एक अधिकारी आहे त्यानें अधिकृत म्हणून लिहिलेला एक लेख अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. ह्या लेखातील कथन सत्य मानलें तर त्यातून बरीच काळींबेरीं कुलगडीं बाहेर पडतील तो अशी माहिती देतोः—"रशियांतील मोठमोठे सरकारी अधिकारी केव्हा केव्हा एकत्र जमून मद्यपान करितात. बेसुमार मदिरापानानें झिंगलेल्या या अधिकारी वर्गांत वाटेल ते प्रकार सुरू होतात. स्टालिनला दारू फार लवकर चढते. अशाच एका प्रसंगीं स्टालिनला निशा चढून तो तेथें उपस्थित असलेल्या एका युवतीचा अनुनय करू लागला मॉस्को बॅलटमधील २४ वर्षें वयाच्या सिमयोनव्ह या नटीवर तो आसक्त झाल्याची अफवा पुढे पिकली, तीच ही युवती. नादीय्याला तें सहन झाले नाहीं तिनें स्टालिनला त्यापासून परावृत्त करण्याचा यत्न

केला. परंतु उलट स्टालिन नि त्याची प्रेयसी हीं दोघेंहि तिची टिंगल करू लागली. ती चिडली व तिनें आत्महत्येची धमकी दिली. त्या धमकी-चीहि थट्टा झाली लगेच नादीय्या, तेथून तावातावानें बाहेर पडली थोडक्याच अवधींत पिस्तुलाची गोळी उडाल्याचा आवाज झाला. नादीय्या मरून पडलेली होती ! स्टालिनला या अनपेक्षित दुर्घटनेचा धक्का बसला स्टालिनच्या तेथील सहकाऱ्यांनी कम्युनिस्ट चालीरीतींना उघडपणें लाथा-डूनहि स्टालिनच्या दुःखाबद्दल सहानुभूति व्यक्त करण्यासाठी त्याच्या मृत पत्नीची थाटात प्रचंड प्रेतयात्रा काढली.

तिचें शव मोठ्या समारंभानें पुरण्यात आलें. त्या थडग्यावर अधोमुख युवतीचा एक सुंदर पुतळा उभारण्यात आला आहे. या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं हातात फुलाचा गुच्छ घेऊन स्टालिन अनेकदा जातो. मृत पत्नीच्या दगडी समाधीवर फुलें वाहाण्याइतकी कोमल भावना कठोर स्टालिनच्या अंतःकरणात असेल यावर कित्येकाचा विश्वासहि बसत नसावा ”

सरकारी अहवालात नि वृत्तपत्रात नादीय्या ‘अपेंडिसायटीस’नें (पोटा-तील विकार) वारली असें प्रसिद्ध करण्यात आलें तिनें आत्महत्त्या केली, यापासून तों स्टालिननें तिच्यावर विषप्रयोग केला, येथपर्यंत सर्व प्रकारचे लोकप्रवाद प्रचलित आहेत.

## स्टालिन ! आणि तरुणींबरोबर ?

मॉस्कोच्या ऑपेरा हाऊसमध्यें (नाट्यगृह) कांहीं वर्षांपूर्वीं एके दिवशीं एकदम खळबळ माजून गेली ‘स्टालिन ! आणि तरुणीबरोबर ? ’ जो तो हलक्या आवाजात एकमेकाला विचारू लागला, प्रश्नार्थक मुद्रेनें पुटपुटू लागला स्टालिननें एखाद्या सार्वजनिक ठिकाणीं कोणा एखाद्या सुंदर तरुणीसह प्रकट व्हावें ही जनतेला आश्चर्याचा धक्का देणारी अपूर्व अशी घटना होती, लोकांना त्याचें आश्चर्य वाटलें यात नवल नव्हतें !

वर उल्लेखिलेल्या त्या युवतीचें नाव मराया डँचेनको. ही स्टालिनच्या सान्निध्यात कशी आली नि स्टालिनचें प्रीतिपात्र कोणत्या रीतीनें बनली ती एक योगायोगाची घटना आहे. युक्रेनमधील सांघिक शेतीचे प्रयोगात

तिचें बालपण गेलेलें होतें. कोणताहि पदार्थ पुष्ट व उत्कृष्ट स्वरूपात पिकविणाऱ्या शेतकरी संघाचें अभिनंदन करण्याची सरकारी प्रथा त्या काळीं रशियात विशेष होती. शुगर बीट्सच्या पैदाशींत उत्कृष्ट यश संपादून पुष्ट व सुंदर बीट्स तिनें पिकविले होते युक्रेनमधील एका यशस्वी शेतकरी संघाचें पुढारीपण तिच्याकडे आलें होतें. त्या संघानें संपादिलेल्या सुयशाबद्दल त्याचें अभिनंदन व्हावयाचें होतें, म्हणून ती मॉस्कोला आली होती तिच्या श्रमाबद्दल तिला पारितोषक द्यावयास नेहमीच्या पद्धतीप्रमाणें स्वतः स्टालिन पुढें आला. तिच्या कमनीय सौंदर्यानें तो तत्क्षणीच मोहित झाला. तो त्या वेळीं कदाचित गोंधळलाहि असेल. पण त्यानें सस्मित होऊन त्या तरुणीला विचारलें, " जगात तुला सर्वांत प्रिय वस्तु कोणती ? "

" विद्यापीठाचें शिक्षण " ती न भिता उत्तरली.

काही दिवसातच मॉस्को विद्यापीठामध्यें मरायाचें नाव नोंदविण्यात आलें. ' स्टालिनची लाडकी ' अशी तिची ख्याति झाली सर्वत्र. क्रेमलिन-च्या सरकारी कार्यालयातून मेजवानीचीं निमंत्रणें तिला मधूनमधून येऊं लागलीं. सार्वजनिक समारंभात स्टालिनबरोबर उपस्थित राहाण्याचा अगर मिरवण्याचा पहिला मान मरायानें मिळविला. ही एकटीएकच या मानाची अधिकारी आहे अजूनपर्यंत तरी स्टालिन मरायाशीं विधियुक्त लग्न करणार कीं नाही, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो परंतु स्टालिनचें तिसरें लग्न जॉर्जियातील कोणा एका स्त्रीबरोबर झालें असल्याचें निकोलाय मासीच सांगतो.

## रोझ आणि दोरासझन

नादा कागोविच तथा ( ऊर्फ ) रोझ ही स्टालिनच्या एका सहकारी मित्राची—भाई कागनोव्हिच—बहीण एके काळीं स्टालिनची प्रणयिनी म्हणून रशियन जनतेंत प्रसिद्धि पावली होती. सोव्हिएट कारभारात हात असणारे नि स्टालिनच्या खास मर्जीतील बरेच लोक प्रत्यक्ष क्रेमलिनमध्येंच राहा-तात. रोझ ही एका खात्यात काम करीत असल्यानें नि स्टालिन

तिच्यावर प्रसन्न असल्यामुळें क्रेमलिनमध्येंच तिचा निवास सुमारें एक वर्ष होता. लोकाना काय, तेवढेंच कारण पुरलें. रोझ—स्टालिन याच्या प्रणयलीलाच्या कपोलकल्पित अफवाना—ऑगप्यूच्या टेहेळणीची योग्य ती काळजी घेऊन—ऊत आला. परतु पुढें वर्षभरानतर रोझ स्वगृहीं निघून गेल्यावर त्या लोकवार्तांना खळ पडला. आता रोझ दुसऱ्या कोणाशी तरी विवाहबद्ध झाली असल्याचे म्हणतात. तथापि स्टालिनला शेती-व्यवसाया-तील तरुणीच अधिक आवडतात, असें कुणी अनुमान काढल्यास तें चूक होईल का ?

रोझप्रमाणेंच दोरासझन या जॉर्जियन स्त्रीबद्दल मधें लोकात अफवा होती स्टालिनच्या जन्मभूमीतील टिलीस या खेड्याकडून दोरासझन या नावाची एक स्वरूपसुदरी मॉस्कोमध्यें आली होती 'कडव्या क्रातिकार-काचा त्वेष नि कळकळ यानीं या सुकुमार तरुणीचे अत करण प्रज्वलित झालेलें आहे' असें लोक त्या वेळीं तिचें वर्णन करीत दोरासझन ही मोहक तरुणी होती. स्टालिनचा व तिचा कुटेतरी निकटचा सबध आल्यानें त्या दोघाच्या सबधाबद्दल मॉस्कोमधील जनता कुजबुजू लागली होती.

## आवडती कन्या, नावडता पुत्र

स्वानिट्झ या पहिल्या पत्नीपासून झालेला त्याचा मुलगा याशा सध्या २९-३० वर्षांचा असेल एका कारखान्यात मेकॅनिक म्हणून तो नोकरी करतो. त्याचे व त्याच्या वडिलाचें कधींच पटलें नाहीं. एकमेक एक-मेकाचें तोंडहि पाहात नसावेत. याखेरीज दुसऱ्या विवाहापासून त्याला दोन मुलें झाली वॅसिली हा मुलगा १९ च्या दरम्यानचा असून मुलगी स्वेटलाना सुमारें १४ वर्षांची आहे. या एकुलत्या एका मुलीवर स्टालि-नचे अतोनात प्रेम आहे. ही त्याच्याबरोबर अनेक वेळा दिसते. तिला शाळेत जायला नको असतें परतु तिनें शाळेंत गेलेंच पाहिजे नि शिस्त शिकलीच पाहिजे असा स्टालिनचा आग्रह असतो. ही त्याची कन्या अगदी थेट आपल्या आईच्या वळणावर आहे

## राजकीय बुवाबाजी

रशियाच्या या अनभिषिक्त सम्राटाच्या खाजगी जीवनाचे पापुद्रे

अधिक खोलवर जाऊन उकलून पाहाण्याची तुमची इच्छा कितीहि अनिवार असली नि ते उकलून दाखविण्यासाठीं मीहि किती उत्कंठित असलों तरी यापेक्षा अधिक खोलीत शिरताच येत नाहीं. हिमालयाच्या उत्तुंग शिखरावरील एखाद्या अधाऱ्या गुहेत असलेल्या योग्याविषयी अगर परमार्थाच्या नि अध्यात्माच्या अवडबरानें स्वतःचें सत्य स्वरूप झाकून घेणाऱ्या एखाद्या बुवाबाजीनिपुण 'महाराजा–' विषयीं सामान्य जनतेला अति कुतूहल असतें. किंवा राजकीय क्षेत्रातीलच उदाहरण द्यावयाचें म्हटलें तर हिंदुस्थानातील राजकीय सन्त गांधीजी यांचें देतां येईल या राजकारणी 'महात्म्या' नें आपल्याभोवतीं जसें एक गूढ कल्पनाचें वलय मोठ्या कौशल्यानें निर्माण करून घेतलें आहे, तसेंच एक चमत्कारिक आभासाचें वलय स्टालिननें स्वतःभोवतीं उत्पन्न करून ठेविलें आहे. मागे एका प्रकरणात 'इझवेस्ता' या पत्रातील जी एक कथा उद्‌धृत केली आहे त्यावरून माझ्या या म्हणण्याचें प्रत्यतर येऊ शकेल जर्मनीचा हुकूमशहा हिटलर याची हीच पद्धति आहे

हिंदुस्थानातील बहुसख्य जनता निरक्षर व अज्ञ आहे रशियातील कामगार व शेतकरी वर्ग यापेक्षा फारसा वरच्या प्रतीचा नाही. अर्थातच अशा प्रकारची राजकीय 'बुवाबाजी' स्टालिनला तेथें सहजसाध्य झाली. अर्थात् स्वत बुवाबरोबर त्याचा इरसाल शिष्यगण स्वार्थाच्या अपेक्षेनें त्या बुवाबाजीवर जी ईश्वरी सामर्थ्याची जिल्हई देतो तशी जिल्हई स्टालिनच्या जीवनाला दिली गेली नसेल असे म्हणतां येणार नाही, पण शिष्याचें लटाबर जमविणारा बुवा त्याच्याहूनहि अधिक धूर्त असणें सभवनीय असतें!

असो. स्टालिनच्या या वैयक्तिक जीवनावर अधिक विचार न करता त्याच्या स्वभावातील परस्परविरोधाचा उगम कोठें आहे हें शोधणें आवश्यक आहे.

## स्टालिन एक नरयंत्र

एक गोष्ट निःसशय–कीं जोसेफ स्टालिन हा रशियन क्रान्तीचा एक एकनिष्ठ पायिक आहे. त्यानें ती क्राति टिकवून धरण्यासाठी अनेक बरींवाईट

कृत्यें केली असली तरी त्यांत क्रान्तीचें हित त्यानें पाहिलें होतें हें निर्विवाद व्यक्ति या दृष्टीनें त्यानें सोसलेल्या हालअपेष्टा, यातना नि केलेला स्वार्थत्याग त्याला खरोखरीच भूषणास्पद आहे. क्रांतिकालात सतीचें वाण हातीं घेऊन जॉर्जिया या आपल्या जन्मभूमीतून तो जो एकदा बाहेर पडला, त्यानतर त्यानें मागें मुळींच पाहिलें नाहीं घरी पत्नी मृत्युमुखी पडली, मुलगा पोरका झाला, घरादाराची वाताहात उडाली, तरीहि त्यानें त्या आपत्तींची तमा बाळगिली नाहीं सैबेरियातील सीमापारीत अनन्वित जुलुमाला नि निर्दय दडपशाहीला तोंड देऊनहि त्यानें आपली क्रान्तीची सेवा अखडपणे चालविली होती त्याची आकांक्षा प्रचड होती, त्याची इच्छा दुर्दम्य होती राजकारणातील डावपेंच खेळतानाहि त्यानें फक्त ध्येयाकडे दृष्टि ठेविली होती ( अर्थात ध्येय बरोबर कीं चुकीचें हा प्रश्न निराळा, परतु त्यानें स्वतःचें म्हणून जें ध्येय ठरविलें होतें, त्याच्याशीं मात्र तो एकनिष्ठ राहून अव्यभिचारी भक्तीनें त्या ध्येयमूर्तीची पूजा बाधीत राहिला एवढें खरें. ) ध्येय गाठताना उपयोजावे लागणारे मार्ग कितीहि कठोर, निर्दय असले तरी त्या ठिकाणीं त्यानें स्वत.च्या वा दुसऱ्याच्या भावनाचा यत्किंचितहि विचार केलेला नाहीं. त्याच्यापाशीं पापपुण्याच्या कल्पनाच नसाव्यात, आणि म्हणूनच तो बेडरपणे वाटेल त्या घोर सकटात नि.शकतेनें उडी झोकू शकतो

ही धडाडी, ही निष्ठुरता, हा साहसीपणा ट्रॉट्स्कीमध्यें तर नाहींच परन्तु लेनिनमध्येंहि नव्हता. लेनिनला एखादा तीव्र दु.खाचा कोरडा लागला तर त्याच्या डोळ्यांतून अश्रु गळले असतील हें म्हणणे वाचकाना नि मलाहि पटू शकतें, पण स्टालिनबाबत असें सागणें धाष्टर्याचें वाटतें. त्यावर विश्वास बसत नाहीं अशी त्याच्या मनाची नि शरिराचीहि विशिष्ट ठेवण आहे. त्याच्या ठिकाणीं ध्येयसाधनेसाठीं आत्यतिक तळमळ असेलपण कदाचित् त्या तळमळीच्या प्रखर अग्नींतच त्याच्या इतर साऱ्या नाजुक वा कोमल अशा मानव्याच्या भावना जळून पार खाक झाल्या असाव्यात आतां स्टालिन हा एक यत्र बनलेला आहे, तो यापुढें माणूस

म्हणून शिल्लक उरलेला नाही—आणि कोणाला कडु लागेल—पण मला असें निःसंदिग्धपणें म्हणावयाचें आहे की, अशी 'नरयंत्रे' च जगातील अत्यंत प्रचंड अशा घडामोडी घडवीत असतात ! फरक येवढाच की, राक्षसी महत्त्वाकांक्षेनें प्रस्फुरित झालेलें बादशाही नेपोलियनचें मानवी यंत्र जगाच्या संहाराला कारणीभूत होतें तर स्वातंत्र्याच्या तेजस्वी ज्योतीनें पेट घेतलेले क्रांतिवीर गॅरीबॉल्डीचें मनुज–यंत्र परतंत्र इटालीला स्वातंत्र्याच्या वैभवशिखरावर चढवितें. या दोन प्रकारांत स्टालिनचें स्थान कोठें आहे हें आजच सांगण्याची घाई न करितां गतिमान कालाच्या निर्णयाकडेच तें सोपवून द्यावें हें बरें !

**वेल्सच्या मतांत शब्दाचा फरक**

जगद्विख्यात साहित्यिक मि. एच्. जी. वेल्स यानीं स्टालिनाविषयीं आपलें मत खालीलप्रमाणे प्रकट केलें आहे.

" स्टालिनशीं मी गप्पागोष्टी केल्या आहेत तो असामान्य बुद्धिमत्तेचा माणूस आहे असें मला वाटलें नाहीं, परंतु प्रामाणिकपणा व दणगटपणा याबरोबर त्याच्या ठिकाणीं माणुसकीहि आहे असें मला वाटतें. "

मि. वेल्स यांच्या या विधानांत फक्त एकाच शब्दाचा फरक आता करावासा वाटतो—नि तो म्हणजे " त्याच्या ठिकाणीं माणुसकीहि 'आहे' " यातील 'आहे' या ऐवजी 'होती' हा शब्द घालावा कारण माणुसकी या वर्णनांत मनुष्याला स्वतःसंबधींची जाणीव असणें ( Self-Consciousness ) हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे; परंतु स्टालिनसंबधीं बोलावयाचें झालें तर तो आता आपल्या स्वतःला विसरून गेला आहे असें म्हणावें लागेल आणि त्यानें स्वतःच एके ठिकाणीं म्हटल्याचें मागें आलें आहेच की, " मी म्हणजे रशिया ! " त्याला स्वतंत्र अस्तित्व, भावना, विचार, आचार—कांही नाहीं.

—आणि म्हणून हा जो स्टालिनरूपी, स्टालिननिर्मित, स्टालिनचा रशिया तो आज कोणत्या ठिकाणीं आहे, कोणत्या मार्गानें चालला आहे, कोठें जाऊन पोहोंचणार आहे नि तुम्हाआम्हांला—हिंदू समाजाला त्याच्या विषयीं कांही निकडीचा विचार कर्तव्य आहे कीं काय हें आतां पाहू.

# हा ' स्वर्ग ' तुम्हांला हवा ?

" आमचें राष्ट्र पारतन्त्र्याच्या रौरवात पिचत असता, आमच्यावर सत्ता गाजविणारें तुमचे राज्य, न्याय व सत्य यावर कसें अधिष्ठित असू शकेल ? "

" How can you be a nation of Justice and Right;
While we are a nation of slaves ? "

एफ्. वाय. मेयरनें ब्रिटनला विचारलेला हाच नेमका प्रश्न, आज सोव्हिएटाच्या लाडगेतोंडीत नष्टप्राय झालेली पोलिश जनता नि रशियन आक्रमणाखाली चिरडले जाणारे फिनिश लोक, कामगाराच्या सर्वाधिकाऱ्याला विचारीत आहेत. या विषम मृत्युलोकावर कामगाराचा, समतेचा स्वर्ग निर्माण करण्याची घोषणा गर्जत पुढें सरसावलेले, दलितांचे कैवारी नि गरिबाचे कनवाळू, स्वातन्त्र्याचे रक्षक नि समाजसत्तावादाचे पायिक, जगावर नव्या ओजस्वी, तेजस्वी नि अभिनव

तत्त्वज्ञानाची आयात करू पाहाणारे अशा सोव्हिएट श्रेष्ठींनीं, लहानग्या पोलंडचे नि चिमकुल्या फिनलंडचे लचके तोडले आहेत. रशियाच्या कैवाऱ्यांनो, स्टालिनच्या भक्तांनो नि बोल्शेव्हिझमच्या उपासकांनो, शब्द शिल्लक आहेत का तुमच्यापाशीं या अन्याय्य, अमानुष, पाशवी आक्रमणाचें समर्थन करण्यासाठीं ?

बुद्धानें मूर्तिपूजेचा नायनाट करण्याचा चंग बांधून तेजस्वी वैदिक धर्मावर कांहीं काल मात केली, पण पुढें त्याचेच अनुयायी, बौद्ध भिक्षु नि भिक्षुणी बौद्ध देवाच्या प्रतिमा उभारून, त्यांचीं मंदिरें बांधून, त्यांच्या प्रचंड, भव्य मूर्ति निर्माण करून, हे मूर्तिपूजेला तिलांजलि देण्यासाठीं निघालेले बौद्धानुयायी बुद्धदेवाची पूजाअर्चा करण्यात निमग्न होऊन गेले. सरकार ही संस्थाच अजिबात नष्ट करण्यासाठीं पुढें सरसावलेल्या स्टालिन आदि रशियन क्रांतिवाद्यांनीं आज नेमकी तीच गोष्ट घडविली आहे. मी माझ्या मनचें नाहीं सांगत—हा डोस्टोव्हस्कीच ओरडून सांगतो आहे. (" The Possessed ") तो कबूली देतों कीं,—" आम्ही ज्या ध्येयाकडे जावयाचें ठरविलें होतें त्याच्या बरोबर विरुद्ध दिशेला येऊन पोहोंचलों आहोत. " एक दशांश लष्करी अधिकाऱ्याची सत्ता नऊ दशांश जनतेवर चालू लागली आहे. कामगारांना, मजुरांना नि शेतकऱ्यांना सत्तादान करण्याची घोषणा करीत करीत या बोल्शेव्हिकांच्या सम्राटानें असें एक प्रचंड, भक्कम, बळकट नि अपूर्व राज्ययंत्र निर्माण केलें कीं त्याच्या काठिण्याच्या, दंडपशाहीच्या, सोटेशाहीच्या तुलनेनें क्रूर झारशाहीहि मागें पडेल राष्ट्रीयत्वाचा धिक्कार करणाऱ्या सोव्हिएटाच्या राज्यांत १९३६ पासून स्वदेशाभिमान नि मातृभूमीवरील निस्सीम प्रेम यांचीं गीतें गायिलीं जाऊं लागलीं राष्ट्रवादाला मूठमाती देण्यासाठीं उभारलेली लाल सेना आंतरराष्ट्रीयवादाचे साधेहि नियम पायाखालीं तुडवून ' रशियाकी जय ' म्हणून गर्जना करूं लागली, इतकेंच नव्हे तर फिनलंडसारख्या स्वतंत्रतेंत जगणाऱ्या देशावर साम्राज्यविस्तारासाठीं आक्रमणें, स्वाऱ्या, मोहिमा करूं लागली धर्माला

अफू मानून त्याला फुकून द्यावयास निघालेल्या रशियात रशियनत्वाचा नवा धर्म उदय पावू लागला कला, साहित्य, राजकारण सर्व कांहीं रशियन वैशिष्ट्याच्या गडद मुलाम्यानें चकाकू लागलें. जागतिक क्रान्तीची चळवळ वाऱ्यावर विरून गेली जगातील पुढारी भकास चेहेऱ्यानें 'इन्क्विलाब झिंदाबाद' म्हणून ओरडता ओरडताच सोव्हिएट रशियाचा नवा अवतार पाहून स्तिमित होत्साते विचारूं लागलेः 'स्टालिनचा नैतिक अधःपात झाला का हो? रशियानें आपल्याला तोंडघशी पाडलें काय हो?' त्याचें उत्तर स्टालिनभक्तांना विचारा ते मोठे चतुर आहेत. प्रामाणिकहि असतील कदाचित्. त्याचें उत्तर येईल—नव्हे येतेंचः "अहो, बिघडले कुठें? स्टालिननें पोलंडचा लचका तोडला तो पोलंड राष्ट्र नाझींच्या पंजाखालून वाचविण्यासाठीं. फिनलंडवर स्वारी केली ती साम्राज्यवादी ब्रिटनला शह देऊन जागतिक क्रान्तीचा मार्ग मोकळा करून घेण्यासाठीं. सोव्हिएट सैन्य उद्यां हिंदुस्थानवर चाल करून आलें तर आम्ही त्याचें स्वागतच करूं ते आमचे नि साऱ्या जगाचे उद्धारक आहेत" वारे पांडित्य! शाबास त्याच्या युक्तिवादाची! धन्य त्याच्या अंधभक्तीची!

——आणि हे म्हणे जगताला शांततेचा, सुखाचा नि चिरंतन स्वातंत्र्याचा राजमार्ग मोकळा करून देणार!

कशाला थापा मारून इतरांची नि त्याबरोबरच स्वतःचीहि फसवणूक करून घेण्याचा प्रयत्न करतां?

सोव्हिएट साम्राज्यवादाचें उघडेंनागडें स्वरूप जगाच्या निदर्शनाला आतां स्पष्टपणें आलेलें आहे ज्याच्या राज्यात कामगारांना संप करून आपली गाऱ्हाणीं जनतेसमोर मांडण्याचाहि साधा अधिकार कायद्यानें दिलेला नाहीं, ज्या ठिकाणीं बोल्शेव्हिक—नव्हे स्टालिनवादी पक्षाखेरीज दुसरा कोणताहि पक्ष अवैध मानला जातो, नागरिक स्वातंत्र्याचे सामान्य व प्राथमिक अधिकारहि ज्या सरकारनें हिरावून घेतले आहेत, त्यांनीं कामगार वर्गाच्या, कामगार वर्गासाठीं, कामगार वर्गाकडून चालविल्या जाणाऱ्या सर्वाधिकारी

शासनाच्या गप्पा कशाला माराव्या ? ज्या राज्यातील कामगार नि शेत-करी वर्ग निःशस्त्र केलेला आहे, तेथें लोकस्वातन्त्र्याची महती गाण्यात काय अर्थ आहे ?

## बोल्शेव्हिझम-विरोधी तत्त्वांचें गुंथाडें

ज्याला बोल्शेव्हिझम म्हणून म्हणतात, तें परस्परविरोधी तत्त्वाचे एक गुथाडें आहे. त्याचें आद्य तत्त्व जें स्वतंत्र व्यक्तित्वाचा नाश तें निसर्ग-विरुद्ध व आधुनिक सुधारणा युगात परागतिक असें आहे बोल्शेव्हिझम निसर्गविरुद्ध कसे, याचें विवेचन करण्यासाठी एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल, परंतु येथे त्याचा थोडक्यात विचार करू.

अनादि जगत्शक्तीच्या ठिकाणीं अहंभाव स्फुरण पावला नि त्यातून अखिल ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली, असा एक सिद्धांत वेदांत्यांनीं मांडलेला आहे. एथपासूनच या 'मी' पणाची सुरवात झाली. हा 'मी' आहे म्हणून सारें चराचर आहे याची जाणीव आपल्याला होते त्या 'मी' च्या अस्तित्वाबरोबरच त्या 'मी' शीं संलग्न असणाऱ्या सर्व विश्वपसाऱ्याची उत्पत्ति— त्या 'मी' पुरती होते, नि त्या 'मी' च्या नाशाबरोबरच त्या अफाट विश्वपसाऱ्याची–त्या 'मी' पुरती—इतिश्री होते. अर्थातच या मी" खेरीज उत्कर्ष वा अपकर्ष, उत्क्रांति अथवा परागति संभवत नाहीं म्हणजेच त्या सर्व गोष्टी सापेक्ष आहेत तेव्हा या 'मी'चाच नाश करण्याचा प्रयत्न या जगत्कारणाचेंच समूळ उच्चाटण करण्यासारखा नाहीं काय ?

## आर्थिक योजनेचे तीन तेरा

नाझीझम अगर फॅसिझमप्रमाणें बोल्शेव्हिझममध्येंहि समाजातील कोणाहि घटकाला स्वतंत्र व्यक्तिमत्व नाहीं. ती प्रत्येक व्यक्ति राष्ट्राची एक गुलाम घटक आहे असें म्हणतां येईल राष्ट्राचा सर्वाधिकारी सांगेल तसेच तिनें वागावयाचें. तिची प्रत्येक कृति जशी सर्वाधिकारी–शासनानें मर्यादित केलेली आहे, तसेच तिचे विचारहि ( जपानमधील Thought Control प्रमाणें ) नियंत्रित करण्याचा प्रयत्न रशियात केला जात आहे.—

अर्थात् ही गोष्ट पूर्णतः प्रत्यक्षात येणें अशक्यप्राय आहे 'ऑगप्यू' हें रशियाचें गुप्त हेर खातें कितीहि कार्यक्षम नि आपल्या कामात वाकबगार असलें तरी प्रत्येक व्यक्तीच्या मनात चालणाऱ्या त्याना अनिष्ट असलेल्या विचाराना तें आळा घालू शकत नाहीं म्हणून लाखोंवारीनीं कत्तली कराव्या लागतात, शेकडों सहकाऱ्याचें हत्याकांड घडवावें लागतें आणि हें अपरिहार्यच होतें. स्टालिन हा अरेरावी वृत्तीचा हुकूमशहा तेथें होता म्हणून त्यानें तें केलें असें नव्हे, स्टालिनला परिस्थितीनें तें करण्यास भाग पाडलें. त्यावाचून त्याला गत्यंतरच नव्हतें स्टालिनच्या जागीं लेनिन असता अगर ट्रॉट्स्की येता तरी त्यानाहि तेंच करावें लागलें असतें कारण रशियन राज्यक्रान्ति ज्या पायावर घडविली गेली तो पायाच चुकीच्या तत्त्वाचा बनविलेला आहे. निसर्ग विरुद्ध मनुष्य असाच हा एक झगडा होता मानवी प्रयत्नानें कांहीं काल निसर्गाशीं टक्कर देता आली परंतु त्या झुंजींतून जें कांहीं निष्पन्न झालें तें अल्पायुषी होतें. त्या फलनिष्पत्तीची आयुर्मर्यादा वाढविण्यासाठीं तिला रक्तमांसाचें खत घालावें लागलें. परंतु तरीहि तो कृत्रिम डोलारा कायम टिकून राहणें शक्य नव्हतें.

सामुदायिक शेतीची योजना नि खाजगी मालमत्तेचें संपूर्ण उच्चाटण या गोष्टी जनतेला पटणाऱ्या नव्हत्या. 'लष्करी समाजसत्तावादा'च्या गोंडस नावाखालीं हे प्रयोग जनतेच्या गळीं उतरविण्याचे प्रयत्न सोव्हिएट श्रेष्ठींनीं करून पाहिले, परंतु त्यातहि ते अपयशी ठरले. त्यांना शेवटीं मूळपदावरच यावें लागलें हळूहळू खाजगी मालमत्तेला पुनश्च परवानगी देण्यात आली धान्याच्या लहान प्रमाणावरील व्यापाराला संमति देण्यात आली. ही निसर्गाला शरणागतिच आहे आर्थिक योजनेचे हे असे तीनतेरा वाजले

## धर्म नि संस्कृति-रशियन

आता धार्मिक प्रश्न विचारात घेतला तरी तीच स्थिति दृष्टोत्पत्तीला येईल. रशियाचा अधिकृत किंवा सरकारी धर्म अनीश्वरवादी अगर नास्तिकवादी आहे. परंतु ह्या अधिकृत धर्माला धर्म म्हणून नाव देण्यास

बोल्शेव्हिक विचकतात वस्तुतः रशियाचा आजचा धर्म 'रशियन' असाच सांगावा लागेल धर्म हें नावच समूळ नष्ट करावयास निघालेला सोव्हिएट रशिया अद्यापि त्या कार्यांत यशस्वी होऊ शकलेला नाही. उलट धर्मविषयक कायद्यात फेरफार करून आपल्या चुकीची कबुली अप्रत्यक्षपणे त्यानें दिली आहे

देवळें, ख्रिस्ताच्या, मेरीच्या व साधुसंताच्या मूर्ति, धर्मग्रंथ यांचा तेथें नाश करण्यात आला. साधुसंतांचा छळ करून त्यांची वर्षासनें व संपत्ति जप्त करण्यात आली. शाळातून, वृत्तपत्रातून नि सर्वत्र देव व धर्म यांचेविरुद्ध प्रचार सुरू झाला जन्म, लग्न, मृत्यु यांचे सर्व विधि मोडण्यात आले, त्याऐवजी सरकारी नोंदणी सुरू झाली पण अखेर स्टालिनला धार्मिक स्वातंत्र्य ( Freedom of Worship ) जनतेला देणें भाग पडलें.

सांस्कृतिक बाबतीत तरी रशियाचा प्रयोग कितपत यशस्वी ठरला ? याचें उत्तर बॅसिली देतोः

"In the cultural sphere the Bolshevik experiments have produced . ..a marked reduction in the common patrimony, the disappearance of national capital, both material and moral through senseless waste" ( P 458 )

सामाजिक परिवर्तनातहि बोल्शेव्हिकांना तसेंच अपयश आलेलें दिसेल. याबाबत हिंदी समाजवाद्यांचे नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांचेंच एक उद्धृत दिलें असता अधिक खात्री पटेल.

"तेथें ( रशियात ) असें बरेंच घडले आहे कीं, ज्यामुळें माझ्या मनाला तीव्र यातना झाल्या, आणि त्या घटना मला अजिबात संमत नाहींत, असें पंडितजींनी लिहिलें आहे

### स्वैराचार हा एकच आचार

रशियाच्या समाजसत्तावादी सरकारनें केलेल्या नव्या सामाजिक कायद्याचें काहींसें स्वरूप पुढील मासल्यावरून लक्षात येण्यासारखें आहे

रशियात १ लग्नसंस्कार अनवश्यक २ व्यभिचार ( Adultary ) गुन्हा नाहीं, ३ गर्भपात कायदेशीर असून सरकारी रुग्णालयात केला जावा; ४ लग्नानंतर किंवा पूर्वी कोणापासूनहि झालेली मुलें कायदेशीर, ५ घटस्फोटाला केव्हाहि वाटेल तितके वेळा मुभा व कारणें देण्याची अनवश्यकता इत्यादि.

कुटुंबसंस्था ही भांडवलशाहीस उत्तेजक आहे या कल्पनेनें ती उखडण्याचा प्रयत्न तेथील सरकारनें केला. कुटुंबाकरितां शिल्लक टाकण्याची बुद्धि माणसाला होते, ते भांडवल भांडवलशाहींत व धनसत्तेंत रूपांतरित होतें. म्हणून कुटुंबसंस्थाच नष्ट करावी अशी सोव्हिएट विचारसरणी होती. अर्थात कुटुंबसंस्था नाहींशी करावयाची म्हणजे लग्नाची आवश्यकता नष्ट करणें, संततिनियमनाच्या प्रसाराला पाठिंबा देणें व गर्भपात कायदेशीर ठरविणें हें क्रमप्राप्त आलें. या तत्त्वप्रचारासाठीं शिक्षणालयें, बालकगृहें यांची उभारणी करावी लागली. संसारातील सर्व गरजा घराबाहेर भागविण्याची सोय करणें भाग पडलें त्यामुळें रशियाच्या समाजव्यवस्थेचेच बारा वाजले.

' स्वैराचार ' हा एकच आचार रशियात शिल्लक राहिला, रतिसुखाचा भयंकर अतिरेक होऊन तरुण पिढी दुबळी, रोगी नि भेषपात्र बनली याचें अधिक वर्णन करण्यापेक्षा मॉरिस हिंडस याच्या "उध्वस्त मानवजात" ( Humanity uprooted ) या ग्रंथातील एक वाक्यच तत्कालिन रशियन समाजाचें यथार्थ चित्र डोळ्यापुढें उभें करू शकेल. तें वाक्य असें " रशियांतील ह्या स्वैराचारानें मानवजात पशुवत् होईल की काय अशी भीति वाटते ! "

अखेर स्टालिनला हे कायदे बदलावे लागले. त्याचें थोडक्यात दिग्दर्शन करावयाचें तर खालील कांहीं गोष्टी सांगतां येतील १८ वर्षांच्या अनुभवानें रशिया शहाणा झाला, स्टालिनचे डोळे उघडले, समाजशास्त्रज्ञांना आपली घोडचूक कळून आली, नि म्हणून समाजसत्तावादी सरकारनें केलेले कायदे रशियाला बदलणें भाग पडलें

" गर्भिणीच्या जीवास गर्भामुळें धोका येत नसल्यास केलेला गर्भपात गुन्हा " ठरू लागला " सुखी व चिरस्थायी " कुटुंबें रशियात असावींत असा स्टालिनने संदेश दिला ज्या मातेला पाचांपेक्षा जास्त मुलें होतील तिला दर मुलामागें १००० रूबल्स सरकारातून दिले जाऊ लागले, वर 'अष्टपुत्रा भव ' असा आशीर्वादहि मिळू लागला !

वर्गरहित समाजरचना नि सरकार ( State ) संस्थेचें अजिबात उच्चाटण ही मार्क्सवादाचीं दोन आद्य तत्त्वें, त्यावरच स्टालिनने घाला घातला सरकारी अधिकारी, बुद्धिजीवी, कारागीर यासारख्या वर्गांचे गट त्याने वाढीला लावले. त्याची कामगार व शेतकरी वर्गांशी फारकत झाली. ' गरजेप्रमाणें ज्याला त्याला वेतन देण्याऐवजी, ' ' ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणें त्याला मोबदला देण्याची ' जुनी पद्धती पुनश्च व्यवहारिली जाऊ लागली.

## रशियनांच्या आत्म्याची खरेदी

क्रान्तीनन्तर आज जवळजवळ दोन तपें लोटलीं; अद्यापि लेनिननें व त्यामागून स्टालिननें आश्वासिलेल्या उदात्त, उन्नत व सुखमय जीवनाचा सूर्य कुठेंच उगवलेला दिसत नाहीं रशियन जनता त्या तेजस्वी प्रकाशाची वाट पाहून पाहून थकली आहे आता उलट झारशाहीमध्यें जीं कांहीं सुखे नि थोडेबहुत स्वातंत्र्य त्याच्या पूर्वजांना मिळालें त्यानाहि ते पारखे झाले आहेत. हातात पैसे असून माल मिळत नाही, वस्त्रप्रावरणें, विजेचे दिवे, स्वयंपाकाची भांडीकुंडीं, रॉकेल इत्यादि दैनंदिन जीवनाला अत्यवश्यक अशाहि वस्तूंचा तुटवडा भासतो. १९३३ पर्यंत लोकानी तें सोसल. राष्ट्रासाठीं, चागले दिवस येतील या आशेने कळ काढली. १९३४, १९३५ साल व ३६ चा पूर्वार्ध थोडा सुखावह होता. पदार्थ बाजारात दिसू लागले. जिनसा लागतील त्या मिळू लागल्या, पण १९३६ च्या मध्यावरतीच रशियन जनतेने व्यक्तिस्वातंत्र्य गमावलें. त्या १९३६ च्या स्टालिनप्रणीत आदर्श घटनेचेंहि तकलादी स्वरूप पुढें प्रत्ययास् आले. सोव्हिएटविरोधक म्हणून वा कम्युनिस्ट म्हणून रशियातील लहानमोठ्याची कत्तल

झाली. त्याला सुमार नव्हता. जुलुमाची सक्रान्त कोसळली त्यामुळें लोकांचा उत्साह खचला.—आणि हें सारें कशामुळें? प्रचड लष्करी सिद्धता, शस्त्रास्त्रवाढ, लाल लष्करावरील अवाढव्य खर्च नि कर्तबगार, समर्थ ब्रोल्शेव्हिकांचें व कम्युनिस्टांचें अदूरदर्शी शिकांण. अनुभवी तत्र-विशारद, विद्वान् साहित्यिक, वाकबगार शास्त्रज्ञ, कोणी—कोणीच शिल्लक राहिला नाहीं. सोव्हिएट पुढाऱ्यातील कर्तबगार रक्ताची परपराच नष्ट झाली उरला एकटा काय तो हुकूमशहा स्टालिन नि त्याच्याभोंवतीं गोड बोलणारा ' होयबा ' चा वर्ग.

म्हणून लुई फिशरनें लिहिलें आहे "आतां कधींहि न येणाऱ्या भविष्य काळावर विश्वासून पैसा ओतण्यास रशियन जनता राजी नाहीं."

रशियातील शेतकरी कामगारापेक्षा हलाखींत दिवस कढीत आहे. कामगार अथवा शेतकरी हे दोन्ही वर्ग अद्यापि नि:शस्त्र आहेत. देशात घरगुती परवान्याची अभिनव पद्धती सुरू आहे. साऱ्या सरसीमावर सोव्हिएट पहारेकरी डोळ्यात तेल घालून कडक दृष्टि ठेवीत आहेत. परवान्याविना देशाबाहेर पडण्याचा प्रयत्न करणें हें मृत्यूला निमत्रण्या-सारखेच असतें !

"स्टालिननें रशिया म्हणजे एक स्थानबद्धाची छावणी बनविली आहे" —मि ग्रेगरी बीनस्टॉक म्हणतात; आणि इतकें करून त्यानें काय सपादिले तें ते पुढील शब्दात वर्णितात: "एखाद्यानें अखिल पृथ्वीचें राज्य सपादिलें नि त्याबदला स्वत्व गमावले, स्वतःच्या आत्म्याचा होम केला तर काय उपयोग त्या वैभवसपादनाचा?" "भौतिक द्रव्य सपादून रशियन जनतेचा आत्मा स्टालिननें खरेदी केला आहे"

## तें आपण साध्य करूं

हा कामगाराचा स्वर्ग ! माझ्या हिंदु बाधवानो, तुम्हाला आपल्या प्रिय हिंदुस्थानावर असा 'स्वर्ग' अवतरावा अशी अजूनहि इच्छा आहे का? सारें जग चढाऊ राष्ट्रवादाच्या मदानें धुद होऊन गेलें आहे मानवी सस्कृतीचाच समूळ नायनाट होऊन जातो कीं काय, अशी भीति तज्ज्ञ

नि विचारवंत व्यक्त करीत आहेत. साऱ्या अवनीतलावर संहारक महा-युद्धाचा वणवा कमीअधिक प्रमाणात पेटलेला दिसतो. जो प्रबल असेल तोच जगेल. निर्बलाला विनाशाच्या खोल दरींत नष्ट होऊन जावें लागेल!

आता थांबायला वेळ नाही प्रत्येक क्षण लाख मोलाचा आहे त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला नाहीत तर नामशेष होऊन जाल तुमची पुरातन, सनातन नि उदात्त संस्कृति, तुमचा सहिष्णु नि जगत्कल्याणशील समाज, तुमचा खरा तेजस्वी नि चिरंतन शांततेचा नेता असा धर्म—सारें सारें इतिहासजमा होऊन जाईल. अजून जागे व्हा. संघटित नि सामर्थ्य-संपन्न झालात तर रशियाला जें घडवितां आलें नाही, कर्तृत्वसंपन्न लेनिनला नि राक्षसी स्टालिनला जे साधलें नाहीं तें आपण, आपलें हिंदुराष्ट्र करून दाखवील.

सोव्हिएट रशिया एक बलाढ्य राष्ट्र आहे, जोसेफ स्टालिन त्या राष्ट्राचा एकमेव पुढारी आहे. आणि तो—राष्ट्रीय भावनेनें पाहिलें तर—एक महा-पुरुष आहे. नुकत्याच उदयाला येऊ लागलेल्या हिंदूंच्या राष्ट्रव्यापी राष्ट्रीय संघटनेला त्याच्यापासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे!

# परिशिष्ट

## ( छापतां छापतां )

कल्पना नव्हती आणि एकाएकी हिटलरचें सैन्य १५०० मैलांच्या विस्तृत आघाडीनें रशियावर तुटून पडलें. दि. २२ जूनच्या पहाटेची ही गोष्ट स्वतः हिटलरनें युद्धघोषणा केली, परंतु ती नाझी रणगाडे सोव्हिएट प्रदेशात घुसल्यानंतर.

साहजिकच तुम्ही विचाराल कीं, नाझींच्या नेत्याचा वर्षांनुवर्षें अनुनय करणारा हा स्टालिन एकाएकीं हिटलरच्या मर्जीतून का उतरला ? तुम्हांला आठवत असेल, मागें पृष्ठ १६४ वर लिहिलें आहेः " एकमेकानी ( रशिया व जर्मनी ) एकमेकाच्या गळ्यात गळे, केव्हातरी कापण्याची संधि आणूच आणू अशा अंतस्थ उद्देशानें, घातले." या वाक्यातच नाहीं का, या नव्या आकस्मिक घटनेचें मर्म ?

म्हणजे त्याचें असें झालें. स्टालिनचें धोरण युद्ध टाळण्याचें; परंतु त्याबरोबरच सोव्हिएट यूनियनसाठीं शक्य तो तो लग्गा साधण्यासाठीं तो

सारखा धडपडत होता जर्मनीला पश्चिम नि पूर्व या दोन आघाड्यावर युद्ध नको होतें. म्हणून पोलडवरील स्वारीच्या वेळीं तिनें रशियाला चुचकारून शांत केलें. पण त्याच क्षणीं त्या राष्ट्राच्या दोघांहि धुरीणांना चांगलें माहीत होतें कीं, दूरच्या भविष्यात करावयाच्या घनघोर संग्रामाची ही नांदी आहे !

युद्धघोषणा करिताना जर्मन फ्यूरेर हर हिटलरनें सांगितलें कीं, बोल्शेव्हिझमच्या अरिष्टापासून जगाचें रक्षण करण्यासाठीं आम्हीं हा लढा आरंभिलेला आहे ' सोव्हिएट परराष्ट्रीय प्रधान मॉ. मोलोटॉव्ह बर्लिनला आला असता त्यानें खालील चार गोष्टी जर्मनीपुढें मांडल्या, असें हिटलर आपल्या घोषणेंत सांगतो. त्या अशा: (१) रुमानियाच्या बेसरेबिया व बुकोव्हिना प्रांतावर रशियानें स्वारी केल्यास जर्मनी रशियाला साहाय्याची हमी देईल काय ? ( २ ) रशियाला फिनलंडपासून भय वाटत आहे; तरी या परिस्थितीत जर्मनी फिनलंडच्या मदतीला सैन्य पाठवील काय ? ( ३ ) जर्मनीला रशियापासून सुरक्षितेचें आश्वासन व बल्गेरियावर चालून जाण्यासाठीं सैन्य पाहिजे आहे का ? ( ४ ) रशियाला डार्डानेल्समधून वहातुकीची सरहा मुभा व बॉस्फरसच्या सामुद्रधुनीपाशीं लष्करी नि आरमारी ठाणीं मिळण्यास जर्मनी आडकाठी करील काय ?

परंतु या मागण्याकडे किंवा अटीकडे जर्मनीनें कानाडोळा केला, आणि तेव्हांपासून जर्मनीविरुद्ध रशियाचीं कारस्थानें अधिक जोरानें शिजूं लागलीं.

आणि त्याचें प्रत्यंतर जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेनट्रॉप यानें बर्लिनमधील सोव्हिएट वकिलाच्या हातीं सोव्हिएट राष्ट्रसंघाच्या विश्वासघातकी नि कपटी वर्तनाबद्दल तक्रार असलेला जो खलिता दिला, त्यात सांपडतें. रूसो-जर्मन अनाक्रमणाचा करार झाल्यापासून स्टालिनने जर्मनीच्या हितशत्रूची भूमिका कशी कशी वठविली याचें साद्यंत वर्णन या खलित्यात आहे. याचा अर्थ त्या खलित्यातील शब्दन् शब्द खरा मानावाच असा नाहीं; तरीपण त्यात बरेंच तथ्य आहे

अनाक्रमणाच्या अटी जर्मनीकडून कसोशीनें पाळल्या जात असता रशियाने मात्र नव्यानें आक्रामिलेल्या प्रदेशात नाक्याच्या जागा मिळवून जर्मनीविरुद्ध बडाळी माजविण्याचा प्रयत्न केला. त्यानें आर्क्टिक महासागरापासून काळ्या समुद्रापर्यंत शक्य तेथें आपलें लष्करी सामर्थ्य वाढवून युरोपला आपल्या बोल्शेव्हिक तत्त्वज्ञानाच्या टाचेखालीं आणण्याचा सतत प्रयत्न केला. बेसरेबिया प्रांत सैनिक शक्तीच्या दडपणावर लाटून बुकोव्हिनावरहि तो आपला अन्याय्य हक्क सांगू लागला. याखेरीज बल्गेरियाबाबतची जर्मनविरोधी घोषणा, बाल्टिक संस्थानाचा अपहार, फिनिश स्वातंत्र्याचा नायनाट करण्याची मागणी, युगोस्लाव्हियातील नाझीविरोधी प्रतिक्रांतीला पाठिंबा, तुर्कस्थानला जर्मनविरोधी गटात ओढण्याचा प्रयत्न आणि रुमानियन सरसीमेवर लाल सैन्याची प्रचंड जमवाजमव या आणि इतर अनेक गोष्टी रशियानें केल्या. अर्थातच रशियाचें सामर्थ्य असें हळूहळू वरचढ होऊं देणें जर्मनीला अनिष्ट होतें. स्टालिन हिटलरचें सामर्थ्य ओळखून होता नि आहे, परंतु तो इतरत्र भयंकर लढा लढविण्यात गुंतला असल्यानें आपल्याकडे वळणें आत्ताच शक्य नाहीं, अशी स्टालिननें समजूत करून घेतली असावी. कारण जर्मन स्वारी झाल्याची वार्ता ऐकून रशियन श्रेष्ठींना आश्चर्य वाटलें, असें स्वतः मोलोटॉव्हनेंच सांगितलें आहे. एवीतेवी केव्हातरी लढावें लागणारच, मग रशियाला प्रबळ होऊन आपल्या अंगावर चालून येण्याची संधि तरी कां द्या, असा विचार करून जर्मन सेनापतींनी रशियाच्या बेसावधतेचा फायदा घेऊन घाव घातला. स्टालिनचे युद्ध टाळण्याचे प्रयत्न धुळीला मिळाले. त्याला त्या वेळीं नको असलेली गोष्ट घडली.

आता पुढें काय? नाझी सेनानी तर ही मोहीम ३।४ महिन्यातच उरकण्याची भाषा बोलत आहेत. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवावयास पाहिजे कीं, रशियासारखा अवाढव्य म्हणजे एकूण जगाच्या एक षष्ठांशाएवढा असलेला भूप्रदेश सबंधच्या सबंध नाझी अमलाखालीं आणण्याची अनर्थकारक आशा त्यांनीं धरलेली नसावी. युक्रेनचा तेल व धनधान्यें यांनीं

समृद्ध असलेला प्रांत, कॉकेशसमधील तेलखाणींचा प्रदेश नि रशियाची नाकेबंदी करणारीं उत्तरेकडील नि काळ्या समुद्रातील सोव्हिएट बंदरें एवढेंच हस्तगत करण्याची त्याची योजना असावी —आणि तें फार सोपें नसलें तरी अशक्य कोटींतील मात्र नव्हे !

आज रशियापाशीं जें लष्करी सामर्थ्य आहे त्याविषयीं तज्ज्ञ माणसांत मतभिन्नता दिसते. उगीच दोन—चार वर्षांपूर्वींचे आंकडे सांगण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तरीपण सैनिकसंख्या व विमानदल या बाबतींत सोव्हिएट राष्ट्रसंघ जगांत पहिल्या श्रेणींत बसावा असें वाटतें. आरमाराचा मात्र त्याच्यापाशीं अभावच दिसतो, आणि यंत्रसज्ज सैन्याच्या बाबतींतहि जर्मनीच्या अचाट शक्तीपुढें त्याचा टिकाव लागणे कठीण !

त्याबरोबरच दुसऱ्याहि एका अरिष्टाला सोव्हिएट श्रेष्ठींना तोंड द्यावें लागण्याचा संभव आहे. सोव्हिएट सरकार नि तेथील निरनिराळ्या २८ राष्ट्रिकांची मिळून बनलेली सुमारे १८ कोटींवर जनता यांचे परस्पर संबंध कसे आहेत, रशियन जनतेला आपल्या राज्यकर्त्यांविषयी किती प्रेम व आपुलकी वाटतें हें मागील कांहीं प्रकरणांतून आपण पाहिलेंच आहे. तेव्हां चालून आलेल्या या सुसंधीचा फायदा लिथुआनियानें स्वतंत्रतेची घोषणा करण्यांत जसा घेतला, तसा लाटाव्हिया, इस्थोनिया, युक्रेन वगैरे लहान लहान संस्थानें घेणार नाहींत कशावरून ?

सोव्हिएट रशियाला ब्रिटन आणि अमेरिका यांनीं साहाय्य करण्याचें आश्वासन दिलें आहे पैकीं ब्रिटनचें साहाय्य म्हणजे काय हें आतापर्यंतच्या युद्धावरून स्पष्ट झालेलेंच आहे, आणि ते येण्याचा मार्ग जर्मनीच्या माऱ्यांत आहे हें विसरून चालणार नाहीं अमेरिकेकडून पॅसिफिकमार्गें व्हलाडिव्होस्टॉक बंदरांतून रशियाला कुमक येणार आहे म्हणे ! परंतु जपानचें धोरण नि त्याचें पॅसिफिकवरील सामर्थ्य विचारांत घेतल्यास ही कुमक मध्यंतरीं पॅसिफिकच्या तळाशींच जाईल कीं काय अशी शंका वाटते.

उलट जर्मनीच्या पक्षाला जें प्रचंड सामर्थ्य उभें आहे आणि तिच्या पाठीमागें जी ताजी विजयपरंपरा आहे, त्यावरून जयाचें पारडें कोणत्या

बाजूला झुकेल याविषयीं फारसें साशंक राहाण्याचें कारण दिसत नाहीं. तुर्कस्थान या रशियन सीमेवरील कणखर देशानें जर्मनीशीं सख्य जोडलें आहे. स्वीडन, फिनलंड, पोलंड, रुमानिया, स्पेन, इटाली आदि लहानमोठीं राष्ट्रें या युद्धांत हिटलरशीं सहकार्य करण्यासाठीं सज्ज आहेत.

— आणि आतां या रात्रीपर्यंत हातीं आलेल्या माहितीवरून जर्मन-गरुडानें घातलेली ही नवी झाप फारच थोड्या अवधींत यशस्वी होण्याची शक्यता आहे कीं, उलट जर्मनीलाच एक भयंकर टोला बसणार आहे या बाबतींत बरेंच सांगण्यासारखें आहे. परंतु चालू राजकीय परिस्थिति तें तसें सांगू देणार नाहीं, म्हणून येथेंच थांबतों. पुनः. ..

२७–६–४१

RLLBK-0006159

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६१५८